19-03-2010 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

MSS/ 11:00

19-03-2010 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-1

MSS/ MMP/ D/ 11:00

सभापतीस्थानी माननीय सभापती

पृ.शी. / मु.शी : नियम 289 संबंधी

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी नियम 289 संबंधी सूचना दिलेली आहे.

सभापती : मी सभागृहाला सांगू इच्छितो की, दिनांक 12 मार्च 2010ला नियम समितीची जी बैठक झाली त्यामध्ये असा निर्णय घेतलेला आहे की, या सदनामध्ये काही वेळा प्रश्नोत्तराच्या तासामध्ये नियम 289 अन्वये जे प्रश्न उपस्थित केले जातात ते प्रश्नोत्तराच्या तासाच्या वेळी उपस्थित केले जाऊ नयेत.

आज नियम 289 अन्वये दोन प्रस्ताव माझ्याकडे आलेले आहेत. त्या संदर्भात सन्माननीय सदस्यांना प्रश्नोत्तराच्या तासानंतर त्यांचे म्हणणे मांडण्याची परवानगी देण्यात येईल, असा निर्णय मी घेतलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./ मु.शी. : तोंडी उत्तरे

संत गजानन महाराजांच्या संजीवन शताब्दी महोत्सवानिमित्त रस्ता रुंदीकरण व विस्थापितांचे पुनर्वसन करण्या संदर्भात

(1) *** 2696 श्री. पांडुरंग फुंडकर, श्री. नितीन गडकरी, श्री जगदीश गुप्ता** : सन्माननीय **वित्त व नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

1) संत गजानन महाराजांच्या संजीवन शताब्दी महोत्सवानिमित्त शेगाव येथे होणारी भाविकांची गर्दी लक्षात घेता रस्ता रुंदीकरणाची कामे तातडीने करणे आवश्यक असताना त्या कामांची तसेच इतर कामांची अद्याप सुरुवातच झालेली नाही, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, रस्ता रुंदीकरण करताना तेथील शेकडो किरकोळ व्यावसायिक विस्थापित होणार आहेत व त्यांचे पुनर्वसनही प्राधान्याने करावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, आतापर्यंत याकडे झालेले दुर्लक्ष व विलंब लक्षात घेता ही कामे शीघ्र गतीने करण्यासाठी शासनामार्फत कोणते विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत,

(4) अद्याप याबाबत कोणतीही कार्यवाही झाली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

श्री. विजय वडेट्टीवार, श्री. सुनील तटकरे यांच्याकरिता : (1) व (2) होय.

(3) व (4) सप्टेंबर 2010 रोजी शताब्दी महोत्सव सुरु होणार आहे. तत्पूर्वी पहिल्या टप्प्यात करावयाच्या कामांची अंदाजपत्रके तातडीने मागविण्याची उचित कार्यवाही करण्यात आली आहे. शासनाने दि. 8.3.2010 च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिलेली कामे कालमर्यादेत करण्याबाबत पुरेपूर प्रयत्न करण्यात येत आहेत.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मुळात हा प्रश्न यासाठी उपस्थित करण्यात आलेला आहे की, संत गजानन महाराजांचे हे संजीवनी शताब्दी महोत्सवी वर्ष असून शासनाने त्यासाठी 360 कोटी रुपयाचे पॅकेज मंजूर केलेले आहे. गेले वर्ष-सव्वावर्ष हा प्रश्न या सभागृहाच्या माध्यमातून बाहेर चालू आहे. पैसे मंजूर व्हायला उशीर झालेला आहे. मागील अधिवेशनामध्ये माननीय वित्त मंत्री श्री.सुनील तटकरे यांनी डिसेंबर अखेरपर्यन्त कामे सुरु होतील असे उत्तर दिलेले होते. परंतु आता मार्च महिना अर्धा संपला तरी कामांना सुरुवात झालेली नाही. सप्टेंबर 2010मध्ये शताब्दी वर्ष सुरु होणार आहे अशा प्रकारचे उत्तर प्रश्न भाग 3 व 4 ला दिलेले आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

हे उत्तर चुकीचे असून शताब्दी महोत्सवाला सप्टेंबर 2009मध्ये सुरुवात होऊन सप्टेंबर 2010मध्ये महोत्सवाची सांगता होणार आहे.त्यावेळी लाखोच्या संख्येने भाविक येणार आहेत. असे असताना अद्याप कामाला सुरुवात झालेली नाही. विकास कामे करताना रस्ते रुंद करावे लागणार असून तेथील शेकडो किरकोळ व्यापारी विस्थापित होणार आहेत. या विस्थापितांच्या बाबतीत शासनाने काय विचार केलेला आहे ? अजून कामांचे टेंडर निघालेले नाही. मार्च महिना संपत आलेला आहे. आता पावसाळा सुरु होईल. हा शताब्दी सोहळा सप्टेंबर 2010मध्ये संपणार आहे. 360 कोटी पैकी फक्त 23 कोटी रु. दिलेले आहेत. उर्वरित रक्कम ताबडतोबीने देऊन विकास कामे युध्द पातळीवर होण्यासाठी शासनस्तरावर काय प्रयत्न होणार आहेत ? विस्थापितांच्या बाबतीत शासन कोणता निर्णय घेणार आहे ?

श्री. विजय वडेट्टीवार : संतश्रेष्ठ गजानन महाराजांच्या संजीवन शताब्दी महोत्सवाच्या निमित्ताने आपण हा विकास आराखडा सुरु करीत आहोत. 193 कोटीचा हा मूळ आराखडा होता. नंतर शिखर समितीच्या बैठकीमध्ये 250 कोटी रु.च्या विकास आराखडयास मंजुरी प्राप्त झाली. 360 कोटीमध्ये राज्य शासनाचा वाटा 250 कोटीचा आहे. 65.50 कोटी देवस्थान देणार आहे. 13.90 कोटी नगरपरिषदेकडून आणि 31 कोटी केन्द्र सरकारकडून प्राप्त होणार आहेत. सन 2009-2010च्या अर्थसंकल्पामध्ये 65 कोटी रुपये मंजूर केले असून त्यातील 23 कोटी रुपये वितरित केलेले आहेत. तसेच विभागीय आयुक्तांना प्रशासकीय मान्यतेचे संपूर्ण अधिकार बहाल केलेले आहेत.

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जवळपास 14 कामांना प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. त्या कामांना लवकरच सुरुवात होणार आहे. रस्ता रुंदीकरणामुळे ज्यांचे पुनर्वसन करावे लागणार आहे त्यासाठी 10 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. या कामासाठी 3 कोटी रुपयांची आवश्यकता आहे. तरी देखील 10 कोटी रुपयांची या कामासाठी तरतूद केलेली आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, शिखर समितीची दिनांक 28 जानेवारी, 2010 रोजी बैठक झाली. या बैठकीमध्ये ताबडतोब 100 कोटी रुपये वितरीत करण्याचे आदेश दिले गेले. परंतु 100 कोटींपैकी आतापर्यंत फक्त 23 कोटी रुपये दिले गेले आहेत. मंदिर विश्वस्त समिती या कामासाठी मदत करीत आहे. परंतु नांदेड येथे ज्या धर्तीवर नांदेड गुरुद्वारा प्रबंधक समितीला महोत्सवासाठी अनुदान दिले त्याच धर्तीवर या मंदिर विश्वस्त संस्थानला विशेष अनुदान देण्यासंबंधी शासन विचार करणार आहे का?

श्री.सुनील तटकरे : सन्माननीय सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी प्रश्न उपस्थित केला त्याबाबत मी एवढेच सांगू इच्छितो की, शिखर समितीने जानेवारी महिन्यात मान्यता दिली आहे. विभागीय आयुक्तांना कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. सन्माननीय राज्यमंत्री यांनी सांगितल्याप्रमाणे काही विशिष्ट कामांची यादी माझ्याकडे उपलब्ध आहे, ती यादी मी पटलावर ठेवावयास तयार आहे. प्रशासकीय मान्यतेचे अधिकार विभागीय आयुक्तांना दिले आहेत. 23 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला आहे. कामे सुरु करण्यासाठी लागणारा निधी त्यांना गरजेनुसार उपलब्ध करुन दिला जाईल. विभागीय आयुक्तांना प्रशासकीय मान्यतेचे अधिकार देण्यामागची भावना हीच आहे की, कालापव्यय टाळावा आणि त्या स्तरावर कामांना प्रशासकीय मान्यता देऊन कामे सुरु करावी. मी संबंधित विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा केली. पी.डब्ल्यू.डी.मॅन्यूअलप्रमाणे कमीत कमी कालावधी असतो त्यानुसार निविदा मागवाव्यात आणि महिन्याभरात ही कामे सुरु करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यांना नांदेडच्या धर्तीवर विशेष अनुदान देण्याबाबतचा योग्य तो निर्णय शासन स्तरावर घेतला जाईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2696.....

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, शासनाच्या वतीने सन्माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले की, शासनाकडून 250 कोटी रुपये देण्यास मान्यता दिली आहे. हा निधी वितरीत होत असताना जो त्रास होतो तो लक्षात घेता मी काही प्रश्न उपस्थित करु इच्छितो. 250 कोटी रुपये किती दिवसात वितरीत करणार आहात? प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार विभागीय आयुक्तांना दिले. एवढ्यावर समाधान न मानता त्या योजनेतील फक्त 14 कामांना प्रशासकीय मान्यता दिली, इतर कामांना अद्याप प्रशासकीय मान्यता द्यावयाची आहे. ती प्रशासकीय मान्यता किती दिवसात देणार आहात? यासंबंधी वेळापत्रक जाहीर केले पाहिजे. ज्या 14 कामांना प्रशासकीय मान्यता दिली ती 14 कामे ठराविक दिवसात पूर्ण करण्याविषयीचे बंधन त्यांच्यावर घालण्यात येईल काय?

श्री.सुनील तटकरे : ज्या कामांना प्रशासकीय मान्यता दिली त्यामध्ये विश्रामगृहाचे बांधकाम, पोलीस ठाण्याचे बांधकाम, कर्मचाऱ्यांचे वसतिगृहाचे बांधकाम, सईबाई मोटे रुग्णालयाचे बांधकाम अशा वेगवेगळ्या कामांचा अंतर्भाव आहे. ही कामे विशिष्ट मुदतीत पूर्ण केली पाहिजेत असे वेळापत्रक आखून दिले जाईल. सन्माननीय सदस्यांनी विचारल्याप्रमाणे त्यांना त्यांच्या गरजेनुसार निधीची उपलब्धता करुन दिली जाईल.

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांनी विकास कामांसाठी शासनाचा निधी किती, संस्थानचा निधी किती हे सांगितले. स्थानिक नगरपरिषदेचा 13 कोटी रुपयांचा हिस्सा असल्याचेही सांगितले. त्या नगरपरिषदेची आर्थिक कुवत आहे का? हिंगोली नगरपरिषदेने 2 कोटी रुपयांचे विजेचे बिल भरले नाही म्हणून वीज पुरवठा खंडित केला गेला, त्यामुळे दिवाबत्तीची सुविधा बंद आहे. अशा छोट्या नगरपरिषदेवर 13 कोटी रुपयांचा बोजा टाकणे योग्य नाही. त्या नगरपरिषदेची तशी कमिटमेंट आहे का? अर्थसंकल्पात त्यांनी तरतूद केली आहे का? त्यांच्याकडून 13 कोटी रुपये दिले जाणार नसतील तर यासंबंधी काय व्यवस्था करणार आहात?

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(नंतर श्री.खर्चे...

तारांकित प्रश्न क्र. 2696.....

श्री. सुनिल तटकरे : सभापती महोदय, यासंदर्भात नगरपालिकेने सहमती दर्शविली आहे. परंतु हा निधी तसेच हा आराखडा तीन वर्षात पूर्ण करावयाचा आहे. कारण हे काम 350 कोटीचे आहे. यामध्ये करावयाच्या पाणीपुरवठा, बांधकाम तसेच भुयारी गटारांचे बांधकाम या कामांसाठी तीन वर्षांचा कालावधी लागणार आहे. या कामाला निधी देण्यासाठी नगरपालिकेने आपली सहमती दर्शविली असून पुढे जर नगरपालिकेला तशी अडचण आलीच तर त्याबाबतही योग्य तो निर्णय शासन घेईल.

डॉ. नीलम गोऱ्हे : महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, येत्या तीन वर्षात हे काम पूर्ण होणार आहे. नांदेडचा उल्लेख माननीय विरोधी पक्षनेत्यांनी केला. तसेच पंढरपूरचे उदाहरण पाहिले तर दरवर्षी कुठलेही काम वेळेवर पूर्ण न झाल्यामुळे भाविकांना दगड-धोंडे व खाच-खळग्यातून पंढरपूरच्या वारीला जावे लागते, ही वस्तुस्थिती आहे. माझा या अनुषंगाने प्रश्न असा आहे की, केंद्रशासनाकडून या कामासाठी आतापर्यंत किती रक्कम मिळाली आहे ? तसेच तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी जात असताना रस्त्यावर अपघात होऊन अनेक भाविक दगावल्याची उदाहरणे आहेत. अशा अपघातांपासून मुक्तता होण्याच्या संदर्भात या निधीचा कशा कशा प्रकारे शासन वापर करणार आहे ?

श्री. सुनिल तटकरे : सभापती महोदय, केंद्रशासनाकडून पहिला हप्ता 15 कोटीचा आलेला आहे. उरलेला निधी देण्याच्या दृष्टीने राज्यशासनाकडून केंद्रशासनाकडे पत्रव्यवहार सुरु आहे. अपेक्षा अशी आहे की, येत्या काही दिवसातच हा पैसा देखील उपलब्ध होईल. तसेच वेगवेगळ्या शहरांकडून शेगांवमध्ये जाणाऱ्या अन्य रस्त्यांच्या संदर्भात सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी प्रश्न विचारला आहे. प्रथम गावातील रस्त्यांचे रुंदीकरण वगैरे कामे या आराखड्यात समाविष्ट केलेले आहेच. परंतु अन्य शहरांकडून जाणाऱ्यारस्त्यांबाबत जो प्रश्न आपण विचारला त्यात काही राज्य मार्ग असतील तर काही एमडीआर अथवा ओडीआर असतील त्यादृष्टीने सार्वजनिक बांधकाम विभाग आवश्यक तो निर्णय घेईलच.

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तारांकित प्रश्न क्र. 2696.....

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देताना सांगितले की, काही कामे ताबडतोबीने सुरु केलेली आहेत, त्यांचे टेंडर निघालेले आहेत. त्यात मंत्री महोदयांनी पोलीस स्टेशन, रेस्ट हाऊस वगैरे कामे सुरु झाल्याचे सांगितले. परंतु या सोहळ्याला लाखो लोक सप्टेबर, 2010 मध्ये येत आहेत. खरे म्हणजे लोकांना गरज आहे ती रस्ते, पिण्याचे पाणी तसेच स्वच्छता व निवास या बाबींची आणि अशा बाबींना प्राधान्य द्यावयास पाहिजे. पोलीस स्टेशन किंवा सर्किट हाऊस ही कामे प्राधान्याने घेण्याची गरज नाही. म्हणून स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, जी कामे आवश्यक आहेत त्या कामांना ताबडतोबीने प्राधान्य देऊन सप्टेंबर 2010 पर्यंत पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासन प्रयत्न करणार काय ?

श्री. सुनिल तटकरे : महोदय, मी मघाशीच सांगितले की, ज्या कामांना सुरुवात झाली आहे त्या कामांची यादी माझ्याकडे आहे, ती मी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास तयार आहे. मी फक्त दोन तीन कामे सांगितली. या कामांमध्ये रस्त्यांच्या कामांचाही समावेश आहे. तसेच उरलेल्या कामांना प्रशासकीय मान्यता अद्याप द्यावयाच्या असून येत्या 15 दिवसात त्या दिल्या जातील असे अगोदरच्या उत्तरातही मी सांगितले. ही कामे किती कालावधीत पूर्ण करावीत यासंबंधीचे वेळापत्रक देखील ठरवून दिलेले आहेत. जी प्रशासकीय मान्यता दिलेली कामे आहेत ती किती दिवसात पूर्ण करावयाची आहेत यासंबंधीच्या सक्त सूचना देखील विभागाकडून दिलेल्या आहेत.

अशुधारित प्रत / शोधासाठी नाही

मॅट्रिक ट्रेन प्राथमिक शिक्षकांना लागू करावयाची सेवानिवृत्ती वेतन योजना

(2) * 3862 **श्री. शिवाजीराव पाटील, श्री.विक्रम काळे, श्रीमती मंदा म्हात्रे** : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सांगली जिल्ह्यातील मॅट्रिक ट्रेन प्राथमिक शिक्षकांना जिल्हा परिषदेने सेवानिवृत्ती वेतन योजना लागू केली नाही, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सन 1971 ते 1981 या कालावधीत जिल्हा परिषद शाळेत नियुक्त दिलेल्या मॅट्रिक ट्रेन प्राथमिक शिक्षकांना सेवानिवृत्ती वेतन योजना लागू केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, संबंधित शिक्षकांना शासन निर्णयाप्रमाणे सेवानिवृत्ती वेतन योजना लागू करण्याबाबत शासन निर्णय घेणार आहे काय,

(4) असल्यास, निर्णय केव्हा घेण्यात येणार आहे, याबाबत शासनाची भूमिका काय आहे व याबाबतची सविस्तर कारणे काय आहेत ?

श्री. रणजित कांबळे, श्री.जयंत पाटील यांच्याकरिता : (1), (2), (3) व (4) जिल्हा परिषद सांगली यांचेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने सदर शिक्षकांच्या संदर्भात, पी.एस.सी. किंवा एस.एस.सी. आणि पी.टी.सी. किंवा शिक्षणशास्त्र पदविकाधारक सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांना प्रशिक्षित समजण्यात आले असून त्यांना निवृत्तीवेतनादि लाभ देण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांना दिनांक 9.3.2010 च्या शासन पत्रान्वये सूचना देण्यात आल्या आहेत.

श्रीमती मंदा म्हात्रे : महोदय, उत्तरामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, सांगली यांना शासनाकडून सूचना दिल्याचे म्हटले आहे. प्रश्न असा आहे की, यासंबंधीची सद्य:स्थिती काय आहे आणि यासंबंधीचा निर्णय शासन किती दिवसात घेणार आहे ? कारण हा प्रश्न आल्यानंतरच यासंबंधीचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांकडून सादर केलेले असल्याचे दिसते. तेव्हा वस्तुस्थिती काय आहे ?

श्री. रणजित कांबळे : महोदय, हा प्रश्न आल्यानंतरच निवेदन दिले अथवा या कामाला गती आली असे नाही. वस्तुस्थिती अशी आहे की, लोकल ऑडिटमध्ये श्री. देशमुख नावाच्या अप्रशिक्षीत शिक्षकांना पेन्शन देण्यात आले त्याबाबतची क्वेरी आली होती. ऑडिटरचे म्हणणे होते की, श्री. देशमुख हे पेंशनसाठी अपात्र आहेत. या क्वेरीच्या संदर्भात जिल्हा परिषदेने शासन स्तरावर मार्गदर्शन मागितले व त्याचे उत्तर जिल्हा परिषदेला शासनाकडून दिलेले आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 3862.....

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये काम करणारे जे जुने शिक्षक हे पी.एस.सी. आणि एस.एस.सी. पात्रता धारण करणारे आहेत. त्यानंतर ज्युनिअर पीटीसी किंवा सिनिअर पीटीसी अशी प्रशैक्षणिक अर्हता प्राप्त केलेले आहेत. संपूर्ण राज्यामध्ये धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे की, ज्युनिअर पीटीसी किंवा सिनीअर पीटीसी शिक्षकांना प्रशिक्षक शिक्षक समजले जाते. या शिक्षकांना सेवानिवृत्ती वेतन देय आहे. सर्व जिल्हयामध्ये या शिक्षकांना सेवानिवृत्ती वेतन मिळत होते. परंतु यांनी केवळ सांगली जिल्हयात ऑब्जेक्शन काढले व त्यामुळे या शिक्षकांना सेवानिवृत्ती वेतन मिळू शकले नाही. यासंदर्भात आपले जे काही आदेश गेलेले आहेत त्याची एक प्रत माझ्याकडे आहे त्यामुळे त्यांचा प्रश्न आता मिटेल. संपूर्ण राज्यामध्ये अशा प्रकारचा निर्णय झ्रालेला असतांना केवळ एकाच जिल्हयामध्ये ऑब्जेक्शन घेऊन ज्या शिक्षकांना सेवानिवृत्ती वेतनापासून ज्या अधिका-याने वंचित ठेवले त्यांच्या संदर्भात आपण काय कारवाई करणार आहात ? हा माझा पहिला प्रश्न आहे.

माझा दुसरा प्रश्न असा आहे की, जिल्हापरिषदेच्या शाळेमध्ये 1972 पासून अनेक शिक्षक 20-20,30-30 वर्षापासून काम करीत होते व ज्यांना वयोमानाप्रमाणे डी.एड. अर्हता प्राप्त करणे शक्य झाले नाही असे काही शिक्षक सेवेत आहेत तर काही शिक्षक सेवानिवृत्त झाले, तर काही काही शिक्षक मृत पावले आहेत. त्यामुळे या शिक्षकांना सेवानिवृत्ती वेतन देण्याच्या संदर्भात ग्रामविकास खाते काही विचार करणार आहे काय ?

श्री. रणजीत कांबळे : सभापती महोदय, या संदर्भात लोकल फंड ऑडीटमध्ये क्वेरी निघाली होती त्यामुळे संबंधित ऑडीटर ॲक्शन घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. प्रश्न असा आहे की, 30 जून, 1972 च्या नंतर जे शिक्षक म्हणून काम करीत आहेत त्यांनी कायद्यानुसार डी.एड. करणे आवश्यक आहे. एस.एस.सी. किंवा ज्यूनिअर पी.टी.सी. असले तरी सुध्दा त्यांनी डी.एड. करणे बंधन कारक आहे. यासंदर्भात माझ्याकडे जी.आर.सुध्दा आहे. 1971 मध्ये असा जी.आर. आला होता की, एस.एस.सी., पी.टी.सी. किंवा एस.एस.सी. किंवा डी.एड. अशी रिक्रुटमेंट रुल मध्ये आली होती. एका वर्षासाठी प्रशिक्षित शिक्षक मिळाला नाही तरी सुध्दा आपण ज्युनिअर पीटीसीची नियुक्ती करु शकतो. परंतु यासाठी 1983 मध्ये असा जी.आर. आला होता की, ज्या ठिकाणी प्रशिक्षित शिक्षक मिळाला नाही तर त्या शिक्षकांना डिम्ड ट्रेन्ड शिक्षक धरावयाचे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ MMP/ D/

ता.प्र.क्र. :3862..

श्री. रणजित कांबळे....

पण 1973 च्या नंतरचे जे शिक्षक आहेत, जे ज्युनिअर पी.टी.सी. शिक्षक आहेत त्यांना आपण अनट्रेन्ड शिक्षकच धरले जाते. त्यामुळे या ठिकाणी देशमुख यांच्या संदर्भात जी क्वेरी आलेली आहे त्यांची नियुक्ती 1978 ची होती. तसेच ते एस.एस.सी. ज्युनिअर पी.टी.सी. आहेत. खरे म्हणजे त्यांनी 4 वर्षात डी.एड. करणे अपेक्षित होते परंतु त्यांनी 4 वर्षात डी.एड. केले नाही. निवृत्तीनंतर त्यांना पेन्शन देण्यात आली. परंतु ऑडीटमध्ये ऑडीटरने सुस्पष्ट सांगितले आहे की, सदर शिक्षक पात्र नसतांना संबंधित शिक्षकाला पेन्शन दिलेले आहे. त्यामुळे त्यांच्याकडून पेन्शन रिकव्हर करण्याचे सुस्पष्ट आदेश ऑडीटरने दिले होते तसेच आम्ही शासन स्तरावर जे काही फंडस् देत असतो त्यामध्ये कपात करु. त्याप्रमाणे संबंधित शिक्षकांकडून रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. त्यामुळे या प्रकरणात संबंधित शिक्षकांना पात्र धरणे योग्य होणार नाही.

.....3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ MMP/ D/

मालवण (जि.सिंधुदुर्ग) येथे विकास कामासाठी पाठविलेला निधी परत जात असल्याची बाब

(३) * ३०९० श्री सुभाष चव्हाण , श्री. चरणसिंग सप्रा , श्री. अशोक उर्फ भाई जगताप , श्री. संजय दत्त : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण (जि.सिंधुदुर्ग) येथे शासनाच्या विविध योजनांचा लाभ सर्वसामान्य जनतेला मिळवून देणे आवश्यक असतानाही काही विभागातील अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे त्या विभागातील कामे करण्यात आली नसल्यामुळे निधी परत जात असल्याचे माहे डिसेंबर, २००९ मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकास कामासाठी निधी न वापरणाऱ्या विभागीय अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच भविष्यात विकास कामे न करता निधी परत पाठविण्याच्या घटना घडू नयेत म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रणजित कांबळे, श्री.जयंत पाटील यांच्याकरिता : (१), (२) व (३) मालवण तालुक्याअंतर्गत शासनाकडून विविध योजना राबविण्यासाठी आलेल्या निधीचे मार्च, २०१० अखेर १००% नियोजन जिल्हा व तालुका स्तरावरुन करण्यात आलेले आहे. मालवण बांधकाम उपविभाग, ग्रामपंचायत विभाग व आरोग्य विभागाकडून डिसेंबर, २००९ च्या दरम्यान कोणत्याही योजनेचा निधी परत गेलेला नाही.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, भारत निर्माण योजनेतून मंजूर झालेली कामे सुरु झालेली आहेत काय? तसेच भारत निर्माण योजनेचा कालावधी कधी संपणार आहे ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, भारत निर्माण योजनेची कामे मालवण तालुक्यात सुरु असून ही कामे 31 डिसेंबर रोजी संपणार आहेत. सन्माननीय सदस्यांनी आपल्या प्रश्नात विचारले आहे की, मालवण तालुक्यातील भारत निर्माण योजनेतील पैसे अखर्चित आहे परंतु यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, मालवण तालुक्यातील कोणत्याही योजनांमध्ये, जिल्हापरिषदेच्या मार्फत कोणतेही पैसे अखर्चित राहिलेले नाहीत. या ठिकाणी भारत निर्माण योजने अंतर्गत जे टार्गेट होते त्यापैकी 99 ठिकाणच्या योजना पूर्ण झालेल्या आहेत. ज्या 53 योजनांची कामे शिल्लक राहिलेली आहेत त्या आम्ही नॅशनल रुरल ड्रिंकींग वॉटर प्रोग्राममधून घेत आहोत.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औरंगाबाद जिल्हा परिषद शाळेतील संगणक धुळखात पडून असल्याप्रकरणाची चौकशी

(४) * ३८२६ श्री. किसनचंद तनवाणी , श्री. दिवाकर रावते , डॉ. निलम गोऱ्हे , श्री. अनिल परब :
सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद जिल्हा परिषदेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना संगणकाचे ज्ञान मिळावे याकरिता दिलेले संगणक, शाळेत प्रशिक्षित संगणक शिक्षक नसल्याने शाळेत धुळखात पडून असल्याची माहिती माहे जानेवारी, २०१० मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यास जबाबदार असणा-या व्यक्तींवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती फौजिया खान,श्री.बाळासाहेब थोरात याच्याकरिता : (१) हे खरे नाही. संगणकाचा पुरवठा केलेल्या शाळेतील प्रत्येकी दोन शिक्षकांना Microsoft संस्थेमार्फत संगणकाचे प्रशिक्षण दिले जाते. तसेच सन २००९-१० मध्ये ५५० शिक्षकांना संगणकाचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.
(२), (३), व (४) प्रश्न उद्भवत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किसनचंद तनवाणी : सभापती महोदय, उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, "संगणकाचा पुरवठा केलेल्या शाळेतील प्रत्येकी दोन शिक्षकांना मायक्रोसॉफ्ट संस्थेमार्फत संगणकाचे प्रशिक्षण दिले जाते. तसेच सन 2009-10 मध्ये 550 शिक्षकांना संगणकाचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. " या उत्तरामध्ये माननीय मंत्रिमहोदयांना दुरुस्ती करावयाची आहे काय ?

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, 550 ऐवजी 551 असे वाचावे.

श्री.किसनचंद तनवाणी : सभापती महोदय, मी अत्यंत जबाबदारीने सांगू इच्छितो की , औरंगाबाद जिल्हयातील कन्नड तालुक्यातील गल्लेभोरगावच्या शाळेत 20 संगणक धूळ खात पडून आहेत. मी स्वत: त्या शाळेला भेट दिली होती आणि तेथील विद्यार्थ्यांना याबाबत विचारले होते. उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, " प्रत्येकी दोन शिक्षकांना संगणकाचे प्रशिक्षण दिले जाते. परंतु गल्लेभोरगावच्या शाळेतील एकाही शिक्षकाने संगणकाचे प्रशिक्षण घेतलेले नाही. विद्यार्थ्यांना संगणकासंबंधी विचारले असताना संगणक कसा असतो हेसुध्दा त्यांना माहीत नाही.या शाळेतील शिक्षकांनी संगणकाचे प्रशिक्षण घेतलेले नाही हे खरे आहे काय ?

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, औरंगाबाद जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना संगणकाचे ज्ञान मिळावे यासाठी सर्व शिक्षा अभियान मार्फत नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घेण्यात आला असून संगणक प्रयोगशाळे अंतर्गत 2003-2004 सालापासून संगणक, यु.पी.एस आणि प्रिन्टर्स इत्यादी साहित्य महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक परिषद, मुंबई कडून दिले जाते. काही शाळांना संगणकाचा पुरवठा करण्यात आलेला आहे .2003-2004 सालापासून 99 प्रयोगशाळांची औरंगाबादमध्ये स्थापना करण्यात आली आहे आणि 551 शिक्षकांचे संगणकाचे प्रशिक्षण झालेले आहे. सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्याबाबत मी त्यांना सांगू इच्छिते की, औरंगाबाद , पुणे आणि नागपूर या तीन ठिकाणी मायक्रोसॉफ्ट ॲकडमी ट्रेनिंगचे सेन्टर असून त्या ठिकाणाहून श्री. ए. बी. चौधरी व श्री नितीन पाटील या शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. तसेच मुलांना संगणकाच्या प्रयोगशाळेतून प्रशिक्षण देण्यात येत आहे. सन्माननीय सदस्यांनी जी माहिती दिलेली आहे ती माहिती तपासून पाहिल्या नंतरच मला त्याबाबतीत सांगता येईल. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी जी स्पेसिफिक माहिती दिली आहे त्याची मला चौकशी करावी लागेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय प्रा. फौजिया खान सदस्य असतांना हिंदीतून बोलत होत्या परंतु मंत्री झाल्यानंतर सभागृहामध्ये आणि सभागृहाच्या बाहेरही त्या मराठीतून बोलतात त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो आणि त्यांना मन:पूर्वक धन्यवादही देतो.

सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी छापील उत्तरामध्ये 550 ऐवजी 551 अशी दुरुस्ती केली आहे. माननीय सदस्यांनी असा प्रश्न विचारला होता की, शाळेमध्ये प्रशिक्षित संगणक शिक्षक नसल्यामुळे संगणक धूळ खात पडून आहेत हे खरे आहे काय ? या प्रश्नाला असे उत्तर देण्यात आले आहे की , "हे खरे नाही . संगणकाचा पुरवठा केलेल्या शाळेतील प्रत्येकी दोन शिक्षकांना मायक्रोसॉफ्ट संस्थे मार्फत सगणकाचे प्रशिक्षण दिले जाते. शिक्षकांना संगणकाचे प्रशिक्षण द्यावयाचे हा शासनाचा प्रोजेक्ट आहे. 2009-2010 मध्ये 551 शिक्षकांना संगणकाचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.म्हणजे या शिक्षकांचे प्रशिक्षण पूर्ण् झालेले नाही आणि शाळेतील शिक्षकांचे संगणक प्रशिक्षण झालेले नसल्यामुळे तेथील संगणक धूळ खात पडून आहेत. म्हणजेच तेथील शिक्षक प्रशिक्षित नाहीत हे शासनाने मान्य केलेले आहे, असे असतांना " हे खरे नाही" असे उत्तर कसे देण्यात आले आहे ? माननीय मंत्र्यांनी जे लेखी उत्तर दिलेले आहे त्याचा असा अर्थ होतो की, हे शिक्षक प्रशिक्षित नाहीत. त्यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. या शिक्षकांचे संगणकाचे प्रशिक्षण पूर्ण् झालेले नसल्यामुळे ते विद्यार्थ्यांना संगणक शिकवू शकत नाहीत म्हणूनच तेथील संगणक धूळ खात पडून आहेत. माननीय मंत्रीमहोदयांनी ही बाब तपासून पाहिली जाईल असे सांगितलेले आहे . सदनामध्ये जेव्हा एखादा सदस्य माहिती देतो तेव्हा ती माहिती खरी मानली जाते ती माहिती तपासून पाहिली जात नाही. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती खरी ठरल्यास सबंधितावर कारवाई करु असे उत्तरच आपल्याकडून अपेक्षित आहे. माननीय मंत्री महोदया या क्षेत्रातील असल्यामुळे त्यांनी तर याबाबतीत अधिक कडक राहिले पाहिजे. अशी आमची अपेक्षा आहे तेव्हा एकही शिक्षक संगणकाचे प्रशिक्षण झालेला नाही असे उत्तर मिळते तेव्हा 551 पैकी किती शिक्षक सगणक प्रशिक्षित आहेत आणि ते मुलांना संगणक शिकवत आहेत आणि ते कोण कोणत्या शाळेत शिकवत आहेत ?

4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, औरंगाबादमध्ये 99 प्रयोगशाळा असून त्या प्रयोग शाळेमधून संगणकाचे प्रशिक्षण पूर्ण झालेल्या शिक्षकांची संख्या 88 आहे आणि 551 शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. या शिक्षकांचे प्रशिक्षण चालू आहे. काही ठिकाणच्या शिक्षकांची बदली झाल्यामुळे , तेथील पद रिक्त असल्यामुळे त्या ठिकाणी कदाचित प्रशिक्षित शिक्षक नसेल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या बाबतीत आपणच निदेश द्यावेत अशी माझी आपणास विनंती आहे.

सभापती : माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देत असतांना सविस्तर माहिती दिली आहे. यामध्ये सन्माननीय सदस्यांचा मूळ प्रश्न असा आहे की, विद्यार्थ्यांना संगणकाचे ज्ञान मिळावे म्हणून संगणक विकत घेण्यात आले आहेत.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती ....

परंतु प्रशिक्षित शिक्षक नसल्यामुळे ते वापरात नाहीत असे माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. याठिकाणी सुरुवातीला 88 शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले व 500 च्यावर शिक्षक प्रशिक्षण घेत आहेत, असे सांगण्यात आले. त्यामुळे हे संगणक वापरात येऊन त्याव्दारे विद्यार्थ्यांना प्रशिक्षण कसे मिळेल यासाठी शासनाने कसोशीने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. माननीय सदस्यांनी याठिकाणी सांगितलेल्या गावाची चौकशी करुन त्याबाबत कारवाई करावी.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, या संपूर्ण पध्दतीमध्ये इंम्प्रुव्हमेंटला खूप स्कोप आहे. सेल्फ सफिशियंट फायनान्सचा वापर करुन उच्च तंत्र शिक्षण विभागामध्ये पी.सी.बी. मॉडेलचा वापर करण्यात येत आहे. त्या धर्तीवर शालेय शिक्षण विभागामध्ये इंम्प्रुव्हमेंट करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने टाईम-टेबल, सिलॅबसमध्ये सुधारणा करण्याचे काम सुरु केले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दोडामार्ग आणि सावंतवाडी तालुक्यात (जि.सिंधुदूर्ग) मोठया प्रमाणात जमीन खरेदी करतांना महसूल (सिलिंग ॲक्ट) अधिनियमाचे झालेले उल्लंघन

(५) * ३००९ श्री.परशुराम उपरकर , श्री.किरण पावसकर , श्री. रामदास कदम , श्री. अनिल परब :

सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) के.व्ही. थॉमस, पाळ्ये, २ साजी सेबेस्टीयन,३. बिजू जोसेफ वडखन, ४. जेटी जोसेफ इलियाज-परमे (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदूर्ग) वरील व्यक्ती या केरळ राज्यातील असून जमीन खरेदी करतांना शेतकरी असल्याचे बोगस दाखले देवून जमीन खरेदी केल्याचे माहे जानेवारी, २०१० च्या सुमारास उघडकीस आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जमिनी खरेदी करतेवळी देण्यात येणाऱ्या बोगस दाखल्याची चौकशी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून केरळ राज्यातील त्यांच्या राहत्या गावी करण्यात आली आहे काय,

(३) अशाच प्रकारे दोडामार्ग आणि सावंतवाडी (जि.सिंधुदूर्ग) तालुक्यात मोठया प्रमाणात जमीन खरेदी करतांना जमीन महसूल (सिलिंग ॲक्ट) अधिनियम यांचे उल्लंघन झाले आहे, हे खरे आहे काय ?

श्री. प्रकाश सोळंके, श्री.नारायण राणे यांच्याकरिता : (१) व (२) दोडा-मार्ग व सावंतवाडी तालुक्यात जमिनी खरेदी करताना केरळ राज्यातील व्यक्तींनी केरळ राज्यातील तहसिलदार यांचेकडील शेतकरी असल्याचे दाखले सादर केले आहेत. श्री.जी.टी.जोसेफ इलियाज यांच्या दाखल्याची पडताळणी तहसीलदार,ता.दोडामार्ग यांनी तहसिलदार कोझीकोडे, केरळ यांचेकडे केली असता सदर दाखला बनावट नसल्याचे आढळून आले. इतर दाखल्यांची पडताळणी करुन घेण्याचे काम सुरु आहेत.

(३) दोडा मार्ग/सावंतवाडी तालुक्यातील शेतजमिनी खरेदीमुळे महाराष्ट्र शेतजमीन (ज.धा.क.म.) अधिनियम,१९६१ चे उल्लंघन झाल्याचे आढळून आले नाही.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, तारांकित प्रश्न क्र.3009...

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, छापल्याप्रमाणे. आपल्या अनुमतीने छापील उत्तर क्रमांक 1 व 2 मध्ये मी पुढीलप्रमाणे दुरुस्ती करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ D/

ता.प्र.क्र. 3009....

श्री.प्रकाश सोळंके....

"दोडा-मार्ग व सावंतवाडी तालुक्यात जमिनी खरेदी करतांना केरळ राज्यातील व्यक्तींनी केरळ राज्यातील तहसिलदार यांचेकडील शेतकरी असल्याचे दाखले सादर केले आहेत. सदर दाखल्यांची पडताळणी करण्याचे काम सुरु असून पडताळणीअंती शेतकऱ्यांचे दाखले अवैध किंवा बोगस असल्याचे आढळून आल्यास सदर नोंदणी रद्द करण्यात येईल".

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, दोडा-मार्ग व सावंतवाडी तालुक्यामध्ये केरळ राज्यातील परप्रांतीय 5 हजार लोकांनी जमिनी खरेदी केल्या आहेत. या जमिनी खरेदी करतांना बोगस दाखले दिल्याचे उघड झाले आहे त्या सर्व बोगस दाखल्यांची चौकशी करणार काय? त्याचप्रमाणे केरळ राज्यातील या लोकांनी आपल्यासोबत अनेक कामगार आणले आहेत. त्या कामगारांकडून अनेक ठिकाणी गुन्हे घडत आहेत. गुन्हा करुन हे लोक पळून जातात. त्यांची नोंद नसल्यामुळे दोडा-मार्ग तालुक्यामध्ये 7 ते 8 खूनाच्या गुन्हयाचा तपास लागलेला नाही. तेव्हा महसूल विभाग या कामगारांची नोंद ठेवणार आहे काय? या केरळीयन लोकांनी वेगवेगळया नावाने शिरंग्यामध्ये जमिनी खरेदी केल्या आहेत. त्यांच्यावर महसूल विभागाने पावणे तीन कोटी रुपयांचा दंड लावला आहे. अशाप्रकारे 30 जणांनी 1300 एकर जमीन खरेदी केली आहे. वेगवेगळया नावाने जमिनी खरेदी करुन कायद्यातून पळवाट शोधणाऱ्यांविरुध्द आपण उपाय योजना करणार काय?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, दोडा-मार्ग आणि सावंतवाडी तालुक्यासंबंधी स्पेसिफिक प्रश्न विचारण्यात आला आहे. प्रामुख्याने चार केरळीयन लोकांच्या नावाने प्रश्न विचारला आहे. त्यामध्ये बिजू जोसेफ वडखन या व्यक्तीने 12 हेक्टर 28 आर जमीन खरेदी केली आहे. साजी सेबेस्टीयन या व्यक्तीने 2 तालुक्यामध्ये मिळून 5 हेक्टर 41 आर जमीन खरेदी कली आहे. जेटी जोसेफ या व्यक्तीने दोडा-मार्ग तालुक्यात 16 हेक्टर 81 आर जमीन खरेदी केली आहे. आणि के.व्ही.थॉमस या व्यक्तीने दोडा-मार्ग तालुक्यात 6 हेक्टर 64 आर इतकी जमीन खरेदी केली आहे. याव्यतिरिक्त माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न या प्रश्नाशी संबंधित नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ D/

ता.प्र.क्र. 3009....

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. या जिल्हयामध्ये परप्रांतीय केरळीयन लोक मोठया प्रमाणात येत आहेत. विशेषत: दोडा-मार्ग तालुक्यात मोठया संख्येने लोक येऊन मोठया प्रमाणावर जमिनी खरेदी-विक्रीचे व्यवहार सुरु आहेत.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.3009 . . . .

श्री.गुरुनाथ कुलकर्णी . . . .

तसेच रबर प्लॅन्टेशनसाठी हा भाग अतिशय पोषक असल्यामुळे त्या भागामध्ये रबर प्लॅन्टेशन मोठया प्रमाणात होत आहे. परंतु असे होत असताना तेथे जमिनीच्या संदर्भात देखील गैरप्रकार होत आहेत. अशा वेळी तेथील शासकीय महसुली यंत्रणा या प्रश्नाचा कशा प्रकारे मुकाबला करणार आहे ? उद्या त्या जिल्ह्यामध्ये मोठया प्रमाणात मायनिंग सुरु झाले तर काय करणार आहात ? आज दोडामार्ग व सावंतवाडी येथे मायनिंग आलेले आहे. सध्या गोव्यातील मायनिंग बंद झालेले आहे. अशा वेळी त्या भागातून येणारे आणि महाराष्ट्राच्या इतर भागातून येणारे लोक मायनिंग सुरु करीत आहेत. त्यामुळे त्याठिकाणी बाहेरचे लोक येऊन जमिनी घेत आहेत आणि संपूर्ण सिंधुदूर्ग जिल्हा वेठीला धरला जात आहे. यावर तेथील महसूल यंत्रणा काही निर्बंध घालणार आहे काय ? या गोष्टींवर कंट्रोल करणार आहे काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे, त्यासंदर्भात सांगावयाचे तर केरळ राज्यातील काही शेतकऱ्यांनी तेथे येऊन रबराचे उत्पादन करण्यास सुरुवात केलेली आहे. याठिकाणी महसूली कायदे आहेत, त्याप्रमाणे निश्चितपणे याबाबतीत पडताळणी केली जाईल की, हे खरोखर शेतकरी आहेत काय ? त्यांनी दिलेले दाखले खरे आहेत की खोटे आहेत ? याबाबत पडताळणी करुन कारवाई केली जाईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, खरे म्हणजे दोडामार्ग तालुक्यातील जमिनीच्या खरेदी-विक्री प्रकरणाची सविस्तर चौकशी होण्याची गरज आहे. या प्रश्नाच्या संदर्भात अधिकाऱ्यांनी उत्तर दिल्यानंतर, कदाचित ब्रिफींगच्या वेळेस माननीय मंत्री महोदयांच्या एक गोष्ट लक्षात आली असेल आणि त्यामुळे मग ती दुरुस्त करण्यात आली असावी त्याबद्दल मी माननीय मंत्री महोदयांचे आभार मानतो आणि त्यामुळे आपण वाचला आहात. मला दोन-तीन घटना माननीय मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणावयाच्या आहेत. दोडामार्ग हा तालुका आहे आणि तेथील गेवाने, बांबरडे येथे भूमीहीन, मागासवर्गीयांना जमीन दिली होती. परंतु त्या जमिनी केरळी लोकांच्या नावावर झालेल्या आहेत. पहिला मुद्दा असा आहे की, असे करता येत नाही,परंतु तसे प्रकार झाले आहेत असे माझे याबाबतीत स्पेसिफीक म्हणणे आहे.रेवाळे, बांबरडे येथील श्री.आबासाहेब देसाई हे मयत झालेले आहेत. परंतु त्यांची खोटी सही करुन जमीन विकण्यात आलेली आहे. यामध्ये....

. . . .जी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तलाठ्याने खोटी सही केलेली आहे, त्यामुळे याबाबतीत चौकशी व्हावयास पाहिजे असे माझे स्पेसिफीक म्हणणे आहे. तसेच दुसरा मुद्दा असा की, आयनोडी-तिलारी धरणाचे संपादित क्षेत्र हे बुडित क्षेत्रामध्ये दाखविलेले असून शिल्लक समाईक क्षेत्र संबंधित खातेदाराच्या नावाने दाखवून त्याच्या खरेदी-विक्री बाबत व्यवहार झालेला आहे. म्हणून माझी माननीय मंत्री महोदयांना नम्र विनंती आहे की, येथे एवढे घोटाळे झालेले आहेत, त्यामुळे शासनाने या सर्व प्रकरणांची उच्च अधिकाऱ्यामार्फत चौकशी केली पाहिजे. आज तेथील सर्वसामान्य ग्रामस्थ त्रस्त झालेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी जे सांगितले ते खरे आहे. म्हणून या सर्व प्रकरणांची शासनाने चौकशी केली पाहिजे आणि माननीय मंत्री महोदय तशी चौकशी करणार आहेत काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी तीन मुद्यांच्या बाबतीत प्रश्न उपस्थित केलेला आहे. याबाबतीत उच्चस्तरीय अधिकाऱ्यामार्फत चौकशी केली जाईल.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, त्याठिकाणी जे तलाठी तीन वर्षापेक्षा जास्त काळ कार्यरत आहेत आणि ज्यांचा काळ नियमाप्रमाणे पूर्ण झालेला आहे, अशा तलाठ्यांच्या बदल्या करण्यात येणार आहेत काय ? जे अधिकारी लाचलुचपत खात्यामार्फत पकडले गेलेले आहेत, त्यांच्यावर कठोर कारवाई करणार आहात काय ? जे परप्रांतीय कामगार शेत जमीन मालकांबरोबर येत आहेत, त्यांच्या बाबतीत कोणतीही नोंद करण्यात आलेली नाही. तशा प्रकारची नोंद महसूल विभागामार्फत ठेवली जाणार आहे काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जे प्रश्न उपस्थित केलेले आहेत, त्याबाबतीत नियमानुसार कारवाई केली जाईल.

. . . .जी-3

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

मौजे भाल-विठ्ठलवाडी (ता.पेण, जि.रायगड) येथील गावाच्या हद्दीत समुद्राचे पाणी घुसून जमीन नापिक झाल्याप्रकरणी करावयाची कार्यवाही

(६) * ४९९९ श्रीमती मंदा म्हात्रे : सन्माननीय **जलसंपदा व लाभक्षेत्र विकास (खार जमीन) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे भाल-विठ्ठलवाडी (ता.पेण, जि.रायगड) येथील अंबा नदी आणि धरमतर खाडी किनारी असलेल्या खारभूमी बंधाऱ्याला १६ ठिकाणी भेगा (खांडी) पडल्याने समुद्राचे पाणी सदर तालुक्यातील गावाच्या हद्दीत घुसून हजारो एकर जमीन नापिक झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीत काय आढळून आले व तद्नुसार सदर शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.भास्कर जाधव, श्री.नारायण राणे यांच्याकरिता: (१) हे अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) उधाणाचे पाणी खारभूमी योजनेच्या बंधाऱ्यावरून गेल्याने खांडी पडून खारे पाणी ३१० हेक्टर क्षेत्रात घुसले, यावेळी शेत जमिनीत कोणतेच पिक नव्हते. त्यामुळे पिकांचे नुकसान झालेले नाही. परंतु खाऱ्या पाण्यामुळे शेत जमिन भिजल्याने पुढील हंगामात जमिनीची उत्पादकता कमी होण्याची शक्यता आहे. समुद्राच्या उधाणाचा समावेश नैसर्गिक आपत्तीत नसल्याने नुकसान भरपाई देता येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, मौजे भाल-विठ्ठलवाडी (ता.पेण,जि.रायगड) येथील गावांच्या हद्दीत समुद्राचे पाणी घुसल्यामुळे तेथील जमीन नापीक झालेली आहे. पहिल्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की,"हे अंशत: खरे आहे." आज अशी स्थिती आहे की, मौजे भाल-विठ्ठलवाडी (ता.पेण, जि.रायगड) येथील अंबा नदी व धरमतर खाडी किनारी असलेल्या खारभूमी बंधाऱ्याला 16 ठिकाणी भेगा पडलेल्या आहेत ही गोष्ट उत्तरामध्ये मान्य केलेली आहे.

यानंतर श्री.बरवड . . .

अशुद्धीत प्रत/ग्रंथ प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 4999..... श्रीमती मंदा म्हात्रे ..

पुढे असे उत्तर दिले आहे की, यावेळी शेत जमिनीत कोणतेच पीक नव्हते. म्हणजे ज्यावेळी पीक नव्हते त्यावेळी या शेतामध्ये खारे पाणी गेलेले आहे. त्यामुळे तेथील शेतकरी हवालदिल झालेले आहेत. उत्तरामध्ये पुढे असे म्हटले आहे की, खाऱ्या पाण्यामुळे शेत जमीन भिजल्याने पुढील हंगामात जमिनीची उत्पादकता कमी होण्याची शक्यता आहे. म्हणजे त्या ठिकाणी उत्पादन सुध्दा होणार नाही. अशा वेळी त्या शेतकऱ्यांनी काय करावे ? शासन यामध्ये गांभीर्याने कोणते निर्णय घेणार आहे ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, गेल्या 50 वर्षामध्ये जेवढे उधाण आले नाही तेवढे उधाण 31.1.2010 आणि 1.2.2010 रोजी कोकणपट्टीमध्ये आले. रायगड जिल्ह्यामध्ये 5.49 मीटरने पाण्याची पातळी वाढली. हे पाणी शेतकऱ्यांच्या शेतामध्ये घुसले, ही वस्तुस्थिती खरी आहे. शेतीमध्ये त्यावेळी पीक नव्हते. कारण त्या ठिकाणी पावसाळी पीक घेतले जाते त्यामुळे पीक नव्हते. या ठिकाणी शक्यता यासाठी वर्तवली आहे की, हे खारे पाणी शेतामध्ये गेल्यामुळे कदाचित पीक कमी येण्याची शक्यता आहे. त्यादृष्टीने त्याची पाहणी करण्यात आलेली आहे. आज तरी अशा पध्दतीची कोणतीही भीती व्यक्त करण्यात आलेली नाही. कारण शेतीमध्ये पीकच नव्हते. परंतु पुढे तशा प्रकारची परिस्थिती उद्भवली तर शासन शेतकऱ्यांच्या बाजूने विचार करील.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, रायगड जिल्ह्यामध्ये खारेपाटामध्ये जी मळणी होते ती फाल्गून महिन्यामध्ये होते हे शासनाला माहीत आहे काय ? या खारेपाटामध्ये आमदार म्हणून फिरलो. बऱ्याचशा शेतकऱ्यांची मळणी झालेली नव्हती. त्यांच्या पिकाचे नुकसान झालेले होते. जिल्हा नियोजन मंडळाच्या बैठकीमध्ये माननीय पालकमंत्री व अर्थमंत्री यांनी सांगितले होते की, जवळजवळ 400 कोटी रुपयांचे नुकसान रायगड जिल्ह्यामध्ये झालेले आहे. ज्यावेळेला खारे पाणी जमिनीमध्ये येते त्यावेळी त्या ठिकाणी पाच वर्षे शेती पिकत नाही याची शासनाला जाणीव आहे काय ? त्याप्रमाणे शेतकऱ्यांना पाच वर्षाची नुकसानभरपाई देण्यात येणार आहे काय ? यामध्ये बांध फुटण्याचा विषय आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, कोकणामध्ये 50 वर्षामध्ये जेवढे उधाण झाले नव्हते तेवढ्या मोठ्या प्रमाणावर उधाण झाले. त्यामुळे बऱ्याच ठिकाणी बांध फुटलेले आहेत. त्याची पाहणी शासनाने केली आहे काय ? पाहणी केली असेल तर त्याचे किती नुकसान झाले आहे ?

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र. 4999.....

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, जे बांध फुटलेले आहेत त्याची पाहणी शासनाने केलेली आहे. मुळात हे मातीचे बंधारे आहेत आणि 1960-61 साली हे बंधारे घालण्यात आले होते. 1990-91 मध्ये त्यांची डागडुजी करण्यात आली. आता त्यावर किती खर्च येईल अशा पध्दतीचा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला. त्यांचा प्रश्न एका स्पेसिफिक तालुक्यापुरता आहे. आजच्या अंदाजानुसार त्या बंधाऱ्याकरिता 1 कोटी 2 लाख रुपये खर्च येण्याचा प्राथमिक अंदाज शासनाकडे आहे. मघाशी मी सांगितले की, शेतामध्ये पीक नव्हते. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी अधिकची माहिती सांगितली. कोकणामध्ये भात कापतात आमच्याकडे त्याला उडवी म्हणतात. भात कापून एकत्रित रचून ठेवतात याची शासनाला जाणीव आहे. परंतु अशा प्रकारच्या उडव्या पाण्याखाली गेल्या किंवा भिजल्या याची माहिती शासनाकडे नाही तसेच माननीय पालकमंत्र्यांनी त्या ठिकाणी निश्चितपणे काय विधान केले याची माहिती आता माझ्याकडे नाही. एकदा उधाणाचे खारे पाणी शेतामध्ये शिरल्यानंतर पाच वर्षे पीक येत नाही असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. शासनाची अशी माहिती आहे की, सुरुवातीलाच मोठा पाऊस पडला तर पहिले खारे पाणी वाहून जाते आणि जमीन बऱ्यापैकी पिकायोग्य होते.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र.4999.... श्री.भास्कर जाधव....

म्हणून तशा प्रकारे जर होऊ शकले नाही तर हे शासन शेतकऱ्यांच्या बाजूचे असल्यामुळे शेतक-यांसंबंधी सहानुभूतिने विचार करील.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, समुद्राच्या उधाणाचे पाणी शेतीमध्ये घुसले तर ही बाब नैसर्गिक आपत्तीमध्ये येत नाही असे उत्तरात नमूद केले आहे. परंतु कोकणातील अनेक भागात ही आपत्ती येते. त्यामुळे शासन हा विषय नैसर्गिक आपत्तीमध्ये समाविष्ट करणार आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अत्यंत महत्वाचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. कारण कोकणातील अनेक भागात अशी अचानक परिस्थिती उद्‌भवते हे नाकारता येत नाही. त्यामुळे नैसर्गिक आपत्तीमध्ये या विषयाचा अंतर्भाव करण्यासंबंधी शासन सहनुभूतिपूर्वक विचार करील.

2.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

राज्यातील सन 2009-2010 च्या हंगामात वाशिम जिल्हयाची पैसेवारी 50 पेक्षा कमी असल्याची बाब

(7) * 2859 श्री. दिवाकर रावते, श्री. गोपीकिसन बाजोरिया, डॉ. दीपक सावंत, श्री.किरण पावसकर : सन्माननीय महसूल मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील सन 2009-2010 च्या हंगामाकरिता वाशिम जिल्ह्यात अंतिम पैसेवारी जाहिर करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, जिल्हयातील सर्वच 793 गावांची अंतिम पैसेवारी 50 पैशापेक्षा कमी असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, ती किती व त्यात कोणकोणत्या गावांचा समावेश आहे,

(4) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय ?

श्री.प्रकाश सोळंके, श्री.नारायण राणे यांच्याकरिता : (1) होय.

(2) होय.

(3) सन 2009-10 मधील खरीप पिकाची अंतिम पैसेवारी 15 जानेवारी, 2010 रोजी प्रसिध्द करण्यात आली असुन वाशिम जिल्ह्यातील संपूर्ण म्हणजे 793 महसूली गावांमध्यें पैसेवारी 50 पैशापेक्षा कमी आलेली आहे,

(4) शासन निर्णय क्र.एससीवाय 2009/प्र.क्र.137/म-7 मंत्रालय मुंबई दिनांक 2 फेब्रुवारी, 2010 अन्वये वाशिम जिल्ह्यातील 50 पैसेपेक्षा कमी पैसेवारी लागलेल्या 793 महसुली गावात टंचाई परिस्थीती जाहिर करण्यात आली आहे व आवश्यक उपाययोजना करण्यात

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी प्रश्नातील परिस्थिती मान्य केलेली आहे. वाशिम जिल्हयातील 793 गावांमध्ये 50 टक्क्यांपेक्षा कमी आणेवारी आलेली आहे. त्यामुळे त्याठिकाणी टंचाईग्रस्त परिस्थिती निर्माण झाल्याचे म्हणजेच तेथे दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याचे शासनाने मान्य केलेले आहे. 'या 793 महसुली गावात टंचाई परिस्थिती जाहीर करण्यात आली आहे व आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत' असे उत्तरात म्हटले आहे. या गावांमध्ये वीज बिलाची वसुली थांबविली आहे काय, कर्ज वसुली थांबविली आहे काय, शासनाच्या ज्या योजना आहेत त्याचा त्यांना लाभ दिला आहे काय ? अशा कोणत्या उपाययोजना केल्या आहेत त्या सांगाव्या.

श्री.प्रकाश सोळंके : वाशिम जिल्हयातील टंचाईग्रस्त गावांमध्ये 50 टक्क्यांपेक्षा कमी आणेवारी आल्यामुळे त्यांना कोणत्या सवलती दिल्या जात आहेत असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. एखाद्या जिल्हयात अशी स्थिती उद्भवल्यास जमीन महसुलात 100 टक्के सूट देण्याची तरतूद आहे.

अशुधित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र.2859.... श्री.प्रकाश सोळंके....

वाशिम जिल्हयातील सर्व गावांमध्ये टंचाई जाहीर केल्यामुळे या गावांना 2.44 लाख एवढी जमीन महसुलात सवलत दिलेली आहे. त्याचबरोबर वीज बिलामध्ये 33 टक्के म्हणजेच एक तृतीयांश सूट दिली आहे. त्याची अंदाजित रक्कम 66 लाख होते. परीक्षा शुल्का पोटी 76.51 लाखाची सूट दिलेली आहे. सहकार कर्जाचे रुपांतर करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. 31 मार्च अखेर हे रुपांतर पूर्ण केले जाईल. शेती विषयक असलेल्या सर्व कर्जाच्या वसुलीला स्थगिती देण्यात आली असून त्याचा पाठपुरावा किंवा तगादा लावू नये असे आदेश जिल्हाधिका-यांना दिलेले आहेत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, वाशिम जिल्हयासंबंधी मंत्रिमहोदयांनी निवदेन केले आहे. राज्यात 50 पैशाच्या आत आणेवारी असलेली गावे अनेक जिल्हयामध्ये आहेत. त्यांना हे सर्व निकष त्यांना लागू केले जातील काय ? विदर्भातील बुलढाणा, अकोला, अमरावती, यवतमाळ हे जिल्हे दुष्काळग्रस्त आहेत. या जिल्हयांमध्ये याही वर्षी पाऊस कमी पडल्यामुळे 50 पैशाच्या आत आणेवारी आलेली आहे. त्यामुळे या जिल्हयांना सुध्दा हे निकष लागू केले जातील काय ?

श्री.प्रकाश सोळंके : राज्यातील टंचाईग्रस्त गावे जाहीर करण्यात आलेली आहेत. त्याठिकाणी या सर्व सवलती दिल्या जातील.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी आता जे उत्तर दिले आहे त्याचे मी स्वागत करतो. वाशिम जिल्हयातील 793 गावांमध्ये आणेवारी कमी आली आहे असे म्हटले आहे, या जिल्हयातील या व्यतिरिक्त गावे आहेत काय ?

श्री.प्रकाश सोळंके : 793 गावो वाशिम जिल्हयातील आहेत. संपूर्ण जिल्हयातील ही गावे आहेत.

4.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

NTK/KTG/KGS

शिरुरकासार (जि.बीड) तालुक्यात अतिवृष्टीने शेकडो

हेक्टर पिकांचे मोठया प्रमाणात झालेले नुकसान

(8) * 3450 श्रीमती उषाताई दराडे : सन्माननीय पुनर्वसन व मदतकार्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) शिरुरकासार (जि.बीड) तालुक्यात माहे डिसेंबर, 2009 व जानेवारी, 2010 मध्ये झालेल्या अतिवृष्टीत शेकडो हेक्टर पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले तसेच तरडगव्हाण गावांचा संपर्क तुटल्याने दोन व्यक्तींना रस्त्याअभावी प्राण गमवावे लागले आहे हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर गावातील रस्ते दुरुस्त करण्याबाबत अनेक वेळा मागणी करुन ही रस्त्याबाबत शासनामार्फत कोणतीच कार्यवाही केली नाही हेही खरे आहे काय,

(3) असल्यास, प्रश्न भाग (1) व (2) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(4) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार या घटनेत मृत झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना तसेच तालुक्यातील अतिवृष्टीत नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासनामार्फत कोणती मदत केली वा करण्यांत येत आहे,

(5) अद्याप कोणतीच मदत केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.प्रकाश सोळंके, श्री.नारायण राणे यांच्याकरिता : (1) नाही, हे खरे नाही.

(2), (3), (4) व (5)

प्रश्न उद्भवत नाही.

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, या प्रश्नाला शासनाने अत्यंत चुकीचे उत्तर दिलेले आहे. माझी स्वत:ची अशी माहिती आहे की, आर्वी पासून 3 कि.मी.वर असलेल्या तरडगव्हाण या गावात पाऊस पडल्यानंतर 10 दिवस या गावाचा इतर गावांशी संपर्क तुटला होता. त्यामुळे दामोदर तुकाराम पवार यांचा आणि रमाबाई गंगाराम या 45 वर्षाच्या महिलेला दवाखान्यामध्ये जाता आले नाही म्हणून मृत्यू झाला आहे.

यानंतर श्री.ओटवणेकर.....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.3450.....

श्रीमती उषा दराडे...

सदर रस्त्याच्या दुरूस्तीसंबंधी शासनाने पावले उचललेली नाहीत तसेच मृत पावलेल्या वारसांना शासनाने नुकसान भरपाई दिलेली नाही. असे असताना शासनाने "हे खरे नाही" अशा प्रकारचे लेखी उत्तर दिलेले आहे. तेव्हा यासंबंधी शासन फेर तपासणी करणार आहे काय ?

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी शासनाकडे उपलब्ध असलेल्या माहिती शिवाय अधिकची माहिती सदनासमोर आणली आहे. यासंबंधी सविस्तर चौकशी केली जाईल आणि त्यानुसार कार्यवाही केली जाईल.

.....

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पालघर (जि.ठाणे) येथील वैतरणा नदीतून अवैधरित्या रेती उपसा करण्यात येत असून लाखो रुपयांचा शासनाचा महसूल बुडविल्या प्रकरणी करावयाची कार्यवाही

(९) * २९०७ श्री. संजय दत्त , श्री सुभाष चव्हाण , प्रा. सुरेश नवले , श्रीमती अलका देसाई , श्री. एम.एम.शेख : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर (जि.ठाणे) येथे वैतरणा नदीतून अवैधरित्या सक्शन पंपाने रेती उपसा करण्यात येवून शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बूडविला जात असल्याचे माहे जानेवारी, २०१० मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवैधरित्या होत असलेला रेती उपसा करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच दिवसेंदिवस वाढत असलेला रेती उपसा रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.प्रकाश सोळंके,श्री.नारायण राणे यांच्याकरिता : (१), (२) व (३) माहे जानेवारी २०१० ते आजतागायत रेतीचे अवैध उत्खनन व वाहतूक करणाऱ्या एकूण १११ ट्रक्सवर दंडणीय कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून रूपये ६,९१,०००/- इतका दंड वसूल करण्यात आलेला आहे. तसेच, अनधिकृतरित्या सक्शन पंपाद्वारे रेती उत्खनन करणाऱ्या ७ सक्शन पंपधारकांवर भा.द.वि.स. ३७१,३४ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, या प्रश्नाच्या लेखी उत्तरात मला आपल्या परवानगीने पुढील सुधारणा करावयाची आहे. लेखी उत्तरामध्ये नमूद केलेले "भा.द.वि.सं.371 ऐवजी 379" असे वाचावे.

सभापती : ठीक आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, या प्रश्नाला अतिशय गंभीर स्वरूप प्राप्त झाले आहे. सध्या वाळू माफियांनी फार मोठ्या प्रमाणावर धुमाकूळ घातला आहे, याची महसूल मंत्री श्री.नारायण राणे यांना कल्पना आहे. त्यांनी यासंबंधी पावले उचललेली आहेत. परंतु, पूर्णपणाने जेवढे करायला पाहिजेत तेवढ्यापर्यंत परक्युलेशन होत नाही. (अडथळा) त्यामुळे माझा पहिला प्रश्न असा आहे की, वाळू माफियांना आळा घालण्यासाठी शासन कुठली ठोस पावले उचलणार आहे ? वाळूचा लिलाव करण्यासंबंधी दोन प्रकार आहेत. त्याबाबत शासनाचे धोरण काय आहे, यासंबंधीची माहिती माननीय महसूल मंत्री श्री.नारायण राणे सभागृहाला देतील काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी वाळू संबंधीचा विषय अतिशय गांभीर्याने घेतलेला दिसत आहे. हा विषय त्यांनी गांभर्याने घेण्यापूर्वी थोडी अधिकची माहिती घेणे आवश्यक आहे, असे मी त्यांना सांगेन. सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त हे सरकारी पक्षात आहेत. ठाणे जिल्ह्यातील पालघर येथे पारंपरिक पद्धतीने म्हणजे बुडकी मारून वाळू काढली जाते. यासंबंधीची माहिती सदनातील सदस्य श्री.जयंत पाटील यांना देखील आहे. वाळू काढण्यासाठी गट क्रमांक देण्यात येतो. त्याप्रमाणे या परिसराला गट क्रमांक 7 देण्यात आला आहे. येथे सक्शन पंपद्वारे वाळू काढली जात नाही. वाळू काढण्याच्या व्यवसायाला प्राधान्य देण्यासाठी येथे लिलाव काढला जात नाही. येथे वर्षानुवर्षे बुडक्या पद्धतीने वाळू काढली जाते व त्यास प्राधान्य दिले जाते. एवढेच नव्हे तर पालघर येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी देखील बुडक्या पद्धतीने वाळू काढावी अशी विनंती केली आहे व ती शासनाने मान्य देखील केली आहे. पालघर येथे प्रथे नुसार वाळू काढण्यात येते. असे असताना काही लोकांनी बेकायदेशीररित्या म्हणजे सक्शन पंपद्वारे वाळू काढण्याचा प्रयत्न केला होता. अशा सक्शन पंपधारकांना शासकीय अधिकाऱ्यांनी पकडले असून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली आहे. त्यांच्याकडून किती रक्कम वसूल करण्यात आली आहे, यासंबंधीची माहिती लेखी उत्तरामध्ये नमूद करण्यात आली आहे. सभापती महोदय, राज्यात वाळू माफिया भरपूर आहेत. त्यांच्याविरूद्ध कडक कारवाईचे धोरण राज्य शासनाने स्वीकारले आहे. पूर्वी ठराविक लोकांना परमिट दिले जाते अशा प्रकारचे आरोप व्हायचे. आता मात्र माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार लिलावाची पद्धत राज्य शासनाने स्वीकारली आहे. सगळीकडे खुला लिलाव काढला जातो. आज शासनाचे वाळूद्वारा मिळणारे उत्पन्न जवळपास 800 कोटी एवढे आहे. लिलावाद्वारे अधिक उत्पन्न मिळावे म्हणून शासनातर्फे उपाययोजना केली जात आहे. तसेच जे बेकायदेशीररित्या वाळू काढत आहेत त्यांची गय केली जात नाही.

यानंतन श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बेकायदेशीर वाळू काढणा-यांच्या गाड्या, सक्शन पंप इत्यादी जप्त करण्याची कारवाई केलेली आहे. रायगड किंवा महाड परिसरात जे कोणी बेकायदेशीर वाळू उत्खनन व वाहतूक करीत असतील त्यांच्यावर कारवाई करण्याचे धोरण अवलंबिलेले आहे.

श्री. भाई जगताप : माननीय महसूल मंत्री श्री. नारायण राणे यांनी या प्रश्नाला सविस्तर आणि योग्य उत्तर दिलेले आहे असा माझा समज आहे. प्रश्न भाग (1), (2) आणि (3)च्या उत्तरामध्ये 111 ट्रक्सवर दंडणीय कारवाई करण्यात आलेली असून 6,91,000/- रु. दंड वसूल करण्यात आलेला आहे, असे म्हटलेले आहे. तसेच ज्यांनी सक्शन पंप वापरले त्यांच्यावर कारवाई करण्यात आल्याचे मंत्री महोदयांनी सांगितले आले. या गोष्टी एका दिवसात घडत नाहीत. अनेक वर्षे अशा गोष्टी चालू असतात. या अवैध गोष्टी चालू असताना संबंधित अधिकारी काय करत असतात ? तेव्हा याबाबत संबंधित अधिका-याला जबाबदार धरुन त्याच्यावर आपण कोणती कारवाई करणार आहात ?

श्री. नारायण राणे : जे बेकादेशीर वाळू काढत असताना आढळले त्यांच्यावर अधिका-यांनी कारवाई केली. त्यांचे ट्रक्स, सक्शन पंप जप्त केले, त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली. त्यामुळे अशा प्रकारचे काम करणा-या अधिका-यांवर कारवाई करण्याचा प्रश्न नाही. परंतु जे कोणी अधिकारी चोरट्या पध्दतीने वाळू उत्खननास व वाहतूकीस मदत करतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

श्री. भाई जगताप : 7 सक्शन पंपधारकांवर व 111 ट्रक्सच्या बाबतीत कारवाई केल्याचे उत्तरात नमूद केलेले आहे. मग अशा अवैध वाळू वाहतूकीस किंवा उत्खननास अधिकारी मदत करीत असल्याचा आणखी कोणता पुरावा पाहिजे ? असे प्रकार घडणार नाहीत याची जबाबदारी संबंधित अधिका-यावर नाही काय ? या सगळया भागामध्ये बेकादेशीर काम करणा-यांवर ज्या पध्दतीने कारवाई करायला पाहिजे होती त्या पध्दतीने ती केली गेली नाही याबद्दल दुमत नाही. तेव्हा हे जे अवैध काम झाले त्याबाबतीत जबाबदार असणा-या अधिका-यांवर कारवाई करण्यात येईल काय ?

श्री. नारायण राणे : अधिकारी चांगले काम करीत असताना त्यांच्यावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही असे मी सुरुवातीला सांगितले. बेकायदेशीर कामे करणा-यांना जे अधिकारी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मदत करत असतील त्यांच्या कठोर कारवाई केली जाईल. रायगड आणि महाड या परिसरामध्ये मोठया प्रमाणावर असे प्रकार चालतात. तेथील जिल्हाधिकारी, एसडीओ या सर्वांना याबाबतीत निर्देश दिलेले आहेत.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : वाळू उत्खननाचा व्यवसाय हा कोकणातील विशेषत: ठाणे आणि रायगड जिल्ह्यामध्ये चालतो. कोकणातील भूमिपुत्र हा व्यवसाय मोठ्या प्रमाणावर करतात. बुडी मारुन वाळू काढली जाते. हायकोर्टाच्या निर्देशप्रमाणे राज्य शासनाने लिलाव पध्दत स्वीकारलेली आहे. माझ्या माहिती प्रमाणे सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये कालच वाळूचा लिलाव करण्यात आला. वाळूची टंचाई निर्माण झाल्यानंतर लिलाव बंद करण्यात येतो. नंतर पुन्हा दुसरा लिलाव काढण्याची प्रक्रिया सुरु होते. अशा पध्दतीने कृत्रिम वाळू टंचाई निर्माण करण्याची पध्दत सुरु झाली तर त्याचा परिणाम वाळूच्या किंमती वाढण्यामध्ये होणार आहे. तेव्हा ही परिस्थिती लक्षात घेऊन शासन यावर काही विशेष नियंत्रण ठेवणार आहे काय ?

श्री. नारायण राणे : सजेशन फॉर ॲक्शन

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सिंधुदूर्ग तसेच रत्नागिरी जिल्हयात होत असलेली बेसुमार जंगलतोड

(१०) * ३४२६ श्री. अनिल परब, श्री. रामदास कदम, डॉ. दिपक सावंत, श्री. दिवाकर रावते : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग तसेच रत्नागिरी जिल्ह्यात बेसुमार जंगलतोड होत असून या प्रकरणी वन विभागाचे अधिकारी कोणतीही कार्यवाही करीत नाहीत, हे खरे आहे काय

(२) असल्यास, बेसुमार कत्तलीमुळे बहुउपयोगी वृक्षांच्या, औषधी तसेच खैराच्या झाडांच्या जाती नष्ट होण्याचा धोका निर्माण झाला असून पर्यावरणाचे संतुलन बिघडले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

श्री. भास्कर जाधव, डॉ. पतंगराव कदम यांच्याकरिता : (१) रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्ह्यात काही क्षेत्रामध्ये स्थानिक लोक खाजगी क्षेत्रातील वृक्षांची तोडणी करण्यासाठी परवानगी घेऊन वृक्षतोडणी करतात. सदर प्रकरणी वनविभागाचे अधिकारी कोणतीही कार्यवाही करीत नाहीत, हे खरे नाही.

(२) व (३) सिंधुदूर्ग जिल्ह्यात भौगोलिक क्षेत्राच्या १०.९२% क्षेत्र वन विभागाकडे आहे व रत्नागिरी जिल्ह्यात भौगोलिक क्षेत्राच्या फक्त ०.८% क्षेत्र वनविभागाकडे आहे. या दोन्ही जिल्ह्यातील बऱ्याच लोकांचे जिवन हे खाजगी मालकीतील वृक्षापासून मिळणाऱ्या उत्पन्नावर अवलंबून असल्यामुळे खाजगी क्षेत्रातील वृक्ष तोडकरीता मोठ्या प्रमाणात परवानगी घेऊन वृक्षतोड केली जाते. सदर वृक्षतोडीमुळे पर्यावरणाचे संतूलन बिघडू नये म्हणून आवश्यक प्रमाणात वृक्ष लावण्याची तरतूद कायद्यामध्ये करण्यात आली आहे.

ॲड. अनिल परब : प्रश्न भाग (1)च्या संदर्भात शेवटी "हे खरे नाही." असे उत्तर देण्यात आलेले आहे. प्रश्न भाग (2) आणि (3)च्या उत्तरामध्ये खाजगी क्षेत्रातील वृक्ष तोडीकरीता मोठ्या प्रमाणावर परवानगी घेऊन वृक्षतोड केली जाते असे म्हटलेले आहे. परवानगी न घेता जी वृक्षतोड केली जाते त्याबाबत शासनाला किती माहिती आहे हे मला माहीत नाही. परंतु परवानगी घेऊन जेवढी वृक्षतोड केली जाते त्याच्या किती तरी पटीने परवानगी न घेता वृक्षतोड केली जात आहे. तेव्हा अशाप्रकारे परवानगी न घेता वृक्षतोड करणा-यावर कारवाई करण्याकरिता कायद्यात विशेष तरतूद करण्यात येईल काय ? ज्या लोकांना पकडले जाते त्यांना तेथेच सोडले जाते. तेव्हा अशा लोकांना जामीन न मिळता त्यांच्यावर कडक कारवाई होईल अशा प्रकारची तरतूद कायद्यात करण्यात येईल काय ?

...नंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत/परिपृच्छा समिती

ता.प्र.क्र.3426.....

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सभापती महोदय, ही वस्तुस्थिती खरी आहे की, कोकणाला खूप मोठे निसर्गाचे वरदान या वन संपत्तीच्या माध्यमातून लाभले आहे. कोकणातील सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी या दोन जिल्हयांपैकी सिंधुदुर्ग जिल्हयात भौगोलिक क्षेत्रफळाच्या 10 टक्के जमिनीवर वन आहे. रत्नागिरी जिल्हयातील एकंदरीत भौगोलिक क्षेत्र आहे त्याच्या 0.8 टक्के वनीकरण आहे. इतर सर्व जमीन खाजगी आहे. शासनाच्या हे लक्षात आले आहे की, तेथे खूप मोठी नैसर्गिक संपत्ती आहे. या नैसर्गिक संपत्तीचे रक्षण करण्यासाठी चांगल्या प्रकारची पावले शासनाने उचलली आहेत. 100 टक्के कोळसा बंदी केली आहे. तेथे वृक्षतोड अधिक वाढली हे शासनाच्या लक्षात आल्यानंतर मागील 3-4 वर्षाचा आढावा घेतला तर हळूहळू या गोष्टीवर मोठया प्रमाणात बंधन आणण्यात शासनाला यश आले आहे. यावर अधिक कठोर उपाययोजना व्हावी असे शासनाचे धोरण आहे. माननीय मंत्रीमहोदय सुध्दा या संदर्भात आग्रही आहेत. शासनाने या गोष्टीकडे दुर्लक्ष केले अशी वस्तुस्थिती नाही.

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी : सन्माननीय मंत्रीमहोदयांनी याठिकाणी उत्तर दिले आहे. परंतु रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये जे वन आहे ते विचारात घेता वन अधिकाऱ्यांच्या माध्यमातून मोठया प्रमाणात वृक्षतोडीस चालना मिळते. मध्यंतरी मुंबईमध्ये एक परिषद झाली त्या परिषदेमध्ये केंद्रीय वन आणि पर्यावरण मंत्र्यांनी स्पष्टपणे सांगितले की, महाराष्ट्रामध्ये वन खात्याचे या गोष्टीकडे लक्ष नाही. वन खात्याने ज्या प्रामाणिकपणे काम केले पाहिजे, वनाचे प्रमाण वाढण्यासाठी जे काम केले पाहिजे ते काम वन खाते करीत नाही. असलेले वन कमी करण्यात वन अधिकारी आणि वन विभागाची यंत्रणा कामाला लागली आहे. या पार्श्वभूमीवर सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्हयामध्ये जे वन आहे ते वन मोठया प्रमाणात अधिकाऱ्यांच्या माध्यमातून कमी होत आहे त्याबाबत शासन कोणती उपाययोजना करणार आहे?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी माहिती दिली त्या पध्दतीने केंद्रीय वन आणि पर्यावरण मंत्री बिलकूल बोललेले नाहीत. त्यांनी सांगितले की, महाराष्ट्रामध्ये पर्यावरणाच्या दृष्टीने आणि वनाच्या दृष्टीने उत्तम काम चालले आहे. आम्ही केंद्र सरकारकडून अधिक निधी देत आहोत. माननीय मुख्यमंत्री त्या परिषदेला हजर होते. कोकणामध्ये काही जिल्हयांमध्ये अधिक वृक्षतोड होते म्हणून आम्ही धोरणात्मक निर्णय घेत

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहोत. ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये झाडे तोडण्यावर बंदी आणणार आहोत. याची तपासणी करण्यासाठी मुख्य वनरक्षकांच्या अध्यक्षतेखाली समिती करणार आहोत. विभागीय आयुक्त, कोकण विभाग आणि मुख्य वनरक्षक, पुणे यांची समिती करीत आहोत. कशासाठी आणि किती परवानगी दिली पाहिजे याची छाननी केली जाईल. कोकणातील या चारही जिल्हयांमध्ये वृक्षतोड बॅन करीत आहोत.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम हे ज्येष्ठ मंत्री आहेत. प्रभू रामचंद्राना वनवास भोगावा लागल्यानंतर त्यांनी वनवासात असताना रावणाचा वध केला. जे जंगल माफिया रावण आहेत त्यांचा बंदोबस्त करणे आवश्यक आहे. चिपळूणमधील एका सॉ मिलच्या आवारात सुमारे 2000 ट्रक्स लाकूड सापडले. परंतु केवळ 700 ट्रक्स लाकूड सापडल्याची नोंद केली गेली. विनापरवाना या लाकडाची वाहतूक करण्यात येत होती. या संदर्भात कोणती कारवाई केली गेली? अधिकारी या प्रकरणी कारवाई करीत नाहीत, जे अधिकारी यांना पाठिशी घालतात त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल काय? ग्लोबल वॉर्मिंगची चर्चा होत असताना वन खात्याचे महत्व लक्षात घेता अवैध वृक्षतोड करणाऱ्यांवर मोक्का कायद्यांतर्गत कारवाई करण्याचा विचार करणार आहात का? तरच अवैध वृक्षतोड थांबेल.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी चिपळूणमधील मिलचा उल्लेख केला. ही वस्तुस्थिती आहे की, वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी अवैध वाहतूक होत असलेला माल पकडला. मध्यंतरी आमच्या अधिकाऱ्यांनी बिबटया मारणाऱ्या लोकांना पकडल्यानंतर त्यासंदर्भात आंदोलन करणाऱ्या लोकांशी संबंधित व्यक्ती यामध्ये पकडण्यात आली होती. त्यांचे म्हणणे असे होते की, या व्यक्तिविरुध्द गुन्हा दाखल करु नये, परंतु आमच्या अधिकाऱ्यांनी त्यांची विनंती मान्य केली नाही म्हणून थोड्या वेगळ्या मार्गाने मोठ्या प्रमाणात सर्वांच्या समोर आणण्याचा हा प्रयत्न केला जात आहे हे लक्षात घेतले पाहिजे. याचा अर्थ असा नाही की, अवैध वाहतुकीला शासन पाठिंबा देत आहे. त्या वस्तुंचा अधिकाऱ्यांनी पंचनामा केलेला आहे व पुढील कारवाई नियमानुसार करण्यात येईल.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

.....2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावासंबंधी

सभापती : नियम 289 अन्वये आज माझ्याकडे दोन सूचना प्राप्त झालेल्या आहेत. पहिली सूचना सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी "मुंबई आणि राज्यातील 80 हून अधिक शाळकरी आणि तरुण विद्यार्थ्यांनी केलेल्या आत्महत्त्या व त्याबाबत करावयाची उपाययोजना" यासंदर्भात आहे. यासंबंधीचा निर्णय मी दालनातच दिलेला आहे.

यानंतर माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर व इतर यांनी "वसई-विरार प्रस्तावित महानगरपालिकेतून 53 गांवे वगळावी यासाठी सर्वपक्षीय समिती स्थापन होऊन जन आंदोलन सुरु असून माननीय सदस्य श्री. विवेक पंडित व आंदोलकांवर लाठीहल्ला करुन पाण्याचे फवारे मारणे" अशा गंभीर विषयावर चर्चा करण्यासाठी 289 अन्वये सूचना दिलेली आहे.

ही सूचना मी स्वीकारलेली आहे व त्यावर पुढील आठवड्यात चर्चा घेण्याचे मान्य केले असून त्या चर्चेला गृह विभागाकडून उत्तर देण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण आमची सूचना स्वीकारल्याबद्दल मी आपणास धन्यवाद देतो. परंतु कामकाज सल्लागार समितीमध्ये चर्चा झाली त्यावेळेस सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी हे देखील उपस्थित होतो. नियम 289 अन्वये प्रस्ताव देणे हा सन्माननीय सदस्यांचा विशेषाधिकार आहे. तो अधिकार यासाठी आहे की, अत्यंत गंभीर आणि महाराष्ट्राच्या सर्वसाधारण जीवनमानावर परिणाम करणारी एखादी घटना घडल्यानंतर तातडीने सभागृहापुढील कामकाज बाजूला सारुन असा प्रस्ताव घ्यावा. तो नियम मी वाचून दाखवितो.

"कोणत्याही सदस्यास सभापतींच्या संमतीने कोणताही नियम विधानपरिषदेपुढील कोणत्याही विशिष्ट प्रस्तावास तो लागू करतांना स्थगित करण्यात यावा असा प्रस्ताव मांडता येईल आणि प्रस्ताव संमत झाला तर संबंधित नियम त्या वेळेपुरता स्थगित होईल." असा हा मूळ नियम आहे.

त्यानुसार सभागृहात दररोज चार-पाच स्थगन प्रस्ताव यायला लागले आणि त्यावर दोन-दोन तास एवढा वेळ जात होता. त्यामुळे सभापतींना जो प्रस्ताव स्वीकारावासा वाटेल त्या प्रस्तावाच्या बाबतीत आणि परिस्थिती गंभीर वगैरे असेल तर मात्र प्रश्नोत्तराच्या 10-15 मिनिटे अगोदर निवेदन करण्यात यावे म्हणून हा जो अधिकार पाहिजे तो नियम समितीमध्ये काढून घेतलेला नाही.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

परंतु यासंदर्भात योग्य तो निर्णय घेण्याचा अधिकार आम्ही आपल्याला नियम समितीच्या बैठकीतच दिलेला आहे. कारण अधिवेशन काळात रोज नियम 289 चे 5-10 प्रस्ताव येत असतात व त्या प्रस्तावामध्ये सभागृहाचा बराचसा वेळ वाया जातो व कारण नसतांना महत्वाचा प्रस्ताव बाजूला पडतो. त्यामुळे नियम 289 चा प्रस्ताव गंभीर असेल तेव्हा प्रश्नोत्तराचा तास बाजूला ठेवून किंबहुना सभागृहापुढे कोणताही विषय असला तरी तो बाजूला ठेवून नियम 289 च्या गंभीर प्रस्तावावर चर्चा घडवून आणावी अशी माझी आपल्याला विनंती आहे. आपण गंभीर प्रश्नाला न्याय द्याल अशी अपेक्षा आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, नियम 289 च्या प्रस्तावाच्या संदर्भात निर्णय घेण्याचा माननीय सभापती महोदयांना स्वत:चा अधिकार आहे व तो अधिकार माननीय सभापती महोदयांना कायम राहणार आहे. फक्त इंटरप्रिटीशन वाईड होणार नाही याची काळजी घ्यावी एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती :या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला आहे. 12 मार्च, 2010 रोजी नियम समितीची बैठक झाली होती व या बैठकीमध्ये या विषयावर चर्चा देखील झालेली आहे. या बैठकीसाठी सभागृहाच्या विरोधी पक्ष नेत्यांना तसेच गट नेत्यांना देखील बोलावण्यात आले होते. या बैठकीमध्ये सखोल व सविस्तर चर्चा झाली होती. नियम 289 च्या संदर्भात मी समिती पुढे असे विचार मांडले होते की, जर एका एका दिवसात माझ्याकडे नियम 289 अन्वये सहा सहा प्रस्ताव आले आणि हे सर्व प्रस्ताव कसे योग्य आहेत म्हणून जर सदनात चर्चा झाली तर त्यासाठी किमान 15 ते 20 मिनिटे जाऊ शकतात. काही वेळेला तर यासंदर्भात अर्धातासापेक्षा अधिक वेळ सुध्दा गेलेला आहे. सभागृहातील सदस्यांच्या तसेच जनतेच्या दृष्टीने सभागृहातील प्रश्नोत्तराचा तास हा सर्वात महत्वाचा आहे. त्यामुळे प्रश्नोत्तराच्या वेळेस नियम 289 चा प्रस्तावावर चर्चा करण्यापेक्षा मी यासंदर्भात दालनात निर्णय घेईन. जर यासंदर्भात चर्चा करणे आवश्यक असेल तर प्रश्नोत्तराच्या तासानंतर प्रस्ताव पुकारला जाईल.

....2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती ....

आता सुध्दा मी नियम 289 चा प्रस्ताव हा प्रश्नोत्तराच्या तासानंतरच पुकारलेला आहे. मी फक्त एवढेच केले की, नियम 289 च्या प्रस्तावाच्या संदर्भातील आपल्या मनातील भावना मी स्वीकारलेली आहे. या प्रस्तावावर चर्चा झाली पाहिजे अशी आपली इच्छा होती परंतु ही चर्चा आज न घेता पुढील आठवडयात घेतली जाणार आहे.

या ठिकाणी विरोधी पक्ष नेते श्री. फुंडकर साहेबांचा विषय देखील महत्वाचा होता. त्यामुळे तो विषय देखील मी स्वीकारलेला आहे. पुढच्या महिन्यात यासंदर्भात चर्चा घेतली जाईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, नियम समितीमध्ये ठरल्याप्रमाणे आपण आम्हाला या ठिकाणी विस्तृत माहिती दिलेली आहे. प्रश्नोत्तराचा तास हा अत्यंत महत्वाचा असतो. प्रश्नोत्तराच्या तासानंतर नियम 289 वर चर्चा झाली पाहिजे परंतु आपल्याकडे रोज 5-5,7-7 सूचना येत असतात. परंतु या सूचनांचा निकष लावून त्या सूचनांवर सभागृहात चर्चा झाली पाहिजे. परंतु राज्यामध्ये एखादी गंभीर स्थिती उद्भवली, 26.11 सारखी परिस्थिती निर्माण झाली तर आपण 289 च्या संदर्भात जो काही निर्णय घेतलेला आहे तो निर्णय अशा वेळी लागू करु नये अशी माझी सूचना आहे. नाही तर मग गंभीर विषयालाही महत्व दिले जाणार नाही आणि प्रश्नोत्तराचा तास घेतला जाईल. त्यामुळे माझी आपल्याला विनंती आहे की, एखाद्या विशिष्ट परिस्थितीमध्ये सभागृहात नियम 289 अन्वये प्रस्ताव आला तर त्यावेळी प्रश्नोत्तराचा तास बाजूला ठेवावा लागेल व त्यामुळे यासंदर्भात आपण विचार करावा अशी माझी आपल्याला विनंती आहे.

सभापती :नियम 289 च्या अनुषंगाने योग्य तो निर्णय घेण्यात येईल. परंतु ज्यावेळी राज्यासमोर अत्यंत महत्वाचा प्रश्न निर्माण झाला असेल त्यावेळी माननीय विरोधी पक्ष नेते किंवा गट नेते सांगतील त्या प्रमाणे निर्णय घेतला जाईल.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.मु.शी : **<u>औचित्याचे मुद्दे</u>**

सभापती :सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. राज्यातील मागासवर्गीय व्यक्तिंना जातीचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी 50 वर्षे वास्तवाचा पुरावा द्यावा लागत असल्यामुळे मागासवर्गीय आणि इतर संघटनांनी अशा प्रकारची मागणी केलेली आहे की,शासनाने यासंबंधी फेर विचार करावा . हे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी 50 वर्षे वास्तव्याचा पुरावा द्यावा लागत असल्यामुळे त्यांच्यामध्ये नाराजी पसरलेली आहे तेव्हा शासनाने याबाबत फेर विचार करावा अशी मी औचित्याच्या मुद्याव्दारे शासनाला विनंती करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2.

सभापती : या नंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय,माझा औचित्याचा मुद्दा आहे. हा मुद्दा मांडण्यासाठी आपण मला परवानगी दिल्याबद्दल मी प्रथम आपले आभार मानते.

सभापती महोदय, संबंधित विभागाचे मंत्री श्री बबनराव पाचपुते सभागृहात उपस्थित आहेत तेव्हा त्यानी याबाबत खुलासा करावा अशी माझी त्यांना विनंती आहे. गेल्या दोन दिवसापासून अशी माहिती सातत्याने मिळत आहे की, जळगाव जिल्हयातील चोपडा येथील शासकीय वसतिगृहातील 45 अल्पवयीन आदिवासी मुलींची गर्भधारणा चाचणी करण्यात आली. शाळा कॉलेजेस मध्ये जाण्याची वेळ असतांनासुध्दा मुलीना थांबवून व धमक्या देऊन तेथील गृहपाल श्रीमती स्वाती सूर्यवंशी खाजगी प्रयोग शाळेत घेऊन गेल्या आणि त्या ठिकाणी या मुलींची तपासणी करण्यात आली होती. एका बाजुला आदिवासी मुला मुलींच्या शिक्षणाच्या व्यवस्थेमध्ये अजून चांगली सोय झाली पाहिजे याकडे सातत्याने सन्माननीय सदस्य शासनाचे लक्ष वेधत आहे आणि दुस-या बाजूला आठवी आणि नववीमध्ये शिकणा-या मुलीची अशा प्रकारे गर्भधारणा चाचणी केली जात आहे. ही चाचणी करण्याची कारणे त्यांच्या पालकांना कळविण्यात आली होती किंवा नाही ?. अशा प्रकारे गर्भधारणा चाचणी करण्यामुळे चुकीचे प्रघात पडत आहेत. औचित्याच्या मुद्याव्दारे मी या संतापजनक प्रकाराकडे शासनाचे लक्ष वेधत असून शासनाने या बाबत योग्य ती पावले उचलावीत अशी मी मागणी करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3..

श्री.बबनराव पाचपुते (आदिवासी विकास मंत्री): सभापती महोदय, जळगाव जिल्हयातील चोपडा येथे एक शासकीय वसतिगृह असून त्या ठिकाणी पोस्ट ग्रॅज्युएट पर्यंत शिकणा-या मुली राहातात त्यातील एका मुलीचे पोट दुखत असल्याबद्दल तिने वरिष्ठाना सांगितले होते. त्यामुळे त्या मुलीला हॉस्पिटलमध्ये जाण्यास सांगण्यात आले होते. या मुलीला हॉस्पिटलमध्ये नेल्या नंतर व तेथे सोनोग्राफी केल्यानतर तिला युरिन स्टोन असल्याचे लक्षात आले. त्याच वेळी स्थानिक पत्रकारांनी आणि इतर व्यक्तिनी तक्रार केल्यामुळे बाकीच्या मुलींचीसुध्दा अशा प्रकारची चाचणी करण्यात आली होती हे अत्यंत चुकीचे झालेले आहे. म्हणून त्या ठिकाणी काम करणा-या श्रीमती स्वाती सूर्यवंशी यांना कार्यमुक्त करण्यात आले आहे. तसेच यासबंधीची चौकशी करण्यासाठी काल संध्याकाळी वरिष्ठ अधिका-यांना पाठविण्यात आले आहे. दहा दिवसामध्ये यासबंधीची चौकशी करुन अहवाल येईल. या प्रकारात प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरीत्या जे कोणी दोषी आढळून येतील त्यांच्या विरुध्द कारवाई करण्यात येईल. त्या मुलीची तपासणी करण्यासाठी तिला सरकारी हॉस्पिटलमध्ये न्यावयास पाहिजे होते परंतु त्यांनी खाजगी हॉस्पटलमध्ये पाठविले होते या सगळयाच गोष्टी अत्यंत धृणास्पद आणि चुकीच्या झालेल्या असून या प्रकरणाची दहा दिवसात चोकशी होऊन त्याचा अहवाल आल्यानंतर सभागृहाला त्याबाबतीत अवगत केले जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : या नंतर सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सभापती महोदय कोकणामध्ये आंबा, काजू , कोकम, चिकू, फणस , जांभूळ, करवंदे इत्यादी फळे होत असून गेल्या दहा वर्षापासून असे दिसून आले आहे की अतिवृष्टीमुळे वा फयान वादळामुळे आंब्याचे नुकसान झाल्यामुळे सबंधित शेतक-यांना नुकसान भरपाई द्यावी अशा प्रकारची मागणी केली जाते. अवेळी पडणारा पाऊस आणि हवामानात झालेल्या बदल्यामुळे कोकणातील शेतक-यांच्या वा बागायतदारांच्या फळ बागायतीचे मोठया प्रमाणावर नुकसान होत असते. त्यावेळी जी काही मदत दिली जाते ती अत्यंत अपुरी असते. फयान वादळामुळे जी नुकसान भरपाई दिली गेली ती अत्यत अपुरी आहे. आंब्याचे झाड वाढविण्यास दहा ते पधरा वर्षे लागतात आणि हेक्टरी जी मदत दिली जाते ती अत्यंत अपुरी असल्यामुळे ती मदत त्या शेतक-याच्या उपयोगीसुध्दा पडत नाही.

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर...

त्यामुळे या बागायतदारांना आपल्याला उभे करावयाचे असेल तर त्यांच्यासाठी फळ पीक विमा योजना लागू केली तर त्याचा त्यांना निश्चितपणे फायदा होईल. दरवर्षी नैसर्गिक आपत्तीमुळे या आंबा उत्पादक शेतकऱ्यांचे फार मोठे नुकसान होत आहे. त्याकरिता तातडीने फळ पीक विमा योजना लागू करावी अशी औचित्याच्या मुद्याव्दारे मी मागणी करीत आहे.

सभापती : सन्माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"दिनांक 10 मार्च रोजी रात्री मौजे कुरका, तालुका केज, जिल्हा बीड या गावामध्ये अशरुबा, केदार या दोन महिलांना विवस्त्र करुन मारहाण करीत चावडीपर्यंत फरफटत नेले. अशाप्रकारे चावडीपर्यंत विवस्त्र फरफटत नेल्यानंतर या दोघींनी पोलीस स्टेशन गाठले. व पोलीस स्टेशनला फिर्याद दाखल केली. पोलिसांनी त्यांना दवाखान्यामध्ये जाण्यासाठी सोबत कुणालाही दिले नाही. या दोघीजणी दवाखान्यामध्ये गेल्यानंतर त्या दवाखान्यात गेल्या कां? किंवा त्यांचे पुढे काय झाले, किंवा त्या पळाल्या, किंवा त्यांना कुणीतरी मारुन टाकले या संदर्भात कोणतीही माहिती उपलब्ध नाही. याबाबत शासनाने तातडीने उपाय योजना करण्याची आवश्यकता आहे."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सरफरे/

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"या सदनामध्ये मागील अधिवशेनात मुंबईवरील 26.11 च्या हल्ल्याच्या संदर्भात सुरु असलेल्या खटल्यातील कामकाजाचे वृत्तांकन रोज वर्तमानपत्रामध्ये किंवा विविध वाहिन्यांवर मुलाखतीव्दारे करण्यात येत होते त्याची चर्चा झाली होती. त्यानंतर काही प्रमाणात त्यामध्ये निश्चितपणे बदल झाल्याचे दिसून आले. परंतु आता पुन्हा नवीन पध्दत सुरु झाल्याचे दिसावयास लागले आहे. सरकारी वकिलांमार्फत न्यायालयामध्ये दुसऱ्या दिवशी काय बाजू मांडली जाणार आहे, याची माहिती एस.एम.एस.व्दारे सर्वांना दिली जाते. हे कितपत योग्य आहे याबाबत शासनाने खुलासा करावा अशी मी मागणी करतो."

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

पृ.शी. / मु.शी. : नियम 93 अन्वये सूचना

सभापती : सन्माननीय सदस्य सर्वश्री अनिल परब, किरण पावसकर, डॉ. दीपक सावंत, परशुराम उपरकर यांनी "मुंबई व आसपासच्या परिसरातून साईदर्शनासाठी मुंबई ते शिर्डी अशी पदयात्रा करणाऱ्या लाखो साईभक्तांसाठी मुंबई ते शिर्डी महामार्गाच्या बाजूने स्वतंत्र मार्गिका तयार करण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

त्यानंतर, सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, विनोद तावडे, रामनाथ मोते यांनी "गोळप, पावस, रनपार (जि.रत्नागिरी) परिसरात फिनोलेक्स कंपनीच्या एलपीजीवर आधारीत 22 मेगावॅट विद्युत प्रकल्प उभारणीची परवानगी असताना कंपनीने एलपीजीऐवजी कोळशावर आधारीत 43 मेगावॅट क्षमतेच्या विद्युत निर्मितीसाठी सुरु केलेले बांधकाम" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

त्यानंतर, सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे यांनी "राज्यशासनाच्या अनेक शाळांमध्ये लिहिण्यासाठी फळा व विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी शिक्षक नसणे, तसेच शाळांमधील मुलींसाठी प्रसाधनगृह नसणे व पिण्याच्या पाण्याची गैरसोय असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

त्यानंतर, सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, चंद्रकांत पाटील यांनी "मुंबई विद्यापीठातील परीक्षा नियंत्रक विलास शिंदे यांच्या अपात्रतेबाबत तसेच विद्यापीठाच्या परीक्षेतील गैरप्रकाराची चौकशी करण्यासाठी नेमण्यात आलेल्या दोन स्वतंत्र सत्यशोधन समित्यांनी वेगवेगळया काढलेल्या निष्कर्षाबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

DGS/ KTG/ KGS/

सभापती....

त्यानंतर, सन्माननीय सदस्य सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे, जयंत पाटील यांनी "राज्यशासनाने प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक सेवकांना अनक्रमे रुपये 3 हजार, 4 हजार, 5 हजार सन 2000 पासून सुरु केलेल्या मानधनामध्ये अद्याप वाढ केली नसल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

त्यानंतर, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे, श्री. किरण पावसकर, डॉ. दीपक सावंत यांनी "मुंबईतील अंधेरी येथे निवृत्त सीमाशुल्क अधिकाऱ्याने एका 14 वर्षाच्या मुलीला स्वतःच्या घरात नेऊन हत्या केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर, डॉ. दीपक सावंत, श्री.किरण पावसकर यांनी "सिंधुदुर्ग जिल्हयातील आंबा उत्पादकांना नुकसान भरपाई देण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : सोलापूर येथे साईबाबा नगरात दूषित पाणी पुरवठा झाल्यामुळे पसरलेल्या कॉलऱ्याच्या साथीमुळे झालेले मृत्यू.

मु. शी. :सोलापूर येथे साईबाबा नगरात दूषित पाणी पुरवठा झाल्यामुळे पसरलेल्या कॉलऱ्याच्या साथीमुळे झालेले मृत्यू यासंबंधी सर्वश्री शिवाजीराव पाटील, विक्रम काळे, श्रीमती उषा दराडे,श्री.हेमंतटकले,डॉ.वसंत पवार, श्री.सुभाष चव्हाण, श्री.संजयदत्त,श्री.सुभाषभोईर, डॉ.दीपक सावंत, श्री.किरण पावसकर,व श्री.परशुराम उपरकर वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.शिवाजीराव पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सोलापूर येथील साईबाबानगर येथे दुषित पाणी पुरवठा झाल्यामुळे दिनांक 6 मार्च 2010 रोजी वा त्यासुमारास कॉलराची साथ पसरणे, साथीमध्ये सहा व्यक्तींचा मृत्यू होणे, अद्यापही सदरहू ठिकाणी दूषित पाणी पुरवठा सुरु असणे, परिणामी त्या परिसरातील नागरिकांमध्ये पसरलेले भीतीचे व चिंतेचे वातावरण, मृत्यूमुखी पडलेल्या रुग्णांच्या नातेवाईकांना वा त्यांच्या कुटुंबियांना शासनातर्फे मदत मिळावी म्हणून होत असलेली मागणी तसेच कॉलराची साथ आटोक्यात आणण्यासाठी शासनाने तातडीने केलेली वा करावयाची उपाययोजना व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

श्री.सुरेश शेट्टी (सार्वजनिक आरोग्य मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

. . . .क्यु-2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव पाटील : सभापती महोदय, सोलापूर येथील 48 इंच असलेली पाण्याची पाईप लाईन फुटली, परंतु त्याकडे तेथील महानगरपालिकेचे लक्ष नव्हते. अशा वेळी तेथे सांडपाणी वाहत असल्याने, तेथील पाईप लाईनमधून ते पाणी लोकांपर्यंत पोहोचले. त्यामुळे 6 माणसे मरण पावली आणि 70 माणसांना दवाखान्यामध्ये दाखल करावे लागले. तरी सुध्दा तेथील महानगरपालिकेने त्याकडे लक्ष दिले नाही. सोलापूर येथे एवढी मोठी जी दुर्घटना झाली आहे, त्याला कोण जबाबदार आहे? याठिकाणी एवढया मोठया प्रमाणात माणसे मृत्युमुखी पडल्यानंतर देखील अजूनही लोकांना दूषित पाणीपुरवठा केला जात आहे आणि तेथील महानगरपालिकेच्या आरोग्य खात्याने या बाबीकडे दुर्लक्ष केलेले आहे.याला कोण जबाबदार आहे ? याबाबत शासन कोणती कारवाई करणार आहे ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे, त्या बाबत मी सांगू इच्छितो. त्यांनी असे सांगितले की, त्याठिकाणी दूषित पाणी पुरवठा करण्यात आला होता. ही अत्यंत खरी गोष्ट आहे.खरे म्हणजे दि.25 फेब्रुवारी 2010 मध्ये जेव्हा महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी पाण्याचे सॅम्पल घेतले होते, तेव्हा लगेच याबाबतीत कारवाई करावयास हवी होती. परंतु संबंधित अधिकाऱ्यांनी काहीही कारवाई केली नाही आणि लोकांनी दूषित पाणी प्यायल्यामुळे पुढील दुर्घटना घडली आहे.6 लोक मृत्युमुखी पडले आहेत. त्या विभागामध्ये दोन अधिकारी आहे. तेथील पाणीपुरवठा विभागाचे असिस्टंट इंजिनिअर श्री.डी.के.स्वामी यांना सस्पेंड करण्यात आले आहे. तसेच दुसरे आरोग्य अभियंता श्री.सुरेंद्र कदम यांना रजेवर जाण्याबाबत सांगितले होते. परंतु आज आदरणीय मुख्यमंत्र्यांनी आदेश दिले असल्याने, त्यांना देखील सस्पेंड करण्यात आले आहे. या संबंधित विभागाचे जे दोन अधिकारी आहेत, त्या दोघानांही सस्पेंड करुन त्यांची ताबडतोब विभागीय चौकशी करण्याचे आदेश आदरणीय मुख्यमंत्र्यांनी दिलेले आहेत.

श्री.शिवाजीराव पाटील : सभापती महोदय, अजूनही तेथील पाईप लाईन दुरुस्त झालेली नाही आणि अजूनही त्याबाबतीत योग्य ती उपाययोजना केलेली नाही अशी आमची माहिती आहे. तेव्हा याबाबतीत शासन काय करणार आहे ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, या विभागात 1965 मध्ये पाईप लाईन टाकण्यात आली होती. आता तेथील संबंधित महानगरपालिकेकडून नवीन पाईप लाईन टाकण्याबाबतचा प्रस्ताव ....

. . . .क्यु-3

श्री.सुरेश शेट्टी . . . .

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

शासनाने मागविलेला आहे. त्यांना या कामासाठी जेवढे पैसे पाहिजेत, ते संपूर्ण पैसे महाराष्ट्र शासन देईल असे आम्ही त्यांना सांगितलेले आहे. यासंबंधात महानगरपालिकेने लवकरात लवकर प्रस्ताव पाठवावा असे आम्ही त्यांना निदेश दिलेले आहेत.

श्री.दीपक साळुंखे : सभापती महोदय, याठिकाणी एवढी मोठी घटना घडून सुध्दा अजूनही बहुतांशी ठिकाणी दूषित पाणी पुरविण्यात येत आहे. मी त्याठिकाणी दोन वेळा समक्ष भेट दिली आहे. याठिकाणी दूषित पाण्यामुळे झालेल्या मृत्यूचा जो आकडा सांगण्यात आला आहे, त्यापेक्षा प्रत्यक्षात ती जास्त आहे. असे असताना अजूनही तेथील अधिकारी निष्काळजीपणा करीत आहेत. लष्कर मराठा वस्ती, भवानीपेठ, मंगळवार पेठ अशा मोठया भागामध्ये सुध्दा अजूनही दूषित पाणी येत आहे. याबाबतीत शासन नेमकी काय कारवाई करणार आहे?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सोलापूर शहरात मोहिते नगर विभागात वॉर्ड क्र.56,57 व 58 मधील क्रांती झोपडपट्टी, साईबाबा चौक,शास्त्री नगर,एकता नगर,कर्णिक नगर व पदमनगर या .. . .

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांना आता येथे बोलताच येणार नाही असा माझा मुद्दा आहे. मघाशी आपण लक्षवेधी सूचनेबाबत, आमच्या 289 च्या प्रस्तावाच्या संबंधात निवेदन केले. खरे म्हणजे आपण सकाळी विनंती केली, वाचून दाखविले, नंतर बोलावयास देतो असे सांगितले. मग याबाबतीत आम्ही विचारले की, त्या विषयाच्या बाबतीत काय झाले ? तर आम्हाला सांगण्यात आले की,याबाबत मंगळवारी चर्चा ठेवलेली आहे.

यानंतर श्री.बरवड . . ..

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

मंगळवारी कशी काय चर्चा ठेवली ? ती चर्चा आज व्हावयास पाहिज होती. ती तातडीची बाब होती. आपण लक्षवेधी सूचना स्वीकारली होती त्यामुळे त्यावेळी मी काही बोललो नाही. आज आमच्यासमोर आजच्या दिवसाच्या दोन कामकाज पत्रिका आहेत. आपल्याशिवाय विधिमंडळाने सर्व अधिकार ताब्यात घेतले आहेत काय हा प्रश्न निर्माण झाला आहे. माझ्या हातामध्ये एक कामकाज पत्रिका आहे त्यामध्ये विधान परिषद, दिवसाच्या कामकाजाचा क्रम, शुक्रवार दिनांक 19 मार्च, 2010, या कामकाज पत्रिकेमध्ये सुरुवातीला प्रश्नोत्तरे, नियम 93 अन्वये सूचना असे विषय दाखविलेले आहेत. त्यानंतर लक्षवेधी सूचना असून त्यामध्ये पहिली लक्षवेधी सूचना सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे यांनी दिलेली "कोल्हापूर जिल्ह्यातील पंचगंगा नदीच्या प्रदूषणाच्या" संदर्भात आहे. दुसरी लक्षवेधी सूचना माझी आहे. त्यामध्ये मी स्वत: तसेच सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत, डॉ. नीलम गोऱ्हे, ॲड अनिल परब यांनी दिलेली "वसई विरार महापालिकेतील 53 गावे वगळण्याच्या संदर्भातील" लक्षवेधी सूचना आहे. आज आम्ही नियम 289 अन्वये प्रस्ताव आणला होता त्याच विषयाच्या संदर्भात आमची लक्षवेधी सूचना आज होती. कामकाज पत्रिकेवर अनुक्रमांक 3 वर सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त, चरणसिंग सप्रा, भाई जगताप यांनी दिलेली "मुंबईतील कुर्ला येथील नेहरुनगरमधील एका 9 वर्षाच्या बालिकेवर झालेल्या बलात्काराच्या संदर्भातील"लक्षवेधी सूचना आहे. चौथी लक्षवेधी सूचना सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी यांनी "संत गजानन महाराज समाधीच्या" संदर्भात सकाळी जी चर्चा झाली त्यासंदर्भात दिलेली आहे. अशा प्रकारची कामकाज पत्रिका माझ्यासमोर आहे आणि सभागृहामध्ये वेगळ्या कामकाज पत्रिकेनुसार कामकाज चालू आहे. हे जे कामकाज चालले आहे किंवा जी उत्तरे दिली जात आहेत त्याचा या कामकाज पत्रिकेशी काही संबंध नाही. कोणत्या कामकाज पत्रिकेनुसार काम चालू आहे याबाबत आम्ही संभ्रमित आहोत.

सभापती : जी अधिकृत कामकाज पत्रिका आहे त्याप्रमाणे कामकाज सुरु आहे.

श्री. दिवाकर रावते : आमच्याकडे असलेली कामकाज पत्रिका अनधिकृत कशी काय ? ही कामकाज पत्रिका आम्ही बनविलेली आहे काय ?

सभापती : आपण जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याची मी जरुर चौकशी करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझ्याकडील कामकाज पत्रिका मी आपल्याकडे पाठवतो.

सभापती : आपण ती कामकाज पत्रिका माझ्याकडे पाठवून द्यावी. मी जरुर चौकशी करतो. जी कामकाज पत्रिका वितरित केलेली आहे त्यामध्ये आज तीन लक्षवेधी सूचना दाखविलेल्या आहेत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण याची चौकशी करावी. आपण सभागृहाचे कामकाज तहकूब करावे. या सदनामध्ये एक कामकाज पत्रिका वितरित झाली आणि कामकाज दुसऱ्याच कामकाज पत्रिकेनुसार सुरु आहे. ती लक्षवेधी सूचना काढून टाकण्याकरिता किती तासात आपण कार्यक्रम बदलला ? माझ्याकडे असलेल्या कामकाज पत्रिकेनुसार कामकाज चालू नाही.

सभापती : जी कामकाज पत्रिका वितरित केलेली आहे त्यानुसार कामकाज सुरु आहे. सन्माननीय सदस्यांनी "वसई विरार महापालिकेच्या संदर्भात" असलेल्या लक्षवेधी सूचनेबाबत मुद्दा उपस्थित केला.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, ही कामकाज पत्रिका वेगळी आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, ही बाब अतिशय गंभीर आहे. सभागृहाचे कामकाज थांबवून तातडीने याची चौकशी होणे अत्यंत आवश्यक आहे. आपण सभागृहाचे कामकाज थांबवावे. "वसई विरार महापालिकेच्या संदर्भात" लक्षवेधी सूचना होती. आम्ही नियम 289 अन्वये प्रस्ताव दिला होता. या कामकाज पत्रिकेमध्ये जी लक्षवेधी सूचना दाखविलेली आहे ती येऊ देता कामा नये म्हणून तो विषय कामकाज पत्रिकेतून काढण्यात आलेला आहे असा आमचा समज झालेला आहे. म्हणून आपण सदनाचे कामकाज थांबवून याची चौकशी करावी आणि संबंधितांवर कारवाई करावी. त्यानंतर सभागृहाचे कामकाज पुढे सुरु करावे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, याबाबत ताबडतोब चौकशी करावी. सभागृहाचे कामकाज पाच दहा मिनिटांकरिता थांबवून याची चौकशी करावी. यामध्ये नेमके काय झाले आहे याची माहिती सदनाला समजली पाहिजे. ही गंभीर बाब आहे. दोन-दोन कामकाज पत्रिका येणे ही सभागृहाच्या दृष्टीने गंभीर बाब आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपली पध्दत अशी आहे की, नियम 289 अन्वये प्रस्ताव दिल्यानंतर पाच पाच मिनिटे सन्माननीय सदस्यांना बोलण्याची परवानगी देतो. आज त्या विषयावर लक्षवेधी सूचना असल्यामुळे मी त्यावेळी गप्प बसलो. लक्षवेधी सूचनेच्या वेळी आपण विचारु असे मनात धरुन आम्ही काही बोललो नाही. परंतु या ठिकाणी नवीन कामकाज पत्रिकेप्रमाणे कामकाज चालू आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, आपण सभागृहाचे कामकाज दहा मिनिटांकरिता स्थगित करुन निर्णय घ्यावा. या सभागृहामध्ये दोन-दोन कामकाज पत्रिका कशा येतात ? असे कधीही घडले नसेल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहामध्ये वितरित केलेली कामकाज पत्रिका वेगळी आहे आणि आमच्याकडे आलेली कामकाज पत्रिका वेगळी आहे. आपण सभागृहाचे कामकाज थांबवावे.

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती. : वसई-विरार महापालिकेशी संबंधित जी लक्षवेधी सूचना होती त्या अनुषंगाने सन्माननीय राज्यमंत्री श्री.भास्कर जाधव यांनी मला काल पत्र देऊन विनंती केली होती की, ही लक्षवेधी सूचना उद्या ठेवावी. त्यांच्याकडून अशाप्रकारचे पत्र आल्यानंतर मी आजच्या कामकाज पत्रिकेवरील ही लक्षवेधी सूचना बाजूला ठेवली होती. या विषयाचा नियम 289 चा प्रस्ताव आणि आपण दिलेली लक्षवेधी सूचना याचा संबंध आहे असे, मी समजत नाही. कारण दोन्ही वेगवेगळी आयुधे आहेत. नियम 289 खालील आयुधासंबंधी मी निर्णय घेतलेला आहे. सन्माननीय मंत्री महोदय श्री.भास्कर जाधव यांनी मला काल पत्र दिल्यानंतर मी तो निर्णय घेतला आहे. कामकाजपत्रिकेबद्दल मी जरुर चौकशी करतो. पण त्यासाठी सभागृहाचे कामकाज तहकूब करण्याचे कारण नाही. मी चौकशी करुन त्याचे निष्कर्ष सभागृहात सांगेन.

श्री.दीपक साळुंखे : सभापती महोदय, एवढया मोठया दुर्घटनेनंतर तेथे पिण्याचे पाणी दूषित असल्याचे प्रमाण जास्त आहे. शासनाच्या नियमाप्रमाणे किती टक्के दूषित पाणी नसावे याची टक्केवारी मंत्रिमहोदयांनी द्यावी अशी विनंती करतो.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली वस्तुस्थिती आहे. वॉर्ड नंबर 56, 57 व 58 मध्ये क्रांती झोपडपट्टी, साईबाबा चौक, शास्त्री नगर, एकता नगर, कर्णिक नगर आणि पदम नगरमध्ये दूषित पाणी पुरवठा होत होता म्हणून त्या भागातील संपूर्ण पाणी पुरवठा बंद करण्यात आला होता. त्याठिकाणची जी पाईप लाईन होती त्यातून पाणी गळती होत असल्यामुळे तेथील पाणी पुरवठा बंद करुन या पाचही ठिकाणी टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरु केलेला आहे. ही पाईप लाईन दुरुस्त होईपर्यंत त्या भागाला टँकरद्वारे पाणी दिले जाणार आहे.

श्री.शिवाजीराव पाटील : दूषित पाण्यामुळे 6 माणसे मृत्यूमुखी पडलेली आहेत, त्यांना शासनाच्यावतीने किती नुकसान भरपाई देण्यात आली आहे, ती पुरेशी आहे काय ?

श्री.सुरेश शेट्टी : आदरणीय मुख्यमंत्र्यांनी 1 लाख रुपये मृतांच्या नातेवाईकांना दिले जातील असे यापूर्वीच घोषित केलेले आहे आणि ती रक्कम वितरित करण्याचे काम सुरु झालेले आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सोलापूर शहराशी संबंधित दोन मूलभूत मुद्दे आहेत. त्या मुद्यांकडेशासनाचे पूर्णत: दुर्लक्ष झालेले आहे. अलिकडे मंत्रिमहोदयांनी सोलापूर शहराला भेट दिली असेल तर त्यांनी पुन्हा भेट द्यावी. सोलापूर शहराची हद्द वेगाने वाढलेली आहे. ज्या दफन भूमि आहेत त्या आणि राहती घरे या संमिश्र झाल्या आहेत, त्यामुळे मुडदा कोठे गाडायचा असा प्रश्न निर्माण होतो. अनेक ठिकाणी दफन भूमित जागा शोधायला जातात. यासंबंधी मंत्रिमहोदयांनी तेथील नगरसेवकांशी बोलावे. शहरात मोठया प्रमाणात प्रदूषण वाढले आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, तेथील आरोग्य विभागातील अनेक पदे रिक्त आहेत. सोलापूर महानगरपालिकेने आरोग्य विभागाला वारंवार सांगून देखील ही पदे वारंवार भरली गेली नाहीत. म्हणून सोलापूर महानगरपालिकेशी संबंधित असलेले दोन्ही प्रश्न आरोग्याशी संबंधित आहेत. शहरातील आरोग्य यंत्रणा खिळखिळी होत आलेली आहे. तसेच तेथील रिक्त पदांसंबंधी सोलापूर प्रशासनाबरोबर वेगळी बैठक घेऊन त्याची पूर्तता करण्यासाठी शासन पावले उचलेल काय ?

श्री.सुरेश शेट्टी : होय.

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी असे उत्तर दिले आहे की तेथे पर्यायी पाणी पुरवठयाची योजना सुरु करणार असून त्यासाठी लागणारा निधी शासन देण्यास तयार आहे. या कामासाठी काही कालबध्द कार्यक्रम आखला आहे काय, एक महिन्यात किंवा 15 दिवसात हे काम पूर्ण केले जाईल असा कालबध्द कार्यक्रम आखला आहे काय ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सोलापूर महानगरपालिकेला अगोदरच आदेश दिलेले आहेत की, त्यांनी डीपीआर तयार करुन शासनाकडे प्रस्ताव पाठवावा. त्यांच्याकडून 6 कोटीचा प्रस्ताव आल्यानंतर महानगरपालिकेला पैसे उपलब्ध करुन देण्यात येतील. महानगरपालिकेने सव्वा कोटीचा प्रस्ताव दिलेला आहे. परंतु त्यांना शासनाने असे सांगितले आहे की, तेथे केवळ पाणी पुरवठा सुरु करुन चालणार नाही तर नवीन सिवरेज लाईन सुध्दा घालावी लागेल. त्याबाबतचे दोन्ही प्रस्ताव मंजूर केले जाणार आहेत आणि हे प्रस्ताव महानगरपालिकेकडून शासनाकडे आल्यानंतर ते ताबडतोब मंजूर करुन त्यांना पैसे उपलब्ध करुन दिले जातील.

यानंतर श्री.ओटवणेकर.....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, या पाईप लाईनला 42 वर्षे झालेली आहेत. त्यामुळे सदर पाईप लाईन बदलली पाहिजे. तसेच कालबद्ध पद्धतीने सदर नळ योजनेचे काम पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यामुळे शासन किती कालावधीमध्ये सदर नळ योजनेचे काम पूर्ण करणार आहे ? तसेच टँकरद्वारा पाणी पुरवठा करणे म्हणजे शासनावर एक प्रकारचा बोजा असतो. त्यामुळे सदर योजना पूर्ण करण्यासाठी शासन तातडीने किती निधी उपलब्ध करून देणार आहे व किती कालावधीमध्ये काम पूर्ण करणार आहे ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, यासंबंधी मी आधीच उत्तर दिलेले आहे. महानगरपालिकेकडून प्रस्ताव आल्यानंतर लगेच आम्ही प्रस्तावाला मान्यता देऊ.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, आरोग्य खात्याबरोबरच नगरविकास खात्याची जबाबदारी आहे काय ? असा महत्त्वाचा प्रश्न येथे उपस्थित होऊ शकतो. या लक्षवेधीसंबंधी आम्हाला नगरविकास खात्याकडून उत्तर मिळू शकेल काय ? यासंबंधी शासनाने खुलासा करावा.

उप सभापती : सभागृहात माननीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत. तेव्हा आपण प्रश्न विचारण्यास काहीही हरकत नाही.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, हा प्रश्न नगरविकास खात्याशी देखील संबंधित आहे. त्यामुळे तेथील वरिष्ठ अधिकाऱ्यांवर आपण कोणती कारवाई केली आहे ? केवळ आरोग्य खात्याकडे हा प्रश्न सोपवून तो सुटणार आहे काय ?

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, ही घटना कॉलरा झाल्यामुळे घडली आहे. त्यामुळे हा प्रश्न आरोग्य विभागाशी संबंधित आहे. महानगरपालिकेतील आरोग्य विभागाशी संबंधित असा हा प्रश्न आहे. त्यामुळे या प्रश्नासंबंधी आरोग्य विभागाकडून जी कारवाई अपेक्षित होती ती करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील काही अधिकारी हे येथे प्रतिनियुक्तीवर होते. त्यांना तसेच सार्वजनिक आरोग्य अभियंता यांना निलंबित करण्यात आले आहे. पाईप लाईनच्या कामासाठी महानगरपालिकेला 8 कोटी रूपयांचा खर्च अपेक्षित आहे. महानगरपालिकेने स्वत:चा हिस्सा दिल्यानंतर उर्वरित निधी शासनातर्फे उपलब्ध करून देण्यात येईल.

.....

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : कोल्हापूर जिल्ह्यातील पंचगंगा नदीचा निधी मंजुरी अभावी प्रलंबित राहणे

मु.शी.: कोल्हापूर जिल्ह्यातील पंचगंगा नदीचा निधी मंजुरी अभावी प्रलंबित राहणे यासंबंधी सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"कोल्हापूर जिल्हयातील पंचगंगा नदीच्या प्रदूषणमुक्तीसाठी ७५ कोटी रुपयांचा निधी मंजूर होणे, या निधीपैकी ८ कोटी रुपये कोल्हापूर महानगरपालिका स्थायी समितीच्या मंजुरीअभावी दोन महिने प्रलंबित राहणे, कोल्हापूर, इंचलकरंजी शहर तसेच पंचगंगा नदीकाठच्या शंभरहून अधिक गावांशी निगडीत अचसलेल्या पंचगंगा प्रदूषणमुक्तीच्या कामासाठी निधी येऊनही महानगरपालिका, जिल्हा प्रशासन तसेच शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होणे, परिणामी मार्च अखेर सदर कामासाठी मिळणारा निधी परत जाण्याची शक्यता निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो."

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

...३

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, सन 1991 पासून कोल्हापूर जिल्ह्यातील पंचगंगा नदी प्रदूषणमुक्त करण्यासंबंधी पाठपुरावा करण्यात येत आहे. मी महाराष्ट्र शासनाचे आभार मानतो. त्यांनी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करून 73 कोटी रूपये इतका निधी मिळविला आहे. या निधीपैकी पहिला टप्पा 30 सप्टेंबरमध्ये आला. म्हणजे जवळ जवळ पाच महिने झाले तरी या निधीचा विनियोग करण्यात आलेला नाही. असे असताना लेखी निवेदनात निधी पडून राहिला असे झालेले नाही असे नमूद करण्यात आलेले आहे. 8 कोटी रूपये इतका निधी जवळ जवळ पाच महिने पडून आहे. पंचगंगा नदी प्रदूषणाचा विषय कोल्हापूर जिल्ह्यातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने फार महत्त्वाचा आहे. अनेक वर्षाच्या पाठपुराव्यानंतर सदर निधी मिळालेला आहे. तेव्हा पंचगंगा नदी प्रदूषणमुक्त करण्यासंबंधी राज्य शासन नेमकी कोणती उपाययोजना करणार आहे ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांनी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे निधी मिळविण्यासाठी पाठपुरावा केल्याबद्दल आभार मानले आहेत. त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. पंचगंगा नदी प्रदूषित झाल्यामुळे दरवर्षी या नदीला पूर येतो. त्यासंबंधीचा प्रश्न लक्षवेधी सूचनेद्वारे उपस्थित करण्यात आला आहे. या प्रश्नासंबंधी केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाच्या राष्ट्रीय नदीकृती संचालनालयाने दिनांक 3 ऑगस्ट 2009 रोजी रूपये 74.29 कोटीची योजना मंजूर केली आहे. या निधीचा रूपये 7.38 कोटी इतक्या निधीचा पहिला हप्ता दिनांक 30 सप्टेंबर 2009 रोजी प्राप्त झाला असून तो महानगरपालिकेकडे वर्ग करण्यात आलेला आहे. सदर निधी पाच महिने पडून राहिल्यामुळे तेथील जनतेचे नुकसान झाले आहे, त्यामुळे शासन कोणती कार्यवाही करणार आहे, असे प्रश्न सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केले आहेत. मी यासंबंधी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, हा पी.पी.पी.च्या माध्यमातून हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. त्यातील अटी व शर्तींची पूर्तता विभागामार्फत केली जात आहे. प्रथमस्तरामध्ये ठेकेदाराची अर्हता ठरविण्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार 16 ठेकेदारांकडून निविदा प्राप्त झाल्या असून 11 ठेकेदार पात्र ठरले आहेत. याबाबत लवकरात लवकर कारवाई करण्याच्या दृष्टीने विभाग तत्पर आहे.

यानंतर श्री.शिगम..

अशासकीय प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : माननीय राज्यमंत्र्यांनी या प्रश्नाला चांगले टेक्निकल उत्तर दिलेले आहे. पण उत्तरे टेक्निकल नसावीत. ती व्यवहार्य असावीत. 30 सप्टेंबरला पैसे आलेले आहेत. परंतु महानगरपालिकेच्या स्थायी समितीमध्ये एकमत होत नसल्यामुळे या कामाबाबत अंतिम निर्णय होत नाही. आपण कोल्हापूर जिल्ह्यातील दोन्ही सभागृहातील सन्माननीय सदस्यांना एकत्र बोलावून त्यांच्यामध्ये एकवाक्यता घडवून आणली तरच हे काम मार्गी लागेल. स्थायी समितीमध्ये निर्णय होत नसल्यामुळे कोल्हापूरकरांना दुषित पाणी प्यावे लागत आहे. कोल्हापूर महानगरपालिकेतील इकडचे महापौर तिकडे गेल्यामुळे पाण्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. तेव्हा शासन याबाबतीत आक्रमक भूमिका घेऊन पुढील 8 दिवसात ठोस निर्णय घेईल काय ?

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे सांगतात तशी तेथील परिस्थिती नाही. हा प्रकल्प पीपीपीवर आधारित असून यातील 70 टक्के वाटा केन्द्र सरकारचा आणि 30 टक्के वाटा हा प्रकल्प राबविणा-यांचा असणार आहे. सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले त्या अर्थाने प्रकल्प रखडलेला नाही. प्रकल्पातील कायदेशीर बाबी दूर करण्याकरिता थोडा फार वेळ लागेल. तांत्रिक आणि कायदेशीर बाबी पूर्ण करुनच हा विषय स्थायी समोर येईल. अद्याप हा विषय स्थायी समोर गेलेला नाही. प्रकल्प मार्गी लागण्याच्या बाबतीत काही अडचण नाही. परंतु तशी जर अडचण निर्माण झाली तर सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांची मदत घेण्यात येईल.

श्री. विनोद तावडे : या प्रश्नाच्या संदर्भात नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये पर्यावरण मंत्र्यांनी बैठक घेतली होती. हा प्रकल्प ताबडतोबीने सुरु करण्यात येईल असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले. त्या गोष्टीचा पाठपुरावा आम्ही करीत आहेत. मी येथे राजकीय अभिनिवेषाने बोलत नाही. माननीय राज्यमंत्री महोदय श्री. भास्करराव जाधव यांना महापालिकेच्या कारभाराची फारशी माहिती नाही असे दिसते. कोणेताही प्रस्ताव हा स्थायी समितीने एकमत झाल्यानंतरच आणला जातो. तेव्हा माननीय राज्यमंत्री याबाबतीत पुढाकार घेऊन प्रकल्प मार्गी लावतील काय ?

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन प्रकल्प मार्गी लावण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जातील.

श्री. चंद्रकांत पाटील : निधी 31 मार्च पर्यन्त खर्च झाला नाही तर तो परत जाईल काय ?

श्री. भास्कर जाधव : निधी 31 मार्च पर्यन्त खर्च होणार नाही. पुढील प्रोसेस करीता एक-दीड महिना जाईल. निधी परत जाणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : मुंबईतील कुर्ला येथील नेहरुनगरमधील 9 वर्षाच्या बालिकेवर बलात्कार करुन तिचा केलेला खून

मु.शी. : मुंबईतील कुर्ला येथील नेहरुनगरमधील 9 वर्षाच्या बालिकेवर बलात्कार करुन तिचा केलेला खून यासंबंधी सर्वश्री संजय दत्त, चरणसिंग सप्रा, अशोक ऊर्फ भाई जगताप, सय्यद जमा, शिवाजीराव पाटील, ॲड. उषा दराडे, श्री. विक्रम काळे, डॉ. नीलम गो-हे, सर्वश्री परशुराम उपरकर, किसनचंद तनवाणी, ॲड. अनिल परब सर्वश्री. किरण पावसकर, सुभाष चव्हाण, एम.एम.शेख व जैनुद्दीन जव्हेरी, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. संजय दत्त (विधान सभेने निवडलेले)) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो अणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबईतील कुर्ला येथील नेहरुनगरमधील एका 9 वर्षाच्या बालिकेवर दिनांक 7 मार्च 2010 रोजी वा त्या दरम्यान बलात्कार करुन खून करण्यात आल्याचे पोलीस वसाहतीमधील एका इमारतीच्या गच्चीवर आढळून येणे, तसेच एक महिन्यापूर्वी वा त्यासुमारास वत्सलाबाई नगरात 1 वर्षाच्या मुलीवर बलात्कार होणे व तिचा खून करण्यात येऊन मृतदेह गच्चीच्या शिडीवर गोणीत भरुन टाकण्यात येणे, काही महिन्यांपूर्वी एका 6 वर्षाच्या बालिकेवर अशाच प्रकारे बलात्कार करुन तिचा खून करण्यात येणे, तसेच 7 वर्षाची बालिका गेल्या एक वर्षापासून बेपत्ता असल्याचे आढळून येणे, अशा प्रकारच्या घटना वारंवार घडत असूनही पोलिसांचे याकडे मात्र दुर्लक्ष होत असणे, गुन्हेगारांचा शोध घेण्यासाठी पोलिसांना येत असलेले अपयश, यामुळे सर्वत्र पसरलेले भीतीचे व चिंतेचे वातावरण सदर घटनांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याचे आढळून येणे, सबब सध्या वाढत असलेले बलात्काराचे व खून करण्याच्या वाढत असलेल्या अमानुष घटना रोखण्याबाबत व

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त...

संबंधित दोषी व्यक्तीविरुध्द कठोर कारवाई करावी तसेच अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी शासनाने तातडीनेकरावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

श्री. रमेश बागवे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त : मागच्या काही महिन्यात अशा प्रकारच्या घटनांमध्ये वाढ होत असताना दिसत आहे. जागतिक महिला दिनाच्या पूर्व संध्येला कुर्ल्याला अशा प्रकारची घटना घडणे ही एक शोकांतिका आहे. या संदर्भात माझे नेमके दोन प्रश्न आहेत. काल देखील अंधेरीमध्ये असाच प्रकार घडला. माझा पहिला प्रश्न असा आहे की, लक्षवेधीमध्ये उल्लेखिलेल्या घटनांचा तपास अजून सुरु आहे. हा तपास किती कालावधीमध्ये पूर्ण होईल ? अशा प्रकारच्या घटनांचे प्रमाण वाढत आहे. विशेषत: लहान मुलींच्या बाबतीत असे प्रकार घडत आहेत. तेव्हा यासंदर्भात शासन वेगळा सेल निर्माण करणार आहे काय ?

....नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-3.....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर देण्यापूर्वी मी एक प्रश्न विचारु इच्छितो की, सन्माननीय राज्यमंत्री सुरक्षित आहेत की नाहीत? उद्या ते भेटतील की नाही याबद्दल आम्हाला रोज रात्री झोपताना चिंता वाटते.

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्यामुळे मला काळजी करण्याची आवश्यकता वाटत नाही. सभापती महोदय, सदर गुन्हयामध्ये महंमद अजमेरी अब्दुल कादर शेख याला अटक केली आहे. दिनांक 9.3.2010 रोजी त्याचा रिमांड घेण्यात आला असून 20 मार्चपर्यंत रिमांड मिळाला आहे. आरोपी सध्या पोलीस कस्टडीमध्ये आहे. सन्माननीय सदस्यांनी भावना व्यक्त केली की, अशा तऱ्हेने लहान मुलींबाबत लैंगिक गुन्हे घडतात, बलात्कार करुन त्यांचे खून केले जातात. याबाबत शासन गंभीर आहे. सर्व गोष्टींचा विचार करुन अल्पवयीन मुलांवर बलात्कार करण्याच्या घटना वारंवार घडतात याची गंभीर दखल घेऊन शासन वेगळा सेल निर्माण करेल.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, कुर्ला येथील ही घटना अत्यंत गंभीर आहे. मुंबई शहरातील ही दुसरी घटना आहे. मंत्रीमहोदयांचे उत्तर मी लक्षपूर्वक ऐकले आहे. लहान मुलींवर लैंगिक अत्याचार होणार नाही याची काळजी शासनाकडून घेतली जाईल. परंतु याचा अर्थ असा होतो की, वयस्कर व्यक्तींबाबत असा अत्याचार झालेला चालेल. पोलीस विभाग सगळ्याच बाबी गंभीरपणे घेताना दिसत नाही. पोलीस विभागाला या चर्चेमध्ये घेऊन या संदर्भातील निर्णय घेणे गरजेचे आहे. शासन तसे करणार आहे का?

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाबाबत मी एवढेच सांगू इच्छितो की, जे वयस्कर आहेत त्यांच्याबाबत अशी घटना घडली तर शासन कायद्यातील तरतुदीप्रमाणे कारवाई करणार आहे. लक्षवेधी सूचनेतील प्रश्न हा अल्पवयीन मुलींबाबत ज्या घटना घडतात त्या संदर्भात विशेष सेल निर्माण करण्याबाबत आहे. मी याबाबत यापूर्वीच उत्तर दिले आहे की, शासन या घटनेची गंभीर दखल घेऊन त्यासाठी विशेष सेल निर्माण करणार आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, हा प्रश्न केवळ या घटनेपुरताच मर्यादित नाही. घटनाक्रम पाहिला तर 9.1.2010 रोजी म्हणजे वर्षाच्या पहिल्या महिन्यात एक घटना त्या भागामध्ये

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-3..... श्री.भाई जगताप.....

घडली. फेब्रुवारी महिन्यामध्ये दुसरी घटना घडली आणि त्याच विभागामध्ये मार्च महिन्यामध्ये तिसरी घटना घडली. परिमंडळ 6 या विभागामध्ये घडलेल्या या तीन घटना आहेत. सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी सांगितल्याप्रमाणे अशा घटना राज्यामध्ये इतर ठिकाणी देखील घडत आहेत. त्याबद्दल शासन जरुर काळजी घेत आहे. परंतु या एकाच विभागामध्ये तीन घटना घडल्या ही बाब अतिशय गंभीर आहे. या तीनही घटनांमध्ये अल्पवयीन मुलींवर बलात्कार करुन नंतर त्यांचा खून करण्यात आला आहे. कुर्ला येथे दिनांक 7 मार्च, 2010 रोजी घडलेल्या घटनेत पोलीस कर्मचारी वसाहतीतील इमारतीच्या टॅरेसवर बलात्कार करुन नंतर खून केलेल्या मुलीचा मृतदेह आढळून आला. या संदर्भात तेथील पोलीस अधिकाऱ्यांना जबाबदार धरणार आहात का? पोलीस विभागाने याबाबत स्पेशल स्क्वॉड तयार केले.....

(नंतर श्री.खर्चे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप .....

या स्क्वॉडला काही निदेश शासन देणार काय, जेणेकरुन पोलिसांची भीती अशा लोकांना राहिली पाहिजे तसेच अशा गुन्ह्यांचा तपास सुध्दा लागला पाहिजे. यामध्ये एका गुन्ह्यातील मुलगी सुदैवाने जिवंत आहे परंतु दोन गुन्ह्यांमधील बालिकांचा मृत्यू झालेला आहे, त्याचाही तपास अद्याप लागला नाही त्याबाबत शासन काय कारवाई करणार आहे ?

श्री. रमेश बागवे : अशा गुन्ह्यांची गंभीर दखल घेऊन एकाच भागात अशा घटना घडल्यामुळे त्या भागातील दक्षता समिती, मोहल्ला कमिटी, झोपडपट्टी पंचायत कमिटी, ज्येष्ठ नागरिक समिती, रिक्षा चालक व मालक समिती अशा समित्या तसेच शाळा व कॉलेजेसच्या शिक्षकांबरोबर बैठका घेऊन भविष्यात अशा घटना भविष्यातही घडू नयेत म्हणून संबंधित पोलीस स्टेशनला सुध्दा तशा सूचना दिलेल्या आहेत. त्याचबरोबर रात्रीची गस्त घालण्यास देखील सुरुवात केली व आवश्यक त्या सूचना विभागाकडून देण्यात आल्या आहेत.

डॉ. नीलम गोऱ्हे : महोदय, मुळात गुन्हेगारांना त्यांनी केलेल्या गुन्ह्याची शिक्षा होणार आहे असे वाटतच नाही. कारण शासनाच्या अहवालात म्हटले आहे की, बलात्काराच्या गुन्ह्यांमधील फक्त चार टक्के गुन्हेगारांना त्यांनी केलेल्या गुन्ह्यासंबंधीची शिक्षा होते. याचा अर्थ 96 टक्के गुन्हेगार तसेच सुटतात आणि 91 टक्के खटले प्रलंबित आहेत, त्यामुळे गुन्हेगारांना भीती वाटत नाही. परिमंडळ-6 मधील अल्पवयीन मुलींच्या संदर्भात जे गुन्हे आहेत त्याबाबतीत त्या मुलींचे पुढील आयुष्य उभे करण्याच्या दृष्टीने विचार करणे आवश्यक आहे. म्हणून द्रुतगतीने निर्णय घेणे आवश्यक आहे. त्यासंदर्भात शासन कोणती पावले उचलणार आहे ? अमुक एक धर्माचा खास करुन मुस्लीम धर्मीय गुन्हेगारांची संख्या, अर्थात कोणत्याही धर्माला दुखावण्याचा माझा हेतू नाही. परंतु याच्या पाठीमागे काही गैरसमज वगैरे आहेत काय याची तपासणी शासन करणार काय ? कुर्ल्यामध्ये सुध्दा मोठया प्रमाणात मुस्लीम महिलांनी आंदोलन करुन आरोपींना जामीन मिळता कामा नये अशी भूमिका घेतली होती. म्हणून अशा गुन्ह्यांमागे गैरसमज, अंध:श्रध्दा अथवा मुलींचा व्यापार वगैरे आहे की काय हे जोपर्यंत शासन शोधत नाही तोपर्यंत अशा घटना घडतच राहणार. याबाबत शासन विचार करणार काय ?

.....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप : महोदय, गुन्हेगाराला धर्म, जात असे काहीही नसते. या घटनांमध्ये एक घटना अशी आहे की, अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणारा हा दुसऱ्या जातीचा होता म्हणून कृपया अशा महत्वाच्या प्रश्नाच्या संदर्भात कोणत्याही एका धर्माचा उल्लेख करणे चुकीचे आहे. मी सन्माननीय सदस्या यांच्या भावना समजतो परंतु चुकीचे रेकॉर्डवर राहू नये म्हणून माझी विनंती आहे.

उप सभापती : सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या बोलण्यात "मुस्लीम धर्मीय" असा जो उल्लेख आलेला आहे तो कामकाजातून काढून टाकावा.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, अशा त-हेच्या गुन्ह्यांची गंभीर दखल घेण्यासाठी हे सर्व खटले शीघ्र न्यायालयाच्या माध्यमातून स्थापन करण्यास शासन कटिबद्ध आहे. सीआरपीसी ॲक्ट 309 नुसार यामध्ये सुनावणी केली जाईल. अशा प्रकारचे दोषारोप यामध्ये दाखल केले जातील. त्यानंतर वैधानिक सहाय्य प्रयोग शाळेचे नमुने तीन आठवडयात सादर करण्यात यावे अशा प्रकारची तरतूद त्यामध्ये करण्यात आलेली आहे. या सर्व केसेस इन कॅमेरा चालतील व त्यामध्ये महिला न्यायाधिशांच्या समोरच या केसेस चालतील. यासाठी महिलांची सहाय्यक कक्ष समिती निर्माण करण्यात आलेली आहे, महिला सुरक्षा समिती देखील स्थापन करण्यात आलेली आहे. यामध्ये महिला डॉक्टर, महिला वकील, महिला प्राध्यापिका यांची देखील नेमणूक करण्यात आलेली आहे. अशा त-हेने महिलांवर अत्याचार होऊ नयेत म्हणून शासनाने त्यासंदर्भात गंभीर दखल घेतलेली आहे. शासनाने महिला सहाय्यक कक्षाची जी समिती केलेली आहे त्यामध्ये एक पोलीस निरीक्षक महिला, एक उप पोलीस निरीक्षक महिलेची नेमणूक करण्यात आलेली आहे. महिलांवर अत्याचार होऊ नयेत यासाठी शासनाने अशा प्रकारच्या कमिटया स्थापन करुन त्या कार्यान्वित देखील केलेल्या आहेत.

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "वरील नमूद 3 गुन्हयापैकी 1 गुन्हा उघडकीस आला असून 2 गुन्हयांच्या तपासासाठी 2 पोलीस निरीक्षक, 2 सहाय्यक पोलीस निरीक्षक व 3 पोलीस उपनिरीक्षक असे 7 अधिकारी व 20 कर्मचा-यांचे विशेष पथक कार्यरत असून पालिसांकरवी गुन्हा उघ्डकीस आणण्याच्या दृष्टीने सर्वोतोपरी प्रयत्न सुरु आहेत." सभापती महोदय, या प्रकरणात केस चालण्याची चर्चा सुरु आहे. या प्रकरणात चार्जशिट दाखल झाली तरच केस चालणार आहे. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, जर पोलीस निरीक्षक आणि 20 पोलीस कर्मचा-यांचे पथक काम योग्य प्रकारे करीत नसेल तर हे प्रकरण डीवायएसपी सारख्या वरिष्ठांकडे तपास करण्याचे काम सुपूर्द का केले जात नाही:?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, या प्रकरणात नागेश नामदेव घोलप याला 13.1.2010 रोजी अटक करण्यात आली असून त्याच्यावर रितसर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय राज्य मंत्री महोदय, कायद्याचे पुस्तक हातात घेऊन उत्तर देत आहेत. महिलांवर बलात्कार होऊ नयेत यासाठी आपण ज्या कमिटया स्थापन केलेल्या आहेत त्या कमिटयामुळे महिलांवर होणारे बलात्कार कसे काय थांबतील याची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दि.19.03.2010 (असुधारित प्रत - प्रसिध्दीसाठी नाही) एक्स-2

जुन्नरे

श्री. दिवाकर रावते....

आम्हाला माहिती नाही. परंतु कुर्ला येथील नेहरु नगर येथील अलीदादा इस्टेट इमारतीत कुर्ल्याचा सिनिअर इन्सपेक्टर राहतो. या ठिक्राणी विचारण्यात आले की, पोलिसांचा धाक निर्माण का होत नाही परंतु मला तर असे विचारावयाचे की, ज्या इमारतीत सिनिअर पोलीस इन्स्पेक्टर राहतो त्या इमारतीमध्ये पोलिसांचा धाक निर्माण होत नाही यासंदर्भात संबंधितांकडून जाब विचारला गेला पाहिजे. या ठिक्राणी मंत्रीमहोदय, कायद्याचे पुस्तक हातात घेऊन सांगत आहेत की, यासाठी ही तरतूद आहे, त्यासाठी ती तरतूद आहे. लहान मुलांचा प्रश्न निर्माण झालेला आहे, बलात्काराच्या संदर्भात या ठिकाणी मंत्रीमहोदयांनी बरीच माहिती दिलेली आहे. मला माननीय मंत्रीमहोदयांना विचारावयाचे आहे की, "बलात्काराची नेमकी व्याख्या काय आहे" ? सर्वोच्च न्यायालयाने बलात्काराच्या संदर्भात जो काही निर्णय दिलेला आहे तो फार भयानक आहे. नव-याने स्वत:च्या पत्नीवर बळजबरी केली तर त्याला सुध्दा बलात्कार समजण्यात यावा" असा सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिलेला आहे. आता आपण यासंदर्भात राज्यात कोणती कायदा आणि सुव्यवस्था निर्माण करणार आहात ? किती कुटुंबातील महिलांना आपण इनकॅमेरा विचारणार की, तुझा नवरा काय करतो? त्यामुळे माननीय मंत्रीमहोदयांनी यासंदर्भात उत्तर द्यावे.

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, जशी तक्रार येईल त्या आधारावर कारवाई केली जाईल.

उपसभापती : या लक्षवेधीवर आता बरीच चर्चा झालेली आहे. आता मी शेवटचा प्रश्न विचारण्याची संधी सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांना देत आहे. एका लक्षवेधीवर किती वेळ चर्चा करावयाची याला सुध्दा काही मर्यादा आहेत.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, राज्यमंत्रीमहोदयांना मला विचारावयाचे आहे की, एका प्रकरणात 87 इसम ताब्यात घेऊन त्यांच्याकडून उपयुक्त माहिती मिळाली नाही. दुस-या प्रकरणात 55 संशयित ताब्यात घेतले त्यामध्ये 11 इसमांची डीएनए टेस्ट करण्यात आली परंतु त्यांच्याकडून सुध्दा उपयुक्त माहिती मिळाली नाही. याचा अर्थ तपास करणार अधिकार सक्षम नाही असा त्याचा अर्थ होतो. त्यामुळे अधिक कार्यक्षम अधिका-यांकडे ही केस दिली पाहिजे या मताशी संबंधित पोलीस खाते आलेले आहे काय ? पोलीस खाते या मताशी आले असेल तर ही केस सक्षम अधिका-याकडे सुपूर्द करणार आहात काय ? जळगावमध्ये अशा प्रकारचा गुन्हा घडला होता त्यावेळी आपण सक्षम अधिका-याकडे ही केस सुपूर्द केली होती.

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

यानंतर श्री. गायकवाड....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे ...

मुबईतील या केसचे गांभीर्य लक्षात घेतले पाहिजे. या केसच्या बाबतीत सबंधित पोलीस अधिका-याने प्रामाणिक प्रयत्न केले असतील त्याबाबतीत माझे काहीही म्हणणे नाही. परंतु त्यामध्ये ते कमी पडत आहेत म्हणून या विषयात स्पेशलाईज असलेल्या अधिका-याची नेमणूक करुन त्याच्याकडे या केसची चौकशी देण्यात येणार आहे काय ?

श्री.रमेश बागवे : या बाबतीत तपासून योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2..

विशेष उल्लेख

पृ.शी.: वाद्रे वरळी सी लिंक जवळ पोलीस चोकी बांधणे

मु.शी. वांद्रे वरळी सी लिंक जवळ पोलीस चौकी बांधण्याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उपसभापती : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी विशेष उल्लेखासंबधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधान सभेने निवडलेल्या) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासबंधीची सूचना मांडते.

सभापती महोदय, मुबईतील वाढती वाहतुकीची समस्या दूर करण्यासाठी 1600 कोटी रुपये खर्च करुन बांद्रे वरळी सी लिंक तयार करण्यात आला असून त्या ठिकाणी अत्याधुनिक स्कॅनर बसविणे आवश्यक आहे. या सी लिकच्या सुरक्षिततेसाठी मोठया प्रमाणावर पोलीस नेमण्यात आलेले आहेत. सी लिंक वरुन वाहतूक सुरु झाली आहे . त्या ठिकाणी पोलीस चौकी बांधणे आवश्यक असून तेथे अत्याधुनिक स्कॅनर बसविण्यात यावेत अशी मागणी मुंबईच्या पोलीस आयुक्तांनी गेल्या वर्षीच्या जून आणि ऑगस्ट महिन्यामध्ये केली होती. परतु त्या ठिकाणी अजूनही स्कॅनर बसविण्यात आलेले नाहीत.इतकेच नव्हे तर वाद्रे वरळी सी लिंकवर सुरक्षेसाठी जे पोलीस तैनात करण्यात आलेले आहेत त्यांच्यासाठी अजूनही चौकी बांधण्यात आलेली नाही. लवकर पावसाळा सुरु होणार असल्यामुळे तेथे पोलीस चौकी बांधण्यात यावी अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे. माननीय गृह राज्यमंत्री सभागृहात उपस्थित असून पोलीस चौकी बांधण्यासंबंधीचे अधिकार त्यांच्याकडे नक्कीच आहेत असे मला वाटते. तेव्हा वांद्रे वरळी सी लिंकवर बंदोबस्तासाठी जे पोलीस तैनात करण्यात आलेले आहेत त्यांच्यासाठी लवकरात लवकर पोलीस चौकी बांधण्यात यावी व या संबंधी ज्या काही तांत्रिक अडचणी आल्या आहेत त्या त्वरित दूर करण्यात याव्यात तसेच त्या ठिकाणी स्कॅनर देखील बसविण्यात यावे यासाठी मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेव्दारे शासनाचे लक्ष वेधत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी :. ठाणे जिल्हयाचे विभाजन करणे

मु.शी. : ठाणे जिल्हयाचे विभाजन करण्याबाबत श्री.संजय केळकर,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, ठाणे जिल्हा आकारने मोठा असून येथील लोकसंख्या एक कोटी आहे. या जिल्हयामध्ये 24 विधान सभा सदस्य असून 4 लोकसभेचे सदस्य आहेत. ठाणे जिल्हयाचे भौगोलिक क्षेत्र मोठे असून त्या ठिकाणी विविध शासकीय योजना जाहीर केल्या जातात परंतु त्या प्रत्यक्षात राबविल्या जात नाहीत. त्यामुळे आदिवासी भागातील बालमृत्यू, पिण्याचे पाणी, शिक्षणाच्या सुविधा ,आरोग्याचे प्रश्न,रोजगाराभिमूख शिक्षण, रस्ते इत्यादी समस्या मोठया प्रमाणावर दिवसेदिवस जाणवत आहेत. गेल्या दहा वर्षा पासून ठाणे जिल्हयाचे विभाजन करण्याचा विषय शासनाकडे प्रलंबित आहे. क्षेत्रफळाचा विचार करता ठाणे जिल्हा अवाढव्य असून त्या जिल्हयाचा प्रशासकीय कारभार सुस्थितीत करण्याच्या दृष्टीने सध्याची जिल्हा प्रशासकीय यंत्रणा अपुरी पडत आहे. ठाणे जिल्हयातील जनतेची मुलभूत गरज लक्षात घेता ठाणे जिल्हयाचे विभाजन विना विलब झ ाले पाहिजे अशा प्रकारची मागणी गेल्या 15 वर्षापासून करण्यात येत आहे. त्या मागणीकडे या विशेष उल्लेखाव्दारे मी शासनाचे लक्ष वेधत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : ठाणे जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाच्या वेतन पथकाचे कार्यालय दुस-या इमारतीत स्थलांतरित करणे

मु.शी. ठाणे जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाच्या वेतन पथकाचे कार्यालय दुस-या इमारतीत स्थलांतरित करण्याबाबत श्री.रामनाथ मोते, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री रामनाथ मोते यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, ठाणे जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाच्या वेतन पथकाचे कार्यालय महाराष्ट्र हायस्कूल जवळील अहिल्या बिल्डींग मध्ये आहे. गेल्या अनेक वर्षा पासून हे शासकीय कार्यालय त्या ठिकाणी भाडे तत्वावर सुरु आहे. ही बिल्डीग गेल्या 40 वर्षा पूर्वीची असल्यामुळे ती मोडकळीस आलेली आहे. संबंधित इमारतीच्या मालकाने ही इमारत री डेव्हलपमेन्टसाठी सोहम एन्टरप्रायझेस यांना दिली आहे. सदरहू इमारत धोकादायक असून कोणत्याही क्षणी तेथे दुर्देवी घटना घडू शकते. ही इमारत धोकादायक असल्याबद्दल महानगरपालिकेने सुध्दा त्यांना नोटीस दिलेली आहे. या इमारतीमधील इतर कार्यालये दुसरीकडे स्थलांतरित झाली असून .....

नतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / शोधनेसाठी नाही

श्री. रामनाथ मोते...

फक्त आज त्याठिकाणी माध्यमिक विभागाच्या वेतन पथकाचे एकच शासकीय कार्यालय सुरु आहे. त्या शासकीय कार्यालयामध्ये सर्व शासकीय कर्मचारी काम असल्यामुळे त्या कार्यालयासाठी पर्यायी व्यवस्था करण्याची जबाबदारी शासनाची किंवा शिक्षण विभागाची आहे. ही इमारत केव्हाही कोसळण्याचा धोका असल्यामुळे या कार्यालयासाठी पर्यायी जागा शासनाने उपलब्ध करुन दिली पाहिजे. त्यासाठी प्रशासनाने तातडीने कारवाई करणे आवश्यक आहे. त्या कार्यालयामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या जीविताचा प्रश्न आहे, तसेच त्या कार्यालयामधील अभिलेख वाया जाऊ नयेत किंवा ते खराब होऊ नयेत यासाठी शासनाने तातडीने कारवाई करावी अशी या विशेष उल्लेखाव्दारे मी मागणी करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

पृ.शी.: क्रिकेटमधील अव्दितीय योगदानाबद्दल सचिन तेंडुलकर यांचा सन्मान करणे

मु.शी.: क्रिकेटमधील अव्दितीय योगदानाबद्दल सचिन तेंडुलकर यांचा सन्मान करणे याबाबत श्री. संजय दत्त, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

" क्रिकेट विश्वात कितीतरी महान फलंदाज, गोलंदाज तसेच अष्टपैलू खेळाडूंनी त्यांच्या कालखंडात मैदान गाजविले आहे. मात्र तब्बल दोन दशके त्याच तडफेने क्रिकेट विश्वावर विक्रमांच्या राशी रचणारा सचिन रमेश तेंडुलकर हा त्या राजांचा महाराजा आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करतानाच क्रिकेट विश्वातील दुसऱ्या क्रमांकाचा खेळाडू म्हणून त्याने रेकॉर्ड बुकमध्ये प्रवेश केला आणि तेव्हापासून जवळपास सर्वच विक्रमावर त्याने आपले नाव कोरण्याचा सपाटा लावला आहे. तब्बल 20 वर्षे मैदानावरील हे सळसळते चैतन्य जगातील प्रत्येक गोलंदाजाला आपल्या तालावर नाचायला लावत आहे. आपल्या तडाखेबंद खेळीने क्रिकेटमध्ये नवनवीन विक्रम करणाऱ्या सचिन रमेश तेंडुलकर यांनी एक दिवसीय सामन्यांमध्ये व्दिशतक झळकावणारा पहिला फलंदाज बनून त्याने आणखी एक विश्वविक्रम केला आहे. तो जगातील सर्वोत्तम फलंदाज आहे. अशा या तडाखेबाज महान क्रिकेटपटूचा नागरी सत्कार करण्याचा निर्णय मुंबई महानगरपालिकेने घेतला आहे. महाराष्ट्राचा सुपुत्र मास्टर ब्लास्टर सचिन रमेश तेंडुलकर याच्या क्रिकेटमधील अव्दितीय योगदानाचा सन्मान म्हणून राज्य शासनाने यथोचित सन्मान करायला हवा व केंद्र शासनाकडेही या महान खेळाडूचा सन्मान करावा म्हणून शिफारस करावी अशी मागणी मी विशेष उल्लेखाव्दारे शासनास करीत आहे."

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. केंद्रामध्ये कॉग्रेसचे सरकार असतांना यांच्या केंद्र सरकारला दृष्टी नाही काय? त्यांना याची आठवण करुन द्यावी लागते एवढी त्यांना अक्कल नाही? लोकसभेमध्ये सुध्दा सचिन तेंडुलकरबद्दल गौरवोद्गार काढण्यात आले आहेत. याचा अर्थ यांचे केंद्र सरकार सक्षम नाहीतर राज्य सरकार कसे असणार?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, सभागृहामध्ये मंत्रिमहोदय उपस्थित असल्यामुळे मी आपल्यामार्फत मंत्रिमहोदयांनी याबाबत लक्ष घालावे अशी विनंती करतो.

श्री. नसीम खान : सभापती महोदय, माननीय सदस्यांच्या ज्या भावना आहेत. त्याच भावना राज्य शासनाच्या सुध्दा आहेत. त्यामुळे याबाबतीत शासन नक्की विचार करील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

पृ.शी.: शिक्षण विभागामार्फत राज्यातील प्रत्येक जिल्हयामध्ये कायदेशीर कामकाजासाठी विधीतज्ज्ञाची नियुक्ती करणे

मु.शी.: शिक्षण विभागामार्फत राज्यातील प्रत्येक जिल्हयामध्ये कायदेशीर कामकाजासाठी विधीतज्ज्ञाची नियुक्ती करणे याबाबत श्री. भगवानराव साळुंखे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : माननीय सदस्य श्री. भगवानराव साळुंखे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.भगवानराव साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"राज्यातील शिक्षणाधिकारी (प्राथमिक, माध्यमिक, उच्च शिक्षण इत्यादी) वर्ग सध्या त्यांच्या कार्यालयात पूर्ण वेळ उपस्थित राहून जनतेला न्याय देण्याचे कार्य पूर्ण क्षमतेने करु शकत नाहीत. त्यांच्या अनुपस्थिती मागील एक प्रमुख कारण असते ते म्हणजे त्यांना त्यांचे कार्यालयाविरुध्द ज्या विविध न्यायालयामध्ये खटले दाखल केले जातात त्या ठिकाणी प्रतिवादी म्हणून उपस्थित रहावे लागणे हे होय. आठवडयातून किमान दोन ते तीन दिवस प्रत्यक्ष मा. शिक्षणाधिकारी यांना हजेरी लावावी लागते. शिवाय इतर दिवशी त्यांना वर्ग दोन दर्जाच्या अधिकाऱ्यांना व इतर सेवकांना या कामी गुंतवावे लागते. सारांश शासनाने प्रत्येक जिल्हयात शिक्षण विभागामध्ये या कायदेशीर कामकाजासाठी किमान एका विधीतज्ज्ञाची नियुक्ती करुन घेतल्या जाणाऱ्या प्रत्येक निर्णयाची कायदेशीरता तपासण्याची यंत्रणा निर्माण करावी. जेणेकरुन खटल्यांची संख्या घटेल आणि प्रशासनामध्ये गतिमानता वाढेल अशी या विशेष उल्लेखाव्दारे मी विनंती करीत आहे."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

पृ.शी.: मुंबई उच्च न्यायालयाच्या इमारतीच्या प्रवेशव्दारावर "बॉम्बे" ऐवजी "मुंबई" असा बदल करणे

मु.शी.: मुंबई उच्च न्यायालयाच्या इमारतीच्या प्रवेशव्दारावर "बॉम्बे" ऐवजी "मुंबई" असा बदल करणे याबाबत श्री. दिवाकर रावते,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, मुंबई उच्च न्यायालयाच्या इमारतीच्या न्यायाधीशांच्या प्रवेशव्दारावर "बॉम्बे उच्च न्यायालय" असा फलक आहे, मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा असल्यामुळे या नाम फलकामध्ये "बॉम्बे"ऐवजी "मुंबई" असा बदल होणे आवश्यक आहे. तथापि, असा बदल अद्यापपर्यंत करण्यात आलेला नाही. दि.27.2.2010 रोजी मराठी भाषा दिन साजरा झाला. सदर नामफलकामध्ये "बॉम्बे" ऐवजी "मुंबई" अशी दुरुस्ती तातडीने करण्यात यावी." अशाप्रकारे या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाला वारंवार सांगावे लागत आहे याची आता मला लाज वाटत आहे.

मघाशी माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी केंद्र सरकारला शासनाने विनंती करण्याबाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली. त्यावेळी मी मांडलेला मुद्दा किती योग्य होता याची ही सूचना मांडीत असतांना मला जाणीव होत आहे. मुंबईचे नामकरण झाल्याला एक तप उलटून गेले. माननीय उपमुख्यमंत्री श्री. छगन भुजबळ हे मुंबई महानगरपालिकेचे महापौर असतांना नामकरणाचा प्रस्ताव आला. त्यानंतर मुंबईचे नामकरण झाले. त्यावेळी सर्वोच्च न्यायालय, मुंबई उच्च न्यायालयामध्ये सुध्दा इंग्रजीमध्ये मुंबई हायकोर्ट असा उल्लेख करावा अशाप्रकारचा मी प्रस्ताव आणला व विनंती केली. मला समोरच्या बाजूने तत्कालीन मुख्यमंत्री माननीय श्री. विलासराव देशमुख यांनी सांगितले की, याबाबत तातडीने प्रस्ताव पाठवून तो अंमलात आणावा अशी विनंती करु.

(यानंतर सौ.रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

दोन महिन्यापूर्वी केंद्रीय कायदा खात्याने असे सांगितले की, या देशातील बॉम्बेचे मुंबई आणि कोलकत्ताचे कलकत्ता आणि मद्रासचे तामिळनाडू अशा प्रकारे उच्च न्यायालयाचे नामकरण करण्याच्या बाबतीतील प्रस्ताव विचाराधीन आहे. पण केंद्रातील सरकार एवढे सुस्त का आहे ? असा प्रश्न निर्माण होतो. कारण केंद्र शासनाने कायदेशीररित्या ही नावे मान्य केल्यानंतर ती देण्यासाठी बाब विचाराधीन का ठेवावी लागते ? हे मला कळत नाही. म्हणून मी या अस्मितेच्या विषयाच्या बाबतीत सरकारला अशी विनंती करतो की, आता खूप वेळ झालेला आहे. उच्च न्यायालयाच्या पाटीवर डांबर फासावयास लावू नका, त्यासाठी लोकांना तुरुंगामध्ये जावयास लावू नका. कारण हा एक विशिष्ट असा प्रकार आहे की, उच्च न्यायालयाच्या बाबतीत कोणतेही पाऊल उचलताना अनेक कायदेशीर तरतुदी लक्षात घ्यावा लागतात. म्हणून आपण तातडीने केंद्र शासनाला विनंती करुन उच्च न्यायालयाच्या बाबतीत सांगावयाचे तर तेथे तातडीने "मुंबई" असे नामकरण करावे, बाकीचे नामकरण तुम्हाला केव्हा करता येईल ते पहावे. पण उच्च न्यायालयाच्या बाबतीत "मुंबई" असे नामकरण तातडीने करावे अशा प्रकारे विशेष उल्लेखाच्या व्दारे मी केंद्र सरकारला विनंती करीत आहे. आता केंद्र शासनामध्ये माननीय माजी मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख आहेत. त्यामुळे हे नामकरण करण्याच्या बाबतीत सांगावे आणि तसे करुन घ्यावे अशी मी विशेष उल्लेखाच्या व्दारे विनंती करीत आहे.

. . . .2 ए-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : ठाणे कारागृहात सर्वश्री.कान्हेरे, कर्वे,देशपांडे या थोर स्वातंत्र्यसैनिकांना देण्यात आलेल्या फाशीच्या स्मृती जागृत करण्यासाठी या घटनेची शताब्दी साजरी करण्याबाबत

मु. शी. : ठाणे कारागृहात सर्वश्री.कान्हेरे,कर्वे,देशपांडे या थोर स्वातंत्र्यसैनिकांना देण्यात आलेल्या फाशीच्या स्मृती जागृत करण्यासाठी या घटनेची शताब्दी साजरी करण्याबाबत श्री.दिवाकर रावते वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य श्री.दिवाकर रावते यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"ठाणे कारागृहात सर्वश्री कान्हेरे,कर्वे,देशपांडे या थोर स्वातंत्र्यसैनिकांना दि.19-04-1910 रोजी फाशी देण्यात आली. त्या घटनेला दि.19-04-2010 रोजी शंभर वर्षे पूर्ण होणार आहेत. या थोर स्वातंत्र्यसैनिकांच्या स्मृती जागृत करण्यासाठी दि.19-04-2010 रोजी या घटनेची शताब्दी त्या ठिकाणी साजरी करण्यात यावी.

सभापती महोदय, हा विशेष उल्लेख अतिशय महत्वाचा आहे. याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.उल्हासदादा पवार उपस्थित आहेत, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकलेसाहेब उपस्थित आहेत. खरे म्हणजे हा विशेष उल्लेख असा आहे की, ठाणे कारागृहात सर्वश्री कान्हेरे,कर्वे,देशपांडे या थोर स्वातंत्र्यसैनिकांना दि.19-04-1910 रोजी फाशी देण्यात आली. त्या घटनेला दि. 19-04-2010 रोजी शंभर वर्षे पूर्ण होणार आहेत. या घटनेला 100 वर्षे पूर्ण होत असून, तेथे कान्हेरे यांची उपेक्षित असलेली समाधी आहे. मी मुंबईचा महापौर असताना मुद्दाम ठाणे कारागृहामध्ये गेलो होतो. त्यापूर्वी एक दिवस अगोदर तेथील जेलरनां सांगितले, त्यावेळी ते म्हणाले की, त्याठिकाणी अशा प्रकारचे कोणतेही स्मारक तेथे असल्याचे दिसत नाही. त्यावर मी त्यांना ठामपणे सांगितले की, अशा-अशा ठिकाणी स्मारक आहे अशी माझी माहिती आहे आणि त्या

. . . .2 ए-3

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

स्मारकावर पुष्पचक्र वाहण्यासाठी मुंबईचा महापौर म्हणून मी तेथे येत आहे.मग मी तेथे जाण्यापूर्वी त्यांनी तातडीने सर्व शोधून काढून स्मारकाचा भाग स्वच्छ करुन ठेवलेला होता.त्या दिवसापासून कै.अनंत कान्हेरे यांच्या समाधीला दरवर्षी पुष्पमाला वाहिली जाते, त्यांना सलामी दिली जाते आणि या तीनही स्वातंत्र्यसैनिंकाचा आदर केला जातो. या तिघांना ज्याठिकाणी फाशी देण्यात आली, तेथे मी स्वत: गेलो होतो. त्याठिकाणी काही गोष्टी अस्ताव्यस्त झाल्या होत्या, त्याचे जतन करण्यासाठी मी माझ्या आमदार निधीतून पैसे उपलब्ध करुन दिले होते. याठिकाणी या देशभक्तांना शेवटची फाशी झाली होती. तेथे फाशी देण्यासाठी लागणारी फळी आणि इतर गोष्टी या आजही आहेत. या सर्व गोष्टी जतन कराव्यात आणि पुढच्या पिढीला या स्वातंत्र्यसैनिकांची आठवण रहावी यासाठी त्या सर्व बाबी प्रदर्शनीय कराव्यात. ते लोकांना पहाता यावे यासाठी जेलच्या बाहेरुन भिंत पाडण्यात यावी. माननीय उप सभापतीसाहेब, मला असे वाटते की, आपणही त्यामध्ये सहभागी होतात आणि मी आपणाला विनंती केली होती. तेव्हा ठाणे कारागृहामध्ये एक राष्ट्रीय असा ठेवा आहे की, जेथे आपल्या तीन स्वातंत्र्यसैनिकांना फाशी देण्यात आली होती आणि ती या देशातील शेवटची फाशी होती. अशा घटनेस 100 वर्षे पूर्ण होत असल्यामुळे या थोर स्वातंत्र्यसैनिकांची स्मृती जागृत करण्याकरता या घटनेची शासनाच्यावतीने शताब्दी साजरी करण्यात यावी अशा प्रकारची विशेष उल्लेखाच्या माध्यमातून विनंती करतो आणि खास करुन सन्माननीय सदस्य श्री.उल्हासदादा पवार आणि सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकलेसाहेब आपल्यालाही सांगू इच्छितो की, आपण आपल्या शासनाच्यामार्फत जर ही गोष्ट घडवून आणली तर मला खूप आनंद होईल. कारण हा सर्वांच्याच अभिमानाचा विषय आहे, तेवढे आपण करावे. तसेच याच्याकरता माननीय उपसभापती महोदयांनी मला मदत केली होती आणि त्यांनीही निधी उपलब्ध दिला होता. त्यानंतर तेथील काम केले होते. ते जनतेला कसे प्रदर्शनीय होईल, पहाता येईल आणि लोकांच्या मनात त्यांची स्मृती राहील याप्रकारे आपण यामध्ये लक्ष घालावे अशी मी आपल्याला विनंती करतो. धन्यवाद.

उपसभापती : आता सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितले त्याप्रमाणे ठाणे कारागृहामध्ये तीन थोर स्वातंत्र्य सैनिकांना दि.19-04-1910 रोजी फाशी देण्यात आली होती, त्या घटनेला 100 वर्षे पूर्ण होत आहे.अशा वेळी या घटनेची शताब्दी साजरी करणे उचित आहे. त्याप्रमाणे ती करण्यात यावी.

श्री.रमेश बागवे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, नक्की करु.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : राज्य विशेष सुरक्षा महामंडळ विधेयक.

L.A.BILL NO. XXI OF 2009

(A BILL TO PROVIDE FOR THE ESTABLISHMENT AND REGULATION OF THE MAHARASHTRA STATE SPECIAL SECURITY CORPORATION IN THE STATE OF MAHARASHTRA AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

श्री. रमेश बागवे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2009 चे वि. स. वि. क्रमांक 21- महाराष्ट्र राज्यात, महाराष्ट्र राज्य विशेष सुरक्षा महामंडळाची स्थापना करण्यासाठी आणि त्याचे विनियमन करण्यासाठी तसेच तत्संबंधित व तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक मागे घेण्यास मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : विधेयक मागे घेण्यास सभागृहाची अनुमती आहे.

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2009 चे वि. स. वि. क्रमांक 21 मागे घेतो.

उपसभापती : सन 2009 चे वि. स. वि. क्रमांक 21 मागे घेण्यात आले आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.

सभागृहाच्या कामकाजासंबंधी

उपसभापती : यानंतर कामकाज पत्रिकेवर दाखविलेले सन 2009 चे वि..स. वि. क्रमांक 17 चर्चेला घेऊन त्यानंतर राज्यपालांच्या अभिभाषणावर व शासकीय विधेयकांवर चर्चा सुरु केली असती परंतु बिलाशी संबंधित माननीय मंत्रिमहोदय आता सभागृहात उपस्थित नसल्यामुळे ती चर्चा आपण मध्यंतरानंतर सुरु करु.

सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल व दुपारी 2.00 वाजता पुन: भरेल.

(दुपारी 1.15 ते 2.00 वाजेपर्यंत मध्यंतर)

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर)

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नसणे

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत. त्यामुळे सभागृहाची बैठक 10 मिनिटांकरिता स्थगित करण्यात यावी. आपण मंत्रिमहोदयांना ताकीद द्यावी. कारण पहिल्या दिवशी त्यांना ताकीद दिली नाही तर पुढे देखील असेच चालू राहील.

उपसभापती : सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांकरिता तहकूब करीत आहे. दरम्यानच्या काळात कॅबिनेट मंत्री महोदयांना निरोप पाठविण्यात यावा.

(सभागृहाची बैठक दुपारी 2.00 ते 2.10 पर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री.ओटवणेकर.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगिती नंतर)

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

<u>सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नसणे याबाबत</u>

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहात कॅबिनेट मंत्री नसणे हे सतत 5 वर्षे सुरू आहे. त्यामुळे यासंबंधी आपण माननीय संसदीय कार्यमंत्री महोदयांना निदेश देणे आवश्यक आहे. मागच्या वेळी अधिवेशन संस्थगित होत असताना मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नसल्यामुळे वाया गेलेला वेळ याचे वाचन केले होते. त्याची नोंद मंत्रिमहोदयांनी घेतलेली नाही. आता पण कॅबिनेट मंत्री उपस्थित नसणे हे योग्य वाटते का ? यासंबंधी आम्ही नेहमीच संसदीय कार्यमंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांना सभागृहात बोलतो. मंत्रिमहोदय ऐकत नसतील तर आपण त्यासंबंधी योग्य तो निर्णय घ्यावा. ही सुरूवात आहे म्हणून बाब उपस्थित करीत आहे. माझी तर सूचना आहे की, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना मंत्री करावे. कारण त्यांनी सभागृह सुरू असताना कायम येथे बसेन असे सांगितले आहे.

उप सभापती : एक पूर्णवेळ मंत्री आपण आमच्या ताब्यात द्यावा. तो मग सभागृहात बसेल. हा विषय आता आपण येथेच संपवू या. आता मी सभागृहाच्या अनुमतीने वि.स.वि.क्रमांक 17 घेत आहे.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मुंबई करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयक.

L.A. BILL NO. XVII OF 2009

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY ENTERTAINMENTS DUTY ACT, 1923.)

श्री.प्रकाश सोळंके (महसूल राज्य मंत्री) : अध्यक्ष महाराज, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे मी आपल्या अनुमतीने सन 2009 चे वि.स.वि.क्रमांक 17 - मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, 1923 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

उप सभापती : विधेयक मांडण्यात आले.

श्री.प्रकाश सोळंके : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने सन 2009 चे वि.स.वि.क्रमांक 17 - मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, 1923 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, मुंबई करमणूक शुल्क अधिनियम 1923 यात सुधारणा करण्यातकरिता हे विधेयक आणले आहे. या विधेयकात प्रामुख्याने तीन बाबींचा समावेश करण्यात आला आहे. राज्यातील पर्यटन उद्योगाला गती देण्याच्या दृष्टीने शासनाने "पर्यटन धोरण-2006" नावाचे पर्यटन धोरण जाहीर केले होते. त्या धोरणांतर्गत पात्र ठरणाऱ्या उपक्रमांना करमणूक शुल्क माफी अनुज्ञेय करण्याबाबत .....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या सदनामध्ये सर्व विषय उपस्थित होतात. मी येथे जे सांगणार आहे त्यासंबंधातील आपण सर्व रेकॉर्ड काढून पहावा. मंत्रिमहोदय एखादा कायदा मांडत असताना त्यांनी तो कायदा अभ्यासून आणला पाहिजे. त्यांनी अधिकाऱ्यांकडून ब्रीफिंग घ्यायला पाहिजे. या शिवाय मी जो कायदा निर्माण करणार आहे त्याचे महाराष्ट्रात काय परिणाम होणार आहे याचे चिंतन मंत्रिमहोदयांनी केले पाहिजे. या कायद्यामुळे समाजावर काय परिणाम होणार आहे, या कायद्याद्वारे काय परिस्थिती निर्माण होणार आहे याचा अभ्यास मंत्रिमहोदयांनी केला पाहिजे. म्हणजे कायद्यामुळे होणारा फायदा व नुकसान या दोन्ही बाजू मंत्रिमहोदयांनी तपासून पहायला हव्यात. ...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

आम्ही जेव्हा नुकसानीची बाजू मांडतो तेव्हा या कायद्यातून कोणता फायदा होणार आहे हे पटवून देण्याचे सामर्थ्य मंत्रिमहोदयामध्ये असणे आवश्यक आहे. त्यामुळे हे विधयेक मांडताना सुरूवातील अशी मांडणी अशी असली पाहिजे की, समोरच्या पक्षाला विधेयकातील उणीवा देखील काढायला देता कामा नयेत एवढा चांगला अभ्यास असला पाहिजे. कोणीही मंत्री येतो विधेयक वाचतो आम्ही आग्रह करतो म्हणून काही तरी दोन शब्द सांगतात आणि खाली बसतात. चटावरचे श्राद्ध उरकावे त्याप्रमाणे मंत्रिमहोदय विधेयक सभागृहात मांडतात आणि हे मी गेली पाच वर्षे बघितले आहे. कोणतेही विधेयक मनापासून मांडताना मी मंत्रिमहोदयांना पाहिलेले नाही. हा पक्षाचा विषय नाही. विधिमंडळामध्ये कायदा तयार होतो त्यावेळी त्याचे महाराष्ट्रात दूरगामी परिणाम होतात. माननीय मंत्रिमहोदय हे मराठवाड्यातील आहेत हे मला माहित आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...

माननीय राज्यमंत्री महोदयांना मी सुरुवातीलाच सांगू इच्छितो की, तुम्ही मंत्रिमंडळामध्ये स्वत:च्या कर्तृत्वावर आला आहात. आपले कर्तृत्व या सभागृहामध्ये उठून दिसेल असे आपले काम असले पाहिजे. विधेयके संमत करणे हे या सभागृहाचे महत्वाचे काम आहे. मंत्री कोणीही असो त्या मंत्र्याने सभागृहामध्ये विधेयक मांडताना किंवा विचारात घेताना अर्धा-ताच तरी अभ्यासपूर्ण भाष्य केले पाहिजे. तसे अभ्यासपूर्ण भाष्य करणारे दोन-तीन मंत्री मंत्रिमंडळामध्ये आहेत..(अडथळा)..मला हे सांगावयाचे आहे की, मंत्री महोदयानी विधेयकाच्या संदर्भात या सभागृहामध्ये चिंतन करुन आले पाहिजे. मी सन्माननीय राज्यमंत्री श्री. भास्कर जाधव यांचे कौतुक करतो. एका विधेयकाच्या संदर्भात विरोधकांनी काही सूचना केल्यानंतर त्यांनी सांगितले की, हे विधेयक मांडण्याची त्यांची इच्छा नाही. परंतु नंतर गोंधळामध्ये ते विधेयक संमत करण्यात आले. मला मंत्रिमंडळातील सर्वच मंत्र्यांना विनंती करावयाची आहे की भविष्यामध्ये चांगले राज्यकर्ते म्हणून आपल्याला नावलौकिक मिळवावयाचा असेल तर सभागृहात मांडल्या जाणा-या विधेयकाच्या संदर्भात संपूर्ण अभ्यास करुन ते विधेयक कशासाठी मांडण्यात येत आहे हे सांगितले पाहिजे.

श्री. प्रकाश सोळंके : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी ज्या काही सूचना केल्या, मार्गदर्शन केले त्याचा निश्चितच स्वीकार केला जाईल. ते आमच्या मराठवाड्याचे काही वर्षे संपर्कप्रमुख असल्यामुळे मला मार्गदर्शन करण्याचा त्यांना अधिकार आहे. मराठवाड्यावर त्यांचे प्रेम आहे.

राज्यातील पर्यटन उद्योगाला गती देण्याच्या दृष्टीने शासनाने पर्यटन धोरण 2006 जाहीर केले. या धोरणांतर्गत पात्र होणा-या पर्यटन घटकासाठी राज्यातील पर्यटन प्रकल्पाच्या ठिकाणावर अवलंबून असलेल्या व त्यामध्ये विहित केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून 5 ते 7 वर्षाच्या कालावधीकरिता करमणूक करात आणि मनोरंजन करात पूर्णत: सूट देण्यात आली आहे. पर्यटन धोरण 2006 अंतर्गत पर्यटनार्थ तीन विभाग केलेले आहेत. परिमंडल "अ"मध्ये मुंबई, नवी मुंबई, मुंबई उपनगर जिल्हा, ठाणे, पुणे, पिंपरी-चिचवड महानगरपालिका क्षेत्र यांचा समावेश आहे. परिमंडल "ब"मध्ये परिमंडल "अ"मध्ये असलेल्या महानगरपालिकांचे क्षेत्र वगळून सर्व महानगरपालिका व "अ" वर्ग नगरपालिका क्षेत्र यांचा समावेश आहे. परिमंडल "क"मध्ये "अ", "ब" आणि "क" मध्ये नमूद केलेले क्षेत्र वगळून संपूर्ण महाराष्ट्रातील जिल्ह्यांचा समावेश आहे.

...2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके...

पर्यटनाच्या प्रोत्सानाकरिता पात्र घटकांमध्ये पर्यटन विकास महामंडळाच्या बिछाना आणि न्याहारी योजनेखालील हॉटेले, पारंपारिक हॉटेले, रिसोर्ट आणि आरोग्य क्षेत्रे, आरोग्य आणि निरोगीपणा स्पा आणि युनिटे, मॉटेल्स, आणि रस्त्यावरील सोयीसुविधा, वेष्म हॉटेले किंवा सेवा दालने, जलक्रिडा आणि मनोरंजन उद्याने, कला व हस्तकलांची गावे, गोल्फ कोर्सेस, छावणी, काफला आणि तंबू सोयीसुविधा इत्यांदीचा समावेश आहे. या विधेयकाच्या अनुषंगाने मनोरंजन आणि करमणूक करात 5 आणि 7 वर्षे सूट देत असताना अशी अट टाकण्यात आलेली आहे की, ज्यांना ही सवलत 5 वर्षे दिलेली आहे त्यांनी तो उद्योग किमान 10 वर्षे तरी चालू ठेवला पाहिजे.

...नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके.....

7 वर्षांसाठी जर सूट देण्यात आली असेल तर किमान 14 वर्षे त्यांनी तो उद्योग चालविला पाहिजे आणि 10 वर्षांसाठी सूट दिली तर 20 वर्षे त्यांनी तो उद्योग चालविला पाहिजे अशा प्रकारच्या अटी यामध्ये अंतर्भूत आहेत. त्याचबरोबर पारितोषिक वितरण कार्यक्रम आणि शासन पुरस्कार, सांस्कृतिक उत्सव कार्यक्रमातील करमणूक शुल्क आकारण्याबाबत निश्चितपणे राज्याचा सांस्कृतिक वारसा आणि पर्यटन धोरण लक्षात घेऊन राज्यात विविध सांस्कृतिक आणि पर्यटन महोत्सव आयोजित केले जातात. राज्याच्या सांस्कृतिक वारसा अधिक वृध्दिंगत होण्याच्या दृष्टीने आणि पर्यटनाचा विस्तार करण्याचा विचार करुन राज्याच्या विकासाला चालना देण्यासाठी शासनाने प्रायोजित केलेला सांस्कृतिक महोत्सव किंवा राज्य शासन वा शासकीय उपक्रम, स्वायत्त संस्था, शैक्षणिक संस्था यांच्याद्वारे आयोजित केलेल्या, प्रायोजित केलेल्या किंवा सहप्रायोजित केलेल्या कार्यक्रमांना करमणूक शुल्कातून पूर्णत: सवलत या विधेयकाच्या माध्यमातून देण्यात आली आहे. त्याचा प्रामुख्याने उद्देश हा जो काही महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा आहे, प्रत्येक विभागामध्ये आपल्याला असे आढळून आले की, प्रत्येक विभागाचे सांस्कृतिक कार्यक्रम हे निश्चितपणे वेगवेगळे आहेत, परंपरा वेगवेगळया आहेत. अशा महोत्सवांना करमणूक शुल्कातून पूर्णत: सूट दिली तर असे आयोजन करण्यामध्ये ज्या संस्था पुढाकार घेतात त्यांना निश्चितपणे इन्सेन्टिव्ह आणि या विधेयकाच्या माध्यमातून शुल्कामध्ये माफी देण्याचा प्रस्ताव आहे.

त्याचप्रमाणे मुंबई शहरात चित्रपट किंवा दूरचित्रवाणी उद्योगाच्या प्रातिनिधीक संस्थांकडून किंवा प्रसार माध्यमाच्या यंत्रणांकडून आयोजित केलेल्या गाण्याच्या, नृत्याच्या किंवा अन्य बहुरंगी कार्यक्रमांच्या पुरस्कार वितरण समारंभासाठी मिळणाऱ्या प्रायोजकत्वाच्या रक्कमेवर सवलतीच्या दरामध्ये शुल्क आकारावे हा उद्देश आहे. पूर्वी यावर साधारणपणे 25 टक्के शुल्क आकारण्यात येत होते. परंतु असे लक्षात आले की, बरेचसे असे समारंभ हे प्रामुख्याने राज्याच्या बाहेर चालले आहेत. असे कार्यक्रम बंगळुरु, दिल्ली अशा ठिकाणी आयोजित केले जात आहेत. महाराष्ट्रामध्ये, मुंबईमध्ये आणि परिसरामध्ये असे कार्यक्रम घेण्याचे प्रमाण कमी होत चालले आहे असे आढळून आल्यामुळे 25 टक्क्याऐवजी 12.5 टक्के करमणूक शुल्क आकारण्याचे या विधेयकाच्या माध्यमातून ठरविले आहे. त्याचबरोबर भारतीय चित्रपट मालक आणि प्रदर्शक संघ, त्याचबरोबर विविध नाटयगृह मालक संघ यांनी त्यांना वाढता देखभाल खर्च भागवणे शक्य व्हावे म्हणून चित्रपट

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके.....

प्रदर्शनावरील करमणूक शुल्काचे विद्यमान दर कमी करण्याची आणि सेवा आकार वाढविण्याची त्यांनी शासनाला वेळोवेळी विनंती केली आहे.

मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, 1923 च्या कलम 2 मध्ये सुधारणा करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. राज्यातील चित्रपटगृहांच्या पायाभूत सुविधांमध्ये वाढ करण्यासाठी स्थायी किंवा स्थायीवत चित्रपटगृहांच्या सेवा आकारामध्ये साधारण व वातशीतल वा एअरकूल अशा चित्रपटगृहांच्या बाबतीत 3 रुपयांवरुन 5 रुपये इतकी आणि वातानुकूलित चित्रपटगृहांबाबत 4 रुपयांवरुन 6 रुपये इतकी वाढ करणे त्यादृष्टीने आवश्यक ठरले आहे. त्याचबरोबर सॅटेलाईटमार्फत माहिती व तंत्रज्ञानाच्या सहाय्याने संगणकीकृत तिकीट टर्मिनल नेटवर्क असलेल्या चित्रपटगृह मालकाला प्रत्येक तिकिटामागे 50 पैसे अतिरिक्त सेवा आकार बसविण्याची मुभा या माध्यमातून देण्यात आली आहे. साधारणत: या विधेयकाचा उद्देश एवढाच आहे की, आपण पर्यटन धोरण स्वीकारले आहे त्या धोरणाला चालना मिळावी या दृष्टीकोनातून जे पर्यटक घटक आहेत.....

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके .....

त्यांना करमणूक शुल्क माफ करता यावे. शेवटी ग्राहकाला जास्तीत जास्त सेवा देण्याच्या दृष्टीने चित्रपटगृहांनाही प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने हे विधेयक शासनाने आणले आहे. मला आपल्याला विनंती करावयाची आहे की, या विधेयकातील ज्या तरतुदी आहेत त्यावर सन्माननीय सदस्यांनी सूचना कराव्यात, त्या सूचनांचा समावेश या विधेयकात केला जाईल एवढेच या निमित्ताने सांगू इच्छितो आणि हे विधेयक सभागृहाने मान्य करावे अशी विनंती करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मुंबई करमणूक अधिनियम, 1923 यामध्ये काही सुधारणा करण्यासाठी माननीय मंत्री महोदयांनी हे विधेयक क्र. 17 सभागृहात मान्यतेसाठी आणलेले आहे.

माननीय मंत्री महोदयांनी आताच उद्देश आणि कारणे यांचे वर्णन सभागृहात केले. त्यामध्ये कोणकोणते कर माफ केले आणि पर्यटन क्षेत्राला उत्तेजन मिळण्यासाठी काय करणार आहे याचे विवेचन केले आहे. चित्रपट गृहावर 50 पैसे तसेच प्रेक्षकांना 4 रुपयांवरुन 6 रुपये एवढी वाढ करण्याचे सुचविलेले आहे. त्याचबरोबर सांस्कृतिक देवाण-घेवाण होण्यासाठी जे कार्यक्रम आयोजित केले जातात त्यावर करमणूक शुल्क माफ केलेले आहे. तसेच नृत्य किंवा गाण्याच्या स्पर्धा दूरचित्रवाणी आणि विविध चॅनल्सच्या माध्यमातून दाखविल्या जातात त्यावरील कर 12.50 टक्क्यापर्यंत आणला आहे. आज महाराष्ट्रामध्ये पाहिले तर अनेक थिएटर्स आहेत, मुंबईमध्ये प्रत्येक मॉलमध्ये जवळपास सिनेमागृहे असतातच. त्यात कोणाची 150 तर कोणत्या थिएटरची 300 ची कॅपेसिटी असते. आपण असे म्हटले आहे की, सॅटेलाईटमार्फत माहिती तंत्रज्ञानाच्या संगणकीकृत तसेच नेटवर्क असणाऱ्या चित्रपटांच्या मालकाला प्रत्येक तिकिटामागे 50 पैसे इतका सेवा कर ग्राहकाला सेवा देण्यासाठी देण्याचे ठरविले आहे. आपण बाजूलाच असलेल्या आयनॉक्स थिएटरमध्ये गेला असालच. आपण तिकिट काढून गेल्यानंतर जर मिनरल वॉटरची बाटली विकत घेतली तर तिची किंमत 40 ते 60 रुपये एवढी असते. कॉफी 80 ते 100 रुपयाला मिळते. समोसा घेण्यासाठी 60 रुपये मोजावे लागतात. मग ही ग्राहक सेवा नाही काय आणि याकडे महसूल विभागाने लक्ष दिले नाही काय ? जर ग्राहकाला सेवा द्यावयाची असेल तर अशा बाबींचा विचार करण्याची गरज वाटली नाही काय ? तसेच अशा मॉल्समधील चित्रपटगृहांमध्ये मराठी चित्रपट किती दाखविले जातात ? असलाच तर पहिल्या आठवड्यात दोन चित्रपट व तो देखील सकाळी 8 वाजता आणि रात्री 10.15 वाजता दाखविला जातो. म्हणजे मराठी माणूस याच काळात मराठी चित्रपट बघतो काय ? दुसरे म्हणजे पिक्चर देखील ऑड वेळेला असतात आणि ते कोणी बघू शकणार नाहीत. आज मराठीमध्ये "विहिर", "नटरंग", "टिंग्या" आणि "वळू" सारख्या चित्रपटांना प्रोत्साहन देण्याचे शासनाला का सुचले नाही ?

श्री. प्रकाश सोळंके : महोदय, या विधेयकाच्या माध्यमातून जी दरवाढ प्रस्तावित केली आहे ती मल्टिप्लेक्स थिएटर्ससाठी नाही तर फक्त एक पडदा चित्रपटगृहांसाठी करण्यात आली आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. जयप्रकाश छाजेड)

श्री. दीपक सावंत .....

सभापती महोदय, मी मॉलच्या संदर्भात विचार मांडत होतो. दुसरी बाब अशी आहे की, आपण विधेयकामध्ये म्हटले आहे की, साधारण चित्रपट गृह तसेच वात शितल चित्रपट गृहांच्या तिकीटाच्या किंमतीमध्ये 3 ते 5 रुपयांनी वाढ केलेली आहे. खरे म्हणजे सिंगल पडदा चित्रपटगृह हे ग्रामीण भागातीलच आहेत. ग्रामीण भागामध्ये फ्लॉप झालेले चित्रपट लागत असतात, मराठी चित्रपट लागत असतात अशा ठिकाणच्या चित्रपटाच्या तिकीटांच्या दरामध्ये आपण वाढ केलेली आहे. त्यामुळे आपण जी काही दरवाढ केलेली आहे ती योग्य आहे काय ? असा माझा आपल्याला सवाल आहे. आता जग 21 व्या शतकाकडे जात असतांना आपण सॅटेलाईट मार्फत ज्या ठिकाणी तिकीट उपलब्ध करुन दिले जातात त्या तिकीटाच्या दरामध्ये आपण 50 पैशाने वाढ केलेली आहे. मॉडर्ननायझेशनच्या जमान्यात असे करणे योग्य आहे काय ? ज्या चित्रपटगृहात सिंगल पडदा असतो तो फाटला तर मालकाचे फार मोठे नुकसान होत असते परंतु ज्यांचा विमा आहे त्यांचा पडदा फाटला तर त्यासाठी विमा कंपनीकडून नुकसान भरपाई म्हणून 10 लक्ष रुपये मिळत असतात. ज्या ठिकाणी सर्वसामान्य माणूस चित्रपटगृहात जाऊन चित्रपट बघतो त्या चित्रपटगृहाच्या तिकीटावर दर वाढ करणे योग्य नाही असे मला वाटते. ज्या ठिकाणी बायको मुलांबरोबर सर्वसामान्य माणूस चित्रपट बघण्यास जातो अशा ठिकाणच्या चित्रपटगृहाच्या तिकीटांचे दर वाढविणे योग्य नाही. त्यामुळे सर्वसामान्य माणसांचे नुकसान होणार नाही याची शासनाने काळजी घेण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मंत्रीमहोदयांनी प्रायोजकाच्या संदर्भात विचार मांडलेले आहेत. ज्या संस्था किंवा ज्या कंपन्या कार्यक्रम स्पॉन्सर करतात अशा कंपन्याना किंवा संस्थाना आपण यामध्ये का सूट दिलेली आहे ? त्यामुळे प्रायोजितचा अर्थ माननीय मंत्रीमहोदयांनी सांगण्याची आवश्यकता आहे. एखादा कार्यक्रम एखादी कंपनी किंवा एखादी संस्था स्पॉन्सर करीत असते. या सगळयांचा खर्च ती कंपनी किंवा ती संस्था करीत असते. जर प्रायोजित कार्यक्रमाला दुस-याकडून पैसे मिळणार असेल आणि सरकारला कररुपाने पैसा मिळत असेल तर अशा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

प्रायोजित कार्यक्रमाच्या फीमध्ये कपात करु नये एवढे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. एखादा गाण्यांचा कार्यक्रम असेल, डान्सचा कार्यक्रम किंवा परदेशी कलाकारांचा कार्यक्रम असेल असे कार्यक्रम बीपीएल, लूप, एअरसेल अशा किती तरी कंपन्या असे कार्यक्रम प्रायोजित करीत असते. कार्यक्रम प्रायोजित करुन या कंपन्या कोटयावधी रुपये नफा कमावित असतात. एखाद्या विशिष्ट व्यक्तीसाठी सुध्दा खास शो प्रायोजित केले जात असतात. त्यामुळे ज्या ठिकाणी कार्यक्रम प्रायोजित केले जातात अशा कार्यक्रमावर टॅक्स लावणे आवश्यक असतांना आपण त्यावरील टॅक्स कमी केलेला आहे.एखाद्या ठिकाणी मी शो प्रायोजित केला असेल तर त्या ठिकाणी मी माझ्या जवळच्या व्यक्तींनाच बोलावेन. त्यामुळे ज्या ठिकाणी शो प्रायोजित केले जातात त्यावर टॅक्स वाढविणे आवश्यक आहे. प्रायोजित कार्यक्रमाला टॅक्स लावला तर सांस्कृतिक देवाणघेवाणीचा प्रश्न येतोच कोठे ?

सभापती महोदय, तिसरी बाब अशी आहे की, संगीत, गायन, रियालिटी शो किंवा पारितोषिक वितरण समारंभ होतात, काही वेळा ते कार्यक्रम टीव्ही वरुन दाखविले जातात. आपल्याला कल्पना असेल की, असे कार्यक्रम एकदा सुरु झाले की, 10-10,15-15 मिनिटे त्यावर जाहिरातच दाखवत असतात व या जाहिरातीच्या माध्यमातून कार्यक्रम प्रायोजित करणाऱ्या कंपन्या भरपूर पैसे कमावित असतात. अशा कार्यक्रमाच्या वेळेस प्रेक्षकांना कंटाळा येईपर्यंत जाहिराती पहाव्या लागत असतात आज जाहिरातीच्या माध्यमातून या कंपन्या करोडो रुपये कमावित असतात. ज्या ठिकाणी रियालिटी शो होतात त्या ठिकाणी तर एसएमएसच्या माध्यमातून कार्यक्रम प्रायोजित करणाऱ्या कंपन्या फार मोठा प्रमाणात पैसे कमावित असतात.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ....

काश्मीर पासून कन्याकुमारीपर्यंत अनेक ठिकाणाहून एस.एम.एस. केले जातात. त्याच्या माध्यमातून सबंधित कंपनीला मोठया प्रमाणावर पैसे मिळत असतात परंतु त्या पैशाचा शासनाने विचार केलेला नाही असे म्हणावेसे वाटते. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी त्या पैशाचा उपयोग करुन घेता येईल व त्या पैशातून अनेक सांस्कृतिक पुरस्कार देता येतील असे मला सुचवावयाचे आहे.

सभापती महोदय, पंचवीस टक्क्यावरुन हा कर साडेबारा टक्के करण्यात येत असून त्याला माझा तीव्र विरोध आहे. सभापती महोदय, एखादा कार्यक्रम कोणती तरी कंपनी स्पॉन्सर करीत असते अशा वेळी एखादी कंपनी जर त्यामध्ये इन्व्हॉल्व्ह झालेली असेल आणि त्या कंपनीने जर कर भरला तर काही हरकत नाही. आज रिॲलीटी शोज देखील वारंवार होत असतात. चॅनल्सच्या स्पर्धेमध्ये दर आठ दिवसाला नवीन रिॲलीटी शोज येत आहेत. त्यातून देखील शासनाला मोठया प्रमाणावर कर मिळत असतो. अशा वेळी पंचवीस टक्क्यावरुन साडेबारा टक्क्यापर्यंत जर कर कमी करण्यात येत असेल तर ते उचित होणार नाही असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, या विधेयकामध्ये पर्यटन विकास धोरणाच्या बाबतीत उल्लेख करण्यात आलेला आहे. या बाबतीत खुलासा करतांना असे सांगण्यात आले आहे की, पाच वर्षाची सवलत द्यावयाची असेल तर तो उद्योग दहा वर्षे चालू ठेवला पाहिजे, सात वर्षाची सवलत द्यावयाची असेल तर चौदा वर्षे उद्योग चालू ठेवला पाहिजे आणि दहा वर्षाची सवलत द्यावयाची असेल तर तो उद्योग वीस वर्षे चालू ठेवला पाहिजे. परंतु एखाद्या उद्योगाने सवलती घेतल्या आणि पाच वर्षानंतर उद्योग सुरु ठेवणे परवडत नाही म्हणून बंद केला तर सबंधित व्यक्तीला शिक्षा करण्याच्या दृष्टीने कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. त्यामुळे एखाद्या उद्योजकाने जर पाच वर्षानंतर उद्योग परवडत नाही म्हणून बंद केल्यास शासन काय करणार आहे ? अशा प्रकारे शासन दिशाभूल करणारी आणि खोटी बंधने का घालत आहेत हे समजत नाही. ही बंधने घालून शासन नेमके काय साधणार आहे ?

सभापती महोदय, पर्यटन क्षेत्राला प्रोत्साहन दिले पाहिजे, अनेक पर्यटकांनी आपल्याकडे आले पाहिजे असे एका बाजूला शासनाकडून सांगण्यात येते. वास्तविक भारतासारखी पर्यटन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ....

स्थळे इतर देशात कोठेही नाहीत. थायलंड आणि बॅन्कॉकला काही पर्यटक जातात परंतु तेथील समुद्र किना-या पेक्षासुध्दा अधिक सुंदर समुद्र किनारे आपल्याकडे आहेत. सिंधुदूर्ग आणि रत्नागिरी जिल्हयामध्ये अतिशय सुंदर समुद्र किनारे आहेत परंतु त्या ठिकाणी पर्यटकांना लागणा-या मुलभूत सुविधा न दिल्यामुळे पर्यटक मोठया संख्येने तेथे जात नाहीत. त्या ठिकाणी इनफ्रास्ट्रक्चर तयार नाही त्यामुळे पर्यटक तेथे जात नाहीत. पर्यटन क्षेत्राला प्रोत्साहन देत असतांना त्यांना असा दंडुका दाखविला आहे की , तुम्ही अटीचा व शर्तीचा भंग केला तर तुम्हाला देण्यात आलेली सूट काढून घेण्यात येईल. त्या संदर्भात सुध्दा फक्त एका सुटेच्या बाबतीत भाष्य करण्यात आलेले आहे.बाकीची कोणती सूट काढून घेण्यात येणार आहे याबाबतीत काहीही उल्लेख् केलेला नाही.पाच वर्षे सवलत हवी असेल तर दहा वर्षे उद्योग चालू ठेवला पाहिजे. सात वर्षे सवलत हवी असेल तर चौदा वर्षे तो उद्योग चालू ठेवला पाहिजे, दहा वर्षे सवलत हवी असेल तर वीस वर्षे उद्योग चालू ठेवला पाहिजे एवढाच फक्त उल्लेख करण्यात आला आहे. मला या विधेयकाच्या निमित्ताने एवढेच सांगावयाचे आहे की, हे विधेयक व्यवस्थित असले तरी ते मांडण्यामध्ये अनेक त्रृटी आहेत. सामान्य माणसाचा विचार त्यामध्ये करण्यात आलेला नाही. सामान्य प्रेक्षकाचा, कुटुंब वत्सल प्रेक्षकाचा विचार केलेला नाही , पर्यटनाला जाणा-या माणसाचा विचार केलेला नाही. फक्त मोठया कंपन्यांना आणि फाईव्ह स्टार हॉटेल मालकांना सुविधा देण्याकरिता आणि त्यांनी आणखी भ्रष्टाचार करण्याकरिता हे विधेयक आणले आहे अशी माझी ठाम समजूत असून या विधेयकात सुधारणा कराव्यात आणि सुधारित विधेयक मांडावे एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) :सभापती महोदय,सन 2009 चे वि.स.वि.क्रमांक 17 - मुंबई करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयक 2009 वर माझे विचार मांडण्याकरिता मी उभा आहे.

सभापती महोदय, हे विधेयक विधान सभेत दिनांक 8 जून 2009 रोजी मांडण्यात आले होते आणि 16 जून 2009 रोजी ते संमत करण्यात आले होते. विधान सभेत हे विधेयक समत होण्या पूर्वीच विधान परिषदेचे सत्र समाप्त झाल्यामुळे हे विधेक विधान परिषदेत विचारार्थ येऊ शकले नाही. हे विधेयक लॅप्स झाल्यामुळे पुन्हा आणले गेले व आता हे विधेयक विधान परिषदेत विचारात घेण्यात येत आहे. या विधेयकाचे स्वागत करीत असतांना मला एवढेच सांगावयाचे आहे की, या विधेयकाच्या निमित्ताने सन्माननीय सदस्यांनी जे विचार मांडलेले आहेत ते देखील शासनाने लक्षात घेणे आवश्यक आहे. पर्यटन व्यवसायाला गती देण्याच्या दृष्टीने आणि जास्तीत जास्त लाभ राज्याला मिळण्याच्या दृष्टीने हे विधेयक आणले आहे असे मला सांगावयाचे आहे.. एक पर्यटक जर भारतात आला आणि तो जर फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये राहिला तर 25-30 लोकांना रोजगार मिळू शकतो असे सांगण्यात येते. अशा प्रकारे पर्यटनाच्या माध्यमातून रोजगार निर्मिती होते हा सर्वात महत्वाचा भाग आहे. तेव्हा पर्यटनाच्या माध्यमातून रोजगार कसा वाढेल याकडे अधिक लक्ष दिले गेले पाहिजे.पर्यटनाला अधिक सुविधा देण्याच्या दृष्टीने राज्य सरकारने विचार केला पाहिजे असे मला सांगावयाचे आहे. चित्रपटगृहाच्या कराच्या बाबतीत 3 रुपयाचे चार रुपये आणि 4 रुपयाचे 6 रुपये असे बदल सुचविण्यात आले आहेत तेव्हा असे करण्याचे कारण काय आहे याचा देखील उल्लेख करण्याची आवश्यकता होती.

नतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत/शीघ्रलेखाची नाही

श्री. अरुण गुजराथी....

याठिकाणी दर वाढवितांना त्याचे कारण देखील देण्याची आवश्यकता आहे. आपण दर वाढविण्यास हरकत नाही, परंतु त्या प्रमाणात सुविधा दिल्या पाहिजेत. त्यादृष्टीने माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी ज्या सुविधा दिल्या जातात त्यासंबंधी याठिकाणी मुद्दा मांडला. या विधेयकामध्ये अटी व शर्तीचा भंग केल्यास सूट काढून घेण्याची तरतूद केली आहे. याठिकाणी त्यांनी 5 वर्षे, 7 वर्षे, 10 वर्षे लाभ घ्यावयाचा आणि अटींचे पालन करावयाचे नाही. त्यांनी अटींचा भंग केल्यास आपण फक्त त्यांची सूट काढून घेऊ शकता. म्हणून याबाबतीत आपल्याला वेगळे धोरण स्वीकारावे लागेल. या विधेयकाच्या अनुषंगाने आपण इंटिग्रेटेड स्कीम करु शकलो तर ते जास्त योग्य होईल. हे विधेयक सभागृहामध्ये आणून ते कसेतरी पुढे रेटण्याचा प्रयत्न केला जात आहे असे वाटते. शासनाने याठिकाणी प्रायोजित केलेल्या कार्यक्रमांना मोफत सवलत देण्याचा विचार केला आहे. काही चांगल्या एनजीओंच्या माध्यमातून काही चांगले कार्यक्रम होत असतील तर त्यांना देखील मोफत सवलत देण्याचा शासनाने विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, पृष्ठ क्र. 2 वरील (फ-अ 1) या तरतूदीमध्ये "शासनाने प्रायोजित केलेला सांस्कृतिक महोत्सव" याचा अर्थ, राज्य शासन किंवा शासनाचा उपक्रम किंवा स्वायत्त संस्था यांनी आयोजित केलेला, प्रायोजित किंवा सह-प्रायोजित केलेला महोत्सव किंवा शासन याबाबतीत अधिसूचनेव्दारे राजपत्रात विनिर्दिष्ट करील, असा अन्य सांस्कृतिक महोत्सव किंवा शैक्षणिक संस्था यांच्याव्दारे आयोजित केलेला सांस्कृतिक महोत्सव असा आहे" याबाबतीत आम्ही सूट देत आहोत म्हणून शासनाला प्रत्येक वेळी गॅझेट प्रसिध्द करावे लागेल. आपण त्याची वर्गवारी केली आणि ती नियमामध्ये अंतर्भूत केली तर त्यामध्ये अडचण येणार नाही. त्यादृष्टीने आपण प्रयत्न केले पाहिजेत. यापासून शासनाला किती महसूल मिळणार आहे त्याची आकडेवारी याठिकाणी दिलेली नाही. पर्यटन धोरणाच्या संदर्भात आपण जास्त चांगल्या पध्दतीने विचार केला पाहिजे. आपण याठिकाणी प्रायोजित कार्यक्रमांना कर लावणार नाही असे म्हटले आहे ते योग्य आहे. परंतु हे विधेयक मंजूर झाल्यानंतर पुन्हा त्यामध्ये सुधारणा कराव्या लागतील असे हे विधेयक वाचल्यानंतर माझ्या मनामध्ये विचार आले. या विधेयकाच्या अनुषंगाने पुढील वर्षे सहा महिन्यामध्ये आपण कशाप्रकारे सुविधा करु शकतो यादृष्टीने प्रयत्न झाला पाहिजे असे या विधेयकाला पाठिंबा देत असतांना मला सांगावेसे वाटते. मघाशी माननीय सदस्यांनी म्हटल्यानंतर आपण कोठेही गेल्यानंतर आज बटाटा वडा 50 रुपये आणि समोसा 60 रुपये असा दर लावला जातो ही वस्तुस्थिती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KTG/

श्री. अरुण गुजराथी...

त्याठिकाणी शासनाच्या माध्यमातून किंवा एनजीओंच्या माध्यमातून आपण काय करु शकतो? त्याठिकाणी अल्प दरामध्ये सोयी-सवलती देऊ शकतो कां? याचा विचार केला पाहिजे. पर्यटनाचे महत्व लक्षात घेऊन शासनाने या विधेयकामध्ये आणखी सुधारण करण्याच्या दृष्टीने निश्चितपणे विचार करावा असे बोलून या विधेयकाला पाठिंबा देतो व माझे भाषण संपवितो.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी मांडलेल्या विचारांना पाठिंबा देण्यासाठी व या विधेयकाला विरोध करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

शासनाने याठिकाणी पर्यटनाला पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी किंवा पर्यटन व्यवसाय वाढविण्यासाठी कर प्रणाली अंमलात आणण्याचे ठरविले आहे. 20 वर्षापूर्वी या राज्यामध्ये रोजगार हमी योजनेवरील खर्च भागविण्यासाठी शासनाने प्रोफेशनल टॅक्स लावला होता. या टॅक्सच्या माध्यमातून शासनाला दरवर्षी 1 हजार कोटी रुपयांचा महसूल मिळत होता. शासनाने गोळा केलेल्या या उत्पन्नामधील फक्त 200 ते 300 कोटी रुपयेच रोजगार हमी योजनेवर खर्च केले जात होते. आणि बाकीचा पैसा इतरत्र खर्च केला जात होता. त्याकरिता गेली दहा वर्षे या सभागृहामध्ये आम्हाला झगडावे लागले. शासनाला प्रत्येक वेळी सांगितले की, रोजगार हमी योजनेकरिता गोळा होणारा निधी त्या योजनेवर खर्च होत नाही. त्याप्रमाणे याठिकाणी पर्यटनाच्या विकासासाठी, पर्यटन व्यवसाय वाढविण्यासाठी हा निधी आपल्याला खर्च करावयाचा असेल तर त्यासाठी शासनाकडे कोणतेही नियोजन नाही. आज शासन या ना त्या कारणाने जनतेच्या खिशामधून कर रुपाने पैसा गोळा करीत आहे. परंतु ज्या उद्देशाने आपण लोकांवर कर लावीत आहात तो उद्देश सफल होत नाही.

सभापती महोदय, पर्यटनाच्या दृष्टीने कोकणचा परिसर हा अतिशय उत्कृष्ट समजला जातो. पर्यटन विकास करण्यासाठी आपण ॲग्रो टूरिझमला जास्त सवलत दिली पाहिजे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

ॲग्रो टुरिझमला विद्युतच्या बाबतीत सवलती दिल्या पाहिजेत, टॉयलेटसाठी वेगळी सोय केली पाहिजे. राज्य शासनाच्या वेगवेगळया स्वरुपाच्या योजना आहेत. आदिवासी उप योजनांतर्गत काही योजना आहेत, त्यामध्ये आपल्याला बदल करण्याची गरज आहे. कारण यापैकी काही योजना कालबाह्य झाल्या आहेत, तर काही त्यांचे टारगेट पूर्ण झालेले आहे. डीआरडीए ची योजना आहे, या योजनेच्यामार्फत तुम्ही खऱ्या अर्थाने पर्यटन वाढवू शकता. याठिकाणी आदिवासी भागामध्ये ट्रेन्ड लोक आहेत. माझ्या जिल्ह्यातील प्रत्येक आदिवासी वाडीमध्ये 2-3 मुले ग्रॅज्युएट झालेली आहेत, चांगली सुशिक्षित झालेली आहेत. अशा वेळी तुम्ही आदिवासी योजनांसाठी असलेला पैसा पर्यटन वाढविण्याच्या दृष्टीने वापरात आणलात तर माननीय मंत्री महोदयांना लोक दुवा देतील. हा विभाग पर्यटनासाठी पोषक आहे. विशेषत: मुंबई आणि शहराच्यालगत जे जिल्हे आहेत, तेथे मोठया प्रमाणात पर्यटन वाढू शकते. परंतु आपल्याकडे तशा प्रकारचे, त्यादृष्टीचे नियोजन नाही. तुम्ही दरवर्षी बजेटमध्ये पर्यटनासंबंधात गोडगोड बोलत असता, पण प्रत्यक्षात सध्या आहे तशीच परिस्थिती असल्याचे मला दिसून येत आहे, त्यात बदल झालेला नाही. म्हणून आपल्याकडे पर्यटनाच्या योजनांसाठी अपुरा पैसा आहे. पण प्रत्यक्षात जो पैसा आहे, तो केवळ कागदावरच खर्च होतो. तो पैसा या माध्यमातून वापरले तर आपण पर्यटन वापरु शकतो असे मला वाटते. तसेच सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत सवलतीच्या बाबतीत बोलले आहेत. ते म्हणाले की, याबाबतीत पुढील कारवाई काय करणार ? तर कारवाई करता येईल. तुम्ही संबंधितांची मालमत्ता जप्त करु शकता. त्यांच्या मालमत्तेवर बोजा ठेऊ शकता आणि त्यांना सांगू शकता की, तुम्ही पाच वर्षाची सवलत घेत आहात. अशा वेळी या पाच वर्षाच्या कालावधीमध्ये जर संबंधिताने तो उद्योग बंद केला तर अशा वेळी आम्ही तुमची मालमत्ता जप्त करुन पैसे वसूल करु शकतो.पण तशा प्रकारचा उल्लेख विधेयकामध्ये कुठेही केलेला नाही. विधेयकाच्या उद्देशामध्ये याचा उल्लेख असावयास पाहिजे. पण तसे काही यातून स्पष्ट होत नाही. कोणताही करमणुकीचा कार्यक्रम असेल, एखादा शो असेल, सांस्कृतिक कार्यक्रम असेल तर माननीय मंत्री महोदय आपल्याला माहिती असेल की, या राज्यामध्ये कोणतीही परवानगी घ्यावयाची असेल तर काय परिस्थिती आहे ? माननीय मंत्री महोदय,आपण मंत्री होण्यापूर्वी देखील मी आपल्याबरोबर अनेकवेळा खाजगी स्वरुपामध्ये चर्चा केलेली आहे. पण माननीय मंत्री महोदय, आपल्याला कुठेही वजन ठेवल्याशिवाय परवानगी मिळत

. . . .2के-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

नाही. मग आपल्याला एखादा शो करावयाचा असेल तर तो पार पडल्यानंतर देखील आपल्याला या साठी परवानगी मिळेल याची खात्री देता येत नाही. या विषयाच्या बाबतीत मला जो खेद वाटतो त्या बद्दल मी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलताना सांगणार आहे. परंतु माननीय मंत्री महोदय, याठिकाणी तुम्ही अधिकाऱ्यांच्या हातामध्ये आणखी एक कोलित देत आहात. ही परवानगी घ्यावयाची म्हणजे यासाठी तुम्ही त्यांचे दुकान सुरु केले आहे.याठिकाणी त्यांची दुकाने सुरु करण्यासाठी विधेयक आणावयाचे आणि मग आम्ही त्याला परवानगी द्यावयाची काय ? माननीय श्री.पांडुरंग फुंडकरसाहेब,याठिकाणी कोणता शो योग्य आहे आणि कोणता शो अयोग्य आहे ? मी सन्माननीय सदस्य श्री.अरुणभाई गुजराथी यांना विचारु इच्छितो की,हे सर्व कोण ठरविणार आहे ?

श्री.अरुण गुजराथी (खाली बसून) : अधिकारी.

श्री.जयंत प्र.पाटील : अधिकारी ठरविणार. परंतु ते कसे ठरविणार ? तर त्यांचे पेपर उडवावे लागतात म्हणजे माननीय मंत्री महोदय, तेथे वजन ठेवल्यानंतर सगळे पेपर बरोबर होतात. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब म्हणाले ती गोष्ट खरी आहे की, आपण विधेयक आणताना परिपूर्ण अभ्यास केला पाहिजे. परंतु तुम्हाला मार्गदर्शन करणारे जे अधिकारी आहेत, ते यामध्ये अशा पळवाटा ठेवतात जेणेकरुन आपल्याकडे सर्व अधिकार कसे येतील. म्हणून या कायदेमंडळामध्ये कायदा करीत असताना, सभापती महोदय, आपल्याला अधिकार राहील हे पाहिले पाहिजे. याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.गोपीकिसन बाजोरिया उपस्थित आहेत. त्यांना आयुक्तांनी एक पत्र पाठविले. मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी एका तलाठ्याला एका व्यक्तीच्या बदलीसाठी शिफारस पत्र दिले की, "संबंधित व्यक्तीला ह्दयविकाराचा झटका आलेला आहे, त्यामुळे जर कायद्यामध्ये बसत असेल तर त्यांना सोयीची होईल अशा ठिकाणी त्यांची बदली करावी." मग आयुक्तांनी तलाठ्याला पत्र लिहीले की,"तू बदली साठी आमदारांच्या मार्फत माझ्यावर प्रेशर आणले आहे, म्हणून तुझे एक वर्षाचे इन्क्रीमेंट बंद करण्यात येत आहे. तुमच्यावर कारवाई करीत आहोत." मग असा प्रश्न आहे की, हे राज्य अधिकारी चालवितात की माननीय मंत्री महोदय, आमदार चालवितात ? अशा प्रकारची विधेयके पास करुन आपण अधिकाऱ्यांच्या हातातील बाहुले बनणार आहोत काय ? हा अरुणभाई खरा सवाल आहे. तुम्ही स्पष्ट बोलत नाही, तुम्ही अपूरे मांडता. तुम्ही सत्ताधारी पक्षामध्ये आहात आणि

. . . .2 के-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

सत्तारुढ पक्षाला पाठिंबा देणारे सदस्य आहात म्हणून तुम्ही वेगळया भाषेमध्ये बोललात की, यामध्ये आपण पुढच्या वेळेस सुधारणा आणू.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील.....

सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी हे सज्जन आणि सद्शील सदस्य आहेत. त्यांची भाषा वेगळी आहे. मी त्यांच्याकडे आदराने बघतो. असे सन्माननीय सदस्य किंवा राजकारणी आता राजकारणामध्ये कमी होत चालले आहेत. मी त्यांचा नेहमी आदर करतो. त्यांचे मार्गदर्शन नेहमी घेत असतो. सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी जे बोलले त्यामध्ये दोन अर्थ आहेत. काही सन्माननीय सदस्य असे म्हणत आहेत की, चेहरे बघून पदे मिळतात. त्यांचा चेहरा माझ्यापेक्षा चांगला आहे तरी त्यांना बघत नाहीत. आता चेहऱ्यावरुन पदे मिळावयास लागली आहेत. त्यांचा चेहरा माझ्यापेक्षा बरा आहे. ते नवीन आमदार असताना माझे काका श्री. दत्ता पाटील यांच्या दालनामध्ये यावयाचे. त्यांच्यासोबत काम केले आहे. मी त्यांच्याकडे वेगळ्या पध्दतीने बघतो.

सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांचे जरुर अभिनंदन करीन. आपण हे विधेयक धांदलीत पास करीत होतो. माझी अशी मागणी आहे की, आपण पर्यटनाचा बाऊ करु नका. आमच्याबरोबर चर्चा करा. आम्हाला चर्चेला बोलवा. आपल्याला मार्गदर्शन करण्याची आमची कुवत नाही परंतु आम्ही आपल्याला सूचना करुन पर्यटन कसे वाढेल, पर्यटनासाठी काय करावयास पाहिजे हे सांगू शकतो. पर्यटन काही हवेत वाढणार नाही. पर्यटन वाढविण्यासाठी आपल्याकडे उपलब्ध असलेला पैसा कसा वापरावयाचा याबाबत शासनाने धोरण बदलले पाहिजे. शासनाने धोरण बदलले तर निश्चितपणे पर्यटन वाढणार आहे. केवळ कर वाढविण्याने ते होणार नाही. आपण आय.पी.एल.ला सवलती दिल्या असे म्हटले जाते. आय.पी.एल.ला सवलती दिलेल्या आहेत. आम्ही आमदार आहोत. आम्ही कायदे बनवितो. या राज्याचे कायदे या कायदेमंडळामध्ये आम्ही बनवितो. हे उच्च सभागृह आहे, विचारांचे सभागृह आहे. या सभागृहात फक्त मी एक अडाणी सदस्य आहे. कायदा कशा प्रकारे बनविला जातो हे माननीय मंत्रिमहोदयांना माहीत नाही काय ? आपण आय.पी.एल.ला सवलती देता परंतु गरीब शेतकऱ्यांसाठी काही नाही. म्हणून या विधेयकाला माझा विरोध आहे. मी सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी यांच्यासारखे बोलत नाही. मी या ठिकाणी स्पष्टपणे सांगतो की, माननीय मंत्रिमहोदयांनी सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी यांनी जी सूचना केलेली आहे तशा पध्दतीची सुधारणा या विधेयकामध्ये करुन याबाबत शासनाने सुस्पष्ट असे धोरण तयार करुन हे विधेयक पुन्हा आणावे अशी मागणी करुन मी माझे विचार संपवितो.

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

तालिका सभापती (श्री. जयप्रकाश छाजेड) : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी भाषण सुरु करावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य या विधेयकावर बोलत आहेत तेव्हा एक खुलासा झाला पाहिजे की, आपण ज्या सवलती देत आहात आणि त्यावर जो कर लावत आहात त्यामध्ये नक्की उत्पन्न किती आहे हे काहीच कळत नाही. जे खाजगी कार्यक्रम लावतात त्यांना आपण सूत्र घालून दिलेले आहे. परंतु उत्पन्न किती आहे ? महाराष्ट्रात किती हॉटेल्समध्ये खाजगी कार्यक्रम होतात, किती बँक्विट हॉल्स आहेत आणि त्या ठिकाणी जे कार्यक्रम होतात त्याचे किती उत्पन्न मिळते तसेच आता सवलती दिल्यामुळे किती उत्पन्न मिळणार आहे ? विदर्भामध्ये, मराठवाड्यामध्ये, खानदेशामध्ये, आदिवासी भागामध्ये कार्यक्रम वाढतील असे या विधेयकामध्ये म्हटले आहे परंतु याबाबतचा हिशेब अजून मिळत नाही. थिएटर मालकांना किती कोटीची सवलत वाढवून देणार आहात हे समजले पाहिजे. याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी खुलासा करावा.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी आपले भाषण सुरु करावे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी या बिलाचे स्वागत करतो. फक्त पर्यटनाच्या दृष्टीकोनातून या ठिकाणी एक विषय मांडण्यात आलेला आहे. माझी एकच विनंती आहे. 1998 मध्ये सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून जाहीर झाला. राज्याचे पर्यटन धोरण ठरवित असताना देशामध्ये सिंधुदुर्ग जिल्हा एक एकमेव पर्यटन जिल्हा जाहीर झालेला आहे. म्हणून या जिल्ह्याच्या संदर्भात पर्यटनाची दिशा ठरविण्यासाठी एक वेगळा विभाग असणे आवश्यक आहे. त्या ठिकाणी 2006 मध्ये वेगवेगळ्या सुविधा दिलेल्या होत्या परंतु आता कालबध्द कार्यक्रम कसा करता येईल, त्या जिल्ह्यामध्ये पर्यटन कसे वाढविता येईल याचा विचार करणे आवश्यक आहे. बाजूच्या गोवा राज्यामध्ये जागतिक पर्यटन केंद्र आहे. त्या ठिकाणी जागा सुध्दा मिळत नाही. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये गोव्याच्या तुलनेत काही कमी नाही. पर्यटनाचा विचार करीत असताना गोव्यातून गाडी आल्यानंतर त्याला टॅक्स द्यावा लागतो.

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.राजन तेली.....

त्यानंतर मद्यावर कर द्यावा लागतो. गोवा राज्यात काही बाबींवर सवलती दिलेल्या आहेत त्या सवलती आपल्या राज्यातील विशेषत: सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये लागू करण्याबाबत मी बोलत आहे. त्याबाबत शासनाने जरुर विचार करावा अशी मी विनंती करतो. या विधेयकाचे मी स्वागत करतो, परंतु त्यामध्ये ज्या त्रुटी आहेत त्या दूर कराव्यात अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, विधानपरिषदेच्या सभागृहात आमचे नेहमीच म्हणणे असते तसेच माझी अशी माहिती आहे की, विधानसभेच्या सदस्यांचे म्हणणे असते की, ज्यावेळी विधेयके सभागृहात आणली जातात त्याची पध्दती योग्य नसते. आता जे विधेयक आणले आहे त्याची मुदत संपली असल्यामुळे ते पुन्हा आणलेले आहे. मधल्या काळात दोन्ही सभागृहाच्या सदस्यांशी चर्चा होते असे वाटत नाही. आपल्या राज्यात पूर्वी विधी आयोग होते. त्या विधी आयोगाकडे अनेक सूचना आलेल्या असतात. परंतु विधिमंडळामध्ये विधेयके आणण्याची कार्यपध्दतीच चुकीची आहे असे माझे मत आहे. प्रत्येक मंत्री महोदय, विधेयक तात्पुरत्या स्वरुपात मंजूर करुन घेतात. त्याच्या पलिकडे जाऊन ते कोणत्याही गोष्टीचा पाठपुरावा करतात असे मला वाटत नाही. प्रत्येक अधिवेशनात प्रत्येक विधेयकाबाबत आम्ही न कंटाळता हेच सांगत असतो. कारण विक्रमादित्य व वेताळच्या गोष्टीप्रमाणे सरकार जोपर्यंत सुधारत नाही तोपर्यंत आम्हाला सांगणे भाग आहे. या विधेयकातील उद्देश व कारणामध्ये असे नमूद केले आहे की, 'राज्याचा सांस्कृतिक व पर्यटन धोरण लक्षात घेता' माझ्या माहितीप्रमाणे शासन सांस्कृतिक धोरण लवकरच जाहीर करणार आहे. त्यासाठी अनेक विचारवंतांची मते विचारात घेतली आहेत. त्या विचारवंतांमध्ये विरोधी पक्षातही विचारवंत आहेत त्यामुळे त्यांची मते विचारात घ्यावीत असे सरकारला वाटले नाही. त्यामुळे ठराविक सरकारमान्य विचारवंत सोडले तर बाकीचे जे आहेत त्या सगळयांची मते विचारात घेऊन राज्याचे सांस्कृतिक धोरण ठरविले जात आहे. त्या सांस्कृतिक धोरणासंबंधी आम्ही जे वर्तमानपत्रात वाचतो त्याच्याशी विसंगत हे विधेयक आहे. त्याचे कारण असे की, यामध्ये एखादा घटक पात्र म्हणून गृहित धरला आहे. त्याबाबतची पान क्रमांक 3 वर यादी दिलेली आहे. खरोखर संवेदनहीनतेचाच हा नमुना आहे. 'कला व हस्तकलाची गावे' याचाही यामध्ये उल्लेख केलेला आहे. एका बाजूला खादी ग्रामोद्योगाला चालना दिली पाहिजे, बचत गटांना चालना दिली पाहिजे, पर्यटन धोरण केले पाहिजे असे म्हणतो. विशेषत: काही वर्षांमध्ये महाराष्ट्रातील जी कुटुंब वत्सल माणसे आहेत ती निसर्ग पर्यटन, दुर्ग पर्यटन, धार्मिक पर्यटन अशा पध्दतीने पर्यावरणाचा फायदा घेण्यासाठी पर्यटनासाठी जातात. यासंबंधी या विधेयकात 'बिछाना व न्याहरी योजनेवरील हॉटेल्स' असे नमूद केलेले आहे. बेड व ब्रेक फास्टची हॉटेल्स कोण

3....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

चालवितो ? सिंधुदुर्ग, रत्नागिरी व रायगड जिल्हयाच्या समुद्र किना-यालगतची छोटी छोटी हॉटेल्स आहेत. रायगडच्या समुद्र किनारी पंचतारांकित हॉटेल्स सुध्दा आहेत. परंतु छोटया हॉटेल्समध्ये जाणारे जे पर्यटक आहेत ते विद्यार्थी आहेत. त्यामुळे पंचतारांकित हॉटेल्सवर किती कर लावला जाणार आहे हा एक विषय आहे. पण हा फटका शेवटी ग्राहकावर बसतो. कोणताही मनुष्य 10 टक्के किंवा 15 टक्के या स्वरुपाचा कर स्वत:चा स्वत: भरणार नाही. त्यांचे चार्जेस वाढतील त्याचा फटका मध्यमवर्गीय पर्यटकांना बसतो. या यादीमध्ये पान क्र.7 मध्ये 'छावणी, काफला व तंबू सोयी सुविधा' यांचा उल्लेख केलेला आहे. म्हणजे जे लोक वेगवेगळया ठिकाणी पर्यटनातून हायकिंगला जातात. गडावर जातात, त्याठिकाणी तंबूच्या सोयी सुविधा देणा-यांवर शासन कर लावणार आहे. ज्याला आपण ताडणे असे म्हणता येईल. या विधेयकाच्या कार्यक्षेत्रासंबंधी असे म्हटले आहे की, सर्व महानगरपालिका, जेथे जेथे महानगरपालिका नाही ते सर्व क्षेत्र, याचा काय अर्थ आहे ? म्हणजे कोठेही कॉर्नरवर तंबू बांधून चहा देत असेल आणि तेथे जर लोकं रहात असतील तर त्याच्यावर कर आकरणी करणारी यंत्रणा आणणार आहे असे म्हणत असाल तर त्यानिमित्ताने जिझिया कर या लोकांकडून वसूल करण्याचे अधिकार सरकारी अधिका-यांना दिलेले आहेत. तसेच तो जो कर आहे त्याची जी पावती दिली जाईल ती डुप्लीकेट नसेल ना ? मागे काही दिवसापूर्वी डुप्लीकेट पावत्यांचा गैरव्यवहार झाल्याचे उघड झाले होते. संबंधित अधिकारी जे पावती देतील त्यातून जमा होणारा महसूल कोणापर्यंत, कसा जाऊन पोहोचणार आहे, तेथे जमा झालेला आहे की नाही ? एखाद्याने निसर्ग संवर्धनाचा प्रकल्प केला असेल तर त्याच्यावर सुध्दा कर लावला जाणार आहे.

यानंतर श्री.शिगम.....

अशुद्धीत प्रत/शोधनासाठी नाही

(डॉ. नीलम गो-हे....)

या सर्व प्रश्नांचा विचार करावा लागेल असे मला वाटते. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सांवत तसेच सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी सिंधुदुर्ग आणि रायगड जिल्हयाचा उल्लेख करुन हे जे पर्यटन धोरण शासनाने जाहीर केलेले आहे ते कसे विपरित आहे याकडे सभागृहाचे लक्ष वेधलेले आहे. या ठिकाणी विविध कार्यक्रमाचा उल्लेख करण्यात आलेला आहे. मराठी साहित्याला चालना देणारे काव्य वाचनासारखे अनेक कार्यक्रम होतात. "नक्षत्रांचे देणे" यासारखे कार्यक्रम, जुन्या कविता वाचनाचे कार्यक्रम वाहिन्यांवरुन दाखविले जातात. अशा कार्यक्रमांवर जर आपण कर लावणार असाल तर अशा प्रकारच्या सांस्कृतिक कार्यकमांची अवनती होईल. म्हणून सूट देण्याच्या बाबतीत देखील काही नियम असावयास पाहिजेत. मल्टीप्लेक्समध्ये मराठी सिनेमा दाखविण्यासाठी वेळा नेमून देण्यात आलेल्या आहेत. गेल्या दोन महिन्यात नटरंग, विहीर, पांढर, गोष्ट छोटी डोंगरा एवढी, अशा प्रकारचे अनेक लो-बजेट चित्रपट लोकप्रिय झालेले आहेत. याबाबतीत शासनाची भूमिका सहृदयतेची असली पाहिजे. मोठे बजेट असलेल्या चित्रपटाला कर लावण्याच्या बाबतीत जो नियम असेल तोच नियम लो-बजेट असलेल्या चित्रपटाला लावणे योग्य होणार नाही. म्हणून या सर्व बाबतीत तारतम्य बाळगून करात सूट देण्याबाबतची भूमिका घेतली पाहिजे.

सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सांवत तसेच सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी या विधेयकाला विरोध केलेला आहे. मी देखील या विधेयकाला विरोध करते. सभापती महोदय, जसे बाहुबल तसे संख्याबलावर विधेयके पास करुन घेण्याची वाईट सवय सत्ताधारी पक्षाला लागलेली आहे. या सभागृहामध्ये विधेयक मांडताना त्या त्या विषयाचे ज्ञान असलेल्या सत्ताधारी पक्षातील सदस्यांना देखील विचारात घेतले जात नाही. घरेलु कामगारांच्या संदर्भातील विधेयक डिसेंबरमध्ये पास झाले. परंतु त्याची अंमलबजावणी मात्र प्रत्यक्षात झालेली नाही. रात्री 12-12 वाजेपर्यन्त चर्चा करुन विधेयके संमत केली जातात पण अंमलबजावणी होत नाही. मग लोकांनी जोडे मारल्यानंतर लोक हिंसाचार करतात असे सरकार म्हणते. तेव्हा या विधेयकाचा शासनाने पुनर्विचार करावा एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपविते.

==2==

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, मुंबई करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयकावर या सदनातील सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र. पाटील, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी आपले विचार मांडलेले आहेत. तसेच या विधेयकातील अनेक बाबीविषयी त्यांनी सूचना केलेल्या आहेत. या निमित्ताने मला एका गोष्टीचा खुलासा करावायाचा आहे की, आपण जे पर्यटन धोरण स्वीकारलेले आहे त्या धोरणा प्रमाणे जे पात्र पर्यटन घटक आहेत त्यांना करमणूक करातून आणि मनोरंजन करातून सूट देण्याच्या संबंधातील हे विधेयक आहे. आपण अ, ब, क अशी तीन परिमंडले केलेली आहेत. पर्यटन पात्र घटकाला 5वर्षे, 7 वर्षे आणि 10 वर्षे अशी सूट दिलेली आहे. पर्यटन क्षेत्रामध्ये जे काम करु इच्छितात त्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी ही सूट दिलेली आहे. ही कर माफी 5, 7 आणि 10 वर्षासाठी केलेली आहे.

...नंतर श्री.भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके.....

त्या माध्यमातून महाराष्ट्रामध्ये असे घटक यावेत आणि पर्यटनाला चालना मिळावी हा उद्देश या विधेयकाचा आहे. सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी सांगितले की, एक विदेशी पर्यटक आपल्याकडे आला तर 25 लोकांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगार मिळतो. हे विधेयक आणण्याचा उद्देश एवढाच आहे की, जे काही पात्र पर्यटन घटक आहेत ज्यांची मघाशी यादी वाचली त्या पात्र घटकांव्यतिरिक्त जे काही घटक आपल्याला पात्र करता येतील अशांचा निश्चितपणे विचार करता येईल. म्हणून या विधेयकाचा हेतू लक्षात घेतला तर पर्यटन धोरण, पर्यटनाचा उद्योग या राज्यात वाढावा या उद्देशाने हे विधेयक आणलेले आहे.

सध्या कोणत्याही प्रकारच्या करमणूक शुल्कापासून किंवा मनोरंजन शुल्कापासून माफी मिळत नाही. ती माफी देता यावी हा या विधेयकाचा उद्देश आहे. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सांगितले की, विहित कालावधीमध्ये जर युनिट सुरु राहिले नाही तर काय करणार आहात? 5 वर्षाची सवलत देत असताना किमान 10 वर्षे उद्योग चालविला पाहिजे. 7 वर्षाची सवलत देत असताना किमान 14 वर्षे व 10 वर्षाची सवलत देत असताना किमान 20 वर्षे उद्योग चालविला पाहिजे. केवळ सवलत घ्यायची आणि उद्योग बंद करायचा असा अनुभव यापूर्वी उद्योगांच्या बाबतीत आलेला आहे. उद्योग क्षेत्रात सवलती दिल्या जातात. परंतु कालांतराने सवलत बंद झाली की तो उद्योगही बंद पडतो. त्याचा फटका राज्याला बसतो. ते विचारात घेऊन पर्यटन घटकातील उद्योग किमान काही काळ निश्चितपणे चालावा या हेतूने या अटी घालण्यात आल्या आहेत. जर त्यांनी विहित कालावधीत हा उद्योग सुरु ठेवला नाही तर कार्यान्वित झालेल्या दिनांकापासून देय करमणूक शुल्काची दंडनीय व्याजासहित वसुली करण्याची मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, 1923 मध्ये तरतूद आहे. त्यामुळे उद्योग बंद झाला तर पुढे काय होईल याची भीती बाळगण्याचे कारण नाही. अधिनियमामध्ये त्यादृष्टीने तरतूद केलेली आहे. त्यानुसार निश्चितपणे योग्य ती कारवाई केली जाईल. सेवा शुल्क तिकिटावर आकारले जाणार आहे. 3 रुपयांपासून 5 रुपयांपर्यंत आणि 4 रुपयांपासून 6 रुपयांपर्यंत सेवाशुल्क आकारले जाणार आहे. प्रेक्षकांकडून जे सेवाशुल्क आकारले जाणार आहे त्या रक्कमेचा वापर प्रेक्षकांच्या सेवा सुविधांसाठी करावयाचा आहे. ती रक्कम उत्पन्न म्हणून दुसरीकडे वापरता येणार नाही. प्रेक्षकांसाठी चांगल्या पध्दतीची टॉयलेट्स बांधली जावीत. इतर सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके.....

असे बंधन घालण्यात आले आहे. मल्टिप्लेक्सच्या संदर्भात तक्रारी करण्यात आल्या आहेत. प्रेक्षकांची भरमसाठ लूट केली जाते. निश्चितपणे याबाबत काय सुधारणा करता येतील याचा महसूल विभाग जरुर विचार करेल. सॅटेलाईटमार्फत जी तिकीट विक्री केली जाते त्या संदर्भात 50 पैसे सेवा आकार घेण्याची तरतूद केली आहे. यामागील उद्देश हाच आहे की, या माध्यमातून करमणूक कर बुडविता येणार नाही. आज इंटरनेटच्या माध्यमातून तिकिटे काढण्याचे प्रमाण वाढत आहे. सिनेमा थिएटर मालकांकडून करमणूक शुल्क बुडविले जात होते त्याला आता आळा बसणार आहे. शिवाय इंटरनेटच्या माध्यमातून तिकिटे काढली जावीत या संदर्भात प्रोत्साहन देण्यासाठी 50 पैसे सेवा आकार घेण्यासाठी परवानगी दिली आहे. त्या माध्यमातून शासनाला अधिक उत्पन्न मिळावे हाच हेतू यामागे आहे.

(नंतर श्री.खर्चे....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके .....

सन्माननीय सदस्य सर्वश्री. राजन तेली, जयंत पाटील तसेच डॉ. नीलम गोऱ्हे यांनी प्रामुख्याने सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पर्यटनासंबंधी उल्लेख केला. राज्यामध्ये एकमेव पर्यटन जिल्हा म्हणून सिंधुदुर्ग जिल्हा शासनाने जाहीर केलेला आहे. या जिल्ह्यातील जी नैसर्गिक साधनसंपत्ती आहे त्याचा उपयोग करुन पर्यटनाच्या दृष्टीने उत्कृष्ट काम या जिल्ह्यात होऊ शकते याचीही शासनाला जाणीव आहे. मी सभागृहाला ग्वाही देतो की, सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या बाबतीत पर्यटनाला कोणत्या सवलती देता येतील जेणेकरुन तो एक आदर्श पर्यटन जिल्हा म्हणून उदयास यावा व त्यासाठी कशा पध्दतीने सवलती देण्याची गरज आहे याचाही शासनाच्या माध्यमातून विचार केला जाईल. त्याचबरोबर जे कार्यक्रम प्रायोजित केले जातात त्यात साहित्य, भावगीते आणि कविता याचाही उल्लेख येथे करण्यात आला व काही मौलिक सूचना सन्माननीय सदस्यांनी केल्या आहेत. त्या सर्व सुचनांचा विचार यासंबंधीचे नियम तयार करताना करण्यात येईल अशी मी ग्वाही देतो आणि हे अतिशय चांगले विधेयक असल्याने त्याला एकमताने पाठिंबा देऊन संमत करावे अशी मी सभागृहाला विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती (श्री. जयप्रकाश छाजेड) : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 4 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2009 चे वि.स.वि. क्रमांक-17, संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती : सन 2009 चे वि.स.वि.क्रमांक 17 संमत झाले आहे.

--- ...2 क्यू

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा
मु.शी. :राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभारप्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा

तालिका सभापती :सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी आपला प्रस्ताव मांडावा.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, आज अशासकीय कामकाज घेतले जाणार आहे का ?

तालिका सभापती : होय, माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणासाठी आज अडीच तासाचा वेळ देण्यात आलेला असून त्यानंतर अशासकीय कामकाज घेतले जाईल. आता माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर आपले विचार मांडावेत.

श्री. भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो.

"राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आम्ही या अधिवेशनाकरिता जमलेले विधान परिषदेचे सदस्य, त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो."

सभापती महोदय, माननीय महामहीम राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शन प्रीत्यर्थ या ठिकाणी ठराव मांडलेला होता. त्या ठरावावर मी माझे विचार व्यक्त करण्यासाठी उभा आहे. या अभिभाषणाबद्दल माननीय महामहीम राज्यपालांचे आभार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून सन 2015 पर्यंतच्या म्हणजे पुढील पाच वर्षाकरिता ज्या काही योजना शासनाने हाती घेतलेल्या आहेत त्यांची यशस्वीरित्या अंमलबजाणी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने ब-याच क्षेत्रामध्ये उचललेली जी पावले आहेत त्याचे या ठिकाणी कौतुक करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांचे अभिभाषण पाहिले तर आपल्याला दिसून येईल की, यामध्ये सर्वसामान्य माणसाच्या सुरक्षेचा प्रश्न असेल, कष्ट करणा-या कामगारांचा प्रश्न असेल, शेतकरी बळीराज्याचा प्रश्न असेल, मुंबई सारख्या अंतरराष्ट्रीय शहराचा चेहरा मोह-यात बदल करण्यासाठी विकास कामांच्या काही योजना असतील, या राज्यामध्ये जे शहरीकरण वाढत आहे त्या शहरी करणाला एक विशिष्ट दिशा देण्याच्या योजना असतील अशा अनेक योजनांचा उल्लेख महामहीम राज्यपालांनी आपल्या अभिभाषणात केलेला आहे त्यामुळे सर्व प्रथम मी मनापासून त्यांचे आभार मानतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ D/ MMP/

श्री. भाई जगताप.....

सभापती महोदय, प्रत्येक नागरिकाची सुरक्षा करणे हे शासनाचे पहिले कर्तव्य आहे यामध्ये कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. आज जगभर आतंकवादाची छाया पसरलेली आहे आणि त्यातून भारत आणि आपले राज्यही सुटलेले नाही. काल परवा पुण्यातील जर्मन बेकरीमध्ये जी काही घटना घडली त्या घटनेमध्ये सुध्दा पोलिसांनी सक्षमपणे शोध घेण्याचा पूर्ण प्रयत्न केलेला आहे. प्रश्न हा नाही की, पोलीस यंत्रणा यामध्ये काय करते ?

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप ..

पोलीस यंत्रणा सक्षम करावी लागणार असल्यामुळे त्यासाठी शासनाने प्राधान्य दिलेले आहे. त्याकरिता केवळ पोलीस यंत्रणा सक्षम करण्याची घोषणा न करता पोलीस यंत्रणेसाठी लागणारी आधुनिक शस्त्रास्त्रे, चिलखती वाहने, अत्याधुनिक तंत्रज्ञान इत्यादी बाबी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने राज्य सरकारने ठोस पावले उचलली आहेत.

सभापती महोदय, आज जर आपण पोलीस दलाकडे पाहिले तर आपल्याला असे दिसून येईल की, प्रत्येक बाबतीमध्ये पोलिसांना जबाबदार धरण्यात येते परंतु आज पोलीस दलात संख्याबळ इतके कमी आहे की, ज्यावेळी सुरक्षेचा प्रश्न येतो त्यावेळी पोलीस दल सक्षम असून सुध्दा परिणामकारक कारवाई दृष्टीस पडत नाही. म्हणून राज्य शासनाने 55 हजार अतिरिक्त पदे निर्माण करण्याचा निर्णय घेतला असून त्यापैकी 44 हजार 844 पदे यापूर्वीच भरण्यात आली आहेत.

सभापती महोदय, मी खात्रीपूर्वक सांगू इच्छितो की, सरकारने सुरक्षेच्या बाबतीत काही पावले उचलली आहेत तेव्हा आपण सर्वांनी खुल्या दिलाने त्याचे स्वागत करावयास पाहिजे. सुरक्षेचा विषय हा केवळ राज्यकर्त्यांचा वा विरोधी पक्षाचा असू शकत नाही. राज्यातील प्रत्येक नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न महत्वाचा आहे. त्याचबरोबर आतंकवादाचा प्रश्न आल्यानंतर देशाच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होत असतो. सभापती महोदय, ज्या ज्या वेळी सुरक्षेचा प्रश्न येतो त्या त्या वेळी एका गोष्टीकडे गेल्या अनेक वर्षापासून दुर्लक्ष झाले आहे असा माझा समज आहे. आपल्या राज्यातील नक्षलवाद हा सुध्दा आतंकवादी स्वरुपाचाच एक प्रकार आहे असा मी खालच्या सभागृहाचा सदस्य असतांना अनेकदा उल्लेख केला होता. नक्षलवादाच्या संदर्भात जे काही अलीकडे पुरावे प्राप्त झालेले आहेत त्यातून एक गोष्ट स्पष्ट झालेली आहे की, नक्षलवादी कारवाया करणा-या काही मंडळीचा संबंध आय.एस.आय.शीसुदा आलेला आहे अशा प्रकारचे पुरावे पोलिसांकडे आहेत, हे आपणा सर्वांना ज्ञात आहेच. तेव्हा नक्षलवाद समूळ नष्ट करण्याच्या दृष्टीने देखील राज्य सरकारने ठोस कार्यक्रम हाती घेतला आहे व त्या दृष्टीने काही पावले उचलली आहेत. नक्षलवादाकडे सुध्दा एका वेगळया दृष्टीकोनातून पाहिले पाहिजे याबद्दल माझे दुमत नाही. राज्यातील नक्षलग्रस्त भागातील आणि दुर्गम भागातील तरुणांना रोजगार उपलब्ध होत नाही

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप ..

त्यामुळे तो नक्षलवादाकडे वळत आहे काय ? राज्यातील इतर भागाची जेवढी प्रगती झालेली आहे त्या तुलनेने आपल्या भागाची प्रगती झालेली नाही म्हणून येथील तरुण नक्षलवादाकडे वळत आहेत काय या दृष्टीने देखील राज्य सरकारने विचार केलेला आहे.

(सभापती स्थानी माननीय उप सभापती)

सभापती महोदय, नक्षलवाद नाहीसा करण्याच्या दृष्टीने राज्य सरकारने काही ठोस निर्णय घेतलेले आहेत. गडचिरोली येथे स्वतंत्र पोलीस परिक्षेत्र निर्माण करण्याचा निर्णय घेऊन निरनिराळया दर्जाची 2 हजार 355 नवीन पदे निर्माण करण्यात आलेली आहेत. अशा प्रकारे नक्षलवादाशी सक्षमपणे सामना करण्याची भूमिका राज्य सरकारने घेतलेली आहे.राज्य सरकारच्या या धोरणाचे मी स्वागत करतो. नक्षलवादी विभागासाठी एक वेगळे पॅकेज शासनाने दिले असून तेथील तरुणांना शिक्षण वा प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम घेण्यात आला आहे तसेच त्यांना रोजगार उपलब्ध करुन देण्याची योजना सुरु करण्यात आली आहे. केवळ त्याकडे लक्ष न देता या संदर्भात विशेष पॅकेज जाहीर केले असून अशा प्रकारे नक्षलवाद वाढू नये यासाठी प्रयत्न करण्यात आले असून नक्षलवादी भागाकडे किंवा नक्षलवादी चळवळीकडे राज्यातील तरुणांनी किंवा तरुणींनी आकर्षित होऊ नये म्हणून राज्य सरकारने प्रयत्न केलेले आहेत त्याचे आपण सर्वानी स्वागत केले पाहिजे .

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. भाई जगताप...

सभापती महोदय, अलिकडच्या काळात आपण पाहिलेतर निसर्ग आपल्यावर कोपला आहे की काय? अशाप्रकारचा संभ्रम सर्वांच्या मनामध्ये तयार झाला आहे. ही परिस्थिती जगभर जरी असली तरी भारत देशामध्ये जरा जास्त आहे. कधी अजिबात पाऊस पडत नाही, कधी जास्त पाऊस पडतो त्यामध्ये अनेक लोकांची जीवितहानी, वित्तहानी होते, कधी अवकाळी पाऊस पडल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते. कधी फयानसारखे जीवघेणे चक्रीवादळ येते. देशामध्ये सर्वात जास्त 700 कि.मी. लांब असलेला समुद्र किनारा कोकणाला लाभला आहे. त्या समुद्र किनाऱ्यावर राहणारे आणि मासेमारी करुन आपली उपजीविका करणाऱ्या कोळी बांधवांचे संसार फयानच्या वादळामुळे नष्ट झाले. त्या वादळामध्ये मोठया प्रमाणावर जीवितहानी झाली. त्यानंतर शासनाने कोळी बांधवांना त्यांचे उपजीविकेचे साधन मोफत पुरविण्याचा कार्यक्रम हाती घेतला. इतकेच नव्हे तर तो त्यांच्यापर्यंत पोहोचविण्याचे काम केले. जेणेकरुन ज्यांची जीवितहानी झालेली आहे, त्यांना आपला व्यवसाय पुन्हा उभा करता येणार नाही, ज्यांचा रोजगार बुडाला आहे त्यांच्यासाठी उपजीविकेची यंत्रणा देऊन त्यांना सक्षम करण्याचे काम शासनाने केले आहे.

सभापती महोदय, या सभागृहामध्ये शेतकऱ्यांच्या प्रश्नासंबंधी नेहमी चर्चा होते, ती झाली पाहिजे. त्या प्रश्नाच्या बाबतीत दोन्ही बाजूकडील आम्ही माननीय सदस्य फार संवेदनशील आहोत. त्या विषयावर आम्ही नेहमी कळकळीने बोलत असतो. आपण पाहिले आहे की, या शासनाने 72 हजार कोटींच्या कर्जमाफीचा ऐतिहासिक निर्णय या देशाला स्वातंत्र्य मिळून 62 वर्षे झाल्यानंतर पहिल्यांदाच घेतला. 72 हजार कोटींची बळीराजाची कर्जमाफी केंद्र शासनाने मान्य केली नव्हे तर ती प्रत्यक्षात त्यांना देण्यात आली. एवढेच नव्हेतर या कर्जमाफीचा फायदा काही विशिष्ट शेतकऱ्यांना होत असल्याचे लक्षात आल्यानंतर व अल्पभूधारक शेतकऱ्यांना त्याचा फायदा होत नाही असे वाटल्यानंतर शासनाने आणखी 6 हजार कोटींच्या पॅकेजची मदत करण्याचा निर्णय घेतला. आणि या बळीराजाला न्याय देण्याचा प्रयत्न केला.

सभापती महोदय, सन 2009-2010 मध्ये या राज्यातील जवळ जवळ 221 तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती शासनाने जाहीर केली. ही दुष्काळी परिस्थिती हाताळण्यासाठी शासनाने एक स्वतंत्र पॅकेज जाहीर केले व ते यशस्वीपणे राबविण्यात शासनाने यश प्राप्त केले. जवळ जवळ 25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ D/

श्री. भाई जगताप...

अवर्षणप्रवण जिल्हयामध्ये शेततळयांचा विकास करण्याचे काम शासनाने हाती घेतले. आणि जवळ जवळ 37 हजार 500 शेतमळे विविध उपक्रमाच्या माध्यमातून पूर्ण केले. आणि अजूनही 27 हजार शेततळे बांधण्याचे काम प्रगतिपथावर आहे. आपल्या बळीराजाला स्वत:च्या पायावर उभे करण्यासाठी, त्याला सक्षम करण्यासाठी आणि पाऊस न पडल्यामुळे त्याला ज्या यातना सहन कराव्या लागत आहेत, ज्या विवंचनेतून तो जात आहे, आणि मग नाईलाजास्त त्याच्या मनामध्ये आत्महत्त्येचे विचार येत आहेत ते थांबविण्यासाठी शासनाने हा अतिशय चांगला कार्यक्रम हाती घेतला आहे.सभापती महोदय, शासनाने रोजगार हमी योजनेंतर्गत प्रत्येक तालुक्यात 200 शेततळी बांधण्याचा कार्यक्रम हाती घेतला आहे.

त्याचप्रमाणे माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणामध्ये आणखी एक महत्वाची गोष्ट आपणासमोर ठेवली आहे. आगामी वर्षात 129 विशाल पाणलोटक्षेत्र प्रकल्प विकसित करण्याचा कार्यक्रम हाती घेऊन पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम अंमलात आणला जाणार आहे. त्या माध्यमातून जवळ जवळ 24.86 लाख हेक्टर इतके क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप .....

त्यामध्ये प्रत्येक कामगाराला त्याचा पगार चेकने मिळाला पाहिजे, त्यांची पिळवणूक थांबावी यासाठी शासनाने तसा निर्णय घेतला. त्याबद्दल मी शासनाचे आभार मानतो आणि काही सूचना सुध्दा करतो. घरेलू कामगारांचे प्रश्न आहेत तसेच शेतमजुरांचे प्रश्न आहेत. एक गोष्ट नाकारता येणार नाही की, संघटित कामगारांसाठी देशामध्ये 100 पेक्षा जास्त कायदे आहेत. संघटित कामगार 16 टक्के होते ती संख्या आता 7 टक्के झालेली आहे. उरलेले 93 टक्के असंघटित कामगार आहेत. त्यांच्यासाठी कोणताही कायदा नाही. अलीकडे आपण त्यांच्यासाठी कायद्याचे गठन करीत आहोत. घरेलू कामगारांसाठी, असंघटित कामगारांसाठी आपण काही करीत आहोत. घरेलू कामगारांसाठी मागच्या अधिवेशनामध्ये कायदा केला. केंद्राचा सुध्दा कायदा आहे. या कामगारांसाठी बोर्डाची संकल्पना मांडली. तशा प्रकारचे बोर्ड तयार करण्याचा जो विचार आहे त्या बोर्डाचे तात्काळ गठन व्हावे. नुसते बोर्ड नको तर त्या बोर्डाला स्वायत्त अधिकार द्यावा. त्या घटकांच्या बाबतीत सगळ्या गोष्टी तपासून घेऊन त्यांना मदत करण्यासाठी कायदा करण्याच्या दृष्टीने बोर्डाला सक्षम करावे लागेल.

सभापती महोदय, आपण या ठिकाणी मुंबईचे प्रश्न मांडतो. मुंबईच्या सगळ्या इन्फ्रॉस्ट्रक्चरच्या गोष्टी करतो. रेल्वे ही मुंबईची लाईफ लाईन आहे. आपल्या लक्षात येईल की, सध्या एका ट्रेनमध्ये पाच ते साडेपाच हजार प्रवासी लटकून प्रवास करीत असतात. त्यांच्यासाठी काही तरी करणे गरजेचे होते. सरकारने त्याबाबत विचार करुन मेट्रो रेल्वे असेल, मोनो रेल्वे असेल त्याच्या संदर्भात काम सुरु केले. आपणा सगळ्यांना अभिमान वाटावयास पाहिजे की, या वर्षीच्या प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी देशातील पहिली मोनोरेल मुंबईमध्ये धावली. हा मान आपल्या राज्याला मिळाला ही आपणा सगळ्यांसाठी अभिमानास्पद बाब आहे. हे सगळे प्रकल्प मग मेट्रो रेल्वे असेल, मोनोरेल असेल हे प्रकल्प सन 2012 पर्यंत पूर्ण करुन प्रवाशांची जी हेळसांड होत आहे, त्यांची जी असुविधा होत आहे त्यांना नक्की सुविधा प्राप्त होऊन त्यांना दिलासा मिळेल.

सभापती महोदय, विजेच्या प्रश्नाच्या संदर्भात आपण अनेक वेळा भाषणे एकतो की, आम्ही भारनियमन मुक्त महाराष्ट्र करणार. वेळेअभावी मी या विषयाच्या फार खोलात जाणार नाही. याबाबतीत अनेक गोष्टी बोलण्यासारख्या आहेत. माझे अनेक सहकारी सुध्दा त्यासंदर्भात बोलतील. परंतु मी एवढे मात्र निश्चितपणे सांगू इच्छितो की, वीज निर्मिती ही 24 तासामध्ये तयार होणारी

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. भाई जगताप .....

बाब नाही किंवा 24 महिन्यामध्ये तयार होणारी बाब नाही. वीज निर्मिती ही कंटीन्युअस प्रोसेस आहे. ही वर्षानुवर्षे चालणारी प्रोसेस आहे. शासनाने विविध उपक्रमातून 10 हजार मेगावॅट वीज निर्मिती करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यामध्ये पब्लीक प्रायव्हेट पार्टिसिपेशन मधील उपक्रम आहेत जेणेकरुन सन 2012 पर्यंत राज्य भारनियमनमुक्त होऊ शकेल. याबाबतीत एकेकाळी आपले वैभव होते की आपण तीन राज्यांना वीज देत होतो. आता आपल्याला त्यांच्याकडे पहावे लागते. ही वेळ या राज्यावर राहणार नाही असे मला नम्रपणे सांगावेसे वाटते.

जाता जाता एका गोष्टीचा मुद्दाम उल्लेख करीन. मघाशी एका विधेयकाच्या बाबतीत बोलत असताना अनेक सन्माननीय सदस्य बोलले. सन्माननीय सदस्य डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी सुध्दा अगदी मनापासून पोटतिडिकीने भाषण केले. त्यांनी सांस्कृतिक धोरणाबाबतचा उल्लेख केला. हे खरे आहे की, या राज्याची एक विशिष्ट संस्कृती आहे. राज्याचे सांस्कृतिक धोरण असावे ही बाब आपणा सगळ्यांना प्रेरणा देणारी आहे. हे धोरण फक्त मंत्र्यांनीच मंथन करुन तयार केलेले नाही किंवा फक्त सत्तेत असलेल्या आमदारांनीच बसून तयार केलेले नाही तर त्यासंदर्भात साहित्यिकांकडून, सर्वसंबंधितांकडून सूचना मागविलेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी यासंदर्भात जो मुद्दा उपस्थित केला त्याला मी जोरदार पाठिंबा देईन. या प्रक्रियेमध्ये विरोधी बाकांवरील सदस्यांकडून सुध्दा सूचना घेण्यास काहीच हरकत नाही.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, या ठिकाणी फक्त प्रस्ताव तयार केलेला आहे. तो अजून फायनल झालेला नाही. ज्यांना सूचना करावयाच्या असतील जे आजही करीत आहेत.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, साहित्य संमेलन पुण्याला होत आहे. त्यामुळे मी महाराष्ट्र साहित्य परिषदेला भेट देऊन या परिषदेच्या पदाधिका-यांना असे विचारले होते की, शासनाने सांस्कृतिक धोरणाच्या संदर्भात परिषदेच्या पदाधिका-यांबरोबर चर्चा केली आहे काय ? याबाबत त्या पदाधिका-यांनी असे म्हटले आहे की, शासनाने आमच्याबरोबर यासंबंधी कन्सल्ट केलेले नाही.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, राज्याचे सांस्कृतिक धोरण राज्याच्या निर्मितीच्या दिवशी म्हणजे दिनांक 1 मे, 2010 रोजी जाहीर करण्याचा शासनाचा मानस आहे. त्याला अजून अडीच महिन्याचा कालावधी आहे. त्यामुळे सांस्कृतिक धोरणासंबंधी कोणीही सूचना देऊ शकतो. त्यासाठी कसलेही बंधन असता कामा नये. राज्यातील सांस्कृतिक धोरणाचा हा विषय आहे, राज्यातील शेतकरी, कष्टक-यांचा, कामगारांचा प्रश्न असेल, सर्वसामान्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न असेल या सर्व प्रश्नांसंबंधी महामहिम राज्यपालांनी आपल्या अभिभाषणामध्ये उल्लेख केलेला आहे. त्यांनी पुढील पाच वर्षाचा रोड मॅप सुस्पष्ट रितीने मांडलेला आहे. त्या पध्दतीने चालण्याचे सरकारचे धोरण आहे. त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो, या अभिभाषणाचे समर्थन करतो आणि आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपलेही आभार मानतो आणि येथेच थांबतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

उपसभापती : मी सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा संध्याकाळी 5.45 वाजेपर्यंत होईल. मी मघाशी म्हटल्याप्रमाणे या विषयावर अजून 30 ते 35 सन्माननीय सदस्यांना आपले विचार व्यक्त करावयाचे आहेत. त्यामुळे प्रत्येक वक्त्यांनी आपला मुद्दा मोजक्या शब्दात मांडावा आणि मला सहकार्य करावे अशी मी विनंती करतो.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ D/

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याचे महामहीम राज्यपाल यांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल त्यांचे आभार मानण्याचा जो प्रस्ताव सभागृहात मांडण्यात आलेला आहे त्याला अनुमोदन देण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीच्या सुवर्ण महोत्सवाचे औचित्य साधून 2015 पर्यंत अनेक कल्याणकारी योजनांची पूर्तता करण्याचा संकल्प राज्यपालांनी मांडलेला आहे. या योजनांची यशस्वीपणे अंमलबजावणी करण्यासाठी मसुदा तयार केलेला आहे. तो पाहिल्यानंतर असे लक्षात येते की, जगामध्ये आर्थिक प्रगतीच्या दृष्टीने वेगाने जात असलेला आपला भारत देश आणि या भारत देशात सर्वात वेगात आपले राज्य प्रगती करीत आहे. माननीय राज्यपालांनी अभिभाषणात सांगितल्याप्रमाणे या राज्यातील सामाजिक स्थिती, कायदा व सुव्यवस्था चांगल्या प्रकारे कार्यरत आहे. हे सांगत असताना मला काही महत्वाच्या सूचना कराव्याच्या आहेत. कायदा व सुव्यवस्थेवर बोलत असताना मी असे म्हणेन की, राज्यात दहशतवादी हल्ले झाले, अतिरेक्यांनी हल्ले केले, नक्षलवाद्यांनी हल्ले केले या सर्वांना सामोरे जात असताना, सर्व परिस्थितीचा सामना करीत असताना अतिरेक्यांना पाठिंबा देणारे देश असतील किंवा संघटना असतील त्यांना उघडे करण्यामध्ये आपण यशस्वी झालेलो आहोत.

यानंतर श्री.ओटवणेकर.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. रमेश शेंडगे....

कोणताही अतिरेकी हल्ला असेल, भ्याड हल्ला असेल, त्या हल्ल्याला समर्थपणे परतवून लावण्याचे सामर्थ्य या महाराष्ट्रामध्ये आणि देशामध्ये आहे. दहशतवादाशी सामना करीत असताना आपले अनेक पोलीस अधिकारी आणि कर्मचारी छातीवर गोळया झेलून शहीद झालेले आहेत. ही बाब लक्षात घेता पोलीस दलाच्या, पोलीस कर्मचा-यांच्या समस्यांकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे. ग्रामीण भागामध्ये पोलीस ठाण्याची इमारत बांधण्याबाबत, पोलिसांच्या वसाहतीतील गैरसोयी दूर करण्याबाबत वारंवार मागणी होत असते. त्याकडे शासनाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, ग्लोबल वॉर्मिंगमुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडत चालले आहे. राज्याला फयान सारख्या मोठ्या वादळाचा सामना करावा लागला. या वादळामध्ये, नैसर्गिक आपत्तीमध्ये ज्यांचे नुकसान झाले त्यांना जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी शासनाने तात्काळ उपाययोजना केल्या.

या राज्यामध्ये जसा सिंचन झालेला प्रगत भाग आहे त्याप्रमाणे कायम दुष्काळी भाग देखील आहे. या दुष्काळी भागातील 221 तालुक्यासाठी स्वतंत्र पॅकेज जाहीर करुन 2009-2010मधील पीक कर्जाची वसुली शासनाने थांबविलेली आहे. 25 अवर्षणग्रस्त तालुक्यातील शेतक-यांचा विकास करण्यासाठी त्यांना सोईसुविधा उपलब्ध करुन देण्याच्या बाबतीत उपाययोजना केल्या गेल्या आहेत. 37,500 शेततळी बांधून पूर्ण झाली असून 27,000 शेततळयांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत प्रत्येक तालुक्यामध्ये अधिकची 200 शेततळी बांधण्याची योजना सुरु केलेली आहे. ग्लोबल वॉर्मिंगमुळे पर्यावरणामध्ये होत असलेल्या बदलामुळे अवेळी पाऊस पडणे, अवर्षणग्रस्तता वाढणे यासारख्या अनिष्ट गोष्टी घडत आहेत. अशा परिस्थितीमध्ये दुष्काळी भागातील ज्या भागाला पिण्यासाठी पाणी मिळत नाही तेथील लोक पिण्यासाठी, सिंचनासाठी पाण्याची पिढ्यान पिढया मागणी करीत आहेत. मागील 50-60 वर्षामध्ये ज्या ओढे आणि नदीनाल्यांना कुणी पाणी पाहिलेले नाही त्या ओढयांना, नदीनाल्यांना अवकाळी पावसामुळे पूर आलेले आहेत. कवठे-महांकाळ, आटपाडी, सांगली, मिरजेचा पूर्वेकडील भाग या ठिकाणी नदी-नाल्यांना मोठे पूर आलेले आम्ही पाहिलेले आहेत. शासनाने राज्यामध्ये 129 सिंचन पाणलोटक्षेत्र विकसित केलेली आहेत.त्यामुळे 24लाख 46हजार हेक्टर क्षेत्र विकसित होणार आहे.केन्द्र पुरस्कृत

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे..

एकात्मिक पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत नाबार्डचे अर्थसहाय्य घेऊन पाणलोट क्षेत्र विकसित करण्यात येणार आहेत. मला या निमित्ताने शासनाला विनंती करावयाची आहे की, जो कायम दुष्काळी भाग आहे त्या भागातील जनता नैसर्गिक आपत्तींना तोंड देत कसा तरी आपला उदरनिर्वाह करीत आहे. देशातील इतर राज्यांमध्ये 97-98 टक्के क्षेत्र सिंचनाखाली आलेले आहे तर आपल्या राज्यामध्ये सिंचनाखालील क्षेत्र फक्त 16 ते 17 टक्के आहे. मला या निमित्ताने शासनाला विनंती करावयाची आहे की, सर्व राज्यामध्ये समान सिंचन झाले पाहिजे या तत्वाच्या आधारे आपल्या राज्यासाठी जास्तीत जास्त निधी मिळण्यासाठी केन्द्राकडे पाठपुरवा करावा. तालुका हा घटक मानून सिंचनाची कामे पूर्ण करावीत. असे केले तरच या राज्यातील कायम दुष्काळी भागाचा विकास होऊ शकेल असे मला वाटते.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे.....

आज या दुष्काळी भागामध्ये कृष्णा खोरे असेल, ताकारी म्हैसाळ किंवा टेंभू योजना असेल या योजनांच्या माध्यमातून या दुष्काळी भागाला पाणी मिळण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. या योजनांसाठी चांगल्याप्रकारे निधी दिला गेला तर पिढ्यान्पिढ्या पाण्यासाठी वंचित राहिलेल्या या भागातील शेतीला आणि प्यायला पाणी मिळाल्यानंतर त्यांचा चांगल्याप्रकारे विकास होईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य निधीची मागणी करीत आहेत. मागणी विरोधी पक्षाकडून केली जाते. सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी सन्माननीय राज्यपालांचे अभिभाषणाबद्दल अभिनंदन करावयाचे आहे.

श्री.रमेश शेंडगे : अभिनंदन करीत असताना मी सूचना करु शकतो. सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांचे त्यांच्या अभिभाषणाबद्दल अभिनंदन करीत असताना मला मुद्दाम नमूद करावेसे वाटते की, रोजगार हमी योजनेंतर्गत फक्त 66 रुपये मजुरी दिली जात होती. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप याठिकाणी उपस्थित आहेत. ते कामगार नेते असल्यामुळे 10 ते 20 टक्के पगार वाढवून द्यायचा झाला तर किती हालअपेष्टा सहन कराव्या लागतात याची त्यांना कल्पना आहे. परंतु राज्य सरकारने मजुरीमध्ये 50 टक्क्यापेक्षा जास्त वाढ केली. मजुरीमध्ये 66 रुपयांवरुन 100 रुपयांपर्यंत वाढ केली आहे ही अभिनंदनीय गोष्ट आहे. त्याचा फायदा 15 लाख मजुरांना होणार आहे. अल्पभूधारक शेती किफायतशीर व्हावी. कोकणामध्ये मोठया प्रमाणात अल्पभूधारक शेतकरी आहेत. त्यांचा विचार करुन अधिकाधिक योजना राबविण्याचे शासनाने ठरविले आहे. माहिती व तंत्रज्ञानाचा अधिक वापर, कंत्राटी शेती पध्दती, कृषि आधारित प्रकल्प, आंतरराष्ट्रीय कृषि विकास निधीच्या सहयोगाने विदर्भातील सहा आपद्ग्रस्त जिल्हयांसाठी महाराष्ट्र समन्वित कृषि विकास प्रकल्प 596 कोटी रुपये खर्च करुन राबविण्याचे ठरविले आहे. अल्प व्याज दराने कृषि कर्ज देत असताना 25 हजार रुपयांपर्यंत पीक कर्ज बिनव्याजी मिळणार आहे. या कर्जाची चांगल्याप्रकारे परतफेड केल्यानंतर 25 हजारापासून 3 लाखापर्यंतच्या कर्जावर 2 टक्के व्याजदर आकारला जाणार आहे. पशुसंवर्धन क्षेत्रात 6 टक्के विकास दर गाठण्याचे ठरविले आहे. हा विकास दर गाठत असताना दूध उत्पादन, मांस, दूध, अंडी यांच्या वाढीसाठी अधिकाधिक योजना राबविण्याचे ठरविले आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करु इच्छितो. पशुसंवर्धनाचा विचार करीत असताना राज्यामध्ये जो मेंढपाळ वर्ग आहे,

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे.....

जो शेळी मेंढी राखण्याचे काम करतो त्यांच्या विकासाकडे प्रामुख्याने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. राज्यामध्ये 33 लाख मेंढ्या व 109 लाख शेळ्या आहेत. हा दुर्लक्षित राहिलेला विभाग आहे. राज्याचे शेळीमेंढी विकास महामंडळ आहे. शेळीच्या दुधाबाबत मी अगोदरच बोललेलो आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी शेळीचे दूध प्यायला सुरुवात केल्यामुळे त्यांच्या शरीराची प्रतिकारशक्ती वाढत आहे. म्हणून मला सांगावयाचे आहे की, शेळीचे दूध पिता, शेळीचे मांस खाता, त्यांच्या विकासासाठी चांगल्याप्रकारे लक्ष दिले पाहिजे. योग्य प्रमाणात निधी देण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

सभापती महोदय, पडिक जमीन या राज्यामध्ये मोठया प्रमाणात आहे. या पडिक जमिनी शेळी मेंढ्यांच्या चराऊ कुरणासाठी देण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. त्याचप्रमाणे या विभागाला कृषि पूरक उद्योगाचा दर्जा देण्याचे सन्माननीय मंत्रीमहोदयांनी यापूर्वीच मान्य केले आहे. त्यासाठी पाठपुरावा होणे गरजेचे आहे. मागील बजेटमध्ये 2.31 कोटी रुपये मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत शेळीमेंढी विकास महामंडळाला देण्यात आले होते. मंत्रिमंडळाने मान्यता दिली होती. बजेटमध्ये मान्यता मिळाली. परंतु काही अधिकाऱ्यांच्या आडमुठया धोरणामुळे 2.31 कोटी रुपये अद्याप मिळालेले नाहीत. राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत 5 कोटी रुपये मंजूर होऊन वर्ग करण्यात आले.....

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / शीघ्रलेखाची नाही

श्री. रमेश शेंडगे .....

पण अधिकाऱ्यांच्या आडमुठ्ठेपणाच्या धोरणामुळे हा निधी वापरता येत नाही. सरकार चांगल्या प्रकारे काम करीत असताना दुसऱ्या बाजूला मात्र अधिकाऱ्यांच्या मनमानीपणामुळे काही योजना राबविता येत नसतील तर त्याकडे लक्ष द्यावे लागणार आहे. राज्यात 6399 कोटी रुपये खर्च करुन अतिरिक्त सिंचन क्षमता वाढविण्यात आली ही अभिमानास्पद बाब आहे. औद्योगिक क्षेत्रात सुध्दा सन 2010 पर्यंत 169 उद्योग निर्मितीचा संकल्प शासनाने केला. सन 2012 पर्यंत राज्य भारनियमनातून मुक्त करण्याचा शासन प्रयत्न करणार आहे ही देखील आनंदाची गोष्ट आहे. कामगारांच्या हिताच्या दृष्टीने सुध्दा अनेक योजना राबवित असताना राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजनेअंतर्गत बीपीएलच्या 14 लाख कुटुंबांना दरवर्षी 30 हजार रुपये इतके विमा संरक्षण मिळत राहील अशी योजना शासनाने आखली ही सुध्दा आनंदाची बाब आहे. मुंबईचे शांघाय करावयाचे तसेच मुंबईला आंतरराष्ट्रीय शहराचा दर्जा प्राप्त व्हावा यासाठी शासन प्रयत्नशील आहे. मुंबईची शांघायशी तुलना करीत असताना तसेच मुंबई शहरासाठी 60 हजार कोटी रुपये इतका निधी खर्च होत असताना काही दृष्टींनी शांघायचे मुंबई करावे अशी चर्चा सुध्दा भविष्यात होण्याची शक्यता आहे म्हणून मला अभिनंदन करावयाचे आहे. मुंबई शहराला आंतरराष्ट्रीय दर्जा मिळण्यासाठी वेगवेगळ्या योजना शासन राबवित आहे. तीर्थक्षेत्रांचा विकास करण्यासाठी सुध्दा 1357 कोटीच्या योजना तुळजापूर, पंढरपूर, भंडारा डोंगर, देहू-आळंदी तसेच शेगांवसारख्या ठिकाणी ही विकासाची कामे करण्याचे ठरविले आहे. पण त्याबरोबरच इतर तीर्थांचाही विकास करण्याची गरज आहे, असे मला वाटते. या सर्व बाबींकडे पाहत असताना महत्वाचे म्हणजे फुले-आंबेडकरांच्या विचाराने काम करीत असताना एससी, एसटी, ओबीसी तसेच एसबीसी या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी 1700 कोटी रुपये देण्याचे शासनाने ठरविले आहे व त्याचा फायदा 10 लाख विद्यार्थ्यांना होणार आहे ही अतिशय चांगली गोष्ट आहे. अल्पसंख्यांकांच्या बाबतीत देखील माननीय राज्यपालांनी सांगितल्याप्रमाणे सच्चर समितीच्या शिफारशींच्या माध्यमातून राज्यातील अल्पसंख्यांकांचे कल्याण व विकास करण्यासाठी अनेक प्रभावी पावले उचलली जात आहेत, याचा मला अत्यंत आनंद होत आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाकडे पाहिल्यानंतर सन 2015 पर्यंत गाठावयाच्या उद्दिष्टांची पुर्तता करावयाची असेल तर

====2====

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे .....

पुढील काही दशकांचा विचार करता या राज्यात काम करीत असताना राज्यातील जनता याच शासनाला पसंती दिल्याशिवाय राहणार नाही. असा विश्वास व्यक्त करीत असताना अशा प्रकारच्या योजना माननीय राज्यपालांनी सुचविल्याप्रमाणे प्रदर्शित होत असताना हे राज्य देशात सर्वात अधिक प्रगती करणारे, देशात अग्रेसर असे राज्य उदयास आल्याशिवाय राहणार नाही एवढीच आशा या निमित्ताने व्यक्त करतो आणि पुन्हा एकदा अभिनंदनाचा जो ठराव मांडला आहे त्या ठरावाला अनुमोदन देतो व मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपल्यालाही धन्यवाद देऊन माझे भाषण पूर्ण करतो. जय हिंद.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, 18 मार्च रोजी होणाऱ्या अधिवेशनाची सुरुवात महामहीम राज्यपालांच्या अभिभाषणाने झाली. माननीय राज्यपालांचे अभिभाषण खरे म्हणजे या राज्याला कुठल्या दिशेने जावयाचे आहे, राज्य कोणत्या मार्गाने जाणार आहे याचे प्रतिबिंब त्या अभिभाषणात असते. परंतु हे अभिभाषण ऐकल्यानंतर तसेच माझ्या हातात त्याची प्रत मिळाल्यानंतर मी एकदा नव्हे तर पाच वेळा हे पुस्तक वाचले, खेदाची बाब अशी आहे की, सर्व विषयाला त्यात स्पर्श करण्यात आला परंतु सर्वसामान्य माणूस जो आज महागाईत होरपळत आहे, महागाईने देशात उच्चांक गाठलेला आहे .....

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

महागाई कमी करण्यासाठी राज्य शासन काय उपाययोजना करणार आहे यासंदर्भात एक अक्षर सुध्दा माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात लिहिले गेलेले नाही. त्यामुळे आम्ही माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाचे कसे काय अभिनंदन करावयाचे, कसे काय कौतुक करावयाचे? या महाराष्ट्रातील सर्व सामान्य माणूस जो रांजलेला आहे, गांजलेला आहे, गरीब आहे, आदिवासी आहे, मागासलेला आहे आणि असे असतांना शाहू, फुले आणि आंबेडकरांचे नाव घेऊन राज्याच्या गोरगरीब जनतेच्या तोंडातील घास तोंडात जात नाही याचा साधा उल्लेखही माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात घेतला गेलेला नाही. त्यामुळे आम्ही माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाचे कौतुक कसे काय करावयाचे ?

सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात आपण मोठया कौतुकाने सांगितले आहे की, रोजगार हमी योजनेच्या कामावर जाणा-या कामगाराची रोजंदारी 62 रुपयांवरुन 100 रुपये करण्यात आलेली आहे. आपण केवळ रोजगार हमी योजनेच्या कामगाराच्या वरच्या खिशात 100 रुपयांची नोट टाकली परंतु त्याच्या खालच्या खिशाला कात्री लावली आहे. एका बाजूला रोजगार हमी योजनेच्या कामगाराच्या मजुरीत वाढ केल्याची घोषणा करावयाची आणि दुस-या बाजूला महागाईच्या मुद्यावरुन सामान्य जनतेला हैराण करुन टाकावयाचे असा विरोधाभास माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात आहे.

सभापती महोदय, सामान्य जनतेला आवश्यक असलेले अन्नधान्य, डाळी, खाद्यतेल, गॅस, भाजीपाला अशा कुठल्याच वस्तू आता या राज्यात स्वस्त राहिलेल्या नाहीत.

सभापती महोदय, विदर्भातील शेतकरी आजही आत्महत्या करीत आहेत. अगोदर शेतकरी विष घेऊन आत्महत्या करीत होते परंतु फवारणीसाठी जे एंड्रीन वापरले जाते ते सुध्दा 2000 रुपये लिटर या दराने मिळत असल्यामुळे शेतकरी गळफास लावून आत्महत्या करीत आहेत. त्यामुळे या राज्यात विष सुध्दा स्वस्त राहलेले नाही हे सिध्द होते. इतक्या प्रचंड प्रमाणात राज्यात महागाई वाढलेली असतांना आम्ही माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाचे कौतुक कसे काय करावयाचे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ...

सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाच्या तिस-या पॅरामध्ये असे म्हटले आहे की, " पुण्यातील जर्मन बेकरी येथे 13 फेबुवारी, 2010 रोजी झालेल्या घटनेत 17 निष्पाप व्यक्ती मृत्युमुखी पडल्या. त्यांना मी श्रध्दांजली अर्पण करतो. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यास जनतेने अत्यंत धीरोदात्तपणे शासन यंत्रणेला सहकार्य केले. मृत व्यक्तीच्या कुटुंबियांना शासनाने तात्काळ मदत केली. तसेच जखमी व्यक्तींना वेळीच अद्ययावत वैद्यकीय उपचार उपलब्ध करुन दिले."

सभापती महोदय, पुण्यातीतल जर्मन बेकरीची घटना घडून एक महिन्याच्यावर काळ उलटून गेलेला असून सुध्दा या घटनेतील आरोपींचा छडा पोलिसांना लागू शकलेला नाही परंतु याबाबीचा उल्लेख माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात करण्यात आलेला नाही. जर्मन बेकरीच्या आधी सेंट्रल आय.बी.ने महाराष्ट्रात घातपाताची शक्यता असल्याची माहिती दिली होती परंतु असे असतांनाही महाराष्ट्राच्या गृहखात्याने या बाबतीत कोणतीही उपाययोजना केली नाही. एक महिना उलटून गेल्यानंतर सुध्दा पुण्यातील जर्मन बेकरीचे आरोपी गृहविभागाला सापडू शकलेले नाहीत याचा साधा उल्लेखही माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात नसल्यामुळे आम्ही माननीय राज्यपालांचे कौतुक कसे कारावयाचे ? पुण्याच्या जर्मन बेकरीमध्ये मृत पावलेल्या व्यक्तींना मदत केल्याच्या कौतुकाचा उल्लेख माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात आहे परंतु एक महिना उलटून गेल्यानंतर सुध्दा आरोपी पकडण्यात आम्ही अपयशी ठरलो याचा साधा उल्लेख सुध्दा अभिभाषणात करण्यात आलेला नाही.

सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाच्या चौथ्या पॅरात असे म्हटले आहे की, "नागरिकांची सुरक्षा व संरक्षण यास माझ्या शासनाचे नेहमीच सर्वोच्च प्राधान्य राहिले आहे. दहशतवादाच्या संकटाचा प्रभावीपणे मुकाबला करण्यासाठी राज्यातील पोलीस दलाला आधुनिक शस्त्रसाधने आणि चिलखती वाहने पुरवून त्यांचे आधुनिकीकरण करण्याचे काम युध्द पातळीवर हाती घेण्यात आलेले आहे."

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ...

सभापती महोदय, आजच्या "लोकमत" या वर्तमान पत्रात जी बातमी प्रसिध्द झालेली आहे ती गृहमंत्र्यांनी वाचावी असे मला त्यांना सांगावयाचे आहे. त्या बातमीत असे म्हटलेले आहे की, "पोलीस दलाचे आधुनिकीकरण करण्याचे काम युध्द पातळीवर हाती घेंण्यात आलेले आहे परंतु प्रत्यक्षात वस्तुस्थिती मात्र वेगळीच आहे.मुंबईतील दहशतवादी हल्यानंतर पोलीस दलाचे सक्षमीकरण करण्यासाठी 126 कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असला तरी आर्थिक वर्षअखेर यातील 50 टक्के रक्कम शिल्लक राहण्याची शक्यता आहे." आपले सरकार किती गतीमान आहे हे यावरुन दिसून येते. मुंबईवर दिनांक 26/11 रोजी दहशतवादी हल्ला झाला होता त्याबाबतीत शासनाने राम प्रधान समितीची स्थापना केली . आणि पोलिसांचे सक्षमीकरण आणि आधुनिकीकरण करण्यासाठी 126 कोटी रुपये दिले होते. परंतु हे पैसे खर्च होऊ शकले नाहीत. या बातमीत पुढे असे म्हटलेले आहे की, " शासनाने 126 कोटी रुपयें मंजुर केलेले असले तरी 31 मार्च अखेर 50 टक्के रक्कम शिल्लक राहण्याची शक्यता आहे. गेल्या साडे अकरा महिन्यात जेमतेम 40 टक्के उपकरणांची खरेदी पूर्ण करण्यात आली आणि हा बॅकलॉग भरुन काढण्यासाठी महासंचालक कार्यालयात टेंडर घाई सुरु आहे ." याबाबतीत माननीय गृह मंत्री श्री आर आर पाटील यांनी चौकशी करावी. गेल्या पंधरा दिवसामध्ये किती टेन्डर निघाले होते ? गेल्या साडेअकरा महिन्यात पोलीस महासंचालकाचे ऑफिस झोपले होते काय ? या बातमीत असेही म्हटले आहे की, "पैसे उपलब्ध झाल्यानंतरसुध्दा ते खर्च करु शकले नाही उपकरणाच्या खरेदी साठी दररोज जवळपास दहापेक्षा जास्त निविदा उघडल्या जात आहेत. शासनाने दिलेला निधी दिनांक 31 मार्च पर्यत त्यांना खर्च करावयाचा आहे. या खरेदीमध्ये एके 47 रायफल्स, बुलेट प्रुफ जॅकेटस, वाहने, सीसी टीव्ही कॅमेरे इत्यादी उपकरणे तसेच कायम स्वरुपी प्रतिबंधक यंत्रणेच्या उभारणीसाठी प्रक्रिया पूर्ण करावयाची आहे. खरेदीसाठी नेमलेल्या समितीमध्ये सुसूत्रीकरण नाही म्हणून खरेदी होत नाही आणि खरेदी होत नाही म्हणून सक्षमीकरण होत नाही. किमान आठ ते दहा वेळा या निविदा मागविण्यात आल्या परंतु त्या मंजूर झाल्या नाहीत. जानेवारी अखेर पर्यत जेमतेम 20 टक्के खरेदीची प्रक्रिया झाली होती. पण या कामासाठी गृह सचिवांनी आणखी एक पोलीस उप महानिरीक्षकाची नेमणूक केली होती .

(सभापती स्थानी सभापती श्री चंद्रकात छाजेड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ...

त्यानंतर त्या कामाचा वेग वाढला असून 20 टक्यावरुन 40 टक्क्यापर्यंत ती खरेदी गेली आहे बुलेट प्रुफ वाहन खरेदीचा अपवाद वगळता अन्य मुख्य उपकरणाची प्रक्रिया अजून अपूर्णावस्थेत आहे." हे सरकार किती गतीमान आहे हे यावरुन दिसून येते. सभापती महोदय, या सरकारचे कौतुक जरी माननीय राज्यपाल करीत असले तरी आम्ही त्याचे समर्थन करु शकत नाही. आम्हाला खेद वाटतो की, पुण्याच्या जर्मन बेकरीवर हल्ला करण्यात आला होता. तसेच मुंबईवर दहशतवादी हल्ला झाल होता आणि हे अतिरेकी इतके मस्तावले आहेत की, मंत्रालय आणि विधान भवन तसेच महत्वाची स्थळे व ऊर्जा प्रकल्पसुध्दा उडवून देऊ अशा प्रकारच्या धमक्या या राज्याला दिल्या जातात व राज्याला आव्हान दिले जाते . मी माननीय गह मंत्री श्री आर.आर .पाटील यांना सांगू इच्छितो की, तुम्ही या बाबतीत काही तरी चमत्कार घडवून दाखवावा. या संदर्भात केवळ घोषणा करुन चालणार नाही. तर छत्रपती शिवरायाच्या महाराष्ट्रावर कोणत्याही अतिरेक्याची तिरपी नजर जाणार नाही आणि छत्रपती शिवरायांच्या महाराष्ट्रामध्ये कोठे तरी स्फोट घडवून आणू असे कोणत्याही अतिरेक्याला वाटणार नाही इतक्या ताकदीचे राज्य ज्यावेळी तुम्ही उभे कराल त्या दिवशी खुल्या मनाने आम्ही शासनाचे अभिनंदन करु. सभापती महोदय, पोलिस दलाच्या सक्षमीकरणाच्या नावाखाली असे लिहिले जाते की, पोलिसांनी फार मोठा पराक्रम केला आहे. यावर मी जास्त बोलणार नाही उलट इतर सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी मी वेळ देणार आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणासंबंधी मला फक्त एक दोन महत्वाचे मुद्दे मांडावयाचे आहेत. शेतक-याच्या संदर्भात जे निर्णय घेतले होते त्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री भाई जगताप यांनी माननीय राज्यपालांचे कौतुक केलेले आहे .72 हजार कोटी रुपयांचे कर्ज शासनाने माफ केले आहे याबाबतीत कौतुक केले आहे परंतु आपण प्रत्यक्षात ग्रामीण भागात जाऊन पहावे .किती शेतक-यांना कर्ज माफी मिळाली आहे व किती शेतक-यांच्या घरापर्यंत कर्ज माफी पोहोचली आहे. यासबंधी मुंबईत बसून आपल्याला काही कळणार नाही. आता अशी घोषणा करण्यात आली आहे की. 25 हजार रुपयापर्यंतचे कर्ज बिनव्याजी देण्यात येईल. 25 हजार ते 3 लाखापर्यंतच्या कर्जासाठी 2 टक्के व्याज लावण्यात येईल. गेल्या चार पाच वर्षापासून या सभागृहात आम्ही हेच ऐकत आहोत...

नंतर श्री.सरफरे

अशोधित प्रत/ प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

कधी 4 टक्के दराने तर कधी 6 टक्के दराने शेतकऱ्यांना कर्ज देऊ असे सांगितले जाते. परंतु शेतकऱ्यांना सांगितलेल्या दराने कर्ज मिळत नाही. कालपर्यंत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या माध्यमातून 14 टक्के दराने शेतकऱ्यांकडून व्याज घेतले गेले. या राज्यामध्ये आपण किती वेळा घोषणा केल्या? परंतु "लबाडाचे आमंत्रण जेवल्याशिवाय खरे मानता येत नाही." त्यामुळे आज तरी राज्यातील जनता आपल्यावर विश्वास ठेवायला तयार नाही.

सभापती महोदय, हे राज्य शेतकऱ्यांचे आहे असे सांगणारे किती तरी परिच्छेद माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये आहेत. आपण शेततळयांच्या गोष्टी करता? आमच्या विदर्भामध्ये शेततळयांमध्ये प्रचंड भ्रष्टाचार झाला, परंतु त्याची चौकशी झाली नाही. आपण किती शेततळी खाल्ले? त्यांची देयके मंजूर करुन घेतली गेली, आणि शेततळी फक्त कागदावरच राहिले. आज आपण 27 हजार नवीन शेततळी खोदण्याचा निर्णय घेतला आहे. शेतकऱ्याच्या शेतामध्ये शेततळे खरेच खोदले जात आहेत की नाहीत हे आपण त्याठिकाणी एकदा जाऊन पहावे. या अभिभाषणामध्ये विदर्भातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यासंबंधी उल्लेख नाही, वाढलेल्या महागाईसंबंधी उल्लेख नाही. असे असतांना या अभिभाषणाचे अभिनंदन आम्ही कशासाठी करावयाचे? आज शेतकऱ्यांसाठी खताचे दर 10 टक्क्यांनी वाढविले आहेत. अशापरिस्थितीत आपण शेतकऱ्यांसाठी काय उपाय योजना करणार आहात? जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती गगनाला भिडल्या आहेत. वाढती महागाई कमी करण्यासाठी कोणतीही उपाय योजना सुचविण्यात आलेली नाही. माननीय श्रीमती सोनियाजी गांधी यांच्या घरी महागाई कमी करण्यासाठी झालेल्या बैठकीला माननीय पंतप्रधान उपस्थित होते. त्या बैठकीमध्ये काही निर्णय घेण्यात आले, त्या निर्णयाचे पुढे काय झाले? साठेबाजांना आळा घालीत असतांना निरपराध व्यापाऱ्यांना छळले. त्यामधून शेतमालाच्या किंमती कमी करण्यात आल्या, परंतु जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती कमी झाल्या नाहीत. महागाईच्या नावाखाली कापसाच्या, सोयाबीनच्या किंमती कमी केल्या, शेतकऱ्याच्या शेतमालाच्या किंमती कमी केल्या, परंतु कोणत्याही वस्तूंच्या किंमती खाली आणल्या नाहीत. एका बैठकीमधून जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती कमी होत नाहीत. शेतकरी आपल्या शेतामध्ये धान्य पिकवित असतांना आपले रक्त आटवतो. आपल्या शेतामध्ये पांढरे सोने पिकवितो, सोयाबीन पिकवितो. अशावेळी त्याच्या मालाची किंमत कमी केली जाते, जीवनावश्यक वस्तूंची किंमत वाढविली जाते. त्याच्या शेतीसाठी लागणाऱ्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ KGS/

श्री. पांडुरंग फुंडकर...

खताची किंमत 10 टक्क्यांनी वाढविली जाते. याबाबत शासनाने अभिभाषणामध्ये कोठेही उल्लेख केला नाही.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये पाणलोट क्षेत्र विकासाचा उल्लेख करण्यात आला आहे. आमच्या विदर्भामध्ये पाऊस पडत नाही, त्यामुळे शेततळे करुन काय साधणार? धरणामधून सोडलेले पाणी आपण शेतीला सुध्दा देऊ शकत नाही. आज आपण विदर्भामध्ये जाऊन पहावे, त्याठिकाणी 18-18 तास वीज मिळत नाही. 5 लाख वीज पंपाचा अनुशेष शिल्लक आहे. या पंपाना आपण केव्हा वीज देणार आहात? शेतकरी मेल्यावर? आपण सन 2012 पर्यंत वीज देण्याची घोषणा केली आहे. परतु गेल्या दहा वर्षामध्ये एकही वीज प्रकल्प आपण पूर्ण करु शकला नाही. आपण गेली दहा-अकरा वर्षे राज्य करीत असतांना भारनियमन कमी करु शकला नाही, शेतकऱ्याला वीज देऊ शकला नाही. 5 लाख शेतकरी आपल्या पंपाना वीजेचे कनेक्शन मागत आहेत त्यांना आपण कनेक्शन देऊ शकत नाही. असे असतांना तुम्ही शेतकऱ्याला काय दिलासा देणार आहात? शेतकऱ्याला वीज नाही, वाढीव किंमतीमध्ये खत, किटकनाशके, बी-बियाणे घ्यावी लागत आहेत. आणि दुसऱ्या बाजूला जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती आकाशाला भिडल्या आहेत. अशापरिस्थितीत शेतकऱ्याचे अर्थशास्त्र बिघडविण्याचे पाप करणाऱ्या शासनाचे आभार आणि धन्यवाद कशासाठी मानायचे? या परिस्थितीत हा शेतकरी जीवंत राहणार नाही. शेतकऱ्याच्या नावाने कुंकू लावून आपण बसला आहात. माननीय आबासाहेब आपला जन्म शेतकरी कुटुंबामध्ये झाला आहे. आपण शेतकऱ्याच्या नावाने कुंकू लावून व त्याच्या नावाने भांडवल करीत आहात हे पाप आपण केव्हा फेडणार आहात?शेतकऱ्याचे अर्थशास्त्र सुधारेल अशाप्रकारच्या योजना आपण आणल्या तर आम्ही आपले अभिनंदन करु, त्या योजनांचे समर्थन करु. मागेल त्याला वीज मिळेल अशी योजना आपण आणली पाहिजे. माजी मुख्यमंत्री माननीय श्री. विलासराव देशमुख यांनी सांगितले होते की, 2010 सालापर्यंत महाराष्ट्र राज्य भारनियमन मुक्त होईल. आणि आता 2012 पर्यंत भारनियमन मुक्त केले जाईल असे सांगितले जात आहे. हा आकडा आता पुढे सरकला आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

अगोदर 2010 पर्यंत आशा दाखविली की, तोपर्यंत महाराष्ट्र विजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण होणार आहे आणि आता तुम्ही 2012 पर्यंत पुढे गेला आहात. मग लोकांनी किती दिवस वाट पहावयाची. शेतकऱ्यांनी किती दिवस धीर धरावयाचा आहे असा प्रश्न आहे. अशा पध्दतीने हे राज्य चालणार नाही. तुम्ही याबाबतीत माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये कौतुक केले तरी आम्ही त्याचे समर्थन करणार नाही. आम्ही महागाईचे समर्थन करावयाचे काय ? आतंकवादी महाराष्ट्राचे समर्थन करावयाचे काय ? बेरोजगार कामगारांचे समर्थन करावयाचे काय ? अशामुळे या राज्यात सर्वसामान्य माणूस सुखी रहाणार नाही. या राज्यकर्त्यांवर सर्वसामान्य माणसांचा विश्वास राहिलेला नाही. मग माननीय गृहमंत्री, तुम्ही असे म्हणाल की, तरीही लोकांनी तुम्हाला निवडून दिलेले आहे.परंतु तुम्ही येथे लोकांच्या सहानुभूतीने बसलेले नाही, तो वेगळा विषय आहे.पण जनता उदासीन आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, सावित्रीबाई फुले यांच्या राज्यामध्ये जे प्रकार सुरु आहेत ते बरोबर नाहीत आणि आता आपण राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये पदार्पण केलेले आहे.पण हे काय सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे ? सन्माननीय श्री.गुजराथीसाहेब, तुम्ही 50 वर्षे राज्य केले, पण या राज्यातील जनता,शेतकरी सुखी नाही,आदिवासी सुखी नाही.दलित सुखी नाही. आज दलितांवर अत्याचाराची मालिका वाढत आहे.या राज्यामध्ये अल्पवयीन मुलींवरील बलात्काराची प्रकरणे वाढत आहेत.या राज्यात दरोडयाचे प्रमाण वाढत आहे.पण दरोडेखोर पकडले जात नाहीत यावरुन आपले सरकार गतीमान आहे का ? असा प्रश्न निर्माण होतो.राज्यातील जनतेमध्ये एक प्रकारची दहशत निर्माण झाली आहे. या राज्यामध्ये कायदा व सुव्यवस्था शिल्लक आहे की नाही ? असा प्रश्न आहे. लोकांना दिवसाढवळया मारले जात आहे. भरदुपारी दोन वाजता, तीन वाजता दरोडे पडत आहेत. मलकापूर सारख्या गावामध्ये दुपारी 3.00 वाजता दरोडा पडला आणि लाखो रुपयांची लूट करण्यात आली. पण अजूनपर्यंत पोलीस दरोडेखोरांना पकडू शकलेले नाहीत. एका बाजूला राज्यात कायदा आणि सुव्यवस्था नाही आणि दुसऱ्या बाजूला तुमचे दडपशाहीचे धोरण सुरु आहे. जर कोणी आवाज उठविला तर त्याचा आवाज दाबण्याचे काम सुरु आहे. वसई-विरार मध्ये काय झाले ? तेथे पोलिसांनी मोठया प्रमाणात दडपशाही केली. तेथील आमदार श्री.विवेक पंडित यांनी कोणती मागणी केली होती? त्यांचे अनुशासनात्मक आंदोलन सुरु होते.त्यासाठी ते उपोषणाला बसले. परंतु सन्माननीय सदस्यांचे उपोषण जबरदस्तीने सोडविण्याचा प्रयत्न झाला.....

. . . .3सी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

त्यावेळी पोलिसांनी बळाचा वापर केला. तेथील गरीब महिलांचा यामध्ये काय गुन्हा होता? या महिला घरामध्ये बसलेल्या होत्या, परंतु पोलिसांनी घरामध्ये शिरुन महिलांना नग्न करुन मारले. तो विषय आता नाही, पण यावर सदनामध्ये चर्चा होणार आहे. राज्यामध्ये आज दडपशाही सुरु आहे.जर कोणी सरकारच्या विरुध्द आवाज काढला तर माननीय गृहमंत्री श्री.आर.आर. पाटील साहेब, तो दाबण्याचे काम खालच्या स्तरावर सुरु आहे. माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील साहेब, याबाबत तुम्हाला माहिती असेल, परवा मलकापूरला हायवेवर एक अपघात झाला आणि त्यामध्ये एका गरोदर महिलेचे दोन तुकडे झाले. सभापती महोदय, त्यानंतर पोलिसांना जवळजवळ 50 फोन केले. जेथे हा अपघात झाला होता, तेथून पोलीस स्टेशन फक्त 6 कि.मी.अंतरावर होते. पण पोलीस आले नाहीत आणि त्या महिलेचे प्रेत तेथे तसेच चार तास पडलेले होते. मग लोक संतापणार नाहीत तर काय करणार ? त्यानंतर पाच-सात गावातील लोक एकत्र आले आणि त्यांनी आपल्याकडील कपडे आणून त्या महिलेल्या अंगावर टाकले. त्यानंतर ज्या ट्रकमुळे हा अपघात झाला, तो ट्रक पेटवून दिला. कारण लोकांचा संताप अनावर झाला होता. लोकांनी हा गुन्हा केला नाही. कारण जर तुमचे पोलीस फोन करुनही चार तास येणार नसतील तर काय करावयाचे ? मग पोलिसांनी काय केले, तर तेथे बेल्लाळ नावाचे गाव आहे. पोलिसांनी त्या गावामध्ये एकाही माणसाला सोडले नाही. जो निरपराध असेल, ज्याला या घटनेची माहिती नसेल अशा सज्जन लोकांच्या घरातील व्यक्तींवर तेथील पंचायत समितीच्या सभापतींच्या मुलावर, इतरांवर पोलिसांनी वाईट पध्दतीने लाठीहल्ला केला. अशा प्रकारे निरपराध लोकांना पोलीस स्टेशनमध्ये आणून डांबले. हे तुमचे कायद्याचे राज्य आहे काय ? अशा प्रकारे जर पोलीस खाते काम करणार असेल तर एका बाजूला दरोडेखोरांची दहशत, दुसऱ्या बाजूला आतंकवादी लोकांची दहशत आणि तिसऱ्या बाजूला पोलिसांची दहशत अशा प्रकारच्या दहशतीमध्ये राज्यातील जनतेला रहावे लागणार आहे, तशीच राज्यातील स्थिती आहे.

अशुद्धित प्रत / शीघ्रलेखाची नाही

यानंतर श्री.बरवड . . ..

श्री. पांडुरंग फुंडकर .....

तरीही आम्ही माननीय राज्यपालांच्या या अभिभाषणाबद्दल अभिनंदन करावयाचे काय ?

यामध्ये अवकाळी पावसाबद्दलचा उल्लेख नाही. हे अधिवेशन सुरु होण्याच्या आधी प्रचंड प्रमाणात अवकाळी पाऊस झाला तसेच गारपीट झाली. सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी यांच्या भागामध्ये सुध्दा गारपीट झाली. शेतकरी उद्ध्वस्त झाले. केळीचे पीक घेणारे शेतकरी, कांद्याचे पीक घेणारे शेतकरी, गव्हाचे पीक घेणारे शेतकरी, तुरीचे पीक घेणारे शेतकरी उद्ध्वस्त झाले. पण या शेतकऱ्यांबद्दल अभिभाषणामध्ये अवाक्षर सुध्दा आलेले नाही. या शेतकऱ्यांच्या संदर्भात शासनाने घोषणा केलेली नाही तसेच या अभिभाषणामध्ये सुध्दा उल्लेख आलेला नाही. तरीही आम्ही कौतुक करावयाचे काय ? अशा पध्दतीचे हे अभिभाषण कौतुक न करण्यासारखे आहे. या ठिकाणी काही सन्माननीय सदस्यांकडून कौतुक झाले. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांना सांगू इच्छितो की, आपल्याला कौतुक करावेच लागणार आहे. आपल्या मनामध्ये कौतुक करण्याची इच्छा नसेल पण आपल्याला कौतुक करावे लागते. यामध्ये विरोधाभास आहे. या अभिभाषणामध्ये व्यसन मुक्तीच्या संदर्भात एक परिच्छेद टाकलेला आहे. अभिभाषणातील परिच्छेद क्रमांक 48 मध्ये याबाबत उल्लेख केलेला आहे. हे सरकार दारुच्या व्यसनापासून मुक्ती करणार आहे आणि दुसरीकडे ज्वारीपासून दारु निर्मिती करणाऱ्या कारखान्यांना परवानगी देत आहे. तरीही आम्ही समर्थन करावयाचे काय ? तरीही आम्ही अभिनंदन करावयाचे काय ? अशा पध्दतीने लोकांना मुर्ख बनविण्याचे हे तंत्र आहे. या अभिभाषणात याबाबत जो उल्लेख केला आहे ते वाक्य मी वाचून दाखवतो. सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंगडे यांनी कदाचित हे वाक्य न वाचता अभिनंदनाचा ठराव मांडला असावा. त्यांनी हे वाक्य वाचले असते तर कदाचित त्यांनी या अभिभाषणाला पाठिंबा दिला नसता. यामध्ये असे म्हटले आहे की, "लोक सहभागातून तसेच विविध प्रसार माध्यमांचा वापर करुन दारुच्या व्यसनाच्या दुष्परिणामांची प्रकर्षाने जाणीव करुन देण्यासाठी माझे शासन व्यसनमुक्ती कार्यक्रमांना प्रोत्साहन देईल." तर दुसरीकडे ज्वारीपासून, धान्यापासून दारु निर्मिती करण्यास हे शासन प्रोत्साहन देत आहे. हे शासन पुढच्या पिढीला काय देणार आहे ? पुढच्या पिढीला आपण हेच देणार आहात काय ? भविष्यातील पाच वर्षात महाराष्ट्रातील जनतेला आपण हेच देणार आहात काय ? याच पध्दतीने राज्य चालले तर हे राज्य अधोगतीकडे जाईल. यामुळे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाला कलंक लागणार आहे. शाहू, फुले, आंबेडकर यांच्या नावाला कलंक लावण्याचे काम होईल. तरीही आपण या अभिभाषणाचे समर्थन करावयास लावणार असाल तर ते आम्ही करणार नाही.

माननीय राज्यपालांना अभिभाषण करावे लागते. आरोग्याच्या बाबतीत, शिक्षणाच्या बाबतीत काय परिस्थिती आहे ? या सुवर्ण महोत्सवी वर्षात राज्यामध्ये शैक्षणिक धोरण तयार करण्याच्या बाबतीत काय परिस्थिती आहे ? या अभिभाषणामध्ये माध्यमिक शिक्षणासंबंधीचा एक परिच्छेद आहे. आज संपूर्ण महाराष्ट्रामध्ये हजारो गांवामध्ये माध्यमिक शिक्षणाची काय अवस्था आहे ? त्या ठिकाणी संगणक देण्यात येणार आहेत. त्या शाळेत किती खोल्या आहेत, शिक्षक किती आहेत ? त्या गावात जिल्हा परिषदेच्या शाळेत काय परिस्थिती आहे ? त्या ठिकाणी दिलेले संगणक कोठे ठेवणार ? शाळेमध्ये खोल्या नाहीत. चार वर्ग एक खोली, सात वर्ग तीन खोल्या, 7 वर्ग 4 शिक्षक अशी परिस्थिती आहे. ते कसे शिकवित असतील ? त्यांना आपण संगणक देणार आहात. हे सर्व परिस्थिती दुरुस्त करावी. नवीन शैक्षणिक धोरण आणावे. सुवर्ण महोत्सवी वर्षात महाराष्ट्र कसा असला पाहिजे याबाबत नीट धोरण आणावे. त्याचे आम्ही समर्थन करु. या शिक्षणाच्या बाबतीत महाराष्ट्रातील ग्रामीण भागामध्ये विदारक चित्र दिसते. ग्रामीण भागातील पिढी उद्ध्वस्त करण्याचे पाप सरकार करीत आहे. या सरकारच्या कामाचे आम्ही समर्थन करावयाचे काय ? ग्रामीण भागातील शाळांची फार वाईट अवस्था आहे. या अभिभाषणात शैक्षणिक धोरणाच्या बाबतीत उल्लेख नाही. महाराष्ट्रातील जनतेच्या आरोग्याची शासनाला काळजी नाही. जे.जे.हॉस्पिटलमध्ये काय चालले आहे यासंदर्भात 'लोकमत' वर्तमानपत्राने एक मालिका लिहिली.

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

यानंतर श्री. खंदारे...

श्री.पांडुरंग फुंडकर....

तुमच्या मंत्रिमंडळात असलेल्या एका मंत्र्यांचे लोकमत वर्तमानपत्र आहे. त्या वर्तमानपत्राने 19 जानेवारी पासून 'आरोग्य धनसंपदा' नावाची मालिका सुरु केली होती. त्या मालिकेतून मुंबईतील जे.जे.हॉस्पिटल, जी.टी.हॉस्पिटल या हॉस्पिटलमधील वैद्यकीय सुविधेचा उल्लेख केलेला आहे. त्याचे सविस्तर वर्णन करण्यासाठी मला पुरेसा वेळ नाही. या गैरसोयींची शासन चौकशी करणार आहे की नाही ? या मालिकेतून शासनावर जे आरोप करण्यात आले आहेत ती वस्तुस्थिती आहे. या मालिकेचे सन्माननीय मंत्री श्री.सुरेश शेट्टी यांनी समर्थन केले आहे. त्यासंबंधी त्यांनी एका सचिवांची वन मॅन कमिटी नेमली आहे. त्या कमिटीला काम करु दिले जाणार आहे की नाही ? जे.जे.हॉस्पिटल संपूर्ण देशामध्ये नावाजलेले हॉस्पिटल आहे. त्या हॉस्पिटलसंबंधी 'आरोग्य धनसंपदा' या सदराखाली जी लेख मालिका छापून आली ती राज्य सरकारला भूषणावह नाही. सर्वसामान्य माणसांचे आरोग्य धोक्यात आले तर माणसे मुंग्यांसारखी मेल्याशिवाय राहणार नाही. त्यांच्या जीवाशी खेळ खेळणा-या अधिका-यांवर कारवाई होणार आहे किंवा नाही, त्यांना जाब विचारला जाणार आहे की नाही ? राज्यात कोट्यवधी रुपयांची औषध खरेदी केली जाते, त्याचे दर मनाप्रमाणे ठरविले जातात. त्यासाठी काही निकष लावले जात नाहीत. जी.टी.हॉस्पिटलची मशीनरी आली तेव्हापासून बंद आहे. त्याठिकाणी डॉक्टरांचा मनमानी कारभार सुरु आहे. त्याकडे कोण लक्ष देणार आहे ? अशाप्रकारे सर्वसामान्य माणसांचे आरोग्य धोक्यात आले आहे. परंतु त्याकडे लक्ष देण्यासाठी सरकारकडे वेळ नाही, असे असताना आम्ही राज्यपालांच्या अभिभाषणाचे समर्थन करावे काय ? आम्ही या अभिभाषणाचे समर्थन करु शकणार नाही.

सभापती महोदय, शेगांवच्या गजानन महाराजांच्या संजीवन शताब्दी महोत्सवासंबंधी शासनाकडून द्यावयाच्या निधीबाबत शासनाने ठोकबाजी करु नये. गजानन महाराजांचा शाप फार वाईट असतो. माननीय वित्त राज्यमंत्री श्री.वडेट्टीवार यांना मी सांगू इच्छितो की, हा महोत्सव सप्टेंबर, 2010 मध्ये सुरु होणार आहे अशी आपल्याला चुकीची माहिती दिलेली आहे. हा महोत्सव सप्टेंबर, 2009 मध्ये सुरु झालेला आहे व तो हा सोहळा सप्टेंबर, 2010 पर्यंत संपन्न

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

श्री.पांडुरंग फुंडकर.....

होणार आहे. म्हणजे अद्याप 5 महिन्यांचा कालावधी शिल्लक राहिलेला आहे. हा विषय या सभागृहात मागील दीड वर्षापासून मी मांडत आलो आहे. या दीड वर्षात शासनाकडून कधी 150 कोटी रुपये देण्याची घोषणा केली गेली, कधी 165 कोटी रुपये देण्याची घोषणा करण्यात आली आहे. हा निधी जाहीर करीत असताना शेगांवच्या पाणी पुरवठा योजनेचा देखील त्यात समावेश करण्यात आला आहे. वास्तविक शेगांवच्या पाणी पुरवठयाची 60 कोटी रुपयांची योजना अगोदरच मंजूर झालेली आहे. अशाप्रकारे फसवे पॅकेज जाहीर केले जाते. या निधीपैकी 65 कोटी रुपये केंद्र सरकारचे आहेत. पेय जल योजनेसाठी 10 टक्के लोकवर्गणी नगरपालिकेने दिले आहेत म्हणजे मंदिराच्या विश्वस्थ मंडळाने 10 टक्के निधी दिला आहे आणि 90 टक्के केंद्र सरकारचा निधी आहे. तरी सुध्दा 365 कोटी रुपयांमध्ये पाणी पुरवठा योजनेचा अंतर्भाव केला गेला. या पॅकेजचा त्याच्याशी काही संबंध नसताना ती योजना पॅकेजमध्ये घुसविली आहे. 365 कोटींची घोषणा केल्यावर त्याची मागणी सातत्याने केल्यावर एक बैठक झाली. त्या बैठकीत माननीय मुख्यमंत्र्यांनी 100 कोटी रुपये देण्याचे जाहीर केले. परंतु त्यापैकी केवळ 23 कोटी रुपये दिले आहेत. सप्टेंबरमध्ये होणा-या या सोहळयाला 1 कोटी लोक येणार आहेत. हे गाव 'क' वर्ग नगरपालिकेत येते. तेथे उतरण्याची सोय नाही, वाहने उतरण्याची सोय नाही, रस्ते निमुळते आहेत. 1 कोटी भाविक आले तर तेथे काय परिस्थिती निर्माण होईल याची कल्पना करावी. त्या मंदिराची इतकी मोठी क्षमता नाही.

यानंतर श्री.ओटवणेकर.....

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी

श्री.पांडुरंग फुंडकर ...

श्री गजानन महाराज संस्थान त्यांच्या क्षमतेनुसार काम करीत आहे. परंतु यापुढच्या काळात त्यांची क्षमता देखील कमी पडणार आहे. त्यांच्याकडून जेवढे करणे शक्य आहे, तेवढे ते करीत आहेत. पण शासन म्हणून आपण काय करणार आहात ? नांदेडला आपण 1400 कोटी रूपये दिले. पण प्रत्यक्षात तेथे किती भाविक आले. परदेशातून भाविक येणार आहेत त्यामुळे विमानतळ करावे अशा सूचना करण्यात आल्या होत्या. तेथे सर्व केल्यानंतर प्रत्यक्षात किती जण आले ? हे तसे नाही. शेगावला दररोज दोन हजार गाडया येतात. त्यामुळे सप्टेंबरमध्ये आपण काय करणार आहात ? आता फक्त पाच महिन्यांचा कालावधी राहिला आहे. शासनाने फक्त 23 कोटी रूपये दिले. शासनाने आता टेंडर प्रक्रिया सुरू केली आहे. जसा लागेल तसा निधी उपलब्ध करून देऊ असे शासनाचे म्हणणे आहे. श्री गजानन महाराज संस्थानने अनेक कोट्यवधीची कामे केली आहेत. संस्थानने सुचविले होते की, आनंद सागर पासून ते मंदिरापर्यंतच्या पादचारी मार्गाचे काम आम्ही करतो. या कामाचा मेंटनन्स करू असे देखील देवस्थानने सांगितले होते. परंतु, त्याची देखील परवानगी आपण दिली नाही. आम्ही प्राधिकरणाची देखील मागणी केली होती. परंतु ती देखील मान्य करण्यात आली नाही. तुळजापूरसाठी 325 कोटी रूपयाचे प्राधिकरण केले. पण 360 कोटीच्या प्रकल्पासाठी आपण प्राधिकरण केले नाही. शासनाने आता 23 कोटी रूपये दिले आहेत. तेथे पाणी,मुतारी,स्वच्छतागृह,वाहनतळ यांची व्यवस्था नाही. त्यामुळे येथील सोहळा कसा होणार अशी चिंता जनतेला लागून राहिली आहे. सकाळी प्रश्नोत्तराच्या तासाला मंत्रिमहोदयांनी सांगितले की, युद्धपातळीवर काम सुरू आहे. कशाचे काम सुरू आहे तर ते पोलीस स्टेशन आणि रेस्ट हाऊसचे. ह्या आवश्यक बाबी आहेत काय ? पिण्याचे पाणी, रस्ते, वाहनतळ, मुतारी, लोकांना राहण्यासाठी धर्मशाळा बांधणे, दवाखाने या आवश्यक बाबी आहेत. असे असताना पोलीस ठाणे आणि रेस्ट हाऊस यांची टेंडर्स पहिली निघालीत. या प्रकारामुळे श्री गजानन महाराज यांचा कोप झाला तर फार वाईट होईल. श्री.आर.आर.पाटील यांना गजानन महाराज यांची ख्याती माहित असेल. माननीय मुख्यमंत्री श्री गजानन महाराज यांच्या मंदिरात जात नाहीत. माननीय मुख्यमंत्री श्री गजानन महाराज यांच्या मंदिरात गेले आणि श्री गजानन महाराज यांची शाल पडली तर सहा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

महिन्यात मुख्यमंत्री पद जाते. श्री गजानन महाराज संस्थान देशातील गौरवशाली संस्थान आहे. अशा संस्थानशी तरी आपण अशा पद्धतीने वागू नका, एवढेच मला याठिकाणी सांगावयाचे आहे. 360 कोटी रूपये श्री गजानन महाराज सोहळ्यासाठी दिले आहेत असा उल्लेख शासनाने नावापुरता केला आहे. असे आपण करू नका. श्री.विजय वडेट्टीवार साहेब विदर्भातील शेगाव मध्ये श्री गजानन महाराज यांचा सोहळा होणार आहे. त्या निमित्ताने हाती घ्यावयाच्या कामांना गती आली पाहिजे. सप्टेंबर पर्यंत किमान गावात शिरणारे रस्ते तरी रूंद झाले पाहिजेत. अन्यथा अपघाताचे प्रमाण वाढेल. सप्टेंबर मध्ये होणारा सोहळा अधिक चांगला होण्यासाठी जितक्या तातडीने पैसा देता येईल तो द्यावा एवढेच सांगतो आणि माझे वक्तव्य मी संपवितो.

.....

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर संतुष्ट व्हावे,आनंद व्हावा आणि या महाराष्ट्रामध्ये नव्याने आलेल्या सरकारकडून अपेक्षा कराव्यात असे काही असते तर बरे वाटले असते, कौतुक करावेसे वाटले असते. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप हे नव्या जोमाने, दमाने अभिभाषणाचे समर्थन करीत होते. पण अन्य सन्माननीय सदस्यांची भाषणे ऐकल्यानंतर त्यांना आता वाटले असेल की अरेरे आपण समर्थन करण्याऐवजी ते दुसऱ्याला कोणाला तरी करण्यास सांगितले पाहिजे होते. पूर्वी अभिभाषणाला समर्थन देण्याचे काम आमच्या माजी सन्माननीय सदस्या जोशी बाई करीत होत्या. आमचे श्री.शेंडगेभाऊ देखील पाठिंबा देण्यासाठी उत्साहाने उभे राहिले. काही करून त्यांना शेळी-मेंढींचा प्रश्न मांडायचा असतो. त्यामुळे सर्व मुद्दे मांडून झाल्यावर ते आपल्या मूळ प्रश्नावर आले आणि त्यांनी सांगितले की, आम्हाला हे मिळाले नाही. त्यांनी अभिभाषणाचे समर्थन करण्याऐवजी काय मिळाले नाही हेच सांगितले.

यानंतर श्री.शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मला त्यांना उठून सांगावे लागले की आम्ही विरोधी पक्षामध्ये बसलेलो आहोत, त्यामुळे आमची देखील काळजी घ्यावी. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप हे कॉंग्रेसचे चांगले भविष्य घडविणा-यां पैकी एक आहेत. पण त्यांना मला सांगायचे आहे की, जेव्हा चुकीचे समर्थन केले जाते त्यावेळी भविष्य घडत नसते.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य निर्मितीच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून पुढील 2015 पर्यन्त गाठावयाच्या उद्दिष्टांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने हाती घ्यावयाच्या योजनांबाबतची माहिती अभिभाषणामध्ये दिलेली आहे. परंतु या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये महाराष्ट्राची काय परिस्थिती आहे हे मी मांडण्याचा प्रयत्न करणार आहे.

सभापती महोदय, आमच्या सर्वांच्या जिव्हाळयाच्या अशा शेतीच्या संदर्भात अभिभाषणामध्ये केवळ एक परिच्छेद आहे. बाकी सर्व अद्वातद्वाच आहे. गेल्या 50 वर्षामध्ये शेतीची काय परिस्थिती झालेली आहे ? राज्यातील 55 टक्के जनता शेतीवर अवलंबून आहे. पूर्वी 70 टक्के जनता शेतीवर अवलंबून होती, ती नागरिकरणामुळे आता 55 टक्क्यावर आलेली आहे. राज्याचे एकूण शेती उत्पन्न 1980-81मध्ये 22.1 टक्के होते ते 2008-2009मध्ये 12 टक्क्यावर आणून ठेवलेले आहे. मी सांगत असलेली आकडेवारी अधिकृत आहे. 2008-2009मध्ये कृषी व सलग्न क्षेत्रातील स्थूल उत्पन्न 17.6 टक्के होते ते आता 12 टक्क्यावर आलेले आहे. ही कोणती प्रगती आहे ? 1960- 1961 ते 2007-2008 या 47 वर्षाच्या काळात कृषी सलग्न क्षेत्राचा वाटा 31.1 टक्क्यावरुन 15.1 टक्क्यावर आला. त्यामध्ये 60 टक्के घट झाली. अशा प्रकारे लक्षणीय घट होत असल्यामुळे ग्रामीण भागातील 55 टक्के जनतेवर टाचा घासून आत्महत्या करण्याची पाळी आलेली आहे. हे या महाराष्ट्राच्या सुवर्ण महोत्सवी वर्षातील सत्य आहे. ज्या शासनाने महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्राला 50 टक्क्यांनी घसरायला लावलेले आहे ते शासन या महाराष्ट्राच्या विकासाची कोणती स्वप्ने पहाणार आहे हा प्रश्न आहे. या राज्यामध्ये सिंचन करण्यासाठी 1 लाख 92 हजार कोटीचे कर्ज झाले. 2001-2002 ते 2005-2006 या पाच वर्षाच्या काळात बिगर कृषी जमिनीच्या वापरामध्ये 2.4 टक्क्यानी वाढ झाली. निव्वळ पेरणी क्षेत्रामध्ये 1 टक्का घट झाली. मग शेतकरी टाचा घासून आत्महत्या करणार नाही तर काय करणार ? सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांना पशुधनाची

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...

काळजी वाटते. राज्यातील पशुधन झपाट्याने कमी होत आहे. गायी, म्हशी, शेळया-मेंढया यांच्या संख्येत घट होत आहे. 1997साली 3.96 कोटी असेलेले पशुधन 2007मध्ये 3.69 पर्यन्त कमी झाले. याच काळात 3.54 कोटी कोंबड्या 2.65 कोटी पर्यन्त घटल्या. कोंबड्यांची घट झाल्यामुळे, पशुधनामध्ये घट झाल्यामुळे खताच्या उत्पादनामध्येही घट झाली. केन्द्रीय कृषीमंत्री श्री. शरद पवार यांनी सांगितलेले आहे की, शेतक-यांनी आता केवळ शेतीवर अवलंबून न राहाता इतर उद्योग सुरु करावेत. सभापती महोदय, अस्मान गाठेल अशी चिंताजनक परिस्थिती ग्रामीण भागातील शेतक-यावर आलेली आहे. शासनाने बिगर शेती क्षेत्र वाढविले. उद्योगधंद्यामध्ये वाढ केली. महाराष्ट्र हे उद्योगधंद्यामध्ये देशामध्ये पहिल्या क्रमांकावर आहे असे आपण सांगतो. उद्योगाच्या बाबतीत महाराष्ट्र हे इतर राज्याच्या मानाने पुढे आहे, कारण आपले राज्य हे प्रगतिशील राज्य आहे.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

गेल्या 47 वर्षांच्या उपलब्ध सांख्यिकी माहितीचा विचार करावा लागतो. राज्याच्या स्थूल उत्पन्नात 1960-61 मध्ये उद्योग क्षेत्राचा वाटा 23 टक्के होता. तो 25 टक्क्यांनी घटला आहे. आपल्याला हे मान्य करावे लागेल. कारण कारखाने बंद पडत आहेत. लोडशेडिंग या एकमेव कारणामुळे उद्योग बंद पडत आहेत. मजुरांची काय परिस्थिती आहे? आता कायम मजुरी नाही. शेतीची उद्ध्वस्तता झालेली आहे. आता कॉन्ट्रॅक्ट लेबर पध्दत आली आहे. कायम नोकरी गेली.

सभापती महोदय, उर्जा क्षेत्राबद्दल बोलायचे झाले तर सगळीकडे अंधारच आहे. तो तुम्हा आम्हा सर्वांना मान्य आहे. 2012 सालचे आश्वासन दिले होते. पाचव्या पंचवार्षिक योजनेपर्यंत राज्याचा उर्जा क्षेत्राचा वाटा उत्तम होता. हा उर्जा क्षेत्रात पाचव्या पंचवार्षिक योजनेत थेट केला गेलेला खर्च 34.2 टक्क्यावरुन दहाव्या पंचवार्षिक योजनेत 9.6 टक्क्यावर आला आहे. राज्याची वाढती विजेची मागणी आणि उत्पादन यातील तफावत ही कायम चिंतेची बाब राहिली आहे. सदनामध्ये या संदर्भात आम्ही चर्चा उपस्थित केली होती. सन्माननीय तत्कालीन उर्जामंत्री श्री.दिलीप वळसे पाटील यांनी काय आश्वासन दिले होते ते मी मुद्दाम जपून लॅमिनेट करुन ठेवले आहे. Minister Mr.Dilip Valse Patil on 10th March, 2005 at the time of Governor's Address इंग्रजीमध्ये काय म्हटले होते, "I will get you the power 10,000 MW by 2010." शासनाने या सदनामध्ये 2005 साली हे आश्वासन दिले होते. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी सांगितले की, इतकी वर्षे तुमची सत्ता आहे, मग तुम्ही का विजेचे उत्पादन वाढविले नाही? कोणते प्रकल्प आणले? केवळ भूलथापा द्यायच्या. फसवाफसवी करायची, वेळ निभावून न्यायची. उर्जा क्षेत्रात फार गंभीर पेचप्रसंग निर्माण झालेला आहे. 34.2 टक्क्यावरुन 9.6 टक्क्यावर थेट खर्चाचे प्रमाण आलेले आहे.

दळणवळणाच्या दृष्टीने रेल्वे हा अतिशय महत्वाचा भाग आहे. 1960 नंतर राज्यात 31 मार्च, 2008 पर्यंत 5917 कि.मी.लोहमार्ग तयार करण्यात आला. त्यात किती वाढ झाली? फक्त 677 कि.मी.इतकी वाढ झाली. म्हणजे 13 टक्के वाढ झाली. त्यात कोकण रेल्वेचा 283 कि.मी. लांबीचा भाग वगळता 394 कि.मी. इतकी वाढ झाली. देशाच्या पातळीवर ही वाढ नगण्य आहे. देशाचा यंदाचा अर्थसंकल्प पाहिला तर असे दिसून येईल की, गेल्या 10 वर्षात महाराष्ट्राला कायम वंचित ठेवले गेले आहे. जोपर्यंत रेल्वे विस्तारीत होत नाही तोपर्यंत मागासलेल्या भागात

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

विकासाला गती येऊ शकत नाही. महाराष्ट्रातील एकूण रोजगाराची संख्या हा चिंतेचा विषय आहे. एका बाजूला शेतकरी हटला जात आहे. एका बाजूला कारखान्यांचे क्षेत्र उद्ध्वस्त होत आहे. बेकारांची संख्या वाढत आहे. मुंबईच्या सेवायोजन कार्यालयामध्ये 52 लाख सुशिक्षित बेरोजगारांची नोंदणी झालेली आहे. राज्याची एकूण रोजगाराची संख्या 5 वर्षात घटताना दिसून आली. 2005-06 मध्ये 4.30 कोटी रोजगाराची संख्या 2007-08 मध्ये 4.10 कोटीवर आली. 20 लाखांनी ही संख्या घटली. 2008-09 मध्ये मंदीचे वातावरण असल्यामुळे किमान 50 लाखाने घटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ही महाराष्ट्रातील रोजगाराची परिस्थिती आहे. दारिद्र्य रेषेखालील लोकांची परिस्थिती काय आहे? पिवळी शिधापत्रिका, श्वेत शिधापत्रिका, केशरी शिधापत्रिका, निळ्या घासलेटचा लिलाव असे वेगवेगळे प्रकार आहेत. राज्यातील दारिद्र्याचे प्रमाण 30.6 टक्के असून देशाचे प्रमाण 27.5 टक्के आहे. देशाच्या तुलनेत हे प्रमाण 3.2 टक्के आहे.

(नंतर श्री.खर्चे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

देशाच्या प्रमाणापेक्षा महाराष्ट्रातील दारिद्र्याचे प्रमाण हे प्रगत महाराष्ट्र म्हणजेच 3.2 टक्क्यांनी जास्त आहे. राज्यातील दारिद्र्यरेषेखालील लोकांची निव्वळ संख्या सन 1993-94 मध्ये जेवढी होती त्यापेक्षा 12.2 लाखाने वाढलेली आहे. महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने इंग्रजीत आपण स्वॅट विकनेस आपण म्हणतो. तसेच स्टेंन्थ, विकनेस, अपॉर्च्युनिटीज अँड थ्रस्ट म्हणजेच क्षमता, दुर्बलता, संधी आणि अडचणींचा पुन्हा नव्याने विचार व्हायला हवा अशी परिस्थिती राज्याच्या दारिद्र्याची आज निर्माण झालेली आहे. हा आमचा महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरा करीत असताना माननीय राज्यपाल महोदय सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या दृष्टीने या शासनाचे सन 2015 चे स्वप्न आम्हाला दाखवित आहेत तर कोणत्या पध्दतीने आम्ही त्याचे स्वागत करावे हा महत्वाचा प्रश्न आहे. मी जास्त बोलणार नाही. कारण जर्मन बेकरीत झालेल्या स्फोटाचा विषय समोर येणारच आहे. नेमका तिसऱ्या परिच्छेदात त्याचा उल्लेख करण्यात आलेला आहे. पुण्याचे पोलीस आयुक्त यांनी एक मिरवणूक काढली त्यावेळेस ते जे बोलले त्याची प्रत्येक पुणेकराला लाज वाटेल असे ते बोलले. मिरवणुकीत भाषण करताना ते म्हणाले की, जर्मन बेकरीत जो स्फोट झाला ती जबाबदारी जनतेने घ्यायला पाहिजे होती, जनतेने काळजी घ्यायला पाहिजे होती. जर राज्यात जनतेनेच अशी काळजी घ्यायची असेल तर पोलीस कशाला हवेत. असे असताना त्यावर कोणतीच प्रतिक्रिया उमटली नाही. ज्या जर्मन बेकरीतील स्फोटाने मृत पावलेल्या नागरिकांना आपण श्रध्दांजली वाहतो, अशी श्रध्दांजली वाहताना पोलीस यंत्रणेने तपास करुन आरोपीविंरुध्द गुन्हा दाखल केला असे सांगितले असते तर या देशाला तसेच राज्याला देखील पोलिसांच्या कामाचा अभिमान वाटला असता, सर्वांनी पोलीस दलाचे कौतूक केले असते. मी सर्वच मुद्यांना हात घालणार नाही तर सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांच्या आवडीचा जो विषय आहे त्याला जरुर स्पर्श करणार आहे. कारण तो गोरगरिबांच्या जीवनाशी निगडित असा प्रश्न आहे. तो म्हणजे पशु, दुग्धव्यविकास व मत्स्यव्यवसाय या क्षेत्रात 60 टक्क्यांनी वाढ करण्याचे ठरविले असे कोणत्या अधिकाऱ्यांनी दिले ते मला लिहून द्यावे. मी त्यांना सांगणार आहे की, मुंबईत दररोज 93 लाख लिटर दुधाची गरज आहे. शासनाचा उपक्रम असलेली आरे डेअरी हा बिझनेस नाही तर गोरगरिबांना स्वस्त भावात दूध पुरविण्यासाठी निर्माण केलेला हा उपक्रम आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

त्याची आज मूंबईत 1800 केंद्रे आहेत, खरे तर त्यात लोकसंख्येचा विचार करता वाढ करण्याची गाज आहे. अशा प्रकारे मुंबईची दररोजची 93 लाख लिटर दुधाची गरज असताना आरे डेअरीचे प्रॉडक्शन फक्त 1.25 हजार लिटर एवढे कमी का होत आहे याचा खुलासा होणे आवश्यक आहे. उर्वरित दूध कोणाचे येते ? कोण आहेत हे दूध माफिया ? या माफियांसाठी आरे सारखी डेअरी बंद पाडण्याचा विचार होत आहे काय ? कोणाच्या स्वार्थासाठी आरेची जमीन मोकळी करावयाची, हे काय षडयंत्र आहे ? आज आरे मध्ये जे जे चांगले प्रॉडक्ट्स होते ते मिळत नाहीत. आरेची लस्सी मिळत नाही, आरेची एनर्जी मिळत नाही, सर्व स्टॉल्स भकास पडले असून विजेचे बिल भरण्याची त्यांची सोय नाही. आपणा सर्वांनाच माहीत आहे की, ग्रामीण भागातील इतर खाजगी डेअऱ्यांनी शेतकऱ्यांना दुधाचे दर वाढवून दिले आहेत. शासनाचा कोणता अधिकारी आहे, त्याला एवढेही समजत नाही की जोपर्यंत शेतकऱ्याला एक-दोन रुपया वाढवून देणार नाही तोपर्यंत तो सरकारी डेअरीला दूध देणार नाही. तीन वर्षांपासून यासंबंधीची फाईल या अधिकाऱ्यांनी दाबून ठेवलेली आहे. अशा अधिकाऱ्यांना धडा शिकविला पाहिजे. ज्या गरिबांच्या तोंडात दूध घालण्यासाठी ही सरकारी योजना आहे ती फाईल अजून मंजूर होत नाही, जसे या अधिकाऱ्याच्या खिशातूनच जाणार आहे, हा खर्च आरे डेअरी करणार आहे, आरेचाच उद्योग आहे परंतु आरे डेअरी कशी नुकसानीत जाईल यासाठी हे सर्व षडयंत्र रचलेले दिसत आहे. माननीय गडकरी साहेब अर्थ खात्यावर म्हणूनच ताशेरे ओढत होते. ते कुठलीही फाईल अडवूनच ठेवतात, हा त्यांच्या बापजाद्याचा धंदा आहे म्हणूनच हे सर्व चालले आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

सभापती महोदय,आज आरे डेअरीचा धंदा बसलेला आहे, आरे डेअरी कशी नुकसानीत जाईल याचे षड्यंत्र रचले जात आहे. आरे डेअरीत आता भ्रष्टाचार चांगलाच बोकाळला आहे.

सभापती महोदय, सांगलीमध्ये चार साडेचार लाख लिटर केमिकल दूध बनवून विकले जात होते. दूध विकणारी माणसे पकडली गेली परंतु त्या माणसांच्या मागचे सूत्रधार सापडले नाही. सांगलीतील केमिकल दूध शहरामध्ये आणून विकले जात होते. दुधात पाणी घालून दूध विकले जात होते हे आपण ऐकले होते परंतु सांगलीमध्ये तर नकली केमिकल दूध विकले जात होते. दुधाचा तुटवडा निर्माण झाल्यानंतर दूध माफियांची दादागिरी वेगळ्या पध्दतीने निर्माण झाली आहे. हे नकली दूध खुद्द गृहमंत्री महोदयांच्या सांगलीमधून येत होते, माननीय मंत्री महोदय डॉ. पतंगराव कदम यांच्या सांगलीमधून येत होते आणि माननीय मंत्री महोदय श्री.जयंत पाटील यांच्या सांगलीमधून येत होते.मोठया प्रमाणात केमिकल दूध येत असतांना या ठिकाणी माननीय राज्यपाल महोदय, आपल्या अभिभाषणात म्हणतात की, दूध उत्पादनात 6 टक्क्याने वाढ व्हावी म्हणून स्वयंसेवी संस्था आणि ग्रामीण प्रशिक्षित रोजगार निर्माण करणार असे सांगतात. परंतु हे कसे काय शक्य आहे?

सभापती महोदय, मी काही दिवसापूर्वी भेसळ दुधाच्या संदर्भात एक लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती आणि सर्व पुरावे तत्कालीन मंत्रीमहोदयांना दिल्यानंतर माननीय मंत्रीमहोदयांनी एकंदर पाच अधिकारी निलंबित केले होते. शासकीय दुग्ध व्यवस्थापक, परभणी या ठिकाणी सहाय्यक पदावर असणारे श्री. मोरे आणि त्यांच्याबरोबर चार अधिका-यांना तत्कालीन मंत्रीमहोदयांनी सदनात निलंबित केले होते. भेसळ सिध्द झाल्यानंतर मोरे यांच्यावर जीवनावश्यक वस्तू कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करावयास पाहिजे होता परंतु या शासनात काय चालले आहे, शासनावर पकड कोणाची आहे हे काही सुध्दा समजत नाही. अधिकारी अडचणीत आला, त्याने बॅग पोहचवली की, त्याच्यावरचे सर्वच गुन्हे रद्द होतात. परंतु मोरे यांचे निलंबन रद्द करुन त्यांना प्रमोशन देऊन त्याला सहाय्यक प्रदेश दुग्ध व्यवस्थापक म्हणून त्याची नेमणूक संभाजीनगर येथे करण्यात आली. या मोरेची नेमणूक श्री. आडे नावाच्या एका भ्रष्ट अधिका-याने केली होती. आडे यांचे भयानक प्रताप आहेत. मी माननीय मंत्रीमहोदयांना सांगितले होते की, तुम्हाला तुमचे खाते योग्य रितीने चालवावयाचे असेल तर तुम्ही श्री.आडे पासून लांब राहिले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

पाहिजे. कारण मी श्री. आडे यांचे या सभागृहात वस्त्रहरण करणार आहे. जर श्री.आडे नावाचा अधिकार असेल तर तुमचा दुग्ध व्यसाय कसा वाढणार हे मी माननीय मंत्रीमहोदयांना सांगणार आहे. आज जो दुग्ध व्यवसाय आहे तोच आता लयाला चालला आहे.

सभापती महोदय, माननीय पंतप्रधांनी विदर्भातील सहा जिल्हयांसाठी पॅकेज दिल होते याची माहिती आपल्या सर्वांना आहे. त्यामध्ये किती भ्रष्टाचार झाला तो भाग वेगळा आहे. माननीय पंतप्रधानांनी माणुसकीच्या दृष्टिकोनातून पॅकेज दिलेले होते. माननीय नितीन गडकरी साहेब आणि मी नेहमी सांगत असू की, आत्महत्या ग्रस्त शेतक-याच्या कुटुंबाला शासनाने एक लक्ष रुपये न देता अधिक मदत दिली तर चांगले होईल. जो गेला आहे तो कशाने गेला आहे याच्या फंदात न पडता जे कुटुंब उघडे पडले आहे त्यांना शासन केवळ 1 लक्ष रुपये मदत देते. परंतु तुम्ही दारु गाळणा-या कारखान्यांना 1200 कोटी रुपये देण्यास निघाले आहात आणि आत्महत्या केलेल्या, उद्ध्वस्त झालेल्या कुटुंबाला जास्त मदत केली तर त्यासाठी केवळ 20 कोटी रुपये शासनाला खर्च येणार होता परंतु उद्ध्वस्त झालेल्या कुटुंबाना 20 कोटी रुपये देण्यासाठी शासनाकडे पैसे नाहीत. दारु गाळून महाराष्ट्राला दारुच्या पुरात वाहायला निघालेल्या तथाकथित सगळया काँग्रेसच्या पुढा-यांना अनुदान देऊन महाराष्ट्र लुटावयास तुम्ही निघाले आहात. कोणत्या कारखान्यांना अनुदान दिलेले आहे त्यांचे मी नाव सांगण्यास सुध्दा तयार आहे. (अडथळा) पहिला हप्ता माननीय विलासरावांच्या मुलांकडे गेलेला आहे. मला जास्त बोलावयास लावून नका. अन्नधान्यापासून दारु गाळणा-या सर्वांचा मी निषेध करतो. आपण एकाकडे जे बोट दाखवता पण बाकीची चार बोटे तुमच्याकडे आहेत, हे विसरु नका,

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ MMP/ D/ KTG/ प्रथम श्री.जुन्नरे 16.55

श्री.दिवाकर रावते ...

आमचे नेते जरी त्यात असले तरी आम्ही त्यांचा निषेध केला असता.शेतक-यांना उघडयावर टाकलेले असल्यामुळे दारुच्या विषयावर आम्ही बोलणारच. ज्वारी पासून, मक्यापासून शासनाला दारु गाळावयाची आहे. त्यासाठी 1200 कोटी रुपयांचे शासनाने अनुदान दिले आहे. परतु आत्महत्याग्रस्त शेतक-याच्या कुटुंबियासाठी 20 कोटी रुपये मागितले असता ते मिळणार नाहीत असे सांगण्यात आले आहे. त्या शेतक-याला दारुचे व्यसन असल्यामुळे त्याने आत्महत्या केली असेही सांगितले गेले. तत्कालीन महसूल मंत्र्यांनी असा खुलासा केला होता की, हा शेतकरी दारु पिऊन मेला होता व तो खुलासा रेकॉर्डवरसुध्दा आहे. सभापती महोदय, या गोष्टी आम्हाला न पटणा-या आहेत. माणुसकीचा पाझर फुटणारा एक आदेश शासनाने काढला होता. ज्या शेतक-यांने आत्महत्या केली आहे त्या शेतक-याच्या घरातील मुलगी वा त्याची विधवा पत्नी सक्षम असेल तर तिला अंगणवाडी सेविकेच्या पदावर सामावून घेण्यात यावे अशा प्रकारचा आदेश दिनांक 13 जुलै 2006 रोजी काढण्यात आला होता..अकोला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती अश्विनी जोशी या नुकत्याच या पदावर रुजू झाल्या असून त्यांनी या शासन निर्णयाप्रमाणे अंमलबजावणी केली म्हणून मी स्वत: अकोला येथे जाऊन शाल व श्रीफळ देऊन त्यांचे अभिनंदन केले होते. त्यावेळी त्या मला असे म्हणाल्या की," तुम्ही कशासाठी आला आहात तेव्हा मी त्यांना सांगितले की," या सदर्भात तुम्ही जे काही चांगले काम केले आहे हे मला कळल्याबरोबर मला रहावले नाही म्हणून तुमचे अभिनंदन करण्यासाठी मी आलो आहे." शासनाने काढलेल्या या जीआरचा अर्थ त्या एकटया महिल्या अधिका-यांनी लावला आणि 50 आत्महत्याग्रस्त शेतक-याच्या कुटुंबियातील महिलांना अंगणवाडी सेविका म्हणून रुजू करुन घेतले होते. 2006 साली या संबंधीचा जीआर काढण्यात आला असून आता 2010 साल सुरु आहे. फक्त श्रीमती अश्विनी जोशी यांनी या जीआरचा योग्य अर्थ लावून उद्ध्वस्त झालेल्या कुटुबियांना आधार देण्याचे काम केले आहे.बाकीच्या अधिका-यांनी त्याप्रमाणे काम का केले नाही याबाबातीत शासन त्यांना विचारणा करणार आहे काय ? माननीय पंतप्रधानांनी दिलेले हे आदेश आहेत ना ? आपल्या नेतृत्वासबंधी आम्ही जरा उल्लेख केला तरी तुम्ही ताडकन उभे राहून बोलता परंतु या आदेशाचे पालन न करणा-या अधिका-यांच्या कानफटात मारण्याचे सामर्थ्य तुम्ही दाखविणार आहात किंवा नाही ? श्रीमती अश्विनी जोशी यांचे मी जाहीरपणे अभिनंदन करीत असतांना अंगणवाडी

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ MMP/ D/ KTG/ प्रथम श्री.जुन्नरे 16.55

श्री.दिवाकर रावते ...

सेविकांचे मानधन वाढविण्याचा निर्णय शासनाने घेतला होता.त्या बाबतीत मला एक मुद्दा मांडावयाचा आहे. त्याबाबतीत सुध्दा गोंधळ निर्माण झाला आहे. अशा पध्दतीने आपण सरकार चालवित आहात की मस्करी करीत आहात ?. अंगणवाडी सेविकांचे मानधन वाढविण्याचा निर्णय कॅबिनेटमध्ये घेण्यात आला होता. माननीय मंत्री श्री जयदत्त क्षीरसागर यांना मी विचारु इच्छितो की, आपण कॅबिनेटच्या बैठकीमध्ये उपस्थित असता ना ? सभापती महोदय, अंगणवाडी सेविकांना नोकरी देण्यांसबंधीचा विषय आम्ही गाभीर्याने घेत आहोत. शासनाने त्यासबंधी जीआर काढला परंतु त्याची अंमलबजावणी मात्र झाली नाही. अंगणवाडी सेविकांचे मानधन साडे सहा हजार रुपये करण्यात आल्याचा मेसेज आमच्या मोबाईलवर आला होता तेव्हा आम्हाला असे वाटले की, ठीक आहे शासनाने काही तरी त्यांच्यासाठी केले आहे. मंत्रिमंडळाने असा निर्णय घेतल्याच्या बातम्या टी.व्ही.वर सुध्दा सांगण्यात आल्या होत्या. त्यानंतर दीड दिवस शासन गप्प राहिले . अंगणवाडी सेविकांचे शासनाने भले केले आहे असा मेसेज लोकांपर्यत गेला होता परंतु नतर माननीय मुख्यमंत्र्यांनी असे जाहीर केले होते की, अशा प्रकारचा निर्णयच झाला नाही. तेव्हा यांसंबंधी कॅबिनेटमध्ये निर्णय घेण्यात आल्याची चुकीची प्रेस नोट अधिका-याने दिली होती. त्यामुळे संपूर्ण राज्यातील अंगणवाडी सेविकांनी फटाके वाजविले होते व जल्लोष केला होता त्याच वेळी जागतिक महिला दिन जवळ येत असल्यामुळे महिलांना 33 टक्के जागा राखीव ठेवण्यांसंबंधीचे विधेयक पास करण्यासंबंधीची चर्चा सुरु होती. वेगळया आनंदाचे उमाळे आले होते परतु अंगणवाडी सेविकांच्या मनधनात वाढ करणारा निर्णय घेण्यात आलाच नव्हता असे कपाळ करंटेपणाने माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते.अशा प्रकारे चुकीची बातमी प्रसिध्द करण्यात आली होती तेव्हा संबंधित अधिका-याविरुध्द कारवाई करण्यात आली होती काय याबाबतीत उत्तरामध्ये खुलासा करण्यात यावा असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. महाराष्ट्रातील लक्षावधी दीन दुबळया अंगणवाडी सेविका आपल्या मानधनात वाढ होईल या अपेक्षेने शासनाकडे पहात असतांनाs त्यांचा अपेक्षा भंग करणाऱ्या अधिका-यांविरुध्द काय कारवाई करण्यात आली ?

नंतर श्री.सरफरे

अशुद्धित प्रत / मुद्रणेसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

मंत्रिमंडळाच्या ब्रीफ नोटमध्ये चुकीची माहिती कशी दिली जाते? अशाप्रकारचा दूधखुळा कारभार तुमच्या प्रशासनामध्ये निर्माण झाला आहे काय? सच्चर आयोग हा आपला आवडता विषय आहे. "सच्चरकी सच्चाई कैसी है?" बीन मिशीवाल्या दाढया आणि लांडे, तोकडे लेंगे यांचे तुम्हाला फार कौतुक आहे?

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : माननीय सदस्य श्री. रावते साहेब तुमच्या बाजूचे माननीय सदस्य श्री. पाशाभाई हे तुमच्या आघाडीमध्ये होते, परंतु त्यांना वाटले की, त्यांच्यासाठी मुभा नाही...

श्री. दिवाकर रावते : माननीय सदस्य श्री. पाशाभाई हे त्यांच्या जातीला जागले...

श्री. सुरेश नवले : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेब असे म्हणाले की, "तुम्हाला दाढी आणि लांडे तोकडे लेंगे याविषयी जास्त आस्था आणि प्रेम आहे." ही वाक्ये रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात यावीत असा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

तालिका सभापती (श्री.जयप्रकाश छाजेड) : माननीय सदस्यांनी असे बोलू नये...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, तर मग यापुढे मी कुणाच्याही धर्माचा उल्लेख केल्यानंतर आपण चिडू नका. मुसलमानांचे लाड कां करता? असे बोलल्यानंतर आपण चिडू नका.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : आपल्याला चांगल्या भाषेमध्ये बोलता येईल...

श्री. दिवाकर रावते : मी अल्पसंख्यांक म्हणणार नाही. याचे कारण घटनेप्रमाणे अल्पसंख्यांकामध्ये फक्त मुसलमान नाहीत. तुमच्या दृष्टीने अल्पसंख्यांक फक्त मुसलमानच हे या देशाचे दुर्दैव आहे. या लोकांचा आपल्यावर किती पगडा असावा? सभापती महोदय, वर्तमानपत्रामध्ये छापून आलेला न्यायालयाचा एक निकाल माझ्या वाचनात आला. नवी मुंबईमधील हिंदू वस्ती असलेल्या नेरुळ भागामध्ये बेकायदेशीर बांधण्यात येत असलेल्या मशिदीचे बांधकाम सिडकोने पाडावे याकरिता शिवसेनेची श्रीमती सुमित्रा कडू ही भगिनी कोर्टामध्ये गेली. तिने सांगितले की, या भागामध्ये फक्त तीनच मुस्लिम कुटुंबे आहेत. असे असतांना क्रीडांगणाच्या जागेवर बेकायदेशीर मशीद उभी रहात आहे. धर्मस्थळाबाबत बोलल्यामुळे कोर्टाने तिला फटकारले. कोर्टाला हे माहीत नाही की, ते मशिदीचे बांधकाम बेकायदेशीर आहे? ही बाब कोर्टाच्या लक्षात आणून दिल्यानंतर कोर्टाने ते बांधकाम थांबविले आणि पुढील कारवाईसाठी तारीख दिली. शासनाला प्रतिज्ञापत्र सादर करण्यास कोर्टाने सांगितले. अशीच बेकायदेशीर पंचतारांकित मोठी मशीद ठाण्यामध्ये उभी राहिली

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ KGS/ KTG/ MMP/

श्री. दिवाकर रावते....

आहे. ते प्रकरण अजून गाजत आहे. त्या मशिदीवरील भोंगे आपण अजूनपर्यंत कां बंद करीत नाही? हायकोर्टाचा निर्णय असतांना तुम्ही भोंगे कां बंद करीत नाही? काल माननीय विरोधी पक्ष नेत्यांकडे अक्कलकोटचे आमदार सन्माननीय श्री. सिद्रामप्पा पाटील आले होते. त्यांनी सांगितले की, भाऊ पोलिसांचे अत्याचार सुरु आहेत. त्या गावामध्ये रात्री 11 वाजता नाटक सुरु होते व सकाळी 5 वाजता संपते. ग्रामीण भागातील ते नाटक सुरु असतांना पोलीस दांडके आपटत ते नाटक बंद करण्यास गेले. रात्री दहा नंतर अजिबात नाटक करायचे नाही असे म्हणाले. रात्री दहाच्या नंतर ध्वनिक्षेपक लावायचा नाही तर मग त्या मशिदीवरील भोंगे कां बंद करीत नाही? तुम्हाला हायकोर्टाच्या, सुप्रिम कोर्टाच्या ऑर्डर्स आहेत ना? ते तुम्हाला चालतात कां? त्याठिकाणी कां लेंडया टाकता? तुम्ही लाज वाटून घेऊ नका, आणि माझे श्रेष्ठत्व पण काढू नका. ही तुमची वागणूक इतर धर्मियांकरिता नाही तर मुस्लिम धर्मियांना तुम्ही अल्पसंख्यांक म्हणता. आणि म्हणून घटनेमध्ये असलेल्या इतर अल्पसंख्यांकांचा अपमान व्हावयास नको म्हणून त्यांना मुसलमानच बोलावे लागते. तुम्ही मुसलमानांचे किती लाड करणार आहात? याठिकाणी माननीय राज्यपाल महोदय सांगत आहेत की, नागपूरच्या हज हाऊसचे काम पूर्ण होत आले आहे. त्याबद्दल तुम्हाला अभिमान आहे. औरंगाबाद येथे हज हाऊस बांधण्याकरिता 4 कोटी रुपये मंजूर केले आहेत. माननीय राज्यपालांचे अभिभाषण असल्यामुळे जास्त अपमानित होऊन बोलता येत नाही.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुद्धीत प्रत/ शीघ्रलेखनासाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

सभापती महोदय, गावा-गावामध्ये मुस्लिम पैदास निर्माण करा आणि शासनाचे फायदे लूटा. . . . .

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : माननीय सभापति महोदय, मेरा पाइंट ऑफ आर्डर है. मेरा कहना है कि माननीय सदस्य बार-बार मुस्लिम, मुस्लिम शब्द बोल रहे हैं. यह सब क्या चल रहा है. यह माननीय सभागृह है या कुछ और है ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हे भाषण आहे. मी बोलतो ते या पुस्तकामध्ये आहे. मी वाक्य वाचून दाखवतो.

श्री जैनुद्दीन जव्हेरी : हमारा यही कहना है कि हमारे समाज के बारे में आप इस तरह से मत बोलिए.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी या पुस्तकामध्ये आहे ते वाचतो.

श्री जैनुद्दीन जव्हेरी : इसमें मुस्लिम शब्द का उल्लेख कहीं पर नहीं है, यही मेरा पाइंट ऑफ आर्डर है.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, परंतु ते पुस्तकामध्ये आहे.

श्री जैनुद्दी जव्हेरी : मुस्लिम शब्द का उल्लेख कहीं पर भी नहीं है.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, यह भाषण में लिख कर दिया है.

श्री जैनुद्दीन जव्हेरी : साहब आप भाषण पढ़ कर देखिए. मुस्लिम शब्द कहीं पर भी नहीं लिखा है. (अडथळा)...

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मै भाषण पढता हूँ. मैं माननीय सदस्य को कहूंगा कि आप चिल्लाओ मत.

तालिका सभापती (श्री.जयप्रकाश छाजेड) : सन्माननीय सदस्य श्री.जव्हेरीसाहेब, आपण जागेवर जावे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांना . . . .

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सभापति महोदय, इसमें कहीं पर भी मुस्लिम शब्द का उल्लेख नहीं है. अल्पसंख्यकों में हिंदू, मुस्लिम, क्रिश्चियन, सिख आदि धर्मों के लोग आते हैं. यदि कहीं पर माननीय हाई कोर्ट ने कोई आदेश दिया है तो वह ठीक है.लेकिन माननीय सदस्य द्वारा बार-बार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जैनुद्दीन जव्हेरी ....

इस तरह से मुस्लिम शब्द का उल्लेख करना ठीक नहीं है. हम मंदिरों के बारे में नहीं बोल सकते क्या ? उस बारे में हम कभी कुछ नहीं बोलते. लेकिन आप हमेशा मस्जिद, मस्जिद शब्द बोलते रहते हैं.हम हमेशा आपकी इन बातों को सहन करते रहते हैं. हमारे माननीय मंत्री महोदय भी यहां पर चुप बैठे हुए हैं.

(सन्माननीय सदस्य श्री.जैनुद्दीन जव्हेरी आपली जागा सोडून पुढे येतात.)

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री.जैनुद्दीन जव्हेरी यांनी आपल्या जागेवर जावे.

(काही सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात.)

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय,....(अडथळा) ....

श्री जैनुद्दीन जव्हेरी : माननीय मंत्री महोदय, अब मुझे अपनी बात पूरी कर लेने दीजिए. मेरा कहना यही है कि अल्पसंख्यक समाज में अनेक धर्मों के लोग आते हैं. माझा हरकतीचा मुद्दा आहे. माझी एकच विनंती आहे की, हे सभागृह आहे आणि आपली जी घटना आहे त्यामध्ये सर्व धर्मिय एक आहेत. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब, हे जाणुनबुजून एका समाजाला बदनाम करण्यासाठी "मुस्लिम मुस्लिम" असा सतत उल्लेख करीत आहेत. ते असे कसे म्हणू शकतात. मस्जिद असेल तर ती मुसलमानांची आहे. कोणत्याही धर्माच्या लोकांचे पूजा करण्याचे जे ठिकाण असते, ते बांधण्यासाठी जर परवानगी घेतली नसेल तर ते बांधू नये. त्याकरता परवानगी घ्यावयास पाहिजे. परंतु तसे न करता जर बांधण्यात येत असेल तर त्यावर कारवाई करा. त्यासाठी सरकार आहे.सन्माननीय सदस्यांचा सरकारवर विश्वास नाही काय ? त्यांचीही राज्यामध्ये काही वर्षे सत्ता होती. तेव्हा काय झाले ? तेव्हा सन्माननीय सदस्यांनी बोलताना मुस्लिम समाज असे म्हणावे पण सतत मुस्लिम-मुस्लिम-मुस्लिम असा जो उल्लेख केला जातो तो बरोबर नाही. शासनाच्या अल्पसंख्यांकांच्या यादीमध्ये कोठेही मुस्लिम असा उल्लेख नाही. आता मी चंद्रपूर येथील उदाहरण सांगतो . . . .

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जैनुद्दी जव्हेरी ...

माझा हरकतीचा मुद्दा आहे की, सन्माननीय सदस्यांची वाक्ये कामकाजातून काढून टाकावीत. सरकार असे चालते काय ? येथे उपस्थित असलेले माननीय मंत्री महोदय देखील चूपचाप बसलेले आहेत.

तालिका सभापती : माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मला असे वाटते की, आपण सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेबांच्या भाषणातील तेवढाच मजकूर कामकाजातून काढून टाकला पाहिजे. आपण गावा-गावामध्ये. . . .

श्री.दिवाकर रावते : मी बोललो आहे, घाबरतो काय ?

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, ते रेकॉर्डवर येणे चुकीचे होईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मग माझे भाषणच काढून टाकावे. मी येथे भाषण करीत आहे, मला बोलू द्यावे. त्यानंतर मग जे काही काढावयाचे असेल तर ते काढा. जे भाषणात आहे, ते मी वाचून दाखवतो.

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, आम्ही देखील माननीय राज्यपालांचे भाषण वाचलेले आहे. पण एखाद्या समाजाच्या भावना दुखावतील असे काही होता कामा नये. विरोधी पक्षाच्या बाजूला सुध्दा मुस्लिम समाजातील सन्माननीय सदस्य आहेत. हे सरकार सर्व जाती-धर्मांना समानतेची वागणूक देत आहे.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय वडेट्टीवार .....

मघाशी सन्माननीय विरोधी पक्षे नेते श्री. फुंडकर साहेब म्हणाले की, याच सरकारने गजानन महाराजांच्या मंदिरासाठी सुध्दा पैसे दिले. याच सरकारने देहू आळंदीसाठी सुध्दा पैसे दिले. या राज्यात असणाऱ्या मुस्लीम समाजाकरिता हज या पवित्र स्थळी जाण्यासाठी एखादी 4 कोटी रुपयांची वास्तू बांधली. या ठिकाणी सर्व समाजांचा, सर्व धर्मांचा सन्मान करणे हे सरकारचे कर्तव्य आहे आणि सरकार त्यादृष्टीने काम करीत आहे. पण एखाद्या समाजाच्या भावनांचा उद्रेक किंवा भावना भडकवियाचे काम या सभागृहामध्ये होता कामा नये. म्हणून माझी अशी विनंती आहे की, अशा प्रकारचे जे काही रेकॉर्डवर आले असेल तर ते आपण काढून टाकावे.

श्री. एस. क्यू. जमा : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहब अच्छा बोलते है, माननीय सदस्य स्टडी करके बोलते हैं. वह अब राज्यपाल महोदय के अभिभाषण पर बोल रहे हैं, अच्छी बात है. यह उनका अधिकार भी है. लेकिन राज्यपाल महोदय के अभिभाषण में 50 नंबर का जो पाइंट है उस में बताया गया है कि सरकार ने अल्पसंख्यकों के लिए क्या-क्या किया है. इसमें मुस्लिम शब्द का कहीं पर भी इस्तेमाल नहीं किया गया है. अंग्रेजी भाषा में मॉयनारिटीज शब्द का इस्तेमाल किया गया है और मराठी भाषा में अल्पसंख्यांक शब्द का इस्तेमाल किया गया है. मेरा कहना है कि मॉयनारिटीज एक्ट में मॉयनारिटीज को डिफाइन किया गया है. उसमें बताया गया है कि मॉयनारिटीज में कौन कौन से धर्म के लोग आते हैं.उसमें मुस्लिम, पारसी, क्रिश्चियन, सिख तथा जैन धर्म के लोग आते हैं. यहां पर माननीय राज्यपाल महोदय ने अपने अभिभाषण में मॉयनारिटीज शब्द का इस्तेमाल किया है तथा मराठी भाषा में अल्पसंख्याक शब्द का इस्तेमाल किया है Nowhere he had used the word 'Muslim' आप यहां पर बार-बार हज हाऊस की बात कर रहे हैं.

तालिका सभापति (श्री जयप्रकाश छाजेड): आपका पाइंट ऑफ आर्डर क्या है, वह आप बताइए ?

श्री. एस. क्यू. जमा : हमारा कहना यही है कि माननीय सदस्य को यहां पर मॉयनारिटी शब्द का इस्तेमाल करना चाहिए. उनकी बोलने की जो भाषा है उससे गलत पोस्चरिंग हो रही है. वह इन्सल्टिंग है. ऐसा यहां पर नहीं होना चाहिए. हज हाऊस धार्मिक विषय नहीं है. आज सुबह

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एस. क्यू. जमा जारी...

यहां पर गजानन महाराज के बारे में बात हुई कि महाराष्ट्र सरकार ने वहां पर पैसे दिए हैं. हम भी मानते हैं कि वह सोशल सिम्बॉलिक है. जब हम डॉ. बाबासाहब आंबेडकर और बौद्ध धर्म की बात करते हैं तो वह भी सिम्बॉलिक है. सरकार मस्जिद बनाने के लिए पैसा नहीं देती है, या मंदिर बनाने के लिए पैसा नहीं देती है बल्कि उसके आसपास का जो एरिया होता है उसके विकास के लिए पैसा देती है. हज हाऊस सिम्बॉलिक है. हमारे 5 देशी प्रिंसिपल्स में से एक प्रिंसिपल है और उसका आप इस तरह से मजाक उड़ायेंगें या असम्मान करेंगे तो क्या उससे हमारी फीलिंग हर्ट नहीं होगी. हम माननीय सदस्य का सम्मान करते हैं, उनको जितना बोलना हैं बोलें लेकिन माननीय सदस्य यदि मुस्लिम समाज को सिंगल आऊट करेंगे तो उस पर हमारा आक्षेप है.

तालिका सभापती (श्री. जयप्रकाश छाजेड) : इतर समाजाच्या भावना दुखावल्या जाणार नाहीत याबद्दल सर्व सन्माननीय सदस्यांनी काळजी घेतली पाहिजे. काही आक्षेपार्ह मुद्दे असतील तर ते तपासून पाहून कामकाजातून काढून टाकण्यात येतील.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या अभिभाषणातील उल्लेख मी वाचून दाखविणार आहे. मला दोन्ही सन्माननीय सदस्यांना सांगावयाचे आहे की, आपण रेकॉर्ड काढून बघावे. मी हज हाऊसच्या बाबतीत कोणतीही तक्रार नोंदविली नाही. या ठिकाणी गौरवाने उल्लेख करताना मी मंत्रिमहोदयांना सांगितले की, आपण अधिकाऱ्यांना दणकवा हे सांगण्याची पाळी येते. मी सन्माननीय सदस्यांना मघाशी म्हणालो की, या देशामध्ये केवळ मुलसमान हेच अल्पसंख्यांक नाहीत.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

घटनेप्रमाणे इतरही समाजाचे लोक अल्पसंख्याक आहेत. परंतु शासन मात्र केवळ मुसलमान समाजासाठीच योजना राबविते. अशाप्रकारे मी आग्रहाने बोललो त्याचे कारणही सांगतो. माझ्या दोन्ही सन्माननीय मी मित्रांना सांगतो की, यामध्ये इतरही अल्पसंख्याक येत असतील तर मला आनंद होईल. परंतु ते यामध्ये नाहीत. या अभिभाषणातील मुद्दा क्रमांक 50 मध्ये असे नमूद केले आहे की, "सच्चर समितीच्या शिफारशीच्या अनुषंगाने, सच्चरमध्ये फक्त मुसलमान येतात ना ? (अडथळा) हम आपका सम्मान कर रहे हैं तो भी आप हमको गलत समझ रहे है. मी या परिच्छेदातील पुढील मजकूर वाचतो. "माझ्या शासनाने राज्यातील अल्पसंख्याकांचे कल्याण व विकास यासाठी अनेक प्रभावी पावले उचलली आहेत. अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी मोफत गणवेष, उपस्थिती भत्ता व शिष्यवृत्ती देणे यांसारख्या विविध योजना राबविण्यात येत आहेत. औद्योगिक प्रशिक्षण संस्था व तंत्रनिकेतने यामार्फत अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना दर्जेदार तंत्रशिक्षण देण्यासाठी अनेक उपाययोजना करण्यात येत असून बेरोजगार अल्पसंख्याक युवकांसाठी रोजगाराभिमुख प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ, मौलाना आझाद हे मुसलमान होते हा माझा दोष नाही.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : श्री.मौलाना आझाद जैसे लोग बडे लोग थे.

श्री.दिवाकर रावते : श्री.मौलाना आझाद बडे लोग थे, इसी लिए आप हिंदुस्थान में हैं. देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढलेले श्री.मौलाना आझाद हे मोठेच होते. त्यांचा कशासाठी अपमान करायचा ? मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळामार्फत आतापर्यंत ज्यांना आर्थिक मदत दिली त्याची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवावी आणि मग आम्हाला छातीवर हात ठेवून सांगावे.

श्री.भाई जगताप : ती यादी सभागृहामध्ये ठेवल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे सभागृहाची माफी मागणार आहेत काय ?

श्री.दिवाकर रावते : त्याची टक्केवारी आम्ही बघू. त्या यादीमध्ये 99 टक्के मुसलमान असतील आणि 1 टक्का अन्य लोक असतील. (अडथळा) मी हा परिच्छेद वाचत असताना माझ्या बोलण्यामध्ये अडथळा आणला जात आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप, आपको दुख क्यो हो रहा है ? मग मला आठवण करुन दिली पाहिजे. तुम्ही तुमच्या लोकांकरिता काम करत आहात त्याबद्दल मला तुमचा अभिमान वाटतो.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, उद्या राज्यपालांच्या अभिषाणावर किती तास चर्चा होणार आहे याबाबत आपण निदेश दिलेले आहेत. उद्या काही सन्माननीय सदस्य दोन तास बोलतील आणि बाकीच्या सदस्यांना 5-5 मिनिटे मिळतील असे होऊ नये. म्हणून उद्याच्या चर्चेचे नियोजन केले पाहिजे. एका सदस्यांना एक तास आणि दुस-या सदस्यांना 2 मिनिटे असे होऊ नये इतकाच माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, समोरच्या बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी माझ्या भाषणातील 20 मिनिटांचा वेळ वाया घालविलेला आहे. तेवढा वेळ मला दिला जाणार आहे काय ?

तालिका सभापती (श्री.जयप्रकाश छाजेड) : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना मी सांगतो की, आपल्याकडे कमी वेळ राहिलेला आहे. अभिभाषणावर आणखी काही सन्माननीय सदस्यांना आपले विचार मांडावयाचे आहेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी माझ्या भाषणातील शेवटचा मुद्दा मांडत असताना माझ्या भाषणात अडचणी निर्माण केल्या जात आहेत. मी अभिभाषणातील परिच्छेद वाचून दाखवित आहे....

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या सभागृहामध्ये कोणती माहिती पटलावर ठेवली जाईल हे शासनाच्यावतीने मंत्रिमहोदय सांगू शकतात. तर मग सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना मंत्री केले आहे काय ? सभागृहाच्या रेकॉर्डवर चुकीचे येऊ नये म्हणून मी सांगितले आहे.

यानंतर श्री.ओटवणेकर.....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, "पटलावर" हा शब्द मी वापरलेलाच नाही.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, मी हरकतीच्या मुद्यावर आहे. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांचा तसा पहिला तर कामकाजातील आजचा हा पहिलाच दिवस आहे. आम्ही पटलावर ठेवू असे माननीय सदस्य भाई जगताप म्हणाले आहेत. सदस्य म्हणून ते माहिती ठेवू शकतात. त्यांना माहिती पटलावर ठेवण्याचे अधिकार शासनाने दिले आहेत काय ? श्री.भाई जगताप यांना मंत्री होण्यासाठी आमच्या शुभेच्छा आहेत. माझ्या तर त्यांना व्यक्तिगत शुभेच्छा आहेत. ते मंत्री व्हावेत असे आम्ही मघाशीच सांगितले आहे. ही प्रथा बरोबर नाही. त्यामुळे मघा जे काही रेकॉर्डवर आले आहे ते काढून टाकावे अशी माझी विनंती आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा वेळ अन्य सन्माननीय सदस्यांनी घेतला आहे त्यामुळे आपण मला संरक्षण द्यावे. सन्माननीय सदस्यांचा आदर करण्याकरिता मी अभिभाषणातील परिच्छेद वाचत होतो. अल्पसंख्यांकांची व्याख्या करताना सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी माझ्या ज्ञानात भर घालण्याचा प्रयन केला त्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो. पारशी अल्पसंख्यांकांमध्ये मोडतात. पारशी या समाजाचा आता अस्तित्त्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. या समाजाची लोकसंख्या वाढतच नाही. जैन समाजाची लोकसंख्या फक्त तीन टक्क्यांनी वाढली आहे. गेल्या 50 वर्षात मुस्लीम समाजाची लोकसंख्या 3 कोटीवरून 20 कोटीवर गेली. हे मी आपल्या माहितीकरिता सांगत आहे. यात सुधारणा केली तर अधिक बरे होईल. अभिभाषणामध्ये असे नमूद केले आहे की, "मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ.....

श्री.गुरूनाथ कुळकर्णी : सभापती महोदय, 1947 साली या देशाची लोकसंख्या 35 कोटी होती. आज आपल्या देशाची लोकसंख्या 110 कोटी झाली आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मी मुसलमानांसंबंधी बोलत आहे. मी मुस्लीम लोकसंख्येबद्दल बोललो. देशातील लोकसंख्येबद्दल बोललो नाही. मुसलमानांबद्दल बोललो की, माझ्या सरकारचे काय होईल असा विचार सत्ताधारी पक्षातील सदस्य करतात.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, आपल्या देशाची लोकसंख्या 110 कोटी इतकी आहे. त्यापैकी संपूर्ण भारतातील मुस्लीमांची लोकसंख्या 14 टक्के म्हणजे 14 कोटी इतकी आहे. श्री.दिवाकर रावते यांनी देशातील मुस्लिमांची संख्या 30 कोटी आहे असे सांगितले आहे. ही जनगणना त्यांची आहे काय ? श्री.दिवाकर रावते साहेबांची जनगणना वेगळी आहे काय ? हे त्यांनीच सांगावे. 30 कोटी लोकसंख्या पाकिस्तानाचे नागरिक व शिवसेनेचे सदस्य धरून सन्माननीय सदस्यांनी सांगितली आहे काय ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांच्या माहितीकरिता सांगतो की, लोकसभेत प्रश्न विचारला गेला होता की, बांग्ला देशातील किती मुसलमान लोकांनी या देशात घुसखोरी केली आहे ? तेथे मुसलमान आहेत हे तरी सन्माननीय सदस्यांना मान्य आहे ना. सभापती महोदय, मी 30 कोटीचा उल्लेख केलेला नाही. मी 20 कोटीचा उल्लेख केला आहे. श्री.शिवराज पाटील चाकूरकर हे गृहमंत्री होते. त्यांनी साडेतीन कोटी बांग्ला देशीय मुसलमान घुसखोरी करून आल्याची माहिती सरकारकडे आहे असे सांगितले आहे. त्यातील 75 लाख बांग्लादेशीय हे मुंबई, ठाणे, नवी मुंबई आहेत. हे लोकसभेत श्री.शिवराज पाटील-चाकूरकर यांनी दिलेले उत्तर आहे. हे राजकीय षडयंत्र आहे. मी मुसलमानांसंबंधी वाईट बोलत नाही. मी काय बोलतो आहे हे आपण समजून घ्यावे. हा परिच्छेद फक्त सच्चर संबंधातील आहे. अल्पसंख्यांकांमधील बहुसंख्येने असणाऱ्या मुलसमानांच्या फायद्याकरिता हा परिच्छेद आहे, हे आपण मान्य करणार की नाही ? या परिच्छेदामध्ये काय नमूद केले आहे ते मी आपणास सांगतो.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...

अभिभाषणाच्या मुद्दा क्रमांक 50 मध्ये असे म्हटलेले आहे की, मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाला भरीव अतिरिक्त भागभांडवल मंजूर करण्यात आले असून महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीला अतिरिक्त सहायक अनुदान देण्यात आले आहे. उर्दू साहित्य अकादमी हा अल्पसंख्यांकांचा विषय आहे काय ? अकोल्यामध्ये 68 उर्दू शिक्षकांनी बोगस सर्टिफिकेटस् दिली म्हणून त्यांना निलंबित करण्यात आलेले आहे. (अडथळा)... यह कितनी शर्म की बात है कि शिक्षण् क्षेत्र में इतनी बदमाशी हो रही है.

श्री एस. क्यू. जमा : लेकिन हलबा आदिवासी कर्मचारी भी तो बोगस सर्टिफिकेट खरीद रहे हैं.

श्री दिवाकर रावते : माननीय सदस्य श्री जमा जी अभी जिस सब्जेक्ट पर आपने बात की थी, उस पर मैं अपनी बात कह रहा हूं. (अडथळा)..

श्री. दिवाकर रावते : अल्पसंख्याकबहुल नागरी क्षेत्रात क्षेत्रविकास कार्यक्रम देखील राबविण्यात येत आहे, असा उल्लेख अभिभाषणामध्ये आहे. मुस्लिम संख्या वाढवा आणि अल्पसंख्याकबहुल क्षेत्राचा विकास करा असे मी म्हटले त्यावेळी सन्माननीय सदस्यांना राग आला. (अडथळा) जेथे जास्त अल्पसंख्याक असतील त्याठिकाणच्या नागरी क्षेत्राचा विकास करण्याचे शासनाचे धोरण आहे. म्हणून मुस्लिम संख्या वाढवून आपल्या नागरी क्षेत्राचा विकास करावा असा त्याचा अर्थ होतो. म्हणून माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाचे मी स्वागत करु शकत नाही. धन्यवाद. जय हिंद ! जय महाराष्ट्र !! (अडथळा)..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस. क्यू. जमा : माननीय सभापति महोदय, मेरा पाइंट ऑफ आर्डर है और वह यह कि माननीय राज्यपाल महोदय ने अपने अभिभाषण में कहा है कि मॉयनारिटीज एरिया में डॅवलपमेंट प्लान लागू होगा. इसमें मॉयनारिटी शब्द है. दूसरी बात यह कि माननीय प्राइम मिनिस्टर साहब ने नया 15 पाइंट प्रोग्राम दिया है और उस संबंध में महाराष्ट्र सरकार ने हेड वाइज 15 प्रतिशत बजट एलोकेशन करने का निर्णय लिया है. इस बारे में जी.ए.डी. ने सभी डिपार्टमेंट को आदेश भी दिए हैं कि अल्पसंख्यक बाहुल्य क्षेत्र का विकास करने के लिए हेड वाइज बजट एलोकेशन किया जाये. ऐसी कोई बात नहीं कही गयी है कि वहां पर मुसलमानों का विकास किया जाये और मुसलमानों की आबादी बढ़ाई जाये. इसलिए यहां पर माननीय सदस्य ने जो बात कही है उस पर हमारा ऑब्जेक्शन है और उनकी यह बात रिकार्ड से निकाल देनी चाहिए.

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलत असताना मला प्रामुख्याने एका गोष्टीचा उल्लेख करावासा वाटतो. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जो मुद्दा या ठिकाणी उपस्थित केला त्यासंबंधी त्यांना संपूर्ण माहिती नसावी, ती माहिती त्यांना देण्याचा माझा उद्देश आहे. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी सच्चर आयोगाचा उल्लेख केला. अभिभाषणाच्या मुद्दा क्रमांक 50 मध्ये अल्पसंख्यांक समाजासाठी शासनाने जो कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेतलेला आहे त्याबाबत मी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना माहिती देऊ इच्छितो. सच्चर हे निवृत्त न्यायाधीश होते.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी.....

त्यांनी संपूर्ण देशातील अल्पसंख्य समाजाचा अभ्यास केला. ते सुप्रीम कोटाचे निवृत्त न्यायाधीश होते. या देशामध्ये निरनिराळा जो अल्पसंख्य समाज आहे त्या सर्व समाजाचा अभ्यास केल्यानंतर त्यांनी अहवाल सादर केला. या देशामध्ये जो मुसलमान समाज आहे त्यांच्यामध्ये जी गरिबी आहे, अशिक्षितांचे प्रमाण खूप आहे, नोकरीचा अभाव असल्यामुळे तरुण पिढी बिघडली आहे म्हणून या समाजासाठी जे जे करणे आवश्यक आहे ते करणे क्रमप्राप्त आहे अशी सच्चर समितीने शिफारस केल्यानंतर या देशाचे माननीय पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखाली भारत सरकारने 15 कलमी कार्यक्रम निश्चित केला. तो कार्यक्रम सच्चर समितीनंतर आलेला आहे. त्याची अंमलबजावणी संपूर्ण देशभर केली जात आहे आणि या राज्यामध्ये देखील त्या अनुषंगाने कार्यक्रम राबविला जात आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, प्रत्येक वेळेला आम्हाला याबाबतीत जबाबदार धरले जाते. शासनाने उत्तराच्या भाषणात या मुद्याचे उत्तर दिले पाहिजे. माननीय पंतप्रधान असे म्हणाले की, या देशाच्या संपत्तीवर पहिला अधिकार मुसलमानांचा आहे. हे पंतप्रधानांचे वाक्य आहे.

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी : सभापती महोदय, मला त्या वादामध्ये जायचे नाही. माननीय राज्यपाल महोदय यांनी दोन्ही सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांना उद्देशून जे अभिभाषण केले त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. माननीय राज्यपाल प्रत्येक अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी संयुक्त सभागृहात अभिभाषण करतात. संपूर्ण वर्षात राज्य शासन कशा पध्दतीने कार्यक्रम राबविणार आहे, कोणत्या दिशेने प्रवास करणार आहे या संदर्भातील राज्य शासनाचे धोरण काय आहे हे अभिभाषणामध्ये अभिप्रेत असते. म्हणून माननीय राज्यपालांनी जे अभिभाषण केले त्याचे समर्थन मी करतो. याठिकाणी विरोधी पक्षाला आपली भूमिका मांडण्याचा जरुर अधिकार आहे. काही काळासाठी विरोधी पक्ष सत्तेवर होता. 1990 ते 95 या काळात त्यांनी राज्याचा कारभार चालविला आहे. त्यांनी कशा पध्दतीने राज्य कारभार केला हे त्यांना माहिती आहे. त्यांनी जी जी आश्वासने दिली, जे जे कार्यक्रम आणले त्यांची कशा पध्दतीने अंमलबजावणी झाली? त्यांना वाटत होते की, हे चांगले काम केल्यानंतर राज्यातील जनता त्यांना पुन्हा सत्तेवर आणणार आहे. परंतु 1999 मध्ये त्यांची सत्तेवर येण्याची जी अपेक्षा होती ती पूर्ण झाली नाही. आज सत्ताधारी आघाडीतील काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे दोन्ही पक्ष 1999 च्या सार्वत्रिक

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

भोगले/शिगमनंतर 5.30

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी.....

निवडणुकीत एकमेकाच्या विरोधात लढत असताना शिवसेना व भारतीय जनता पक्षाने एकत्रित निवडणूक लढविली होती. तरी देखील त्यांना सत्ता काबीज करणे शक्य झाले नाही. इतकी या राज्यातील जनता त्यांच्या कारभाराला कंटाळली होती हे 1999 च्या निवडणुकीमध्ये स्पष्ट झाले. गेली 10 वर्षे लोकशाही आघाडीचे सरकार या राज्यामध्ये काम करीत आहे.

(नंतर श्री.खर्चे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी .....

6-7 महिन्यापूर्वी निवडणुका होऊन हे सरकार सत्तेवर आले. त्यावेळेस राज्यात असे वातावरण निर्माण झालेले होते की, पुन्हा काँग्रेस-राष्ट्रवादीचे सरकार सत्तेवर येणार नाही असे वाटत होते. विरोधी पक्षाच्या सभांना जमलेली लाखो लोकांची गर्दी पाहता तसेच त्यांची काम करण्याची पध्दती पाहता संपूर्ण गावातील लोक जमून चर्चा करीत होते. जसे आंदोलन पेटले आहे, संपूर्ण महाराष्ट्र पेटून उठला आहे अशा प्रकारचे वातावरण निर्माण झाल्याचे पहायला मिळत होते. मला देखील शंका वाटत होती आता काँग्रेस-राष्ट्रवादीचे सरकार येईल की नाही. परंतु या परिस्थितीमध्ये लोकांना विरोधी पक्षाने जे जे सांगितले, जे जे वायदे केले, आंदोलने केली तरी देखील विरोधी पक्षाच्या दुर्दैवाने पुन्हा सत्तेच्या आसपास सुध्दा त्यांना फिरकता आले नाही. उलट त्यांची जेवढी संख्या होती, जितकी ताकद होती त्यापेक्षा कमीच झाली आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आता सभागृहात हजर असायला हवे होते. त्यांनाही समजले असते की काय परिस्थिती होती. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाचे समर्थन करताना विरोधी पक्षाची जी ताकद होती तेवढी सुध्दा राहिली नाही. तुमचे जेवढे लोक होते ते आज कुठल्या लेव्हलवर आले ?.....

ॲड. अनिल परब : माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर सभागृहात चर्चा सुरु असताना निवडणुकांचा काय संबंध आहे ? सन्माननीय सदस्य निवडणुकीसंबंधी बोलत आहेत. आपण कृपया त्यांना निदेश द्यावेत की त्यांनी अभिभाषणावरच बोलावे.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा करण्याचा जो अधिकार आम्हाला मिळाला तो अधिकार विरोधी पक्षाच्या मर्जीवर नाही तर तो आमचा हक्क आहे म्हणून मी उभा आहे. तसेच राज्यशासनाचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी आणि शासनाच्या भूमिकेचे समर्थन करण्याचा आम्हाला पूर्ण अधिकार आहे.....अडथळा.....माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाचे समर्थन करणे ही भूमिका या बाजूचे सदस्य ज्यावेळी घेतात त्याला काही तरी कारण आहे. म्हणून मी सांगितले की या बाजूच्या लोकांना माननीय राज्यपालांचे समर्थन करण्याचा आम्हाला अधिकार आहे. राज्यात महागाई आहे ही वस्तुस्थिती आहे परंतु या परिस्थितीतून मार्ग काढण्याचे काम शासन गेली 10 वर्षे करीत आहे.....

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी.....

म्हणून या राज्यातील जनतेने काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसचे सरकारला सत्तेवर बसवलेले आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये प्रामाणिकपणे जो उल्लेख आलेला आहे त्यातील काही महत्वाच्या मुद्यांचा मी या ठिकाणी परामर्श घेणार आहे.

काही महिन्यापूर्वी फयान वादळामुळे फार मोठी भयानक परिस्थिती निर्माण झाली होती. फयान वादळामुळे कोकणातील मच्छिमार समाज जो समुद्राकाठी राहतो त्याचे फार मोठया प्रमाणात नुकसान झाले होते. तसेच मागील काही महिन्यापूर्वी अवेळी पावसामुळे राज्यातील कित्येक ठिकाणी मोठया प्रमाणात नुकसान झाले होते व त्या नुकसानीची भरपाई राज्य शासनाने केलेली आहे. कोकणाच्या समुद्र काठी राहणा-या मच्छीमारांच्या जाळयांचे, ट्रॉलरचे तसेच होडयांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले होते त्यांना नुकसान भरपाई देण्याचा प्रामाणिक प्रयत्न राज्य शासनाने केलेला असल्यामुळे मी राज्य शासनाचे अभिनंदन करतो. सिंधुदूर्ग जिल्हयातील माझ्या काही कार्यकर्त्यांनी तसेच सिंधुदूर्ग जिल्हयाचे सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली, सुभाष चव्हाण तसेच अनिल परब यांनी सांगितले आहे की, सिंधुदुर्ग जिल्हयातील मच्छिमारांचे जे नुकसान झालेले आहे त्या नुकसानीपोटी राज्य शासनाने 4 कोटी रुपये मच्छिमारांसाठी उपलब्ध करुन दिलेले आहे. जवळ जवळ 1/3 वाटप कोकणातील मच्छिमारांना करण्यात आलेले आहे. परंतु यासंदर्भात अधिका-यांनी असा निर्णय घेतला आहे की, ज्या मच्छिमारांच्या जाळयाचे नुकसान झाले असेल त्यांनी त्या जाळया कोणाकडून घेतल्या होत्या त्याचे पुरावे दिल्याशिवाय,पावत्या दिल्याशिवाय त्यांना आता नुकसान भरपाई मिळू शकत नाही. परंतु ज्या मच्छिमारांनी 3-4 वर्षापूर्वी जाळे विकत घेतले होते त्यांच्याकडे त्या जाळयांची पावती आता कशी काय असू शकणार आहे याचा सुध्दा विचार होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, शासन मच्छिमारांना मदत करण्यासाठी उभे आहे परंतु अधिका-यांनी पावत्या उपलब्ध करुन दिल्या तरच तुटलेल्या जाळयांसाठी संबंधितांना मदत दिली जाईल असा निर्णय घेतल्यामुळे ज्या मच्छिमारांच्या जाळयाचे नुकसान झालेले आहे अशा सर्व मच्छिमारांना त्याचा फायदा झालेला नाही. जवळपास 2.75 कोटी रुपये तसेच पडून आहेत. मच्छिमारांना मदत करण्याची भूमिका शासनाने घेतलेली असतांनाही सिंधुदुर्ग जिल्हयातील सर्व मच्छिमारांना मदत मिळू शकली नाही. त्यामुळे शासनाने सर्व मच्छिमारांना नुकसान भरपाई मिळवून द्यावी अशी विनंती मी राज्य शासनास करीत आहे. ...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी.....

सभापती महोदय, 1972 मध्ये संपूर्ण देशातून पहिल्यांदाच आपल्या राज्यात रोजगार हमी योजना सुरु झाली होती. 1972 मध्ये मोठया प्रमाणात महाराष्ट्रात दुष्काळ पडला होता. दुष्काळामुळे जनतेच्या हाताला काम मिळत नव्हते. जनतेच्या हाताला काम मिळावे म्हणून पागे साहेबांनी रोजगार हमी योजना आणली. पागे साहेब त्यावेळेस विधान परिषदेचे सभापती होते. पागे साहेब हे रोजगार हमी योजनेचे जनकच आहेत. कै. पागे साहेब हे सभापती होते त्यावेळी मुख्यमंत्री पदी कै. वसंतराव नाईक होते. रोजगार हमी योजना काढून न भूतो न् भविष्यती असे काम त्यावेळी झाले होते. ज्याला काम पाहिजे त्याला काम देण्याची भूमिका त्यावेळी महाराष्ट्र शासनाने स्वीकारली होती. या रोजागार हमी योजनेच्या कामामध्ये चांगल्या चांगल्या घरातील शेतकरी आणि त्यांची मुले कामावर येत होती.

यानंतर श्री. गायकवाड.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी....

अशा प्रकारे या राज्यात रोजगार हमी योजना सुरु करण्यात आली असून त्या आधारे केन्द्र सरकारने सुध्दा नवीन योजना सुरु केलेली आहे.

तालिका सभापती (श्री.जयप्रकाश छाजेड) :माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेची वेळ सायंकाळी 5.45 वाजेपर्यंत ठरविण्यात आली होती. आता 5.45 वाजले असल्यामुळे ही चर्चा थांबविण्यात येत आहे. यानंतर अशासकीय कामकाज सुरु करण्यात येईल आणि ते संपल्यानंतर पुन्हा माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा सुरु ठेवावयाची असेल तर ती पुढे सुरु करता येईल.

एक सन्माननीय सदस्य : ही चर्चा उद्या घेण्यात यावी.

तालिका सभापती : ठीक आहे. सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी हे ऑन लेग आहेत. आता अशासकीय कामकाज घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशासकीय कामकाज -ठराव

सार्वजनिक हिताच्या विषयावर चर्चा

पृ.शी. : कोयना धरण व त्या परिसरात अत्याधुनिक भूकंप मापक यंत्रणा बसविणे

मु.शी. : कोयना धरण व त्या परिसरात अत्याधुनिक भूकंप मापक यंत्रणा बसविणे

डॉ.नीलम गोऱ्हे (विधान सभेने निवडलेल्या) सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील ठराव मांडते. :

" राज्यातील कोयना धरण व परिसरात सातत्याने बसत असलेले भूकंपाचे लहान मोठे धक्के अशा लहान मोठया भूकंपाच्या धक्कयांची संख्या सुमारे दीड लाखावर असल्याची नोंद कोयना बांधकाम प्रकल्पाच्या वूड अंडर्सन भूकंप मापन यंत्रावर होणे, सदर भूकंपाची मालिका अजूनही सुरु असणे, या भूकंपाचा केन्द्र बिंदू कोयना धरण असणे सदर भूकंपाचा केन्द्रबिंदू व त्याची खोली याची अचूक माहिती तात्काळ उपलब्ध होण्यासाठी असणा-या यंत्रणेतून तात्काळ माहिती मिळत नसल्याने या यंत्रणेवर प्रश्न चिन्ह निर्माण होणे, भूकंप मापक यंत्र कुचकामी असणे, त्यामुळे आपत्ती व्यवस्थापनेला कुठल्याही प्रकारची वेळीच माहिती न मिळणे, कोयना धरणाच्या परिसरात भविष्यात कधीही मोठया प्रकारचा भूकंप होण्याची शक्यता विचारात घेता व त्यातून होणारे मोठया प्रमाणावरील नुकसान टाळण्याकरिता कोयना प्रकल्प भूकंपमापक यंत्रणा आधुनिक तंत्रज्ञानाने प्रगत करुन तातडीने कार्यवाही करण्याबाबत बृहत आराखडा तयार करुन भूकंपाबाबतचे सर्व प्रकारचे तंत्रज्ञान विकसित करण्यात यावे अशी शिफारसही विधान परिषद शासनास करीत आहे.

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, मागच्या अधिवेशनात हा ठराव प्रलंबित होता. दिनांक 12 डिसेंबरलाच कोयनेचा पहिला भूकंप झाला होता आणि 12 डिसेंबर 2009 रोजी पुन्हा त्या ठिकाणी भूकंप झाला होता. अशासाकीय कामकाज हे सभागृहाचे वैशिष्टय असून या पूर्वीसुध्दा निर्णय होण्यासाठी अशासकीय कामकाजाच्या माध्यमातून चालना मिळालेली आहे. आता पर्यत अनेक वेळा भारतात भूकंप झालेले आहेत. महाराष्ट्रामध्ये लातूर जिल्हयातील किल्लारी येथे प्रलंयकारी भूकंप झाला होता त्यामध्ये मोठयाप्रमाणावर जीवित आणि वित्त हानी झाली होती. तसेच शेतीचेसुध्दा मोठया प्रमाणावर नुकसान झाले होते. किल्लारी येथील भूकंपाच्या अगोदर कोयनानगर येथे भूकंप झाला होता. कोयनानगर येथे धरण असून त्या परिसरात सुध्दा आता देखील भूकंपाचे धक्के बसत आहेत त्याची तीव्रता 4.8 इतकी असल्यामुळे त्या भूकंपाला अती तिव्रतेचा भूकंप जरी म्हटले जात नसले तरी सुध्दा नोव्हेबर महिन्यापासून त्या ठिकाणी जे भूकंपाचे धक्के बसतात त्याची व्याप्ती पुणे ,सांगली, सातरा कोल्हापूर ,सोलापूर, रत्नागिरी, मुंबई, चिपळूण या ठिकाणापर्यंत पोहाचली आहे या भूकंपाला तीव्र स्वरुपाचा भूकंप जरी म्हटले नाही तरी त्याची तीव्रता सर्व ठिकाणी जाणवली आहे.सातारा जिल्हयातील अनेक घराना त्यामुळे तडे गेले होते. फयान चक्री वादळातून सावरत असतांना त्या भागात भूकंपाचे धक्के नोव्हेंबर महिन्यात बसल्यामुळे तेथील लोकांच्या मनात घबराट निर्माण झाली होती. कराड तालुक्यातील पाठारवाडी आणि पाटण तालुक्यातील 15 गावाच्या घराची पडझड झाली असून अनेक घरांच्या भितींना तडे गेले होते. या भुकंपामुळे कोयना धरण जरी सुरक्षित असले तरी त्या भूकंपामुळे माठया प्रमाणात घबराट निर्माण झाली होती. 12 तासात जवळजवळ 20 भूकंपाचे धक्के बसले होते. भूकंपाचे धक्के बसणार आहेत किंवा नाही यासंबंधी कोणतीही माहिती देणारी यंत्रणा राज्यस्तरावर तरी कार्यान्वित नव्हती. या भूकंपामुळे जे नुकसान झाले आहे त्याचे पंचनामे तांबे गावात झालेले असले तरी देखील पुढे यासंबंधी काय होणार आहे यासबंधीचे प्रश्न चिन्ह निर्माण झाले असून डिसेंबरचे नागपूर अधिवेशन होऊन गेले तरी त्यासंबंधीचे उत्तर मिळाले नाही ही वस्तुस्थिती आहे.

नंतर श्री.सरफरे

अशुद्धित प्रत/ प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

कोयना प्रकल्पाच्या ठिकाणी डिजिटल भूमापक यंत्रणा बसविण्यात आली आहे. त्यामुळे कोल्हापूर, सातारा व कोयना या तीन जिल्हयाच्या ठिकाणी भूकंप झाल्यानंतर त्या भूकंपाची खोली आणि भूकंपाचा केंद्रबिंदू नक्की कोठे आहे ? याबाबत प्रक्रिया होऊन माहिती मिळायला एक ते दीड तास लागतो. प्रत्यक्षात भूकंपाचा धक्का बसल्यानंतर त्याची तीव्रता पाहून सातारा जिल्हयाचे जिल्हाधिकारी श्री. विकास देशमुख यांनी आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार केला, व त्याबाबतची कागदपत्रे सादर केली. परंतु कोयना प्रकल्पाकडून भूकंपाची माहिती मिळाल्याशिवाय जिल्हाधिकारी कार्यालय सुध्दा प्रत्यक्षात कामाला लागू शकत नाही ही वस्तुस्थिती आहे.आणि म्हणून अवकाळी पाऊस, बदलते पर्जन्यमान इत्यादीमुळे कारणांमुळे व कोयना प्रकल्पावरील भूमापक यंत्रणा बंद पडल्यामुळे, लोड शेडींगमुळे संबंधित परिसरात झालेल्या भूकंपाच्या धक्क्यामुळे निर्माण झालेल्या परिस्थिती संबंधीची माहिती यायला वेळ लागतो, अशाप्रकारच्या तक्रारी अनेक लोकांनी केल्या. त्या संदर्भात अशासकीय ठराव दिला होता. ज्यावेळी नोव्हेंबरमध्ये भूकंप झाला त्यावेळी वीज गेली होती. आणि म्हणून प्रत्यक्षात भूकंप झाल्यानंतर त्यामध्ये किती पडझड झाली? त्यानंतर लोकांना कोणत्या प्रकारची मदत दिली पाहिजे या संदर्भात नंतर खूप मोठे प्रश्न निर्माण झाले होते.

सभापती महोदय, या मुंबई शहराला देखील अनेक वेळा भूकंपाचे धक्के बसले होते व बसत आहेत. आणि म्हणून कोयनानगर येथील भूकंपाच्या धक्क्यासंदर्भात अशासकीय ठराव आणला असला तरी मुंबई शहराला महत्व देण्यासाठी नव्हेतर या शहराला भूकंपाचा धक्का बसल्यानंतर त्यामुळे होणारी हानी आणि त्याची असलेली तीव्रता किती भयानक असू शकेल याची आपणास जाणीव असावी. यापूर्वी मुंबईला 12 वेळा भूकंपाचे धक्के बसले आहेत. ज्याची नोंद घ्यावी लागेल असा सर्वात मोठा भूकंपाचा धक्का 1966 साली बसला होता. या शहरातील भूकंपाच्या धक्क्याच्या तीव्रतेची माहिती परिमंडळ 3 मध्ये समाविष्ट आहे. मुंबई शहरातील अनेक मोठया इमारतींची परिस्थिती पाहिली तर आणि भूकंपाचा तीव्र धक्का बसल्यानंतर त्याचे पुढे काय परिणाम होतील, त्यामधून किती उत्पात होईल याची आपण कल्पना करावी. पुणे शहरामध्ये देखील भूकंपाचे धक्के आम्हाला जाणवले. त्यावेळी अनेक लोकांनी आकाशवाणी आणि वर्तमानपत्राच्या कार्यालयांना फोन करुन भूकंप झाला आहे काय? की आम्हाला भास झाला अशी विचारणा केली. याबाबत सातारा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ MMP/

डॉ. नीलम गोऱ्हे...

जिल्हयाच्या प्रशासनाला माहिती मिळाली असली तरी याबाबतीत सर्व जिल्हयामधील भूकंप मापक यंत्रणांशी समन्वय साधणे गरजेचे आहे म्हणून मी या विषयाकडे लक्ष वेधू इच्छिते.

सभापती महोदय, भूकंपाच्या संदर्भात शासनाने आपत्ती निवारण आराखडा करणे आवश्यक आहे. वेगवेगळया प्रकारचे भूकंप, पूर, नैसर्गिक आपत्ती, वादळ या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना विचारले तर ते सांगतात की, आम्ही आपत्ती व्यवस्थापन आराखडा प्रत्येक जिल्हयामध्ये दिला आहे. त्यानुसार माझ्या माहितीप्रमाणे पुणे जिल्हयात 50 हजार स्वयंसेवकांना प्रशिक्षण दिले असे जिल्हाधिकारी यंत्रणा सांगते. मला या अशासकीय ठरावाच्या निमित्ताने प्रश्न उपस्थित करावयाचा आहे की, यामध्ये रेस्क्यू म्हणजे ताबडतोब सुटका करणे, रिलिफ म्हणजे लोकांना मदत देणे आणि पुनर्वसन या तीन स्तरावर आपण भूकंपाच्या संदर्भात पावले उचलली आहेत. त्यासंदर्भात माझ्या माहितीप्रमाणे "यशदा" ही संस्था कार्यरत असून त्या संस्थेने डिझास्टर मॅनेजमेंट नावाचा स्वतंत्र विभाग केला आहे. तसेच, राष्ट्रीय स्तरावर डिझास्टर मॅनजमेंट मिशन तयार करण्यात आले आहे. राज्यामध्ये देखील युएनडीपीने मदत करुन डिझास्टर मॅनेजमेंटसाठी काही निधी प्रत्येक राज्याला दिला आहे, याकडे या ठरावाच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधायचे आहे. ज्यावेळी भूकंपाचा धक्का बसतो त्यावेळी लोकांनी नक्की काय केले पाहिजे या संदर्भात स्वयंसेवकांना प्रशिक्षण दिले आहे. कोणत्याही शहरामध्ये भूकंप निवारणासाठी आपण नक्की काय केले पाहिजे याबाबत नगर विकास विभागाच्या आराखडयामध्ये व्यवस्थापनेसंबंधी विचार झालेला नाही. दुसरा मुद्दा असा की, ज्यावेळी आपत्ती निर्माण होते त्यावेळी यंत्रणेला कामाला लावण्यासाठी जे केले पाहिजे त्या संदर्भात तेथील नेतृत्व कशापध्दतीने पुढाकार घेते यावर बऱ्याचशा गोष्टी अवलंबून असतात.

(यानंतर सौ.रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यावर देखील बऱ्याच गोष्टी अवलंबून असतात असे सतत निदर्शनास येत असते. तिसरा भाग असा आहे की, लातूर, उस्मानाबाद येथे भूकंप झाल्यावर ज्याप्रमाणे यंत्रणा उभी राहिली, त्यावेळी स्वत: माननीय श्री.शरद पवार यांनी लक्ष घातले होते. अनेक स्वयंसेवी संस्था काम करीत होत्या. 1993 पासून 2000 पर्यंत म्हणजे जवळजवळ सात वर्षे पुनर्वसनाच्या कामासाठी लागली आहेत. या काळामध्ये तेथील 52 गावांमध्ये घरे बांधण्यात आली. कोयनानगरला जसे भूकंपाचे धक्के बसत आहेत, तसेच आजही तिल्लारी येथेही सौम्य प्रमाणात भूकंपाचे धक्के बसत आहेत. त्यावेळी घरबांधणीसाठी, तेथील पुनर्वसनाच्या कामासाठी जागतिक बँकेने निधी दिला होता. त्यानंतर दहा वर्षांनी म्हणजे 2000 सालानंतर 2010 पर्यंत या निधीतून किती लोकांचे पुनर्वसन झाले आहे याचा आढावा घेऊन अजून काही जुजबी दुरुस्ती करण्याची गरज आहे काय ? हे पहावयाचे होते आणि त्यानुसार त्यावेळी जागतिक बँकेने मदत केली होती. त्यानंतर देखील भूकंपाचे धक्के बसलेले आहेत. आज लातूर, उस्मानाबाद येथील 52 गावांना कोणी भेट दिली तर असे दिसेल की, त्यावेळी बांधण्यात आलेल्या घरांची स्थिती काय आहे हे लक्षात येईल.आज तेथील अनेक घरांना लहान-मोठे तडे गेलेले आहेत. त्यावेळी इतर कामांबरोबरच गावातील अंतर्गत रस्त्याचे देखील काम झाले होते. त्याच्या देखभाली बाबत नंतरच्या काळामध्ये तेथील जिल्हा परिषदेने जेवढे लक्ष घालावयास हवे होते, तेवढे ते घातलेले नाही. त्यामुळे विशेषत: पावसाळयाच्या दिवसात या रस्त्यांची पूर्णपणे धूळधाण झालेली आहे. महिला विकासासाठी प्रत्येक गावात महिला विकास केंद्र बांधण्यात आली. परंतु त्या केंद्राची संपूर्णपणे पडझड झालेली आहे. महिलांचे बचत गट मोठया प्रमाणात निर्माण झाले तरी देखील त्यांना कोणतीही मदत मिळालेली नाही.जर भूकंप झाला किंवा आपत्ती आली तर आपण बाधित कुटुंबांना कॉम्पनसेशन देतो,परंतु पुनर्वसनासाठी कोणते नॉर्म्स् असावेत याबाबत आपण संशोधन करुन अंमलबजावणी करावयास पाहिजे. त्यासाठी काही सूत्र असले पाहिजे. पण मला येथे मुद्दाम सांगितले पाहिजे की, जेव्हा एका कुटुंबामध्ये 8 लाख, 10 लाख, 15 लाख रुपयांची मदत दिली जाते, परंतु त्या कुटुंबातील बऱ्याचशा व्यक्ती दगावलेल्या असतात. अशा परिस्थितीमध्ये या कुटुंबाची शेती असेल, घर असेल आणि त्यांना मिळणारी संपत्ती असेल तर त्याचा फायदा घेण्यासाठी संबंधितांचे लांबचे नातेवाईक येऊन याचा लाभ घेण्याचा प्रयत्न करतात. त्याकडेही लक्ष दिले पाहिजे. परंतु भूकंपाच्या वेळी जी काही कामे झाली आहेत, त्यामुळे अनेक

. . . .3 डब्ल्यु-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कुटुंबे उभी राहिली. माझी अशी सूचना आहे की, कोयनानगरला ज्याप्रमाणे भूकंप मापक यंत्रणा बसविलेली आहे, त्यामाध्यमातून भूकांपाच्या बाबतीत अगोदर माहिती मिळण्यासाठी काय प्रयत्न करता येतील याचाही विचार केला पाहिजे. भूकंप झाल्यावर आता पुढचा भूकंपाचा धक्का किती बसणार आहे हे कोणीच सांगू शकत नाही. ज्या "हैती" येथे भूकंप झाला, जर आपण इंटरनेटवर पाहिले तर आपल्या समजेल की, त्यावेळी तेथील राष्ट्रपतींचे घर मोडले होते आणि त्यांना तंबूमध्ये रहाण्याची वेळ आली होती. त्यामुळे पुढील भूकंपाचा धक्का किती मोठा असणार आहे हे कोणीच सांगू शकत नाही ही वस्तुस्थिती असली तरी सुध्दा भूकंपाचा फटका नक्की कुठे-कुठे बसणार आहे याची लोकांना माहिती कळली तर लोक आपल्या घरातून बाहेर येऊन सुरक्षित ठिकाणी आसरा घेऊ शकतात. नाहीतर भूकंप झाल्यानंतर लोकांमध्ये घबराट निर्माण होते आणि लोक अजून भूकंप होणार आहे काय याकडे लक्ष ठेऊन रहातात. मध्यंतरी नांदेडमध्ये सुध्दा रात्रभर आवाज येत होते. परंतु तेथील लोकांना कळत नव्हते की, हा नक्की भूकंपाचा आवाज आहे की दुसरा कसला आहे ? त्यामुळे मला असे सुचवावयाचे आहे की, लोकांमध्ये होणारी घबराट टाळण्याच्या दृष्टीने भूकंप झाल्यानंतर त्या संबंधातील माहिती देणारी यंत्रणा कशी कार्यरत होईल ते पाहिले पाहिजे. जेणेकरुन लोकांमध्ये घबराट होणार नाही.

सभापती महोदय, मला दुसरी विनंती करावयाची आहे. माझ्या माहितीनुसार कोयनानगरचा भूकंपाचा केंद्र बिंदू आता तिल्लारी धरणाकडे सरकत आहे आणि जर तसे होत असेल तर त्याचे काय परिणाम होऊ शकतात याचा विचार करावा. याबाबत शासनाचे काय म्हणणे आहे हे सर्वांसमोर येणे गरजेचे आहे.लातूर,उस्मानाबाद मध्ये भूकंप होऊन 10 वर्षे झाली. सध्या तेथील सामाजिक परिस्थिती काय आहे ? आज तेथील घरांना तडे गेले आहेत. शासनाकडे जागतिक बँकेचा दहा टक्के निधी उपलब्ध आहे. तसेच तेथे 2000 मध्ये केलेल्या कामाचा दहा वर्षानंतर म्हणजे 2010 मध्ये आढावा घ्यावयाचा आहे. यासंबंधात तेथील विभागीय आयुक्त श्री.भोग यांनी त्यांच्या कार्यकाळामध्ये या निधीच्या वापराबाबत आढावा घेतला होता. त्यावेळी मी त्यांना स्वत: औरंगाबाद येथे जाऊन भेटले होते आणि याचा पाठपुरावा केला होता. तसेच त्यावेळच्या आपत्तीनिवारणाचा विषय हाताळणाऱ्या माननीय मंत्री महोदयांकडेही पाठपुरावा केला होता. पण त्या निधीचे काय झाले आहे हे कोणालाच माहिती नाही. तेव्हा मी आपल्याला असू सुचवू इच्छिते की,

. . . .3 डब्ल्यू-3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे . . . .

खास करुन कोयनानगर व पाटण या भागांच्या दृष्टीकोनातून जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्हा स्तरावर एक समिती तयार केलेली आहे. त्याचा संपूर्ण राज्याशी किंवा निदान 10 जिल्हे म्हणजे जेथपर्यंत भूकंपाची व्याप्ती असल्याचे दिसून येते.

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

या दहा जिल्ह्यांशी ते कसे व्यवस्थित जोडता येईल हे पाहणे आवश्यक आहे. तो फक्त पश्चिम महाराष्ट्राचा प्रश्न राहात नाही. कोकण आणि मुंबईपर्यंत त्याची व्याप्ती वाढत आहे. म्हणून भूकंप निवारणासाठी एक आपत्ती निवारण आराखडा या दहा जिल्ह्यांसाठी तयार करुन तो कोयना, पाटण येथील जिल्हाधिकाऱ्यांशी जोडावा तसेच यासाठी एखादी समिती करणे आवश्यक आहे. लातूर, उस्मानाबादला ज्या अडचणी आल्या त्याबाबतीत काय मार्ग निघाला याचे अनेक अहवाल राज्य सरकारकडे आहेत. त्या आधारे एखादे चांगले डॉक्युमेंट तयार करुन भूकंपामध्ये काय आदर्श कार्यप्रमाणाली असली पाहिजे याची माहिती इतर ठिकाणच्या अधिकाऱ्यांना मिळणे गरजेचे आहे. याकडे शासनाचे लक्ष वेधू इच्छिते. भूकंपाबाबतचे तंत्रज्ञान विकसित करणे, बृहत आराखडा तयार करणे तसेच रेस्क्यू, रिलिफ आणि रिहॅबिलिटेशन या गोष्टी महत्वाच्या आहेत. आपण बघतो की कुटुंबावर आपत्ती आलेली असते आणि काही मुले निराधार होतात. त्यासाठी सर्व विभागांचा समन्वय असणे आवश्यक असते. पुरासारखी आपत्ती येते. सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. अजित पवार यांनी पुण्यामध्ये जे काम केले त्याचा उल्लेख या ठिकाणी करावयास पाहिजे. त्यांनी त्या ठिकाणी चांगल्या प्रकारे यंत्रणा राबविली होती. परंतु त्याचे सार्वत्रीकरण बाकीच्या जिल्ह्यामध्ये किती होते याबद्दल शंका वाटते. कारण अनेक वेळा आपत्ती आल्यानंतर, फयान आल्यानंतर परत त्याच चुका झालेल्या दिसतात. नुकसानभरपाईच्या दाव्यांचा प्रश्न असतो. उशिरा असेसमेंट होते. त्यामुळे ताबडतोब मदत मिळत नाही. वेगवेगळ्या आपत्तीसाठी वेगवेगळी कार्यप्रणाली विकसित करणे आवश्यक आहे. भूकंपाच्या संदर्भात जो धोका आहे त्यामध्ये मुंबईसारख्या शहरामध्ये आतापर्यंतचा जो ट्रेन्ड आहे तो तसाच राहिला तर कशा पध्दतीने काम केले पाहिजे याबाबतीत मोठ्या प्रमाणावर जनजागृती करणे आणि सर्व विभागांनी मिळून एकत्रित काम करणे गरजेचे आहे आणि त्याकडे मला शासनाचे लक्ष वेधावेसे वाटते. या प्रश्नाच्या संदर्भात डिसेंबरमध्ये मी चर्चेची मागणी केली आणि त्यानंतर विधान परिषदेमध्ये हा ठराव चर्चेला येत असताना मधला कालावधी मोठा असल्यामुळे मधल्या कालावधीमध्ये सुनामी आली, हैतीमध्ये भूकंप झाला अशा प्रकारची आपत्ती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

जगभर येताना दिसते. त्या दृष्टीकोनातून आपण अधिक गाफील राहणे योग्य नाही. म्हणून याबाबत सरकानने बृहत आराखडा समोर ठेऊन जनतेला विश्वासात घ्यावे तसेच यंत्रणा अधिक व्यापक कशी बनविता येईल याचा विचार करावा एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

ठराव प्रस्तुत झाला

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय वडेट्टीवार (जलसंपदा राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी अशासकीय ठरावाव्दारे राज्यातील कोयना धरण आणि परिसरामध्ये बसत असलेले भूकंपाच्या धक्क्याच्या संदर्भात करावयाच्या उपाययोजनेबाबत चर्चा उपस्थित केलेली आहे. त्यांनी आपत्ती व्यवस्थानाच्या संदर्भात या ठिकाणी उल्लेख केला. खरे म्हणजे कोयना धरणाला जळजवळ 1 लाख 16 हजार 73 इतक्या लहानमोठ्या भूकंपाच्या धक्क्यांची नोंद झालेली आहे. सगळ्यात मोठा भूकंपाचा धक्का 11 डिसेंबर, 1967 रोजी बसला आणि तो धक्का 6.7 रिश्टर स्केलचा होता. खरे म्हणजे जगामध्ये भूकंपाच्या पूर्वी त्यांची माहिती मिळेल अशी कोणतीही व्यवस्था नाही किंवा तंत्रज्ञान नाही. भूकंप झाल्यानंतर माहिती मिळते अशा प्रकारची टेक्नॉलॉजी आहे. 120 सेकंद ब्रॉड बँड सेसमोमीटर अशी यूएसए येथील पिलागो कंपनीची सिस्टीम कराड येथे उभी केलेली आहे. कोयना ते कराड मधील अंतर जवळजवळ 25 ते 30 किलोमीटर आहे. या 25 ते 30 किलोमीटर अंतरावर असलेल्या यंत्रणेव्दारे जगामध्ये कोठेही भूकंप झाला तरी या यंत्रणेव्दारे त्या ठिकाणी त्याची नोंद होते. त्यामुळे कोयनेला भूकंप झाला तरी त्या ठिकाणी त्याची नोंद होते.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय वडेट्टीवार....

अमेरिकेमध्ये भूकंप झाला तरी त्याची नोंद तेथे होते, म्हणजे एवढया मोठया क्षमतेने ही यंत्रणा तेथे कार्यरत आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हे अशा म्हणाल्या की, धरणापासून 2-3 मिनिटांच्या अंतरावर अशी एखादी यंत्रणा उभी केली पाहिजे. यापूर्वी या धरणापासून 1 कि.मी.अंतरावर 'कोयना किरणॉस' नावाची योजना तयार केली होती. आपण सुचविल्याप्रमाणे जर 2-3 मिनिटांच्या अंतरावर अशाप्रकारची नवीन योजना केली तर सध्याची जी यंत्रणा आहे ती कोलॅप्स होऊ शकेल. म्हणून विशिष्ट परिसरामध्ये ही यंत्रणा उभी केली आहे. या यंत्रणेला भूकंप झाल्याची माहिती मिळाल्यानंतर पुढील 25-30 मिनिटांमध्ये जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखाली असलेली यंत्रणा तेथे पोहोचून संबंधितांना मदत देण्याचे काम करते. विशेष करुन दख्खनच्या भागात किंवा महाराष्ट्रामध्ये महत्तम संभाव्य भूकंप तीव्रता आहे ती 7 रिस्टर स्केलच्या वर नाही. हिमाचल किंवा जम्मू काश्मीरमध्ये भूकंप होतो त्यावेळी जमिनीला दोन्ही बाजूला भेगा पडून भूकंप होतो. आपल्याकडील त्या भागात बसाल्टचा भाग असल्यामुळे 7 रिस्टर स्केलच्यावर तेथे भूकंप होऊ शकत नाही. दि.11 डिसेंबर, 1967 साली 6.7 रिस्टर स्केल भूकंपाची नोंद झालेली असताना सुध्दा कोयना धरणाच्या परिसराला हानी पोहोचलेली नाही. त्यावेळी तज्ज्ञ समितीकडून धरणाच्या स्थिरतेचा अभ्यास केला गेला होता. त्यांच्या निष्कर्षानुसार त्यावेळी धरणाच्या अनुस्तरिय भागाच्या मजबुतीकरणाचे काम 1968 ते 1972 या कालावधीत पूर्ण केले गेले. इतक्या क्षमतेचा भूकंप होऊनही धरणाला हानी पोहोचू शकली नाही. त्यापेक्षा जास्त तीव्रतेचा भूकंप आपल्या महाराष्ट्रामध्ये होऊ शकत नाही अशाप्रकारची आपल्याकडे माहिती आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गो-हे यांनी लातूर, उस्मानाबाद या जिल्हयात झालेल्या भूकंपाचा मुद्दा उपस्थित केला आहे. त्याठिकाणच्या लोकांच्या पुनर्वसनाचा प्रश्न उपस्थित केला आहे. या कामासाठी केंद्र सरकारने निधी उपलब्ध करुन दिला होता. याठिकाणी या खात्याचे सन्माननीय मंत्री महोदय श्री.अजितदादा पवार उपस्थित आहेत. या निधीतून 10 टक्के निधी भूकंपग्रस्तांच्या घरांना तडे गेले असतील किंवा तेथील जनसुविधांची कामे करावयाची असतील त्यासाठी निधीची उपलब्धता करुन दिली जाईल. कोयना धरणाच्या परिसरात 6

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

श्री.विजय वडेट्टीवार....

ठिकाणी यंत्रणा व व्यवस्था केलेल्या आहेत. भूकंपाची तीव्रता मोजण्यासाठी वूड अंडरसन सेस्मोग्राफ, मायक्रो अर्थक्वेक रेकॉर्डर, इलेक्ट्रॉनिक मॅग्नेटिक सेस्मोग्राफ याप्रकारची भूकंप मापन यंत्रणा बसविण्यात आलेली आहे. ही सर्व यंत्रणा 6-7 ठिकाणी बसविल्यामुळे सन्माननीय सदस्यांनी मनामध्ये भीती बाळगण्याचे कारण नाही. भूकंप किती मोठा झाला तरी त्याला सामोरे जाण्यासाठी पुरेशी उपाययोजना शासनाने केलेली आहे.

यानंतर श्री.ओटवणेकर.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

श्री.विजय वडेट्टीवार ....

डिझास्टर मॅनेजमेंटची पूर्ण तयारी शासनाने केलेली आहे. ज्यावेळी अशा घटना घडतात त्यावेळी तातडीने उपाययोजना करण्याचे काम शासनाने केलेले आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हे यांच्या मनात थोडीशी शंका होती. भूकंप परिसरामध्ये यंत्रणा उभी करावी अशी त्यांनी मागणी केली आहे. यासंबंधी मी त्यांना सांगू इच्छितो की, भूकंप परिसरामध्ये अशी यंत्रणा उभी केली आणि भूकंप आला तर ती यंत्रणा संपूर्ण कोसळेल म्हणून विशिष्ट अंतरावर यंत्रणा उभारण्यात आलेली आहे. त्यामुळे ज्या ज्यावेळी छोटे-मोठे भूकंपाचे धक्के बसतात त्यावेळी त्याची नोंद केली गेलेली आहे. विकास आराखडा जिल्हाधिकारी,सातारा यांनी तयार केला आहे, असे देखील सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे. तो विकास आराखडा जिल्हाधिकारी, सातारा यांच्याकडून मागवून घेऊन तपासून पाहू. त्यांच्या नियंत्रणाखाली तयार करण्यात आलेल्या आराखड्याला मंजुरी देण्याची आवश्यकता आहे असे शासनास वाटले तर शासन त्याचा निश्चितपणे विचार करेल. तसेच जिल्हाधिकारी स्तरावर समिती गठित करण्यास शासन तयार आहे. जनतेच्या मनामध्ये भीती आहे. ती या अशासकीय ठरावाच्या निमित्ताने दूर होणार आहे. लोकांमध्ये अनेक प्रकारचे गैरसमज निर्माण होतात. मोठ्या प्रमाणावर भूकंप झाला तर शासनाकडे व्यवस्था आहे किंवा नाही असा देखील प्रश्न लोकांमध्ये निर्माण होतो. तेव्हा या निमित्ताने मी सभागृहाला अवगत करू इच्छितो की, शासनाकडे सगळ्या प्रकारची व्यवस्था आहे. जल संपदा विभागाने पूर्ण जागरूकतेने येणारा धोका लक्षात घेऊन यंत्रणा बसविलेली आहे. तेव्हा सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हे यांनी शासनाची बाजू लक्षात घेऊन त्यांनी मांडलेली अशासकीय ठराव मागे घ्यावा अशी मी विनंती करतो आणि येथेच थांबतो.

डॉ.नीलम गोऱ्हे :सभापती महोदय, मी माझा ठराव मागे घेण्यासाठी सभागृहाची अनुमती मागते.

सभागृहाच्या अनुमतीने ठराव मागे घेण्यात आला.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ठराव क्रमांक 3 आधी घेण्याबाबत.

उप सभापती : सन्माननीय मंत्री श्रीमती फौजिया खान यांना विधानसभेच्या सभागृहात कामकाज असल्यामुळे आजच्या कामकाज पत्रिकेवरील अशासकीय कामकाजात नमूद केलेला अनुक्रमांक तीन वरील ठराव आधी घेण्याची विनंती केली आहे. सभागृहाच्या अनुमतीने सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचा अशासकीय ठराव आधी घेण्यात येत आहे. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांचा अशासकीय ठराव घेण्यात येईल.

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: केंद्र शासनाच्या कार्यालयातून त्रिभाषा सूत्रानुसार राज्यात मराठी भाषेचा वापर पुरेसा न होणे

मु.शी.: केंद्र शासनाच्या कार्यालयातून त्रिभाषा सूत्रानुसार राज्यात मराठी भाषेचा वापर पुरेसा न होणे या विषयावरील श्री.दिवाकर रावते, वि.प.स.यांचा ठराव

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने खालील ठराव मांडतो :-

''मुंबई व महाराष्ट्रामधील केंद्र शासनाच्या कार्यालयांतून केंद्र शासनाच्या त्रिभाषा सूत्रानुसार मराठी भाषेचा वापर पुरेशा प्रमाणात होत नाही हे लक्षात घेता, राज्यातील केंद्र शासनाच्या सर्व कार्यालयांमधून मराठी भाषेचा मोठया प्रमाणावर वापर करण्यासाठी विशेष उपाययोजना करावी, या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

सभापती महोदय, महाराष्ट्रात केंद्र शासनाची कार्यालये सर्व ठिकाणी आहेत. राष्ट्रीयकृत बँका देखील केंद्र शासनाच्या अधिपत्याखाली येतात. देशातील प्रत्येक राज्यात त्रिभाषा सूत्र वापरण्याचे धोरण केंद्र शासनाने तयार केले आहे. परंतु, आपल्या राज्यात त्याप्रमाणे अंमलबजावणी होताना दिसत नाही. त्रिभाषा सूत्र काय आहे ? हे मी आपल्याला सांगू इच्छितो. राजभाषा ही पहिल्या क्रमांकावर वापरली पाहिजे. त्यानंतर दुसऱ्या क्रमांकावर घटनेने ज्याला संपर्क भाषेचा दर्जा दिला आहे त्या हिंदी भाषेचा वापर करणे आवश्यक आहे.

यानंतर श्री.शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...

त्यानंतर इंग्रजी भाषेचा वापर, अशा प्रकारे त्रिभाषा सूत्र केन्द्राने प्रत्येक राज्याला घालून दिलेले आहे. आता केन्द्र शासनाच्या कोणत्याही कार्यालयात गेल्यानंतर या त्रिभाषा सूत्राचे पालन अधिकारी करताना दिसत नाहीत. त्या त्या राज्यामध्ये या त्रिभाषा सूत्राचा वापर न केल्यामुळे त्या त्या राज्यभाषेचा अवमान होतो अशी माझी भूमिका आहे. आपण कोणत्याही बँकेत गेलात तर पैसे भरण्याची किंवा पैसे काढण्याची जी स्लिप भरावयाची असते ती हिंदी किंवा इंग्रजीमध्ये असते. मराठीमध्ये ती कुठेही नसते. गोखले रोडवरील बँक ऑफ महाराष्ट्र शाखेवर मराठीमध्ये फलक नव्हता. त्यासंबंधी मी 20 वर्षापूर्वी आग्रह धरला. अनेकवार सांगून बघितले. त्यांनी ऐकले नाही. परंतु नंतर तो फलक तोडून टाकल्यानंतर मराठीमध्ये तो लावण्यात आला. सगळया बँका प्रथमदर्शनी फलक हा मराठी, हिंदी आणि नंतर इंग्रजी भाषेमध्ये लावतात. परंतु आपल्या विधानमंडळाच्या समोरच्या इमारतीमध्ये असलेल्या विविध बँकानी दर्शनी फलक इंग्रजीमध्ये लावलेले आहेत. काही बँकांनी ते हिंदीमध्ये लावलेले आहेत. केन्द्र शासनाच्या आदेशानुसार प्रत्येक बँकेने मराठी भाषेमध्ये दर्शनी फलक लावणे अनिवार्य आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक शहरांमध्ये केन्द्र सरकारची शाखा-कार्यालये असतात. मग ती इन्कम टॅक्स विभागाची असोत किंवा अन्य विभागाची असोत. त्या कार्यालयामध्ये आपण गेलो तर तेथील दर्शनी फलक इंग्रजीमध्ये असल्याचे आपणास दिसते. मराठी फलक लावण्याच्या बाबतीत आपण कितीही आग्रह धरला तरी ते मानत नाहीत. भाषिक प्रांत रचनेप्रमाणे देशातील प्रत्येक राज्यामध्ये त्रिभाषा सूत्राची अंमलबजावणी झाली पाहिजे. त्यानुसार या केन्द्र शासनाच्या कार्यालयातील फलक शुध्द मराठीमध्ये असायला पाहिजेत. परंतु तसे न करता ते इंग्रजी अथवा हिंदीमध्ये असतात. खासकरुन महाराष्ट्राच्या सीमावर्ती भागामध्ये जेथे पलीकडच्या प्रांताचा प्रभाव आहे तेथे त्या प्रांताच्या भाषेतील फलक दिसतात. तेथे मराठीचा अवमान केला जातो. इतर राज्ये त्यांच्या भाषेबद्दल जागरुक असताना महाराष्ट्रामध्ये मराठी राज्यभाषेचा अवमान केला जातोय. शासनाच्या आदेशाची, त्रिभाषा सूत्राची अंमलबजावणी केली जात नाही. केन्द्रीय गृहमंत्र्यांनी यासंदर्भात परिपत्रक काढलेले आहे.

गृहमंत्रालय कार्यालय (सूचना) परिपत्रक क्रमांक 1/14013/5-76 राभाक -1 दि. 18 जून 1970 नुसार केन्द्र सरकारी कार्यालयातील भाषांच्या वापराचे क्रमांक स्थानिक भाषा प्रथम, हिंदी द्वितीय आणि इंग्रजी तृतीय असे करण्याचे निर्देश आहेत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते..

परिपत्रक क्रमांक 1/44013/218/राभाक 1, दिनांक 10.2.1986. सर्व शीर्षपत्रे (लेटर हेडस्) लिफाफ्यावरील मजकूर, सर्व पत्ते, सूचना, परिपत्र्के, जनतेच्या माहितीसाठीची सर्व पत्रके, जाहिराती, हप्ता मागणारी पत्रे या सर्वांच्या पत्रव्यवहारात स्थानिक भाषांना प्राधान्य राहील. मराठी प्रथम त्यानंतर हिंदी व इंग्रजी असा क्रम राहील.

परिपत्रक क्रमांक 1/12015 राभाक-1 दिनांक 10.2.1986. हिंदी व स्थानिक भाषेचा वापर करण्यासाठी आवश्यक त्या सर्व सोयी, टंकलेखन यंत्रे, मुद्रण व अन्य आवश्यक सुविधा ह्या शासकीय खर्चाने निर्माण केल्या जाव्यात.

...नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

व वरीलप्रमाणे क्रम करुन भाषेचा वापर केला जावा अशा प्रकारचे आदेश या परिपत्रकाप्रमाणे केंद्र सरकारने यापूर्वीच निर्गमित केलेले आहेत. त्रिभाषा सूत्राचे पालन महाराष्ट्र वगळता अन्य सर्व राज्यात केंद्र शासनाच्या कार्यालयात जवळजवळ 100 टक्के केले जाते. सीमेवरील भागात ज्यांचा प्रभाव अधिक आहे त्या भाषेचे पालन केले जाते. पुण्यामध्ये खास करुन 30-40 प्रयोगशाळांमध्ये मराठीचा वापर नावापुरता केला जातो. इतर ठिकाणी डावलले जाते अशी परिस्थिती आहे. त्रिभाषा सूत्राचे पालन होत नसल्यामुळे राजभाषा अधिनियम, 1964 नुसार जिल्हाधिकाऱ्यांनी केंद्रीय कार्यालयांकडे पाठपुरावा करावा. त्या त्या जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यांनी पाठपुरावा करावा अशी सध्या तरतूद आहे. मात्र पाठपुरावा करुनही पालन न झाल्यास कोणतीही कारवाईची दंडात्मक तरतूद नाही. म्हणूनच प्रस्तावित ठरावात कार्यालय बंद करणे, राज्य शासनाकडून दिल्या जाणाऱ्या सुविधा बंद करणे, संबंधित अधिकाऱ्यांना त्यांच्या वरिष्ठ कार्यालयांकडून लिखित ताकीद देणे, पगार रोखणे, बढती रोखणे अशा प्रकारची कारवाई केंद्र शासनाच्या अधिकाऱ्यांनी करावी अशा प्रकारचा ठराव करुन तो या निमित्ताने केंद्र शासनाकडे पाठवावा अशी अपेक्षा या राज्य सरकारकडून आहे. निर्बंध नसल्यामुळे अनिर्बंध उत्तर दिले जाते आणि मराठी भाषेचा अवमान जाणीवपूर्वक केला जातो. मराठी भाषेत योग्य नाव लिहिले जात नाही, इंग्रजी आद्याक्षरामध्ये नाव लिहिता कामा नये यासाठी दंडात्तक कारवाईची तरतूद केली आहे. ती कारवाई कशी केली जावी ते लिहिले आहे. मात्र त्याच वेळेला महाराष्ट्र राज्यापेक्षा इतर राज्यांमध्ये त्रिभाषा सूत्राची 100 टक्के अंमलबजावणी होत असेल तर कशाला कॉस्मॉपॉलिटनच्या नावाखाली मराठी भाषेचा गळा घोटण्याचे काम केले जात आहे. तरी मराठी भाषेला दुय्यम दर्जा देण्याचे काम होत असेल तर हे सहन होता कामा नये. महाराष्ट्र राज्याचे हे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. शासन हे आग्रहाने सांगण्याचा प्रयत्न करणार असेल तरच आपल्याला सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करण्याचा शासनाला अधिकार आहे. मराठी भाषेबाबत हडेलहप्पी करणार असाल तर निर्बंध घालावे लागतील हे ठामपणे सांगितले पाहिजे. भाषिक भेदभाव केला जात आहे ते आपण अनुभवतो आहोत. अशा अधिकाऱ्यांवर फौजदारी कलम 156 नुसार भाषेच्या आधारावर भारतीय नागरिकांशी भेदभाव करणे हा फौजदारी गुन्हा आहे म्हणून गुन्हा दाखल करण्याची तरतूद आहे. म्हणून मी घटनात्मक बाब मांडली आहे. मला वाटते म्हणून मी ही बाब मांडलेली

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

नाही. केवळ मराठी भाषेचा अवमान होतो म्हणून शिवसैनिक या नात्याने ही बाब मांडलेली नाही. आमचे मराठी भाषेबाबत आंदोलन आहे म्हणून मांडलेली नाही. मराठी भाषेची अंमलबजावणी होणे हा राज्याचा सन्मान आहे, हा राज्याचा अधिकार आहे. या राज्याची अस्मिता जपण्यासाठी राज्याला दिलेला केंद्रीय अधिकार आहे. त्याचा वापर या राज्यामध्ये केंद्र सरकारचे अधिकारी करीत नसतील तर आपण त्याबाबत अत्यंत कडवट भूमिका घेतली पाहिजे. इतर राज्यातील सरकार ज्या वेळेला एवढ्या कडवटपणाने आपल्या भाषेकरीता झगडत असतील अशा वेळेला मंत्रीमहोदया आपण या राज्यामध्ये मराठी भाषेची अंमलबजावणी करण्यासाठी तेवढा कडवटपणा दाखविला तर सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करण्याचा अधिकार सरकार म्हणून आपल्याला प्राप्त होऊ शकतो. अन्यथा मराठीची गळचेपी होत असताना आम्ही केवळ उदोउदो करणार असू तर ते योग्य नाही. म्हणून जिल्हाधिकाऱ्यांना उद्यापासून परिपत्रक पाठवून सूचना देणार आहात का? सर्व जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून केंद्रीय कार्याललयातील संबंधितांना नोटीस देऊन हे काम करावयास लावणार आहात का? हा ठराव मागे घेण्याची तुम्ही विनंती करु नये. हा संपूर्ण सभागृहाचा ठराव आहे. माझा एकट्याचा ठराव नाही. महाराष्ट्राच्या अस्मितेचा ठराव आहे. तेव्हा सर्वांनी मिळून हा इतिहास घडवू या. विरोधी पक्षाकडून ठराव आला म्हणून पारंपारिक पध्दतीने तो मागे घ्यावा, आम्ही योग्य ते उत्तर देतो असे न सांगता हा ठराव सर्वांनी मिळून संमत करुया आणि राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये या राज्यातील केंद्र शासनाच्या कार्यालयात मराठी भाषेचा आदर केला पाहिजे हा ठाम निर्धार, अशी शिफारस ही विधानपरिषद करीत आहे अशा प्रकारचा संदेश देऊ शकलात तर तुमच्या आमच्या महाराष्ट्राच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये विधानपरिषदेचा गौरव वाढेल.....

(नंतर श्री.खर्चे.....

अशुधारित प्रत/शीघ्रलेखाशी नाही

श्री. दिवाकर रावते .....

म्हणून माझी अत्यंत आग्रहाची विनंती आहे की, यासंदर्भात कुठलीही तडजोड होताकामा नये. केंद्रशासनाला केवळ अशा प्रकारचा ठराव पाठवून चालणार नाही तर त्याचा पाठपुरावा देखील करणे आवश्यक आहे. "बॉम्बे हायकोर्टा"चे नामकरण "मुंबई हायकोर्ट" असे करावे यासाठी याच सभागृहात तीन वेळा ठराव आणला परंतु अद्यापही त्यासंदर्भात कुठलीच भूमिका घेतली जात नाही. तसेच मुंबईतील रेल्वे स्टेशन्सची नावे बदलण्यासाठी वेळोवेळी ठराव मांडले गेले. समोरुन मला सांगण्यात आले की, आपण अशा प्रकारचा जो ठराव मांडला तो मागे घ्यावा. आम्ही केंद्रसरकारला कळवू परंतु तसे झाले नाही. मी देखील केंद्रशासनाला पत्र लिहिले होते परंतु अजुनही "एलफिन्स्टन रोड" या लोकलच्या स्टेशनचे नाव "प्रभादेवी" असे होत नाही. खरे तर मला लाज वाटते की या सभागृहात इतके प्रयत्न करुनही मराठी अस्मितेच्या बाबतीत अशी भूमिका का घेतली जाते. ज्यावेळेस लोकहितवादी देशमुखांच्या नावाच्या संदर्भात सभागृहात प्रस्ताव आला होता त्यानंतर "पेडर रोड" चे नाव "लोकहितवादी गोपाळराव देशमुख" असे 20 वर्षापूर्वी नामकरण झालेले आहे. तरी देखील कोणीच तसा वापर करीत नाही. महापालिकेच्या अजेंड्यावर "पेडर रोड" हे नाव आले होते त्यावेळेस मी महापालिका आयुक्तांना सुध्दा यासंदर्भात खरमरीत पत्र लिहिले होते. माननीय मंत्री महोदय श्री. अनिल देशमुख हे बांधकाम मंत्री असताना त्यावेळेस सुध्दा मी त्यांना पेडर रोडचे नाव लोकहितवादी गोपाळराव देशमुख असाच वापर करावा म्हणून पत्र लिहिले होते. परंतु अद्यापही सर्रास गोपाळराव देशमुख रस्ता असा वापर होताना दिसत नाही. याचे कारण त्या भागातील तथाकथित त्रिभाषा सूत्र मंजूर नसलेली काही मंडळी तेथे आपले पाय घट्ट रोवून उभी आहे, ते मराठीचा द्वेष करतात, मराठी भाषा त्यांना नकोशी वाटत आहे. परंतु त्यांचे मराठी भाषा बोलून काही नुकसान होणार नाही असे असतानाही आपली अस्मिता पायदळी तुडवितात तरी देखील आपण सहन करणार काय ? मी ज्यावेळेस गोपाळराव देशमुखांच्या नावाचा विषय छेडला होता त्यावेळेस त्यांच्या नातवाचा मला फोन आला होता. तो म्हणाला की, साहेब कोणी तरी आहे माझ्या आजोबांची आठवण करणारे. मी त्यांना म्हणालो की तीन वर्षांपासून मी लोकहितवादी गोपाळराव देशमुख यांच्याबाबत आवाज उठवित आहे. शेवटी मला नाईलाजाने सांगावे लागेल की, जर यापुढे त्या रस्त्याचे नाव लोकहितवादी गोपाळराव

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

देशमुख असे दिसले नाही तर काळ्या रंगांने आम्हाला त्याचे स्वागत करावे लागेल, ही खरे तर दुर्दैवाची गोष्ट आहे. पेडर रोड येथील "पेडर रोड रेसिडेंट असोसिएशन" कडे गोपाळराव देशमुख यांचा नातू भेटायला गेला आणि सांगितले की, या रस्त्याला माझ्या आजोबांचे म्हणजेच "लोकहितवादी गोपाळराव देशमुख" असे नाव दिले गेले आहे. त्यावेळेस त्या लोकांनी त्याला "Peddar is a known personality, your Deshmukh is not known" असे इंग्रजीतूनच सांगितले. त्यांचा नातू नंतर मला भेटायला आला. अशा प्रकारचे लोक मुंबईत राहत असतील तर त्यांच्या पेकाटात कोणीतरी लाथ घालावी आणि सांगायचे की हा मराठीचा प्रांत आहे तेव्हा मुंबईत मराठीचाच वापर झाला पाहिजे बाकी आपल्या घरात काय करायचे असेल ते करा परंतु मराठी अस्मितेचा अशा प्रकारे अवमान आपल्याला करता येणार नाही. असे लोक पत्रावर मराठीतून नाव लिहायला सुध्दा नाकारतात. महोदय, या मुंबईत सर्वात जास्त केंद्रसरकारची कार्यालये आहेत त्या सर्व ठिकाणी तसेच रेल्वे स्टेशनपासून बँका, कस्टम ऑफिस पासून ते आयकर भवनपर्यंत संपूर्ण कार्यालयांची नावे प्रथम मराठी भाषेतून असायला हवीत, बाकीच्या भाषा नंतर असा माझा आग्रह आहे. माझी या निमित्ताने शासनाला विनंती आहे की, हा ठराव कृपा करुन मागे घेण्यास मला सांगू नका. कदाचित विरोधी पक्षाचा ठराव असल्याने आपली पंचाईत होत असेल तर आपण म्हणजे सरकारने असा ठराव आणावा, आम्ही संपूर्ण सभागृह अशा ठरावाला पाठिंबा देण्यास तयार आहोत. असा ठराव आणून शासनाने केंद्राकडे योग्य पध्दतीने पाठपुरावा करावा. तसेच जिल्हाधिकाऱ्यांना जो अधिकार प्राप्त झाला आहे त्यानुसार या सुवर्ण महोत्सवी वर्षात केंद्रशासनाच्या सर्व कार्यालयातील भाषा 100 टक्के मराठी झाली पाहिजे अशा प्रकारचे नियोजन आपण करावे. अन्यथा आमची नम्र विनंती आहे की, अशा प्रकारे भाषेची दखल घेण्याची इच्छा आम्ही व्यक्त केली व त्यानुसार मराठी भाषेची अस्मिता केंद्रशासनाच्या कार्यालयात सुध्दा जपावी. तसे ते करत नसतील तर मराठी अस्मिता जपणाऱ्या कार्यकर्त्यांवर हे शासन कारवाई सुध्दा करणार नाही, कारवाईचा बडगा उगारणार नाही, असेही केंद्राला आपण कळवावे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

आपण केवळ पोलिसी बडगा न दाखवता, अंगात खान न संचारू देता हा प्रस्ताव सभागृहाने मंजूर करावा व मराठीची जपणूक करण्यासाठी हा प्रस्ताव सदनाने एकमताने पारीत करावा अशी मी आपल्याला विनंती करतो.

उपसभापती महोदय, आपण या ठिकाणी सुदैवाने आसनस्थ असल्यामुळे आपण हे करु शकता त्यामुळे आम्हाला आनंद आहे. त्यामुळे हा प्रस्ताव आपण स्वत: मांडावा आणि सभागृहाने तो एकमताने मंजूर करुन केंद्रसरकारला पाठवावा. यामध्ये प्रतिष्ठेचा कोणताही प्रश्न येणार नाही. विरोधी पक्षाचे अशा प्रकारचे सहा प्रस्ताव या सभागृहात मंजूर झालेले आहेत. यासंदर्भातील सर्व यादी माझ्याकडे आहे. विनंती करुन मागे घेतलेले एकूण प्रस्ताव आणि विरोधी पक्षाचे मंजूर झालेले एकूण प्रस्ताव किती आहेत याची माहिती माझ्याकडे आहे. जेव्हा अशा प्रकारचे चांगले प्रस्ताव येतात तेव्हा सभागृह त्याला सन्मानित करते हा या सभागृहाचा बहुमान आहे. म्हणून माझी या शासनाला आग्रहाची विनंती आहे की, या ठिकाणी माननीय मंत्री महोदय श्री. अजित पवार हे या ठिकाणी बसलेले आहात. या ठिकाणी ज्येष्ठ मंत्री म्हणून आपणच या सभागृहात उपस्थित आहात. त्यामुळे तुमच्या नेहमीच्या स्वभावाप्रमाणे तुम्ही मनात आणले तर "यस" करण्याचे तुमचे सामर्थ्य आहे. आपण सारस्वत नगरीचे पालक मंत्री आहात त्यामुळे पुण्याच्या सारस्वत नगरीचाही आपण सन्मान करावा अशी मी आपल्याला आग्रही विनंती करतो. हा प्रस्ताव मी मागे घ्यावा आणि तो आपण मांडावा अशी आपण माननीय सभापतींना विनंती करावी. असे जर झाले तर तो या सभागृहाचा बहुमान ठरेल. या सदनाची गरिमा राखणे हे प्रत्येकाचे काम आहे. परंतु या सभागृहात विरोधी पक्षाने मांडलेले प्रस्ताव या पूर्वीही मंजूर झालेले आहेत. या विषयाच्या संदर्भात काही नवीन होत आहे अशातला काही भाग नाही. त्यामुळे सरकारने मी आणलेला प्रस्ताव मंजूर करावा अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

(ठराव प्रस्तुत झाला.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मुंबई व महाराष्ट्रातील केंद्रशासनाच्या कार्यलयातून केंद्रशासनाच्या त्रिभाषा सूत्राबद्दल आदरणीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी ठराव मांठलेला आहे. या ठरावाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी आपल्या तीव्र भावना या ठिकाणी व्यक्त केल्याबद्दल मी त्यांचे मनापासून स्वागत करते.

मराठी राज्य भाषेचा सन्मान प्रत्येकाला असलाच पाहिजे आणि त्याबद्दल महाराष्ट्र शासनालाही मराठीचा सन्मान आणि अभिमान आहे. राज्य भाषेबद्दल शासनाची भूमिका नेहमीच सकारात्मक राहिलेली आहे. शासनाने मराठीच्या सन्मानासाठी वेळोवेळी प्रसार आणि प्रचारासाठी पुष्कळ कॉन्शीअस डिसीजन घेतलेले आहेत. शासनाच्या विविध विभागाच्या माध्यमातून मराठीच्या सन्मानासाठी शासनाने लक्ष केंद्रित केलेले आहे. कलम 345, राज्यभाषा अधिनियम,1964 पारीत करुन राज्याच्या राज्य कारभाराची भाषा मराठी ठरविण्यात आली असून वर्जित प्रयोजन वगळता अनुच्छेद 345 मध्ये नमूद केलेल्या सर्व विषयासंबंधी राज्यशासनाचा सर्व कारभार मराठीतून करण्याबाबत शासनाकडून अनिवार्य करण्यात आलेला आहे. त्याच प्रमाणे शासनाच्या अधिसूचनेद्वारे राज्यातील दुय्यम न्यायालयातील व्यवहाराची भाषा मराठी करण्यात आलेली आहे. त्याच प्रमाणे मराठी चित्रपटांना प्रोत्साहन देण्याचा धोरणात्मक निर्णय वेळोवेळी शासनाने घेतलेला आहे. एसएससी बोर्डामध्ये 10 वी पर्यंत मराठी विषय अनिवार्य करण्यात आलेली आहे. तसेच सीबीएसई, आयसीएसई अशा बोर्डामध्ये सुध्दा मराठी विषय अनिवार्य करण्यात आलेला आहे. शासनाला मराठीच्या सन्मानाची काळजी नाही हे मला मान्य नाही. परंतु या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी 1977 च्या संदर्भातील विषयाचा उल्लेख केलेला आहे. त्यामध्ये हिंदी समितीच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला होता की, नाम फलक, सूचना फलक इतर बाबीसाठी प्रादेशिक भाषा पहिल्या क्रमांकावर राहील आणि त्यांनतर हिंदी भाषा असेल व हिंदी भाषे नंतर इंग्रजी भाषा असेल.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्याशिवाय शब्दांचा आकार सारखाच राहील असे देखील आदेश त्यावेळी देण्यात आले होते. त्यानंतर मागच्या पाच वर्षाचा अहवाल संकलित करुन पाठावावा या संबंधी 1968,1988,1991,2003-2003 साली जिल्हाधिका-यांना शासनाकडून आदेश देण्यात आलेले आहेत. लेजिस्लेटीव्ही आणि कॉन्स्टिटयुशनल लिमिटसमध्ये राज्य शासनाला जे काही करणे शक्य होईल ते सर्व प्रयत्न शासनाने केलेले आहेत. त्याबाबतीत वारंवार आदेश काढण्यात आले होते असे असतांनासुध्दा यामध्ये शुन्य टक्के सुधारणा झालेली आहे असे नाही.काही ठिकाणी जरुर अशी उदाहरणे आपल्याला दिसून येतील. तरी सुध्दा आजपर्यत शासनाने वेळोवेळी आदेश दिलेले आहेत. काही दिवसापूर्वी प्रधान सचिवांच्या सहीने पुन्हा केन्द्र सरकारला पत्र लिहिलेले आहे. तसेच जिल्हाधिका-यानी तीन महिन्याचा अहवाल शासानाकडे पाठवावे असे नुकतेच कळविलेले आहे. मिनिस्ट्री ऑफ होम अफेअर्स विभागाच्या मुख्य सचिवांना देखील यांसबंधीचे पत्र पाठविण्यात आलेले आहे. त्याचबरोबर जिल्हाधिका-याकडून पूर्वी पाच वर्षाचा अहवाल मागितला होता आता पुन्हा तीन वर्षाचा अहवाल मागितला आहे. हा अहवाल आल्यानंतर काय कार्यवाही प्रस्तावित करणें शक्य आहे याबाबतीत विचार करता येईल. या विषयासंबंधी राज्य सरकारला जेवढे अधिकार असावयास पाहिजे होते तेवढे अधिकार नाहीत. हा विषय केन्द्र सरकारशी संबंधित असल्यामुळे आपण त्यांना विनंती करु शकतो.

सभापती महोदय, आता पर्यत केन्द्र शासनाला राज्य शासनाने वेळोवेळी विनंती केलेली आहे. मी माननीय सदस्य श्री दिवाकर रावते याना विनंती करते की, त्यांनी हा ठराव मागे घ्यावा या विषयावर मॉनेटरींग करुन त्याप्रमाणे 100 टक्के अंमलबजावणी महाराष्ट्रात होईल अशा प्रकारचे नियोजन राज्य शासन करील एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, शासनावर मी विश्वास ठेवू शकत नाही. दिनांक 3.4.2007 रोजी माननीय मंत्रिमहोदयांनी मला लेखी पत्र पाठविले होते. ते पत्र माझ्याकडे असून सदरहू पत्र मी लॅमिनेट करुन ठेवले आहे.मराठीच्या विषयासंबंधी त्यावेळी सभागृहात पाच दिवस चर्चा सुरु होती आणि त्या संदर्भात माननीय मंत्रिमहोदयांनी मला पत्र पाठविले होते. सभापती महोदय, या विषयावर पाच दिवस चर्चा तुम्ही करु दिली याबद्दल मी आपणास मनापासून धन्यवाद देतो.

सभापती महोदय, पाचव्या दिवशी थकलेल्या माननीय मंत्री महोदयांनी पत्र पाठवून असे कळविले की, " मला खालच्या सभागृहात काम असल्यामुळे या विषयाला उत्तर देण्याची जबाबदारी मी प्रा.वसंत पुरके यांच्यावर सोपवत आहे." मी त्यांना असे म्हणालो की, सदनामध्ये जवळजवळ पाच दिवस चर्चा झाली होती. त्यावेळी माननीय मंत्री श्री.अजित दादांनी सुध्दा सुंदर भाषण केले होते.हे मला चांगले आठवते. मराठी भाषेच्या संदर्भातील ठरावावर भाषण केल्याचे त्यांनासुध्दा आठवत असेल. माननीय मंत्रिमहोदयानी मला जे पत्र पाठविले होते त्यात असे म्हटले होते की "यांसबंधीची अंमलबजावणी जीएडी कडून कडक पध्दतीने केली जाईल " जीएडी . हा शब्दसुध्दा त्यांनी इंग्रजीतूनच लिहिला होता. 2007 साली त्यांनी मला पत्र पाठविले होते त्यानुसार या संदर्भात मी अनेकदा पत्रव्यवहार केला होता. माझ्याकडे तीन चार फाईल्स भरतील एवढा पत्रव्यवहार आहे. अशा प्रकारे वारंवार पत्र पाठवून मी देखील आता कंटाळलो आहे.सरकारी कार्यालयाकडून सुध्दा मराठी पेपरमध्ये इंग्रजी जाहिराती दिल्या जातात इतकेच नव्हे तर . ग्रामपंचायत,नगरपालिका आणि जिल्हा परिषदांकडून देखील इंग्रजीतून जाहिराती दिल्या जातात या जाहिराती मराठीतून द्यावयास पाहिजेत त्या बाबतीत शासनाने कोणती कडक अंमलबजावणी केली आहे ? राज्य सरकारला स्वत:च्या राज्यात मराठीची अंमजबजावणीकरता येत नाही आणि या बाबतीत आम्ही काही करु शकत नाही असे जे आपण सांगितले आहे ते चुकीचे आहे.

नंतर श्री.सरफरे

अशुद्धीत पत्र / मुद्रित प्रत नाही

श्री. दिवाकर रावते...

आम्ही काहीही करु शकत नाही एवढी हतबलता आपल्यामध्ये कां? हे कॉस्टिटयुशनल ऑब्लिगेशन आहे. अशाप्रकारे भाषेचा वापर झाला पाहिजे असे केंद्र सरकारने अधिकृतपणे परिपत्रक काढले आहे. केंद्र सरकारची दाढी कुरवाळून आपण त्यांना विनंती कशासाठी करावयाची? आपण मराठी भाषेची अंमलबजावणी करीत नसाल तर हा ठराव मागे घेण्याचा प्रश्न उपस्थित होत नाही. यापूर्वी या विधानपरिषदेमध्ये पाच-सहा ठराव पारीत झाले आहेत, या सभागृहाने चांगल्या विषयाचे ठराव स्वीकारले आहेत. मराठी भाषेच्या अंमलबजावणीसाठी हे सरकार केंद्र सरकारपुढे अगतिक होत असेल तर विधान परिषदेमध्ये हा ठराव पारित झालाच पाहिजे. केंद्र सरकारला कळले पाहिजे की, महाराष्ट्राच्या विधानपरिषदेमध्ये आपल्याविरुध्द ठराव मंजूर झाला आहे. म्हणून तातडीने हालचाल केली पाहिजे. आपण आम्हाला आश्वासन द्या. नाहीतर हे जे इंग्रजीमध्ये फलक आहेत त्यांना आम्ही काळे फसू. त्यावेळी तुमची कायदा व सुव्यवस्था आमच्यापुढे आणू देऊ नका. तुमची हतबलता दूर करण्यास आम्ही तयार आहोत. आम्ही तुमच्या कार्यकर्त्यांना घेऊन जाऊ आणि केंद्र सरकारचे फलक ज्या ज्याठिकाणी आहेत ते सुधारायला लावू. त्यावेळी कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी कुठल्याही खानला सांगू नका. हा घटनेने दिलेला अधिकार आहे, आणि तो अंमलात आणला पाहिजे असे माझे ठाम मत आहे. सभापती महोदय, हा मराठी भाषेचा ठराव सभागृहामध्ये मंजूर केला पाहिजे. यापुढे केंद्र सरकारकडून आमची दिशाभूल सहन केली जाणार नाही, हे त्रिवार शक्य नाही. त्यामुळे आपण कृपा करुन ठराव मागे घेण्यास मला विनंती करु नका. मराठी भाषेच्या अंमलबजावणीचा ठराव मागे घेण्यास सांगण्याची या सरकारला हिंमत कशी होते? आपण हा प्रस्ताव पारित करुन केंद्र सरकारला ठणकावून सांगा की, विधानपरिषदेमध्ये प्रस्ताव मंजूर झाला आहे आणि एक महिन्याच्या आत केंद्र सरकारच्या सर्व कार्यालयांना नोटिस द्या. नाहीतर कलम 156 अन्वये जिल्हाधिकारी कारवाई करु शकतात. तशी कारवाई जिल्हाधिकाऱ्यांना करता येते. याबाबतीत आपण लेचेपेचे धोरण स्वीकारीत असाल तर मला आपली विनंती मान्य करता येणार नाही. धन्यवाद.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनांची अंमलबजावणी शासनाकडून होईल. आतापर्यंत आपण तशी अंमलबजावणी केली आहे. तेव्हा माननीय सदस्यांनी शासनाला एकदा संधी द्यावी अशी मी विनंती करते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : या महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीला 50 वर्षे होत असतांना आपण संधी कशासाठी मागता? आपण केंद्र सरकारला ठणकावून सांगा. आपण संधी मागू नका.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, माझी माननीय सदस्यांना विनंती आहे,...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या सभागृहामध्ये मी दुर्दैवाने काही असंसदीय शब्द वापरले आहेत. मला सहन होत नाही म्हणून मी ते जाणीवपूर्वक वापरले. मी ते वापरावयास नको होते याचे मला भान आहे. परंतु या संदर्भात मी वारंवार अधिकाऱ्यांना पत्रे लिहिली आहेत. हा काय माझा धंदा आहे?

प्रा फौजिया खान : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी ठराव मागे घ्यावा म्हणून मी पुन्हा एकदा त्यांना विनंती करते. हा मराठी भाषेच्या कमीपणाचा विषय नाही. माननीय सदस्यांच्या भावनेशी आम्ही सहमत आहोत. आपण मोठे मन करुन ठराव मागे घ्यावा अशी मी आपणास पुन्हा एकदा विनंती करीत आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी याठिकाणी मराठी भाषेच्या वापरासंबंधी महत्वाचा ठराव मांडला आहे. या सभागृहातील प्रत्येक माननीय सदस्य त्यांच्या या ठरावाचे निश्चितपणे स्वागत करील. या ठरावाच्या संदर्भात शासनाच्या वतीने माननीय राज्यमंत्र्यांनी भूमिका मांडली आहे. त्यांनी सांगितले की, ही राज्य शासनाच्या अखत्यारीतील बाब असती तर तात्काळ त्यांनी "होय" असे उत्तर दिले असते. तसेच, यापूर्वी या विषयाच्या संदर्भात अशाप्रकारची चर्चा झाली असल्यामुळे राज्य शासनाच्या वतीने माननीय राज्यमंत्र्यांनी याठिकाणी विनंती केली आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी . . ..

तर त्यांनी सांगितले की, आम्ही लवकरात लवकर राज्य शासनाची भूमिका केंद्र शासनाला कळवितो आणि काही ठिकाणी मराठी भाषेमध्ये फलक लावण्याचे काम केले असेल, परंतु जर काही ठिकाणी ते काम करावयाचे राहिलेले असेल तर ते काम देखील पूर्ण करण्यात यावे अशा प्रकारची जर राज्य शासनाची भूमिका असेल आणि याठिकाणी राज्य शासनाच्या वतीने माननीय मंत्री महोदय सन्माननीय सदस्यांना विनंती करीत असतील, तर माझी देखील सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, आपण त्यांना थोडे दिवस मुदत द्यावी. त्या मुदतीमध्ये जर ही बाब शक्य झाली नाही तर सन्माननीय सदस्य पुन्हा अशा प्रकारचा ठराव या सदनामध्ये आणू शकतात. तेव्हा राज्य शासनाच्या वतीने माननीय राज्यमंत्री महोदया श्रीमती फौजिया खान यांनी सन्माननीय सदस्यांना हा ठराव मागे घेण्याबाबत विनंती केलेली आहे. त्याप्रमाणे त्यांनी आपला ठराव मागे घ्यावा अशी मी देखील आपल्याला विनंती करतो.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकरजी रावते यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे, त्यांच्या भावनेशी आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी सांगितल्याप्रमाणे आम्ही सर्वच जण सहमत आहोत, त्यामध्ये दुमत असण्याची काही आवश्यकताच नाही. फक्त मी एक विनंती करतो की, आपण शासनाच्या भूमिकेबद्दल शंका व्यक्त करु नये. याचे एक कारण सांगतो. तसेच एक उदाहरण सांगतो की, जेव्हा महाराष्ट्रातील इतर भाषिक शाळांनी मराठी शिकविण्याच्या संबंधी काही भूमिका घेतली, तेव्हा सुप्रीम कोर्टामध्ये ती केस गेली हे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेबांना माहिती आहे. तेव्हा महाराष्ट्र सरकारचे याबाबतीत काय म्हणणे आहे असे सुप्रीम कोर्टाने विचारले असता, महाराष्ट्र शासनाने मराठी हा एक विषय कोणत्याही भाषेच्या शाळेमध्ये सक्तीचा केला जाईल अशी भूमिका मांडली आणि सुप्रीम कोर्टाने ती मान्य केली, म्हणजेच शासनाची या भाषेबद्दलची भावना कोणत्याही प्रकारे वेगळी नाही. शासनाने सुप्रीम कोर्टामध्ये मांडलेली भूमिका ही मान्य करण्यात आलेली आहे. म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की, सन्माननीय राज्यमंत्री श्रीमती फौजिया खान यांनी सन्माननीय सदस्यांना सदरहू ठराव मागे घेण्याबाबत जी विनंती केलेली आहे,त्याचा आपण मान ठेवावा.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आता सन्माननीय सदस्य श्री.उल्हासदादा पवार यांनी जे सांगितले, त्याचा एवढयासाठी आदर करतो आणि मला त्यांनी समर्थन केले त्याबद्दल ....

. . . .4 जी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

त्यांना धन्यवाद देतो, म्हणजे या महाराष्ट्रामध्ये अशी अवलाद जन्माला आलेली आहे की, जी मराठी भाषेला विरोध करते आणि त्यासाठी सुप्रीम कोर्टापर्यंत जाते. शासनानेही काही मोठे केले नाही. शासनाने सांगितले की, आमचे मराठी राज्य आहे आणि मराठी विषय राहील. पण आम्हाला हे सुप्रीम कोर्टामध्ये जाऊन मान्य करुन घ्यावे लागते. तेव्हा अशीही लोक या राज्यात आहेत म्हणून या ठरावाची गरज आहे आणि मूळामध्ये हाच याचा गाभा आहे. आपण माझ्याबरोबर इन्कम टॅक्स ऑफीसमध्ये यावे. तेथे बाहेरचे सगळे लोक भरलेले आहेत, ते विचारतच नाहीत. तुमची वाटच लावतात. मग कुठेही चला, त्यामुळे त्यांच्यावर बडगाच उचलला पाहिजे आणि त्यांना सांगितले पाहिजे की, ही विधान परिषद असे ठणकावून सांगत आहे की, असे केले पाहिजे.

उपसभापती : आता शेवटी काय करावयाचे ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय,जर सर्वांच्या भावना माझ्याबरोबर आहेत तर मग आपण हा ठराव मंजूर करु या. सन्माननीय सदस्य हे आदराने सांगत आहेत की, आमच्या भावना तुमच्या बरोबर आहे.

श्री.सय्यद जमा : सभापती महोदय, एक मिनिट . . . .

उपसभापती : अभी बस हो गया. यावर भरपूर चर्चा झालेली आहे.

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, शासनाने केंद्र शासनाला फोर्सफुली कळविलेले आहे आणि त्या बाबतीत पाठपुरावा सुध्दा सुरु आहे. त्यामुळे ठराव . . . .

उपसभापती : मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, आपल्याकडे अधिकाऱ्यांकडून चिट्ठी आल्यानंतर आपण वाचत आहात. तुम्ही स्वत: काहीतरी बोलावे.

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, असे नाही. मी स्वत:च बोलत आहे. फक्त मी मराठी बोलण्याचा प्रयत्न करीत आहे. जर भाषेपुरते मला काही सहकार्य हवे असेल तर त्याबद्दल आपण असे सांगणे मला मान्य नाही.

(काही सन्माननीय सदस्य मतदानाची मागणी करतात.)

यानंतर श्री.बरवड . . . .

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद जमा : सभापति महोदय, माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते ने जो प्रस्ताव रखा है, उसके बारे में हम सब लोग महाराष्ट्र में रहते हैं और हम सभी की भावना आपके जैसी ही हैं. मैं यह समझता हूँ कि महाराष्ट्र शासन की पॉलिसी वही है. 1964 में इस बारे में कानून बन गया है, लेकिन इस पर सेन्ट्रल गवर्नमेंट की तरफ से अमल नहीं हो रहा है. उसके लिए हमारी माननीय राज्य मंत्री ने कहा है कि केन्द्रीय सरकार को इस बारे में बताएंगे और इसीलिए यह प्रस्ताव लाने की आवश्यकता नहीं है. इस विषय में सभी माननीय सदस्यों की भावनाएं एक जैसी है और केन्द्रीय सरकार से इसे लागू करने के लिए कहा जाएगा. इसलिए मेरा माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते से अनुरोध है कि वे अपना ठराव वापस ले लें.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी या शासनावर विश्वास ठेवण्यास तयार नाही. या महाराष्ट्र शासनाने मला आश्वासन दिल्यानंतरसुध्दा माझ्याकडे जे सिनियर सिटिझनचे कार्ड आले आहे ते मराठीमध्ये नव्हे तर इंग्रजीमध्ये आहे. ते मी आपल्याकडे पाठवतो.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जो अशासकीय ठराव मांडलेला आहे त्यावर मतदान होऊ द्यावे अशी आमची मागणी आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी या ठिकाणी जो ठराव मांडलेला आहे त्याबाबतीत महाराष्ट्राच्या अस्मितेच्या दृष्टीने या सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावना सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांच्या बाजूने आहेत. असे असताना यामध्ये कोणताही प्रतिष्ठेचा प्रश्न आणू नये. सरकारला जर असे वाटत असेल की, याचे क्रेडिट सन्माननीय सदस्य श्री. रावते यांना जाईल तर सरकारच्या बाजूने ठराव आणावा. महाराष्ट्राची अस्मिता असलेल्या मराठीचा ठराव एकमताने संमत व्हावा असे मला वाटते. या ठरावावर मतदान होऊ नये असे मला वाटते. मतदान टाळावयाचे असेल तर आपण सरकारला सूचना करावी.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, संयुक्त महाराष्ट्राचे हे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे याचा विचार करुन शासनाने हा ठराव स्वीकारावा अशी मी विनंती करते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, आपण दहा मिनिटांकरिता सभागृहाचे कामकाज स्थगित करावे अशी माझी विनंती आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना मी विनंती करतो की, हा फक्त अंमलबजावणीचा प्रश्न आहे. ती अंमलबजावणी विशिष्ट काळामध्ये करण्याबाबत सदनामध्ये ठरविले तर प्रश्न येणार नाही. या ठरावाच्या बाबतीत मतदानाची मागणी करणे योग्य होणार नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य मला सहकार्य करीत आहेत त्याबद्दल धन्यवाद. या ठरावामध्ये असे म्हटले आहे की, "राज्यातील केंद्र शासनाच्या सर्व कार्यालयांमधून मराठी भाषेचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्यासाठी विशेष उपाययोजना करावी, या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे." याबाबतीत काही हरकत आहे काय ?

उपसभापती : माननीय मंत्रिमहोदयांनी आपल्याला विनंती केलेली आहे त्याप्रमाणे आपण आपला अशासकीय ठराव मागे घेणार आहात काय ?

श्री. दिवाकर रावते : नाही.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, विधानसभेमध्ये या अगोदर अशा प्रकारचे एकदोन नव्हे तर 29 ठराव पास झाले. त्यामुळे याबाबतीत आपल्याला काही अडचण नाही. आपण महाराष्ट्रामध्ये बसलो आहोत. मराठी आपली मायबोली आहे. ज्यावेळी भाषावार प्रांतरचना झाली त्यावेळी मराठी सोडून बाकीच्या राज्यामध्ये हे झाले आहे. आपण नवीन काही करीत नाही. आपल्याला याबाबतीत का लाज वाटावी ? आपल्याला तो अधिकार आहे. याबाबतीत कोण लहान आणि कोण मोठे असा प्रश्न उद्भवत नाही. आपणा सगळ्यांचा तो विषय आहे. आपणा सगळ्यांची ती अस्मिता आहे. हा प्रश्न कोणत्याही प्रतिष्ठेचा न मानता हा ठराव मंजूर करण्यामध्ये अडचण येऊ नये असे मला वाटते.

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार : सभापती महोदय, या सदनाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मराठी भाषेच्या संदर्भात राज्य शासनाने केंद्र सरकारकडे आग्रही भूमिका घ्यावी अशा आशयाचा अशासकीय ठराव या सभागृहात मांडलेला आहे. या ठरावाबाबत दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांमध्ये दुमत असण्याचे कारण नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये आपण सर्वजण आहोत. माझी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना एवढेच सांगेन की, आपण काही काळ सरकारमध्ये होता. अलिकडच्या काळामध्ये आम्ही सरकारमध्ये आहोत. आज आपण विरोधी पक्षाचे सदस्य या नात्याने हा अशासकीय ठराव आणलेला आहे. हा ठराव आज आपण मागे घ्यावा अशी आपल्याला विनंती करतो. या विषयाचा ठराव हे अधिवेशन संपण्यापूर्वी शासनातर्फे मांडला जाईल. त्यावेळी हा ठराव एकमताने मंजूर करुन तो केंद्र सरकारकडे आग्रह करुन पाठवू. तुम्ही आणि आम्ही मराठी माणसे आहोत. मराठी माणसांना मराठी भाषेचा अभिमान आहे याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. राज्य सरकार आपल्या मताशी सहमत आहे. याबद्दल शंका बाळगू नये. मी माननीय उपसभापती यांच्यामार्फत आपल्याला विनंती करतो की, आपण हा ठराव मागे घ्यावा. सत्ताधारी पक्षाकडून हा ठराव आणला जाईल त्यावेळी आपण पाठिंबा द्यावा.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, विरोधी पक्षाकडून आलेल्या ठरावाला सरकारने पाठिंबा न देण्याचे कारण काय ? सत्ताधारी पक्षाकडून आलेला ठरावच मंजूर झाला पाहिजे असा शासनाने आग्रह का धरावा ? शासनाने उगाचच एकमेकांच्या प्रतिष्ठेचा प्रश्न निर्माण करु नये. मराठी भाषेच्या प्रश्नासाठी आम्ही सगळेजण एक होऊ शकतो असे या ठरावाच्या निमित्ताने शासनाने दाखवून द्यावे. सत्ताधारी पक्ष असेल किंवा विरोधी पक्ष असेल असा भेदभाव न ठेवता आम्ही सगळे एक आहोत, मराठी मायबोलीसंबंधीचा ठराव विरोधी पक्षाकडून आल्यानंतर आम्ही तो मान्य करु शकतो असा चांगला पायंडा पाडू शकता. तेव्हा कोणीही प्रतिष्ठेचा प्रश्न न करता आपण सगळयांनी मराठीचा आदर ठेवला पाहिजे. सत्ताधारी पक्षाकडून ठराव आला म्हणून मंजूर करावा आणि विरोधी पक्षाकडून ठराव आला म्हणून तो मंजूर करु नये असे कशासाठी, त्याच्या पाठीमागचा उद्देश काय आहे ? सरकारने हा ठराव मंजूर केला तर आम्ही शासनाचे आभार मानू. या ठरावाला सरकारने पाठिंबा

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KGS/ KTG/ MMP/

श्री.रामदास कदम.....

दिला तर बाहेर जाऊन प्रेससमोर आम्ही आभार मानू. सत्ताधारी पक्षाने आपल्या मनाचा मोठेपणा दाखवून मराठीसाठी कोणताही भेदभाव न ठेवता आम्ही एक आहोत अशी भावना निर्माण केली तर आम्ही तशी भावना घेऊन प्रेससमोर जाऊ. यासाठी आम्ही शासनाचे आभार मानू. परंतु मराठी भाषेसाठी शासनाने हा प्रश्न प्रतिष्ठेचा करु नये. सभापती महोदय, आपण याबाबत योग्य तो निर्णय द्यावा अशी मी आपल्याला विनंती करतो.

उपसभापती : सन्माननीय मंत्री महोदय श्री.अजित पवार, संबंधित मंत्री महोदय आणि सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी माझ्या दालनामध्ये यावे. या प्रश्नासंबंधी तोडगा काढण्यासाठी मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक संध्याकाळी 6.58 ते 7.10 पर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री.ओटवणेकर.....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगिती नंतर)

<u>सभापतीस्थानी तालिका सभापती ॲड अनिल परब</u>

तालिका सभाध्यक्ष (ॲड.अनिल परब) : सभागृहाची बैठक मी दहा मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 7.10 ते 7.20 पर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री.शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

(सभापतीस्थानी तालिका सभापती ॲड. अनिल परब)

तालिका सभापती : सभागृहाची बैठक आणखी 15 मिनिटे तहकूब करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 7.20 ते 7.35 पर्यन्त स्थगित झाली.)

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>स्थगितीनंतर</u>

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रमेश शेंडगे)

तालिका सभापती : सभागृहाची बैठक 30 मिनिटांसाठी स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 7.35 ते 8.05 पर्यंत स्थगित झाली)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ KTG/ MMP/ D/

20:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

<u>अशासकीय ठराव क्र. 11 संबंधी</u>

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या सदनामध्ये मी माझा प्रस्ताव मांडलेला आहे. या प्रस्तावाच्या संदर्भात मी सुरुवातीपासूनच ठाम भूमिका घेतलेली आहे. हा प्रस्ताव मी मागे घेणार नाही हे मी सुरुवातीसच सांगितले होते कारण हे वर्ष या महाराष्ट्र राज्याचे सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे त्यामुळे मराठीच्या अस्मितेचा हा मुख्य विषय आहे. हा प्रस्ताव मागे घेण्याच्या संदर्भात आपण सुध्दा मला विनंती केली होती. मराठीच्या बाबतीत या शासनावर विश्वास ठेवावा असे हे शासन नाही. माझ याकडे सिनिअर सिटीझनची कार्डस् आहेत,

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ...

त्या कार्डावर तहसीलदारापासूनचा सर्व उल्लेख इंग्रजीतून करण्यात आला आहे. 2007 साली मला या सदनामध्ये असा शब्द दिला होता की, "अत्यंत कडवटपणे मराठीचा वापर करु" परंतु त्याप्रमाणे मराठीचा वापर केला जात नाही. सभापती महोदय, मला अत्यत खेदाने नमूद करावेसे वाटते की, आज सभागृहामध्ये करमणूक करासंबंधीचे जे विधेयक आले होते त्या विधेयकाची इंग्रजी प्रत माझ्या कडे आहे.तेव्हा त्यामध्ये सुधारणा करण्यास जर शासन तयार नसेल तर आम्ही काय करावयाचे ? त्या विधेयकामध्ये असे म्हटलेले आहे की , "...Further to amend the Bombay Entertainments Duty Act,1923 " या ठिकाणी बॉम्बेचा उल्लेख "मुंबई "असा करण्यास देखील शासन तयार नाही. आजच्या विधेयकासंबंधीचे हे उदाहरण आहे.तेव्हा या सरकारवर आम्ही विश्वास का ठेवावयाचा ? सभापती महोदय, या बाबतीत आपणच आम्हाला मार्गदर्शन करावे. मराठीच्या बाबतीत आजही पावलो पावली अवहेलना होत असेल तर आम्ही सरकारवर विश्वास ठेवून हा ठराव मागे का घ्यावयाचा ? असा माझा प्रश्न आहे. तेव्हा सभापती महोदय, याबाबतीत आपण आम्हाला जे काही मार्गदर्शन कराल ते आम्ही स्वीकारु परंतु मराठीच्या संदर्भातील प्रस्तावाला आजच मंजुरी दिली गेली पाहिजे आणि महाराष्ट्रातील मराठीचा सन्मान
झाला पाहिजे अशी माझी आपल्याला आग्रहाची विनंती आहे.

सभापती : सदनातील दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य चर्चा करण्यासाठी माझ्या दालनात जवळजवळ अर्धा ते पाऊण तास एकत्रित बसले होते. मराठी आपली राज्य भाषा आहे त्या राज्यभाषेची प्रतिष्ठा या सदनातील प्रत्येक सन्माननीय सदस्यांच्या कृतीने या राज्यात सिध्द झाली पाहिजे या विचारानेच सर्व सन्माननीय सदस्य माझ्या दालनात बसले होते व त्या बाबतीत चर्चा केल्यानंतर सर्वांनी एकत्रित विचार केला असून या सबंधी आपल्या सर्वाच्या भावना ठरावाच्या माध्यमातून व्यक्त करण्याच्या दृष्टीने आपण सर्वांनी संमती दिली . त्या प्रमाणे मी या ठिकाणी ठराव मांडत आहे. सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांनी याबाबतीत अशा भावना व्यक्त केली की, राज्यभाषेच्या अनुषंगाने मराठीची प्रतिष्ठा टिकवली पाहिजे , वाढवली पाहिजे . तसेच या दृष्टीने सदनातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांचा सातत्याने आग्रह असतो. या ठिकाणी त्यासबंधी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

चर्चा होत असतांना ज्या बाबीसबंधी चर्चा करण्यासाठी दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य माझ्या दालनात एकत्रित बसले होते त्या चर्चेमध्ये जो काही विचार पुढे आला होता त्या दृष्टीने आपल्या सर्वांच्या भावना आणि महाराष्ट्रातील सर्व जनतेच्या भावना लक्षात घेऊन मी हा ठराव मांडत आहे...

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, तत्पूर्वी माझी आपल्याला एक विनंती करावयाची आहे. आज जे विधेयक सभागृहासमोर आले होते त्यामध्ये " मुबईचा " उल्लेख "बॉम्बे" असा करण्यात आला होता. त्याबद्दल सरकारने माफी मागितली पाहिजे. सरकारने माफी मागितल्यानंतरच आपण यासबंधीचा ठराव मांडावा. या संदर्भात सरकाराची मानसिकता काय आहे हे मला समजले पाहिजे. आजच्या विधेयकामध्ये इंग्रजी प्रतीमध्ये "मुंबई" ऐवजी "बॉम्बे" असा उल्लेख करण्यात आला होता. जो पर्यंत शासन माफी मागत नाही तोपर्यंत पुढचा ठराव मांडण्यात येऊ नये. मराठीचा वापर करण्यासंबंधी शासनाची मानसिकताच नाही.

सभापती : या बाबतीत मी शासनाला एवढेच सांगतो की, "बॉम्बेचा " उल्लेख "मुंबई " करण्याच्या दृष्टीने शासनाने लवकर कायद्यात लवकर सुधारणा करावी.

श्री.छगन भुजबळ (बसून) : 1923 सालचा हा ॲक्ट आहे.

श्री.दिवाकर रावते : त्या ॲक्टचे नाव शासनाने का बदलले नाही ? केन्द्र सरकारला आम्ही याबाबतीत वारंवार सांगत असतांना राज्य सरकारने या ॲक्टचे नाव का बदलले नाही ? माननीय उप मुख्यमंत्र्यांनी उभे राहून आम्हाला असे सांगावे की, आज जे विधेयक सभागृहासमोर आले होते त्यामध्ये "बॉम्बे" असा उल्लेख आहे तेव्हा त्यात सुधारणा करण्यासाठी आम्ही उद्या सुधारणा विधेयक आणतो. हा ॲक्ट त्या वेळचा होता असे सांगून आपण त्याचे समर्थन का करीत आहात ? सन्माननीय उपमुख्यमंत्र्याना मी सांगू इच्छितो की, या सभागृहामध्ये तुम्ही नेते म्हणून बसलेला आहात आणि हे सांगत असतांनासुध्दा तुम्हाला कोठे तरी खंत वाटावयास हवी होती. गेट वे ऑफ इंडिया जवळ तुमच्या हाताने तुम्हीच " मुंबई " अशी पाटी लावली आहे तेव्हा तुम्ही असे सांगावयास पाहिजे होते की, बॉम्बे असा उल्लेख त्या विधेयकात करण्यात आलेला आहे परंतु त्यात दुरुस्ती करण्यात येईल.

श्री.छगन भुजबळ (बसून): 1923 सालचा तो ॲक्ट आहे.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : इतक्या दिवसात त्यामध्ये दुरुस्ती का केली नाही. ? या संबंधी आपण उभे राहून खुलासा करावा. माननीय शिवसेना प्रमुखांना बोलावून गेट वे ऑफ इंडिया जवळ "मुंबई" अशी पाटी तुमच्या हाताने लावली होती तेव्हा मुंबई या शब्दाचा तेवढा तरी सन्मान आपण करावा व याबाबतीत शासन काय करणार आहे यासंबंधी उभे राहून खुलासा करावा. यासंबंधात समर्थन न करता ताबडतोब काय करणार आहात हे सांगावे आणि आतापर्यंत ते न केल्याबद्दल दिलगिरी व्यक्त करावी.

श्री.छगन भुजबळ (बसून) : चेक करुन पाहतो.

श्री.दिवाकर रावते : यामध्ये चेक करण्यासारखे काही नाही. "बॉम्बे ॲक्ट" असा उल्लेख करण्यात आलेला असल्यामुळे त्यामध्ये बदल करतो असे आपण सांगावे.

श्री.छगन भुजबळ (बसून) : त्यावेळचा हा कायदा आहे.

नंतर श्री.सरफरे

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : त्यावेळी तो कायदा झाला असला तरी तो आम्ही बदलू असे सांगा.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी जी भावना व्यक्त केली आहे त्याची शासनाने योग्य पध्दतीने दखल घ्यावी.

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, हा 1923 सालचा कायदा असून त्यावेळी असलेले विधेयकाचे नाव याठिकाणी उद्धृत केले आहे. माननीय सदस्यांच्या भावनांशी मी सहमत आहे. 1923 साली जो कायदा संमत झाला त्याचा संदर्भ जसाच्या तसा याठिकाणी देण्यात आला आहे. त्याबाबतीत जी काही दुरुस्ती करणे आवश्यक असेल ती तपासून केली जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: त्रिभाषा सूत्रानुसार प्रादेशिक भाषेचा वापर केंद्र शासकीय कार्यालये, महामंडळे व इतर तत्सम संस्थांमध्ये करणे

मु.शी.: त्रिभाषा सूत्रानुसार प्रादेशिक भाषेचा वापर केंद्र शासकीय कार्यालये, महामंडळे व इतर तत्सम संस्थांमध्ये करणे यासंबंधी सभापतींचा ठराव

सभापती : सन्माननीय सदस्यांच्या माहितीसाठी मी सांगू इच्छितो की, सर्व पक्षांच्या नेत्यांशी चर्चा करुन, माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी मांडलेल्या अशासकीय ठरावामधील मसुद्यामध्ये बदल करुन सर्वांच्या संमतीने तयार केलेला पुढील ठराव मी मांडावा, असे ठरले असून, त्याप्रमाणे मी पुढील ठराव मांडतो.

"महाराष्ट्र राज्याचे हे सुवर्ण महोत्सवी वर्ष असून, महाराष्ट्र राज्यात मराठी भाषेचा अधिकाधिक वापर होणे नितांत गरजेचे आहे. केंद्र शासनाच्या त्रिभाषा सूत्रानुसार केंद्र शासनाने वेळोवेळी याबाबत प्रादेशिक भाषेचा (राज्यभाषा) वापर करण्याबाबत दिलेल्या सूचना, ही वस्तुस्थिती लक्षात घेता, राज्यातील केंद्र शासनाची कार्यालये, महामंडळे व इतर तत्सम संस्थामध्ये वरील सूचनांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी, राज्यशासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा अशी शिफारस ही विधान परिषद शासनाकडे करीत आहे".

थोडे थांबून, या ठरावाला सर्वांचा पाठिंबा आहे काय? कोणाचाही विरोध नाही म्हणून हा ठराव एकमताने संमत झाला आहे, असे मी जाहीर करतो.

ठराव एकमताने संमत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/KTG/KBS

पृ शी / मु.शी : अशासकीय ठराव क्रमांक 26 बाबत

सभापती : माननीय सदस्य श्री. राजन तेली यांचा आजच्या कार्यक्रमपत्रिकेवरील दुसऱ्या क्रमांकावरील अशासकीय ठराव चर्चेला घ्यावयाचा काय?

श्री. राजन तेली : सभापती महोदय, माझा अशासकीय ठराव पुढील शुक्रवारी घेण्यास माझी हरकत नाही.

सभापती : ठीक आहे, माननीय सदस्यांचा अशासकीय ठराव पुढे ढकलण्यात येत आहे.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या शनिवार, दिनांक 20 मार्च, 2010 रोजी सकाळी 10.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक रात्री 8 वाजून 27 मिनिटांनी, शनिवार, दिनांक 20.3.2010 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

****

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही